

आवर्तन प्रतिष्ठान आयोजित
शतकपूर्ती संगीत महोत्सव

## स्व. पं. शांताराम चिगरी गुरूजी यांना समर्पित...!

## अनुक्रमणिका


लातुरचे आश्वासक संगीत 'आवर्तन'....................................अतुल देऊळगावकर (२)

रंजयति इति राग:............................................................ किरण भावठाणकर (४)

लातूर जिल्ह्यातील संपन्न सांगीतिक वारसा............................ डॉ. संदीपान जगदाळे (७)

संगीत सांगाती मराठवाडा................................................ डॉ. वृषाली देशमुख (११)

बंदिशीचे विषय समाज, देश हे असु शकतील का ? :- मुक्तचिंतन.............प्राणेश पोरे (१४)

आवर्तन मासिक संगीत सभेची शताब्दी............................... डॉ. संदीपान जगदाळे (१६)

अभिजाततेचं ध्यासपर्व................................................ अतुल देऊळगावकर (१८)

प्रज्ञाचक्षु - पं.शांताराम चिगरी गुरूजी................................ प्रा.हरीसर्वोत्तम जोशी (२५)




# लातुरचे आश्वासक संगीत 'आवर्तन'

अतुल देऊळगावकर

संपर्क: ९४२२०७१९०५



**' संगीत ही मानवजातीची मूलभूत व आदिम अभिव्यक्ती आहे. आपल्या मेंदूचा अधिकाधिक भाग हा संगीताने व्यापलेला असतो, भाषेने नव्हे. अमूर्त वाटणारे संगीत हे थेट हृदयाला भिडत असल्यामुळे संगीत हे रसायनाविना प्रभावी औषध आहे. '' मेंदूशास्त्रज्ञ व लेखक डॉ.ऑलिव्हर सॅक्स**

असंख्य शब्दांना आपल्या काळजाचा ठाव घेता येत नाही पण एखादा सूरच आत जाऊन का भिडतो? ह्या प्रश्नाच्या खोलात न जाता आपण संगीताचा आस्वाद घेत असतो. परंतु अशा प्रश्नाच्या मुळाशी जाण्याचे कष्ट हे शास्त्रज्ञ घेत असतात. मेंदूशास्त्रज्ञ डॉ.ऑलिव्हर सॅक्स यांनी, संगीताचा आपल्या मनावर काय, कसा व किती परिणाम होतो, ह्या रहस्यांचा उलगडा करून घेण्याचा ध्यास घेतला होता. ' म्युझिकोफिलिया– टेल्स ऑफ म्युझिक अँड द ब्रेन ' ह्या ग्रंथात डॉ.सॅक्स म्हणतात, ''अतिशय उच्च भावनिक अवस्था प्राप्त करून देण्याची क्षमता ही केवळ संगीत आणि संगीतामध्ये आहे. विषण्णता दूर करणे, स्मृती जागी करणे, इतकेच काय? आनंदाने नाचायला लावण्याची किमया संगीत करू शकते. थोडक्यात मनुष्य ही एक सांगीतिक प्रजाती आहे. '' हे विधान ते विनाकारण करीत नाहीत. असाध्य रोगांनी ग्रासलेल्या व्यक्तीं या सामान्य व्यक्ती आणि संगीततज्ञांशी प्रदीर्घ चर्चा, निरीक्षण व त्यावर चिंतन व संशोधन करणाऱया शास्त्रज्ञांचे हे विश्लेषण आहे. '' कंपवात, विस्मृती, निद्रानाश यांसारख्या आजारातून बाहेर काढण्याची विलक्षण शक्ती संगीतामध्ये आहे.'' डॉ.सॅक्स यांचा हा सिध्दांत आता सर्व जगाने स्वीकारला आहे.

संगीतामध्ये अनेक प्रकार असले तरी अभिजात भारतीय संगीताची क्षमता असामान्य आहे. वाग्गेयकार पं.कुमार गंधर्व यांनी 'कुठल्याही भाव–भावना अभिव्यक्त करणारी कला' अशी आपल्या संगीताची महती सांगितली आहे. संगीत हे जात–धर्म–वर्ग व स्तर सर्व काही ओलांडून सर्वांना आवाहन करत असते. हे जाणणारे उस्ताद बडे गुलाम अली खान म्हणत ' घराघरातून भारतीय शास्त्रीय संगीताच शीकवले असते तर फाळणी झालीच नसती.'

अनेक पिढ्यांनी ही कला जपून ठेवली आहे. सध्याच्या लक्ष विचलित करणाऱ्या काळात शांतता, एकाग्रता व एकांतवासात आत्मसंवाद घडविण्यासाठी भारतीय अभिजात संगीत हा मार्ग अनुसरणारे असंख्य आहेत व त्यांच्यात वाढही होत आहे. ही जाण ठेवून लातूर येथील 'आवर्तन' ही संस्था दर महिन्याला संगीतसभेचे आयोजन करीत आहे. हल्ली अभिजात गायकांना बाजारातील मागणीनुसार नाट्यगीत, भजन, गझल असे उपप्रकार गावे लागतात. परंतु 'आवर्तन' मात्र अभिजात संगीताच्या संवर्धनाबाबत

आग्रही आहे. तब्बल ९९ महिने हे कार्य सातत्याने चालू आहे. ह्या काळात पं.जयतीर्थ मेवुंडी, पं.रघुनंदन पणशीकर, मंजुषा पाटील, नवनीता चौधरी, जयंत केजकर, विठ्ठल जगताप, प्राजक्ता मराठे, अंजली, नंदिनी व अंगद गायकवाड यांचे गायन तर पं.सचिन पटवर्धन यांचे अभिजात गिटार वादन, पं.सुभाष गोसावी यांचे मोहन वीणा वादन, सौरभ वर्तक यांचे बासरी वादन, पंकज शिरभाते यांचे व्हायोलिन वादन, कपिल जाधव यांचे सुंद्री वादन, इशिता व इशानी कुलकर्णी यांचे भरतनाट्यम, आशिष मिश्रा यांचे धृपद गायन असे वैविध्यपूर्ण कार्यक्रम घेतले गेले. तसेच श्रोत्यांची अभिरूची वृद्धींगत व्हावी, यासाठी संगीताच्या रसग्रहणाचे विशेष सत्रही आयोजित केले. पं.राम मराठे यांच्या गायकीविषयी सप्रयोग व्याख्यानाकरिता पं.राजेंद्र मणेरीकर यांना आमंत्रित केले होते. तर पं.राहुल देशपांडे यांची प्रकट मुलाखत घेऊन डॉ.वृषाली देशमुख यांनी श्रोत्यांच्या वतीने संवाद साधला. पं. कुमार गंधर्व यांची गानवैशिष्ट्ये सादर करणारे 'कुमार दर्शन' आणि 'वसंत ऋतु दर्शन' हे कार्यक्रम सादर केले. हा सर्व खटाटोप करताना काटकसरीचे सर्व उपाय अंमलात आणण्याची किमया 'आवर्तन' साधत आहे. कलावंत अत्यल्प व नाममात्र मानधन घेतात. तसेच त्यांची निवास व्यवस्था ही कार्यकर्त्यांच्या घरीच केली जाते. 'अष्टविनायक प्रतिष्ठान'च्या सक्रिय पाठबळामुळे त्यांना गणेश सभागृह विनाशुल्क उपलब्ध होते. थोडक्यात 'आवर्तन'च्या ह्या अथक प्रयत्नांना सर्व स्तरातून पाठबळ मिळत असल्यामुळे ती एक सर्वसमावेशक संगीत प्रसाराची चळवळ झाली आहे. दर महिन्याची सभा उत्तम दर्जाची व्हावी यासाठी अनेक जण झटत असतात. यामुळेच पाहता पाहता 'आवर्तन' चे नाव ऐकताच अनेक कलावंत तात्काळ राजी होऊ लागले, अशी ख्याती लातूरकरांना लाभली आहे. अशा 'आवर्तनाची' शतकपूर्ती सर्वांसाठी अतिशय अभिमानस्पद आहे. त्यानिमित्त दोन दिवसांचा संगीत महोत्सव आयोजित केला जात आहे.

विख्यात गायक, तबलजी व संगीत प्रसारक गुरूवर्य पं.शांताराम चिगरी यांना समर्पित केलेल्या ह्या महोत्सवात पं. एम. वेंकटेशकुमार, विदुषी डॉ. अश्विनी भिडे–देशपांडे, सतारवादक शाकीर खान व कथ्थक नृत्यकार गौरव व सौरव मिश्र हे सहभागी होत आहेत.

संगीतामध्ये, ज्या बिंदूपासून आरंभ केला तिथेच येऊन वर्तुळ पूर्ण केले की आवर्तन होते. अनेक आवर्तने, प्रत्येकात नावीन्य व कल्पकता साधण्याच्या प्रयत्नात गायक असतात आणि आस्वादक ह्या आवर्तनांचा आनंद घेत राहतात. पुढचे आवर्तन कसे असेल याची उत्कंठा श्रोत्यांना लागुन राहते. गायक व व श्रोते यांच्यात एक अमूर्त संवाद घडत राहतो. गायक स्वरांतून चित्र साकारतात, मूर्ती घडवतात व श्रोते त्यांच्या क्षमतेनुसार त्या अभिव्यक्तीपर्यंत पोहचत राहतात. 'आवर्तन' ही संस्था त्यांचे नामाभिधान सार्थ करीत अभिजात संगीताचे संवर्धन करण्याचे अपूर्व कार्य करीत आहे. याकरिता त्यांचे अभिनंदन करीत त्यांना धन्यवाद देणारे अनेक आहेत. परंतु त्यांच्या मैफलीत सहभागी होऊन, पुढील पिढ्यांना हा वारसा दिला तर 'आवर्तन' ही उत्तरोत्तर भरीव कामगिरी करीत राहील.

संगीतामध्ये उत्तम श्रोत्याला अंतर्मुख करण्याची व स्वत:च्या वर्तनात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता आहे. त्यासाठी कानही तयार करणे आवश्यक आहे. पं.भीमसेन जोशी सांगत,'' नीट ऐकूच येत नसेल तर व्यवस्थित गाताही येत नाही.'' श्रोत्यांच्या मनाला पंख लावून विहरविण्याची क्षमता फक्त आणि फक्त संगीतामध्येच आहे. असा विहार करण्याची आकांक्षा असणाऱ्यानी व इतरांना तशी अनुभूती देण्याकरिता आपल्या दाराशी नित्यनियमाने होत असलेल्या 'आवर्तनात' सहभागी होणे, हे सुसंस्कृत व्यक्तींचे कर्तव्य आहे. संगीतासारख्या विराट क्षेत्राचा आस्वाद घेणारे अनेक स्तरांवर असतात. कोणी वरवर भिजतात, कोणी चिंब होते तर कोणी खोलवर बुडी मारतात. 'आवर्तन'मुळे सर्व प्रकारच्या रसिकांना अधिक खोल जाण्याची संधी मिळत आहे.

चिगरी गुरूजी यांचे शिष्य राज्यभर पसरले आहेत. भिमाशंकर अप्पा पंचाक्षरी यांनी केलेल्या संगीतप्रसाराची ख्याती आजही सर्वश्रुत आहे. विपरित परिस्थितीत केलेल्या पराकाष्ठेमुळे लातूरमधील सांगीतिक पर्यावरण हे वरचेवर संपन्न होत गेले. ह्या परंपरेला साजेल अशी भर घालून रसिकांची अभिरूची संपन्न करण्याचे कार्य 'आवर्तन' करीत आहे.

# रंजयति इति रागः

किरण भावठाणकर, लातूर

संपर्क: ९४२३०४५०७५



भारतीय शास्त्रीय संगीतामध्ये शास्त्रकारांनी" रंजयति इति राग:" अशी रागाची व्याख्या केली आहे जो रंजन करतो तो राग.प्राचीन काळी भरतमुनी, शारंग देव, मतंग मुनी आदींनी आपल्या संगीत व नाट्यविषयक ग्रंथातून राग संगीत यावर विस्तृत असे विवेचन केले आहे.तर **योऽयं ध्वनि विशेषस्तु स्वरवर्णविभूषित:। रंजको जनचित्तानां स राग:कथ्यते बुधै।। अशी व्याख्या "अभिनव राग मंजिरी "** या ग्रंथात केली आहे.

म्हणजे स्वरांचे विविध वर्ण आणि ध्वनीविशेषता यांचा मेळ करून जी रंजकता निर्माण होते, जे नादमाधुर्य निर्माण होते ते म्हणजे 'राग'अशी थोडी व्यापक व्याख्या केली जाते. आपल्याकडे अनेक विद्वानांनी वेगवेगळ्या व्याख्या करून त्या त्या शास्त्राकडे बघण्याचा अथवा संकल्पनेचा दृष्टिकोन व्यक्त केला. उदा: मानसशास्त्र, भौतिकशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास ,भावना, बुद्धी व कल्पना इत्यादी. अभ्यासक व विद्यार्थी या सर्वांच्या व्याख्यांचा योग्य विचार करून त्या त्या शास्त्राचे वा संकल्पनेचे बृहद पैलू पुढे आणतात व त्यातून त्या विषयाचे सखोल आणि समग्र स्वरूप पुढे येते. कोणत्याही एका विषयावर अथवा शास्त्रावर कोणा एकाची मक्तेदारी नसतेच, तेव्हा संगीतशास्त्रही त्यास अपवाद नसावे. इसवीसनापूर्वीपासून आजतागायत अनेक घडामोडी झाल्या. अनेक विषयांची दिशा व व्याप्ती बदलत गेली. त्यामध्ये संगीत म्हणजे भारतीय संगीत व खास करून भारतीय शास्त्रीय संगीत याकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा ही अधिक सखोल आणि विस्तृत होत गेला. म्हणून पहिली व्याख्या, रंजयती इति राग: ही व्याख्या खूप मर्यादित स्वरूपाची आहे काय? असा प्रश्न पडतो. त्या मानाने "योऽयं ध्वनी विशेषस्तु:" या व्याख्येत अधिक स्पष्टता येते. परंतु तीही पुरेशी नाही असे वाटते.साधारणतः दीडशे वर्षांपूर्वी पंडित विष्णु नारायण भातखंडे यांनी भारतभर भ्रमण करून जे संशोधन केले, जी ग्रंथसंपदा उपलब्ध केली त्यास तोड नाही. दक्षिणेतील पं. व्यंकटमखी यांनी राग जाती आरोह अवरोह यांचा उपयोग करून ७२ थाटांमध्ये राग संख्येची विभागणी केली. त्यानुसार ३४८४८ एवढे राग उत्पन्न होऊ शकतात.या सर्व रागांचा अभ्यास करण्यासाठी मनुष्यास अनेक जन्म घ्यावे लागतील. दुसरा प्रश्न असा येतो की या सर्वच रागातून रंजकता निर्माण होईल का? रंजकतेचे नेमके निकष काय? यामध्ये संदिग्धता असू शकते. शास्त्रामध्ये रागाचे नियम आहेत. त्यातून राग कशाला

म्हणावे हे समजते पण रंजकतेचे काय?रागाचा एक नियम म्हणजे –राग रंजक असला पाहिजे. एवढ्या चार शब्दावरून रंजकता ही कशी निर्माण होऊ शकते हे समजत नाही .स्वरांचे विविध वर्ण आणि ध्वनी विशेषता यांच्या उत्कृष्ट मेळातून राग रंजन होते. पुन्हा प्रश्न येतो की स्वरांचे वर्ण आणि ध्वनी विशेषता यांच्या मोजमापाचे निकष काय? वास्तविक पाहता रागगायन ही मनोव्यवहाराची अवस्था उच्च कोटीस नेण्याची प्रक्रिया आहे. म्हणजेच गणितीय प्रक्रियेनुसार निर्माण होणारे राग हे रंजक असतीलच असे नाही. म्हणून व्यंकटमखीच्या ७२ थाटांची संख्या संक्षिप्त करून हिंदुस्तानी पद्धतीमध्ये ३२ थाटांची बांधणी केली गेली, तदनंतर पं.विष्णु नारायण भातखंडे यांनी केवळ दहा थाटामध्ये ही विभागणी करून थाटपद्धती सुकर केली. अर्थात ही थाट पद्धती विशिष्ट रागांपुरती मर्यादित असूनही उपयुक्त राहिली.परंतु जोड व मिश्र राग संकल्पनेमध्ये अनेक राग थाटसंकल्पनेच्या चौकटीत बसू शकत नाहीत. इथून पुढे रागांग पद्धती काम करू लागते,परंतु याचा किंवा या पुढील टप्प्याची आपणास येथे चर्चा करावयाची नाही.तो स्वतंत्र विषय आहे,असो. येथे आपणास थाट या संकल्पने ऐवजी राग व रागसंख्येची मर्यादा'यावर भर द्यावयाचा आहे. यानुसार सध्या प्रचलित ऐंशी नव्वद तर अप्रचलित व अनवट राग तीस ते चाळीस असे साधारण १२० ते १३० च राग प्रचारात असल्याचे संभवते.

पूर्वीच्या काही गायन पद्धतीचा उपयोग केवळ ईश्वर आराधना करण्यासाठी व्हावयाचा. यामध्ये ऋचागायन, सामगायन व मंत्र पठण यांचा समावेश व्हावयाचा. केवळ मंत्र पठण आणि ईश्वर आराधना असा विषय असल्यामुळे रंजकता यास प्राधान्य असल्याचे संभवत नाही. जसा जसा रागसंगीताचा परीघ विस्तारून सामान्य पर्यंत म्हणजे श्रोत्यांपर्यंत जाऊन पोहोचला तशी तशी याची चिकित्सा होऊ लागली. हे श्रोते या रागसंगीताचा उपयोग श्रवणानंदासाठीच करीत असल्यामुळे रंजकता यास महत्त्व प्राप्त झाले.श्रोता म्हणून मला काय आवडते, कसे आवडते यामध्ये विभिन्नता आढळून आली. तेव्हा सामुहिक स्वरूपात श्रोतृवर्ग असेल तर रंजकतेचे नियम कसे असावेत यावर विचार केला गेला असल्याचे जाणवते. म्हणजे श्रोता हा केंद्रस्थानी आहे असेच म्हणावे लागेल. या ठिकाणी श्रोता म्हणजे जाणकार श्रोता असे गृहीत धरावे, यास प्रत्यवाय नाही.आता श्रोत्यांचे मनोरंजन करणे वा होणे म्हणजे त्याच्या चित्तवृत्ती उद्दीपित झाल्या पाहिजेत,त्यातून याचा संबंध हा रसनिर्मितीशी येतो. वास्तविक पाहता संगीत हे सापेक्ष आहे ज्याला जे जे आवडेल ते त्यास संगीत म्हणून रंजक वाटेल.

भारतीय शास्त्रीय संगीतास क्लासिकल म्युझिक असे संबोधतात. विख्यात संगीतकार पं. के.जी. गिंडे बुवा गंमतीने म्हणायचे"क्लासमध्ये शिकवले जाते ते क्लासिकल म्युझिक" संगीताचा मानवी जीवनाशी अत्यंत घनिष्ठ असा संबंध आहे.त्यामुळे मला संगीत आवडत नाही असे म्हणणारा मनुष्य विरळाच. कदाचित त्याच्या सांगीतिक आवडीनिवडी वेगवेगळ्या असू शकतील परंतु संगीत आवडत नाही अशी शक्यता नसावी. रंजकतेच्या निकषानुसार एखादा श्रोता असे म्हणू शकतो की मला अमुक राग आवडतो, अमुक नाही. रंजकतेच्या निकषानुसार हे ग्राह्य धरले जाऊ शकत नाही. राग हा रंजक आहेच! तो श्रोत्यांना आवडावा न आवडावा ही व्यक्ती सापेक्षता आहे.आणि दुसरे म्हणजे श्रोता म्हणजे जाणकार श्रोता असे गृहीत धरले तर असे संभवत नाही. एखादा राग रंजकतेच्या मांडणीनुसार रंजकच आहे असे गृहीत धरले तर तो रंजकच वाटला पाहिजे पण असे नाही झाले तर दोन गोष्टी उद्भवतात. एक म्हणजे त्या गायकास तो राग अधिक प्रभावीपणे सादर करण्यास अपयश आले किंवा दुसरे म्हणजे तो सामान्य श्रोता आहे, जाणकार नाही असे गृहीत धरावे लागेल यात रागाचा दोष नाही राग हा रंजक असतोच पण त्याची सांघिक रचना जर कलाहीन असेल तर श्रोत्यांना आवडणार नाही.आणि सामान्य श्रोत्यांच्या मते तो राग ब्लॅकलिस्टमध्ये टाकला जाईल.मग दोष रागाचा आहे असे थोडेच म्हणता येईल? सध्याच्या जमान्यात गुरुकुल पद्धती नष्टप्राय झाल्याचे दिसते. त्या ऐवजी मोठ्या प्रमाणावर संगीत विद्यालये सुरू झाली. त्यात वावगेही काही नाही. पूर्वीप्रमाणे गुरुगृही राहून एका रागाचा दीड दोन वर्षे अभ्यास करणे हे आता दुर्मिळच आहे. ही पद्धती अस्तित्वातच नाही असे म्हणता येणार

नाही. जे आहेत ते निश्चितच आदरास प्राप्त आहेत. पण आज विद्यालयपद्धतीनुसार विद्यार्थी परीक्षेत बसविले जातात. सात आठ महिन्यात दहा–बारा राग हे बंदिस्त स्वरूपात बसविले जातात. त्यामुळे कार्यक्रमांमध्ये अमुक राग वीस मिनिटे गायचा की चाळीस मिनिटे गायचा हे तो कलावंत ठरवू शकत नाही. कारण राग विस्ताराची व्याप्ती लक्षात घेण्यास तो सक्षम ठरू शकत नाही. प्रश्न उद्भवतो तो सांगीतिक भांडवलाचा ! स्वर आणि वर्ण यांचा सुंदर मिलाफ घडवून उत्कृष्ट रचना तयार केली जाते.ती श्रोत्यांच्या पसंतीस उतरल्यास त्याचे रंजकत्व अधिक बहरते.

पूर्वीच्या काळी संगीत कसे होते,याची श्रवण उपलब्धी आज आपल्याकडे नाही. हे आज आपण केवळ ऐकीव माहितीवर जाणतो. कारण पाच सातशे वर्षांपूर्वी ते कसे होते याची शाब्दिक माहिती आहे, परंतु श्रवणाचा विचार केला तर ते आज अनुभवता येत नाही. मेघराग गायिल्यामुळे पाऊस पडला. दीपक राग आळविल्यामुळे दीप प्रज्वलित झाले. हे आज आपण जाणू शकत नाहीत. परंतु शंका उत्पन्न करून असे होते की नव्हते अशी चिकित्सा करण्यापेक्षा ते गृहीत धरून त्यातील असामान्यत्व, अद्वितीयता, स्वरांचा उच्च कोटीचा आविष्कार आपणास जाणून घेता येईल का? असा प्रयत्न करणे गरजेचे आहे आजच्या तुलनेत त्याकाळचे संगीत हे निर्भेळच होते. आज सवंग रंजकतेच्या कल्पनेमुळे ते थोडेसे भरकटल्यासारखे वाटते.

एक दीड शतकापूर्वी अनेक दरबारी गायक बहुतेक साक्षर नव्हते,त्यामुळे त्यांची संगीत साधना गळ्यात घोटवून घेतल्यामुळे अत्यंत पक्की होती. परंतु लिखापढीचा अभाव होता. आपल्याकडील जुन्या जाणत्या मंडळींनी त्यांचे गायन ऐकून त्यास स्वरलिपीबद्ध केले व आज ते आपल्यापर्यंत पोहोचवले ही एक फार मोठी उपलब्धी आहे. आज सुदैवाने तंत्रज्ञान अत्यंत प्रगत झाल्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात आणि पाहिजे त्याचे पाहिजे तेवढे गायन, वादन व नृत्य आपण अनुभवू शकतो. परंतु एक मात्र नक्की की भारतीय संगीत ही गुरुमुखी विद्या असल्यामुळे ती केवळ ऐकुन व नक्कल करून साध्य होणार नाही .तेव्हा नेमके स्वरूप गुरुमुखातुन जाणून घेऊन तद्नंतर त्याचा विस्तार करण्यासाठी अन्य ध्वनिफितींचा व साधनांचा उपयोग केल्यास सुयोग्य होईल असे वाटते. धन्यवाद!



**अष्टविनायक प्रतिष्ठानचे आवर्तन मासिक संगीत सभेला असेलेले अविरत योगदान**
**अतीशय अमूल्य आहे शतकपूती महोत्सवामध्ये आपला सिंहाचा वाटा आहे.**
**त्यास्तव आवर्तन प्रतिष्ठाच्या वतीने मनस्वी आभार!**

–आवर्तन प्रतिष्ठान, लातूर

# लातूर जिल्ह्यातील संपन्न सांगीतिक वारसा

डॉ. संदीपान जगदाळे

दयानंद कला महाविद्यालय, लातूर
संपर्क ९४२३३४८३१३



**भौतिक सुख-दु:खाची बंधने पार करून एका अनाम दुनियेत विहरणारे स्वर्गीय 'स्वर'... पंचमहाभुतांनी निर्मिलेल्या या शरीरात अपार आनंदाची कंपने निर्माण करणारा 'ताल'.. क्षणोक्षणी जन्मणारी व येत्या जात्या श्वासाशी घट्ट सांधा साधणारी 'लय'... हे माणसांच्या जगण्याचे वैभव !**

अभिजात संगीताची साधना करणाऱ्या ऋषितुल्य गुरुजनांनी हे वैभव प्राणपणाने जपले. याला लातूर जिल्ह्यातील अभिजात कलावंत कसे काय अपवाद असणार? या अभिजात कलावंतांनी व रसिक श्रोत्यांनी लातूर जिल्ह्यातील अभिजात संगीताला अतिउच्च शिखरावर पोहोचविण्याचा प्रयत्न केला. लातूर जिल्ह्यातील या कलावंतांनी अभिजात संगीताच्या वाटा कशा सोनेरी केल्या, याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

संतमहंतांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या मराठवाड्यात मांजरा नदीकाठी विसावलेलं छोटंसं शहर म्हणजे लातूर. रत्नापूर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या शहराची बाजारपेठ श्रीमंत होती. येथे सर्वकाही होते, परंतु अभिजात संगीताचा प्रचार झाला नव्हता. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात शास्त्रीय संगीताचा आस्वाद घेणारी कानसेन मंडळी थोडीशीच होती. अभिजात संगीत ऐकता यावे यासाठी १९५६ मध्ये जॉली क्लब स्थापन झाला. प्रभुअप्पा निगुडगे यांच्या माडीवर या क्लबच्या माध्यमातून गायन-वादनाचे कार्यक्रम होऊ लागले. त्या काळात निगुडगे यांच्या समवेत त्र्यंबक गिरवलकर, नरहरी बझलकर, भीमाशंकर पंचाक्षरी आदी रसिक मंडळी होती. संगीताची तृष्णा शमविण्यासाठी ही मंडळी सवाई गंधर्व महोत्सवासाठी पुण्याला जाऊ लागली.

सवाई गंधर्वांच्या धर्तीवर लातूरकरांना संगीत ऐकता यावे यासाठी १९५० मध्ये लातूर येथे गुरुवार क्लबची स्थापना केली. यातून दिग्गज कलावंतांनी

लातूरकराना मनसोक्त अभिजात संगीत ऐकवले. यासाठी प्रा. काशिनाथ वारद व पं. शांतारामजी चिगरी यांनी साथ दिली. पुढे या क्लबचे रुपांतर संगीत विद्यालयात झाले. संगीत प्रचार व्हावा यासाठी भीमाशंकरअप्पा पंचाक्षरी यांनी १९६५ मध्ये कलोपासक मंडळ स्थापन केले. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना घेऊन सभासदांची नोंदणी केली. ते स्वतः सायकलवर फिरून कार्यक्रमाची तिकिटे श्रोत्यांना घरपोच करीत असत. वर्षातून चार मैफली व्हायच्या. या मैफली टाऊन हॉल, कधी रिगल टॉकीज तर कधी गोजमगुंडे यांच्या माडीवर व्हायच्या. हळूहळू लातुरात कानसेन तयार होऊ लागले.

पुढे १९६८ मध्ये गंजगोलाईतून जगदंबा नवरात्र महोत्सवास प्रारंभ झाला. यातून लोककला व अभिजात संगीताचा विलोभनीय मिलाफ होऊ लागला. नऊ दिवस चालणाऱ्या या महोत्सवातून अनेक नामवंत हजेरी लावू लागले. यात पं. जितेंद्र अभिषेकी, पं. अजय पोहनकर, पं. मालिनी राजूरकर, संगीतकार राम कदम अशा कलावंतांनी लातूरकरांना मोहून टाकले. सन १९७० पर्यंत सार्वजनिक गणेश मंडळातूनसुद्धा मैफली होत होत्या. या मंडळातून हिराबाई बडोदेकर, गिरीजादेवी, परवीन सुलताना अशा दिग्गज कलावंतांनी हजेरी लावली.

संगीताचे चांगले वातावरण होत असतानाच १९८१ मध्ये पाचवे मराठवाडा संगीत संमेलन लातूर येथे झाले. त्यात श्री. भीमाशंकर पंचाक्षरी व प्रा. वारद सरांनी मोलाचे कार्य केले. लोकवर्गणीतून त्यांनी येथे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कलावंत पाचारण केले. यात पं. भीमसेन जोशी,पं. जसराज,पं. बस्वराज राजगुरू, पं. वसंतराव देशपांडे, उस्ताद झाकीर हुसेन, पं. राजन–साजन मिश्र आदी कलावंतांनी लातूरकरांना तालासुरात न्हाऊन टाकले. याच संगीत संमेलनातून लातूरच्या अंगणात वाढलेल्या मुकेश जाधव या तबला वादकाचा परिचय महाराष्ट्राला झाला.

संगीताच्या मैफली होत होत्या, परंतु येथे संगीत शिक्षणाची सोय नव्हती. याचा विचार करून पं. बाबा बोरगावकर यांनी १९६५ मध्ये सरस्वती संगीत विद्यालयाची सुरुवात केली. यातून क्रमिक अभ्यासक्रम शिकविण्याचे पर्व उदयास आले. पं. बाबा बोरगावकर हे उत्तम गायक व हार्मोनियम वादक होते. बाबांना संगीत नाटकाची मोठी आवड होती. एवढेच नाही तर त्यांनी बालगंधर्वांच्या गंधर्व नाटक मंडळीत काम केले होते. या संगीत विद्यालयातून पं. गोविंदराव बोरगावकर यांनी विद्यार्थ्यांना संगीताचे धडे देण्यास प्रारंभ केला. घरात सांगीतिक वातावरण असल्यामुळे बाबूराव व राम हे तालासुरांशी खेळू लागले. हे पाहून बाबांनी बाबूराव यांना पं. सदाशिवराव जाधव यांच्याकडे तर पुढे बनारस येथे पं. बळवंतराय भट्ट व राम यांना सुरुवातीला उ. गुलाम रसूल यांच्याकडे व नंतर पं. शारदा सहाय (बनारस) यांच्याकडे संगीत ज्ञानार्जनासाठी पाठविले. पुढे राम यांनी संगीताचार्य पदवी प्राप्त केली. या बंधुद्वयांनी अनेक शिष्य घडविले. ज्यात प्रा. विजयकुमार धायगुडे, प्रकाश बोरगावकर, प्रा. हरिसर्वोत्तम जोशी, गोपाळ जाधव, प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. लक्ष्मण श्रीमंगले, राजेंद्र भोसले यांचा नामोल्लेख करता येईल.

विजापूर जिल्ह्यातील खैनूर या मूळ गावचे पं. शांताराम चिगरी १९७१ मध्ये लातूरनगरीत दाखल झाले. येथील वातावरण पाहून ते लातूर येथेच स्थायिक झाले. त्यांनी पं. ओंकारनाथ ठाकुर, पं. नारायणराव व्यास यांच्याकडून गायनाचे तर पं. बद्रीप्रसाद मिश्र (बनारस), उ. अहमदजान थिरकवा (फरूखाबाद) यांच्याकडून तबला वादनाचे शिक्षण घेतले. मिळालेले ज्ञानामृत सर्वांना वाटावे यासाठी त्यांनी १९७१ मध्ये सूरताल संगीत विद्यालयाची मुहूर्तमेढ रोवली. यातून पं. मुकेश जाधवसारखा आंतरराष्ट्रीय कीर्तीचा तबलावादक त्यांनी महाराष्ट्राला दिला. याचबरोबर प्रा. अण्णाराव भोसले, खंडेराव कुलकर्णी, गिरीश नाईक, डॉ. शिवरुद्र स्वामी, गोविंद शेळके, प्रा. अंगद गायकवाड, प्रा. डॉ. संदीप जगदाळे, संजय सुवर्णकार, अजित किंबहुने, तेजस धुमाळ असे अनेक शिष्य निर्माण केले. या कार्यात त्यांच्या पत्नी शकुंतलादेवी चिगरी यांनी मोलाची साथ दिली.

उदगीरसारख्या छोट्याशा गावात संगीताचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी पं. रामदास अनवले यांनी १९५४ मध्ये संगीत विद्यालय स्थापन केले. उ. रशीद खाँ, उस्ताद गुलाम रसूल, पं. चांदेकर अशा गुणीजनांकडून संगीतविद्या प्राप्त केली. ते

आकाशवाणी कलावंत होते. त्यांनी 'उदय तालशास्त्र' या ग्रंथाची निर्मिती करून सांगीतिक साहित्यात भर टाकली. पुढे त्यांचे सुपुत्र प्रा. सुधीर व प्रा. डॉ. कृष्णा अनवले यांच्याकडे सांगीतिक वारसा सुपूर्द केला. त्यांचे शिष्य प्रा. कृष्णकांत ज्ञाते यांनी 'भारतीय संगीत स्वरूप आणि प्रयोजन' या ग्रंथाचे लेखन केले.

लातुरातील संगीत प्रचारात पं. कोंडिबा बोळंगे यांनी सुद्धा उल्लेखनीय योगदान दिले. त्यांना सांप्रदायिक भजनाची आवड होती. ते उत्तम गायक व वादक होते. त्यांनी पंढरीनाथ चाकूरकर, माणिकराव संघई यांच्याकडून शास्त्रोक्त संगीताचे घडे घेतले होते. गुरुवार संगीत विद्यालयातून त्यांनी अनेक शिष्य घडविले. त्यात पं. पांडुरंग मुखडे, पं. विठ्ठलराव जगताप, बी. एम. नारगुडे यांचा नामोल्लेख करता येईल. पुढे गुरुवार संगीत विद्यालयाची धुरा पं. विठ्ठलराव जगताप यांनी सांभाळली. त्यांनी सूरमणी भुजंग मुर्के, शंकर जगताप, शिवकुमार गुळवे असे अनेक शिष्य घडवून लातूरच्या सांगीतिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले. प्रा. डॉ. संदीप जगदाळे यांनी १९ सांगीतिक ग्रंथांचे लेखन करून सांगीतिक साहित्यात मोलाची भर टाकली. त्यांची अनेक पुस्तके अमेरिका व कॅनडा या देशांत पोहोचली आहेत.

बालवाडीपासून पदव्युत्तर सांगीतिक शिक्षण घेण्याची सुविधा निर्माण झाली. त्यामुळे विशारद, अलंकार, एम.ए. नेट आदी सांगीतिक परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत आहे. विद्यापीठाच्या केंद्रीय युवक महोत्सवापासून राष्ट्रीय युवक महोत्सवात सर्वाधिक पारितोषिके प्राप्त करणारा जिल्हा म्हणून लातूरचा दबदबा कायम आहे. येथील दयानंद कला महाविद्यालयाने मागील बारा वर्षांत विद्यापीठाच्या युवक महोत्सवात पाच वेळा विजेतेपद व पाच वेळा उपविजेतेपद पटकावून लातूर जिल्ह्याची मान उंचावली आहे.

लातूर जिल्ह्यातील भूमिपुत्र असलेल्या पं. मुकेश जाधव, पं. पांडुरंग मुखडे यांनी भारतीय संगीताची ध्वजा सातासमुद्रापलीकडे फडकविली. प्रा. अंगद गायकवाड व गोपाळ जाधव यांनी संपूर्ण भारतात आपले कला नैपुण्य दाखवून आपल्या जिल्ह्याची एक वेगळी छाप पाडली आहे. प्रा. अंगद गायकवाड यांच्या नंदिनी व अंजली या दोन मुलींनी देशभरात आपल्या गायन कलेचे उत्तम प्रदर्शन करीत श्रोत्यांची मने जिंकली. अंजली हिने तर 'सचिन तेंडुलकर' या चित्रपटात ए. आर. रहेमान यांनी संगीतबद्ध केलेले एक गीत गाऊन कमी वयात आपला ठसा उमटविला आहे. पुढे तिने झी वाहिनीवरील सा रे ग म प या रियालिटी शो मध्ये भारतातून सर्वप्रथम येण्याचा बहुमान पटकावला तसेच तिने इंडियन ॲयडॉल यात आपल्या शास्त्रीय गायनाची चुणूक दाखविली.

रसिकाग्रणी विलासरावजी देशमुख व दिलीपराव देशमुख यांच्या सहकार्यामुळे व संगीत साधकांच्या अथक परिश्रमामुळे लातूर जिल्ह्यातील सांगीतिक वाटा सोनेरी झालेल्या आहेत. असे असले तरी उदगीर व औसा तालुका अपवाद वगळता इतर तालुक्यांत अभिजात संगीत पोहोचले नाही. बोरगावकर बंधूंचे सरस्वती संगीत महाविद्यालय, पं. शांतारामजी चिगरी गुरुजी यांचे सूरताल संगीत महाविद्यालय, रणसम्राट क्रीडा व सांस्कृतिक मंडळाचा चैत्रपल्लवी संगीत महोत्सव या माध्यमातून संगीताच्या मैफली रंगल्या. त्यामुळे लातूर जिल्ह्यात अनेक 'कानसेन' व अल्प का होईना 'तानसेन' निर्माण झाले. अष्टविनायक प्रतिष्ठान व शकुंतलादेवी चिगरी प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित केल्या जाणाऱ्या संगीत स्पर्धांमध्ये लातूरच्या सांस्कृतिक जीवनात नवचैतन्याचे वारे वाहू लागले. स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमाला व सवाई गंधर्व महोत्सव समितीच्या संयोजनातून २०१० मध्ये सवाई संगीत संमेलन झाले. यातून अनेक दिग्गज कलावंतांनी लातूरकरांच्या कर्णाची ओंजळ भरली. आ. अमित देशमुख यांच्या कल्पनेतून साकारलेल्या लातूर फेस्टिव्हलमधून अभिजात संगीताच्या मैफली झाल्या. सूरश्री प्रतिष्ठानने विविध कलावंतांना पाचारण करून लातूरकरांची श्रवणतृष्णा शमविण्याचे कार्य केले. अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी आवर्तन मासिक संगीत सभेचे आयोजन केले जात आहे. पाहत पाहता या प्रतिष्ठानने अभिजात संगीताच्या ९९ संगीत सभा पूर्ण केल्या. यासाठी अध्यक्ष अभय शहा व सचिव डॉ. रवी पोरे यांच्यासह प्रा. शशिकांत देशमुख, डॉ. संदीपान जगदाळे, प्रा. हरीसर्वोत्तम जोशी,

विशाल जाधव व इतर सदस्य परिश्रम घेत आहेत. येथील दत्तमंदिर येथे बाल गोविंदानंद सरस्वती महासमाराधना महोत्सवाची २०१४ पासून सुरुवात झाली. या सात दिवसीय संगीत महोत्सवात अनेक दिग्गज कलावंतांनी हजेरी लावली. डॉ. वृषाली देशमुख, नागेश आडगावकर या नवोदित कलावंतांनी आपल्या अमोघ गायनाने संपूर्ण महाराष्ट्राची मने जिंकून घेतली. मंगेश बोरगावकर, रोहित राऊत, मधुवंती बोरगांवकर यांनी चित्रपटात पार्श्वगायन केले. किशोरी मुर्के, सायली टाक हे नवोदित कलावंत दूरदर्शनच्या विविध चॅनल वरून कला सादर करून रसिकांची मने जिंकत आहेत. श्री. गिरीश नाईक व उदगीर येथील ओंकार बागडे या संगीतकारांनी अनेक चित्रपटांना संगीत दिले. सृष्टी जगताप हिने सलग ५ दिवस ५ रात्री व ६ तास असे एकूण १२६ तास नृत्य करून एक नवा इतिहास रचला. ज्याची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद झाली. विज्ञानाच्या प्रगतीने संगीत शिक्षणाच्या सोयी उपलब्ध झाल्या आहेत, परंतु विद्यार्थ्यांची रियाजी वृत्ती संपुष्टात येत आहे.

ज्ञानार्थी होण्याऐवजी परीक्षार्थी होण्याकडे विद्यार्थ्यांचा कल आहे. शैक्षणिक पंढरी असलेल्या लातूर नगरीतील कितीतरी विद्यार्थ्यांना संगीताची उपजत देणगी मिळाली पण इथे शालेय शिक्षणाला अधिक महत्त्व दिले जात असल्यामुळे ती मुले संगीतापासून दुरावत आहेत. असे असले तरी येणाऱ्या काळात उत्तमोत्तम कलावंत निर्माण व्हावेत व शिक्षणाबरोबरच संगीताचाही एक नवा लातूर पॅटर्न निर्माण व्हावा तसेच स्वर्गीय सुखाची अनुभूती करून देणारे संगीत लातूर जिल्ह्यातील घराघरात पोहोचावे, हीच अपेक्षा!

# संगीत सांगाती मराठवाडा

डॉ. वृषाली देशमुख

संपर्क ९४०४२७५२७५



**पूर्वेस आंध्र, दक्षिणेस कर्नाटक तर उत्तर पश्चिमेस उर्वरित महाराष्ट्राचा भूभाग असा महाराष्ट्राच्या आग्नेय दिशेस विस्तारलेला भूप्रदेश म्हणजे मराठवाडा.संतमहंतांच्या ईश-उपासनेने पावन झालेली आणि गोदावरीच्या पवित्र प्रक्षालनाने दिव्यत्व लाभलेली सात्विक भूमी! साडेतीन शक्तिपिठांपैकी तुळजापूरची भवानी माता, माहूरची रेणुका माता, कोकणस्थ कुलस्वामिनी अंबाजोगाईची योगेश्वरी माता,तसेच बारा ज्योर्तिलिंगांपैकी औंढा नागनाथ, परळी वैजनाथ, घृष्णेश्वर ही देवालये मराठवाड्यात आहेत. देवगिरी (दौलताबाद) आणि प्रतिष्ठान (पैठण) ही इतिहासातील वैभवसंपन्न नगरे म्हणजे मराठवाड्यातील सांस्कृतिक वैभव.या प्रदेशाचा पूर्व इतिहास पाहता, ही भूमी  भौगोलिकदृष्ट्या अभेद्य आणि मानवाच्या सामाजिक,सांस्कृतिक उत्थानासाठी सदैव अग्रेसर होती याचा प्रत्यय देणारे, अनेक दाखले,येथील धर्म, पंथ अनुयायी, यांच्या ग्रंथ-मुद्रा इत्यादी लिखित परंपरा, मंदिरे, अजिंठा लेणी, शिल्पे यातून आपल्याला मिळतात. सांस्कृतिक दृष्टया संगीत या कला आविष्काराची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि सद्यस्थिती याची संगती लावताना संगीत कलेचे  शास्त्र - सैद्धांतिक पक्ष आणि प्रायोगिक पक्ष या दोन्ही बाजूने या भूमीची समृद्धी लक्षात येते.  राजदरबारांची, देवालयांची भव्य यज्ञमंडप, नृत्यमंडप यातून दरबारी संगीत,कीर्तन परंपराही देखील विकसित होत राहिली.**

स्वातंत्र्यापूर्वी निजामशाही, दडशाहीच्या दास्यातून पिंजलेला समाज, स्वातंत्र्यानंतरही नैसर्गिक आपत्ती, केवळ अपुऱ्या सोयी,भक्कम राजकीय पाठबळ,निम्न आर्थिक परिस्थिती मुळे, अपुऱ्या संज्ञापन सोयी,कौशल्य अविकसनशिलतेमुळे निश्चित वेगाने तुलनेत विकसित झाला नाही किंवा पुन्हा दडपला गेला. तरीही संगीत कला ही केवळ मनोरंजनाचे साधन नसून कैवल्य आनंद देणारा मोक्षप्राप्ती चा सर्वोत्तम उपासना मार्ग आहे ह्या विचारांचे आदीबिज साधकांच्या हृदयात पेरणारी ही भूमी आहे.यासाठी अवघे विश्व या भूमीच्या ऋणात राहील हेही खरे.

मराठवाड्यात अनुक्रमे, सातवाहन, वाकाटक, पूर्व चालुक्य, राष्ट्रकुट, उत्तर चालुक्य व यादव अशी राजघराणी चौदाव्या शतकापर्यंत नांदली. इसवीसनाच्या पहिल्या शतकातील, सातवाहन राजा हाल याने संकलित केलेल्या एकूण सातशे गाथा (गै- गेय) 'गाथा सप्तशती',

जी तत्कालीन समाजाच्या भावविश्वाचे प्रतिबिंब असणारे जणु भावगीतेच, प्राकृत भाषेतील आद्य लिखित प्रमाणग्रंथ आहे.गाथा सप्तशतीला लोकसंगीताचा साम म्हणाता येईल. त्यानंतरही संगीत कला जनमाणसातून तसेच राजाश्रयातून विकसित होत गेली.त्यातही तेराव्या शतकातील देवगिरीचे यादव घराणे हे संगीत उद्धारक ठरले. संगीत कलेच्या सैद्धांतिक पक्षावरील खऱ्या अर्थाने सर्वस्पर्शी असा ग्रंथ 'संगीत रत्नाकर' यादव राजा सिंघण यांच्या पदरी श्रीकरणाधिप(महालेखापरिक्षक)असलेले निःशंक शारंगदेव यांनी रचला. संगीत भवसागरात साधकाला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणारा हा सप्ताध्यायी ग्रंथ आहे. हा महान ग्रंथ आजही दक्षिण आणि उत्तर भारतीय संगीत शास्त्रामध्ये अत्यंत आदरणीय व शिरोधार्य आहे. गायन, वाद्य,नृत्य शास्त्राविषयी विस्तृत विवेचन यात आढळते.प्रबंध, गीति, ग्राम, मूर्च्छना, खंडमेरू, इ.शास्त्र विवेचन या ग्रंथात विस्ताराने आढळते. सोळाव्या शतकापर्यंत या ग्रंथाचे टीका विवेचन करणारे अनेक ग्रंथ निर्माण झाले. या वरून या ग्रंथाचे महत्व कालातीत आहे हे उमगते.

यादव साम्राज्या मध्ये देवगिरी ही राजधानी होती.याच काळात मराठी भाषेचा अधिकृत भाषा म्हणून साहीत्यिक दर्जा वाढला. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली ती प्राकृत मराठी मधेच. यादव राजे हे महाराष्ट्रातील शेवटचे हिंदू घराणे होते. त्यानंतर अल्लाउद्दीन खिलजीच्या स्वारीनंतर यादव घराणे लयास गेले.याचा परिणाम म्हणून भारतीय संगीतवर इराणी आणि सूफी संगीताचा संकर होवू लागला. यादव काळातील दरबार गायक गोपाळ नायक आणि अमीर खुसरो यांची स्पर्धा आणि त्यातील गोपाल नायकाचा पराभव हा,खरं तर,परंपरागत पद्धतीने चालत आलेल्या स्वरसप्तक स्वरांतर पद्धती(मूर्च्छना) संगीत शैलीचे स्वर अष्टक पद्धती मध्ये राजकीय पाठबळाने केलेले हस्तांतरणाचा विजय होता.संगीत शास्त्राची ही नवीन मांडणी इंद्रप्रस्थ मत किंवा चतुर्दण्डी संप्रदाय म्हणून ओळखली जाते.खिलजीच्या सत्तेमध्ये,'प्राण गेला तरी राजाच्या मर्जी ने मी गाणार नाही' अशी प्रतिज्ञा, गोपाल नायकांनी आजन्म पाळली. असे बाणेदार व श्रेष्ठ गवई या भूमीवर झाले.

मराठमोळी ठसकेबाज लावणी येथेच सर्व प्रथम रचली गेली.वीरशैव संत शाहीर मन्मथ स्वामी (इस.1560-1613) बीड जिल्ह्यातील नेकनुर कपिलधार येथील त्यांचा जन्म. त्यांनी पहिली अध्यात्मिक लावणी रचली.सामाजिक वास्तवाचे भान आणि उद्बोधन करणारी लावणी जनमानसात रुजली. शृंगाररसपूर्ण बैठकीची लावणीही रागदारीवर आधारित ख्यालाचे प्रारूप मानले जाते.कारण इतर लोकगीत प्रकारापेक्षा या गानप्रकरात सांगीतिक मूल्ये अधिक प्रमाणात दिसतात.संतांच्या विराण्या, गौळणी मधून लावणी फुलत गेली. जन्म मरणाच्या फेऱ्यातून सुटण्यासाठी शरीर किती सहजपणे सहाय्यक ठरू शकते हे ठसविण्यात लावणीकार मागे राहिले नाहीत. याखेरीज भूपाळी,ओवी, भारुडे, कवणे, फटका, आरत्या, इत्यादी जनसामन्यांच्या जगण्याचा भाग होती.शिवाजी महाराजांच्या काळात वीररसयुक्त पोवाडे उत्स्फूर्तहा नाट्यमय गुणगाथाप्रकार लोकप्रिय झाला. तेराव्या ते सोळाव्या शतक भारतीय संगीतावर इराणी व सूफी संगीताचे संक्रमण झाले. दरम्यानच्या काळात हिंदूधर्म पंथ अनुयायी आणि संतांनी आपल्या सिद्ध वाणीतून संगीताच्या मूळ परंपरा स्त्रोतांचा प्रवाह अखंड व अबाधित ठेवण्याचे महत्वाचे कार्य केले. दरबारातील शिष्टसंमत संगीत सामान्य जणांच्या ओठांवर सहज रुळले.

यादव काळातच याची मुहूर्तमेढ रोवली गेली.तेराव्या शतकात जैन आचार्य पार्श्वदेव यांनी संगीत विषयक महत्वपूर्ण संस्कृत ग्रंथ 'संगीत समय सार' लिहिला.मराठवाड्याच्याच भूमीवर पैठण जवळील आपेगाव चे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज,नरसी (परभणी) चे संत नामदेव महाराज, पुढे पैठणचे एकनाथ महाराज व समर्थ रामदास जांब(जालना), दत्त पासोडीकार दासोपंत (अंबेजोगाई), आद्यकवी मुकुंदराज (अंबेजोगाई).या सर्व संत साहित्यात सांगीतिक परिभाषा आढळतात. महानुभाव संप्रदायाचे प्रवर्तक श्री चक्रधर स्वामी यांनी याच भूमीवर महानुभाव पंथाची स्थापना केली याच पंथाची दीक्षा घेतलेले नरेंद्र पंडित यांच्या रुक्मिणी स्वयंवर हे काव्य रागदारीवर रचलेले आहे. महदंबेचे धवळे प्रसिद्धच आहेत.संगीत रत्नाकरामध्ये हा धवल प्रबंध वर्णिला आहेच. अजिंठा लेणी बौद्धधर्म परंपरेचे दर्शन घडवतात.तेथील कोरीव शिल्प तत्कालीन वाद्य, नृत्य, कुतप चे दर्शन घडवतात. ओवी हा गेय प्रबंध अभंगाचा छंद म्हणून संतांनी हृदयाशी धरला.एकनाथी कीर्तन हे रागदारी वर आधारित.सोबत टाळ मृदंगाच्या नादावर नामस्मरणाचा उपासना मार्ग सुकर आणि आनंददायी झाला.या संगीतधर्मी नामसंकीर्तनातून लोकजागर व प्रबोधन घडत गेले.

स्वातंत्र्यानंतर शास्त्रीय संगीताचा प्रचार–प्रसार झाला तो घरंदाज घराणे पद्धतीने आणि शाळा महाविद्यालय यांच्या माध्यमातून.पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर आणि पंडित विष्णू नारायण भातखंडे या विष्णू द्वयांनी संगीत शास्त्राची पुनर्बांधणी व मांडणी केली, विद्यापीठ स्तरावर सुव्यवस्थित अभ्यासक्रम तयार करून शिष्यसंप्रदाय निर्माण केला.

विलगीकरणापूर्वीच्या, मराठवाड्याचा बराचसा भाग हैद्राबाद निजाम संस्थानाच्या अधिपत्याखाली होता.बीड जिल्ह्यातील परळी येथे जन्मलेले 'अप्पा तुलसी' हे थोर संगीत तज्ञ आणि धृपद गायक होते.मोगल काळात विकसित झालेले बानी गायन व तानसेन, बैजू बावरा पुरस्कृत धृपद धमार गायकी आत्मसात करून संगीत शास्त्र विषयक ' संगीत सुधाकर ', 'रागकल्पद्रमांकुर', 'अभिनव ताल मंजिरी ', राग चंद्रिकासार(हिंदी)हे ग्रंथ लिहिले.

अप्पा संस्कृतचे प्रकांड पंडित होते. पंडित विष्णू नारायण भातखंडे आणि अप्पा यांच्यात, संगीतातील सद्य राग–रूपे, धृपद गायकी, विविध घराणी यावर प्रदीर्घ चर्चा झाली,त्याचा उपयोग भातखंडे यांना आपल्या ग्रंथ निर्मिती साठी झाला. शारंगदेवांनंतर गलित गात्र झालेल्या व पडद्याआड गेलेल्या संगीत शास्त्राला नाव संजीवनी देणारे अप्पा तुलसी हे आपल्यासाठी संगीत शास्त्राचे बहुमूल्य विचारधन मागे ठेवुन गेले.वारकरी संप्रदायाचे पाईक वै. बंडा महाराज व वै. धुंडा महाराज देगलूकर यांनी कीर्तन गान परंपरा समृध्द केली. त्यांना पखवाज साथ करणारे तालमार्तंड रंगनाथबुवा देगलूरकर, मंगळवेढेकर, भीमसिंह बुवा भगवानगडकर यांनी राग संगीताला भक्ती रसामध्ये आकंठ बुडवले.नेकनुर चे कीर्तन सम्राट बंकट स्वामी महाराज हे देखील उच्च कोटीचे भजन गायक व पखवाज वादक होते.

संतश्रेष्ठ चुडामणी महाराजांच्या कुळात जन्मलेल्या तालमार्तंड पंडित रंगनाथबुवा देगलूरकर ते थोर तालशात्रज्ञ होते. तालशास्त्रातील,' चक्रदार मांडणी, चौसष्टीचे सूक्ष्म गणिती कसब, बोलप्रस्तार, सरपटी इ. वर बुवांचा अधिकार होता. त्यांच्यानंतर त्यांचे सुपुत्र पंडित शिवदास देगलूरकर यांनी देखील मेवंती घराण्याचे पंडित जसराज आणि श्रेष्ठ धृपद गायक सैदुद्दिन डागर यांच्याकडून विधिवत संगीतविद्या आत्मसात करुन संपन्न शिष्य संप्रदाय निर्माण केला. अश्याच महान रत्नांपैकी जालना जिल्ह्यातील फुलंब्री गावचे मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर,यांनी पं. भास्करबुवा बखले यांच्याकडे गानविद्या प्राप्त केली. तसेच उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर येथे जन्मलेले पद्मभूषण पंडित चितामण रघुनाथ व्यास यांनी संगीत अध्ययन लालसे पोटी मराठवाडा सोडून विद्या संपादित केली आणि नावलौकिक मिळवला. यात परभणी जिल्ह्यातील सोनपेठ या गावी जन्मलेले पंडित उत्तमराव अग्निहोत्री यांचाही उल्लेख आदराने करावा लागेल. या सर्वांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही अविरत साधना करून भूमीचा लौकिक वृद्धिंगत केला.

मूळ मराठवाड्याच्या बाहेरील परंतु या भूमीवर राहून संगीत विद्यादान आणि प्रचार–प्रसार करणारे, नागपूर येथील पं.मधुसूदन भावे, पं.स.भ. देशपांडे यांचा उल्लेख करणे देखील महत्वाचे. ते मुळचे हैदराबादचे असून गुरूआज्ञेमुळे परभणी येथे येउन खूप मोठे सांगीतीतिक कार्य करणारे सूरपमणी डॉ. कमलाकर परळीकर यांच्या सरखे जेष्ठ कलावंत यांनी अनेक उत्तम शिष्य वर्ग घडवला. अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाची परीक्षा केंद्रे, शाळा,महाविद्यालय यांच्या माध्यमातून विद्या प्रसार केला. नांदेड येथील संगीत महर्षी अण्णासाहेब गुंजकर, पं. रमेश कानोले, परभणी चे पं.गुलाम रसूल, औरंगाबाद येथील पं. नाथराव नेरळकर, बीड चे पं. व्यंकटेशराव हंप्रस, पं.विष्णूपंत धुतेकर, पं.देविदास मांडे, अंबड येथील पं.गोविंदराव जळगावकर तसेच पं शंकरबापू आपेगावकर, लातूरचे भीमाशंकर अप्पा पंचाक्षरी बुवा, पं. बाबा बोरगावकर, पं. शांताराम चिगरी यांचाही उल्लेख आवर्जून करावा लागेल.

या आणि अश्या अनेक संगीत तज्ञांनी विद्यादानाखेरीज, अनेक संगीत समारोह,परिषदा, कार्यशाळा,संगीत उत्सव आयोजित करून कलेची देवाणघेवाण केली.आज औरंगाबाद मधील वेरूळ महोत्सव, गोविंदभाई श्रॉफ संगीत उत्सव, पंडित विष्णु दिगंबर समारोह, दत्त जयंती समारोह,अंबड, अहमदपूर,यशवंतराव संगीत समारोह,अंबाजोगाई, कंकालेश्वर महोत्सव बीड, जगदंबा महोत्सव लातूर या सारख्या उत्सवातून संगीत प्रसार होत आहे.

या व्यतिरिक्त गेल्या ९९ महिन्यांपासून नवोदित आणि प्रतिष्ठित कलाकारांसाठी 'आवर्तन प्रतिष्ठान लातूर ही संस्था देखील दर महिन्याला 'आवर्तन मासिक सभा', ही शास्त्रीय संगीताची मैफिल आयोजित करत आहे.

# बंदिशीचे विषय समाज, देश हे असु शकतील का ?; मुक्तचिंतन

प्राणेश पोरे



संपर्कः ९४०५०७९९५९

**प्रबुध्द, प्रगल्भ संगीतज्ञांच्या मांदियाळीत माझ्या सारख्या सीमीत अनुभव विश्व असणाऱ्या आणि सुमार साधना, अभ्यास असणाऱ्यांन व्यक्त व्हावे की नाही हा संभ्रम होता परंतु एखाद्या सुसज्ञ, लखलखीत सोन्या-चांदीच्या भव्य दुकानासमोर कृत्रिम चमचमणारे मणी ओवत बसणाऱ्याचे दुकान असत तसा यत्न करावयास काय हरकत म्हणून हा लेखन प्रपंच.**

शीर्षक एक नवा आयाम अस मी जाणीवपुर्वक लिहील नाही. जगात काही नवीन नसत, ते बीजरूपान आधीच असत असा मानणारा मी. आपणास शोध घेताना नव्याने माहित होत- एवढचं.

अंतर्मनास सृजनशक्तीनं साद देणं आणि वृत्तींनी निर्मितीच्या प्रेरणेनं प्रतिसाद देणे हे

क्षण अनाम आनन्ददायी असतात हा अनुभव मात्र मला आलां तो भासमान कदाचित अन्यांना ज्ञात व आपणास अज्ञात अस काही हाती येणं असेही घडले असाव. प्रेम ही सर्वांगसुंदर भावना. त्याचे अनेक रंग. एक रंग समाज, देशप्रेम असेल, आणि तो बंदिशींचा वर्ण्य विषय म्हणुन विचारात घेतला गेला तर संगीत विश्वास समृध्द होण्यास मदतच होईल, नाही का ?

माझे विचारतरंग असे असणं याच कारण माझ कार्यक्षेत्र. काही पार्श्वभूमी सांगावीच लागेल ती उचित ठरेल, शिक्षकी पेक्षा स्वीकारल्यानंतर माझ्या सभोवती निरागस, निर्मळ विद्यार्थी विश्व होत. हसरे, आरस्पानी चेहरे.... संगीताचा प्रचार, प्रसार करण, विशेष अभिरुची निर्माण करण आणि निसर्गतः देण लाभलेल्या प्रतिभावंतांचा शोध घेणं.. कानसेन बनवणं... तानसेन बनवण्याच माध्यम होणे हे ईप्सित. नित्य आणि नैमित्तिक कार्यक्रमात जी गाणी विद्यार्थ्यांच्या ओठावर खेळवायची ती संस्काराची. कुठेही भडक भावना, शब्दयोजना असणारी गिते नसावीत आपण गुणगुणण, गुणगुणावयास लावणं या अशा दृष्टीने गीतांचा अभ्यास करताना लक्षात आलं की ही गीत खरोखरच अत्यंत उदात्त, अर्थवाही होती (विशेष हे की अशा गितांच्या गीतकारांची,रचनाकारांची नांव एकाही गीताखाली नव्हती !)

या पार्श्वभूमीवर मला अस वाटत गेल की बंदिशी मधुनही समाज, देशप्रेम, भक्ती अभिव्यक्त करण्यास काय हरकत ? स्वतःवर मायमाऊली सरस्वतीचा कृपावर्षाव कितपत असेल आणि उदंड तरी का असावा? कारण आपली साधना कितीशी ? म्हणुन आपल्यासमोर हा विषय मांडण्याचे धाडस करतो आहे. बंदिशीचा हा विषय तरच समृध्द होत राहील. हे विचार मन व्यापत गेले तसे अनेक अनेकाविध विकल्प समोर येवू लागले. आजवरच्या वैभवशाली परम्परा, प्रत्येक कलाक्षेत्रातील उत्तुंग झेप याचे गुणगान.... स्वातंत्र्यासाठी सर्वस्व वाहिलेले शांतीदूत, क्रांतीवीर.... समाजोन्नतीसाठी अर्पित जीवने.... आधुनिक सामर्थ्यसंपन्न भारत घडवताना प्रतिभावंताचे, संशोधकाचे योगदान असे व्यापकत्व या विषयासाठी असु शकते.

आजवर मला ज्ञात असणारे वंदिशीसाठीचे विषय (अर्थातच तोकड्या ज्ञानानुसार) भगवंत भक्ती, गुरुभक्ती, निसर्ग, मानवी भावना विश्व, देव-देवता स्तुती वगैरे... वगैरे.. आता थोडे विषयांतर (पण विषयानुषंगिक म्हणा हव तर !)

भारतीय शास्त्रीय संगीतात फक्त सुरताल-लय हे महत्वाचे. ते अमूर्त निराकार. त्यांची साधना करुन अगम्य, अनाकलनीयतेचा शोध घेत राहणं..... शब्दांच असण- नसणं म्हणुन गौण-- तर अर्थवाही शब्द योजना असणंही गौणच, नाही का?

पण आज सुशीक्षित समाज पूर्वीच्या तुलनेत जितक्या अधिकांशान संगीताकडे आकर्षित झाला आहे. तेव्हा शब्दांना दुय्यम स्थानावरच ठेवुन मूळ सांगीतिक सौंदर्य वाढवता आले तर तेही स्वागतार्हच ना !

मूळ विषयाच्या पुष्ट्यर्थ एक दोन रचना ठेवुन मी थांबणार आहे पण तत्पुर्वी हे सांगावस वाटत की, नवीन बंदिशरचना करता येणं ही गुरुवर्य पं.सी.आर व्यास यांचा मला लाभलेल्या अल्पकाळातील सहवासातला माझ्या फाटक्या झोळीत पडलेल्या दानाचा परिणाम असावा स्वररचना मांडण इथे अप्रस्तुत होईल. तेव्हा गौरखकल्याण मधील (रुपक) एक रचना.

(अनेक क्रांतीवीर अत्यंत अल्पवयात अगदी सहजतेने मृत्युला मित्र मानुन कवटाळुन गेले मित्राची गळाभेट घ्यावी तसे फासावर गेले. कुठलीही आसक्ती नाही पण एक अतृप्ती असेल का त्यांच्या मनात.... खोलवर.... कुठेतरी... )

स्थान –

**इक चुभनसी रही**

**विमोचना ना जनम भू की, कर ना सके सारी उमरिया वही || धृ ||**

**अंतरा – चलो चरण में शीष चढाए । लहु की लालिमा में रुह सजाए**

**इस जनम में ना ही**

**दुजे में ही सही ॥ 1 ॥**

दुसरी रचना सारंग मधिील बडा ख्याल म्हणुन.... समष्टीभावनेच्या संदर्भात.

(आता अश्रु वैयक्तिक दुःखापोटी वाहणारच नाहीत तर तेव्हाच ओघळतील जेव्हा त्या पाण्यान दुसऱ्याचे दुःख हलक करता येईल, तप्तता विझवता येईल. तन-मन या पध्दतीनं प्रज्वलित होईल की दीपज्योती केवळ अंधार नष्ट करण्यासाठी जळत रहाते तशी)

स्थायी –

छलके जो बुंद आखियन से औरन की तपन बुझाने छलके ॥

अंतरा झलके, तिमिर हराने जग में तन-मन जल दीपज्योती जो झलके ॥

# आवर्तन मासिक संगीत सभेची शताब्दी

डॉ. संदीपान जगदाळे

दयानंद कला महाविद्यालय, लातूर

संपर्क ९४२३३४८३१३



**भारतीय अभिजात संगीत आपल्या देशाने सर्व विश्वाला बहाल केलेली सर्वोत्कृष्ट देणगी..! अशा या संगीतातील स्वर, ताल आणि लय हे माणसांच्या जगण्याचे वैभव आहे. अभिजात संगीताचे हे वैभव प्राणपणाने जपावे, अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी काही उपक्रम राबविता येतील का? याच संकल्पनेतून आवर्तन मासिक संगीत सभेची सुरुवात झाली. लातूरकरांना अभिजात संगीत ऐकता यावे यासाठी एक चळवळ म्हणून प्रत्येक महिन्यात एका कलाकाराची गायन, वादन अथवा नृत्य मैफलीचे आयोजन करावे असे ठरले. आणि पाहता पाहता लातूरमधील ह्या संस्थेचा 'तब्बल नव्व्याण्णव महिने गायन, वादन, नृत्य यांच्या सादरीकरणासह सांगीतिक कार्यशाळा, चर्चासत्रे तसेच कलावंतांच्या मुलाखती यांचे आयोजन करणारी संस्था!' असा नावलौकिक देशभर झाला आहे.आज १०० वी मैफल मोठ्या दिमाखात आणि उत्साहात येथील दयानंद सभागृहात संपन्न होत आहे. त्यानिमित्त मागील ९९ मैफलींच्या प्रवासाचा मागोवा घेण्यासाठी हा लेखन प्रपंच!**

दिनांक १४ एप्रिल २०१५ रोजी नांदेड येथील श्री धनंजय जोशी यांच्या मैफलीने या मासिक संगीत सभेचा श्रीगणेशा झाला. या संगीत मासिक सभेत एका महिन्यात स्थानिक कलावंत तर दुसऱ्या महिन्यात लातूर शहराबाहेरील कलावंत पाचारण केले. या चळवळीमुळे नवोदित कलावंतांना तर व्यासपीठ मिळालेच परंतु लातूरकरांना मनसोक्त अभिजात संगीत ऐकण्याची संधी मिळाली. विशेष म्हणजे या मासिक संगीत सभेत केवळ शास्त्रीय संगीतच सादर केले जाते. सुगम संगीत अथवा उपशास्त्रीय संगीत सुद्धा सादर केले जात नाही.

आजपर्यंत मुग्धा वैशंपायन ( अलिबाग )जयंत केजकर (पुणे), आशिष मिश्रा (भोपाळ), मेघा परांजपे (पुणे), नबनीता चौधरी (दिल्ली), पंकज शिरभाते (नांदेड), असावरी वाईकर (चेन्नई ) इत्यादी अनेक कलावंतांनी आपल्या गायन, वादन व नृत्याने लातूरकरांना

मंत्रमुग्ध केले. याबरोबरच लातूर येथील पं. विठ्ठल जगताप, डॉ. शिवरुद्र स्वामी, किरण भावठाणकर, संतोष बिडकर, हरीश कुलकर्णी, तेजस धुमाळ, विशाल सोमवंशी व सौ. नभा बडे यांच्या नपुर अकादमीच्या नवोदित कलावंतांनी दर्जेदार सादरीकरण केले व लातूरकरांच्या कर्णाची ओंजळ भरली. अंजली व नंदिनी गायकवाड या उदयोन्मुख कलावंतांनी आपले कलानैपुण्य दाखवून लातूरकरांना मंत्रमुग्ध केले. प्रा. दुर्गादास सबनीस व प्रा. सुनील सर्वज्ञ यांच्या गायन व चित्रकलेचा एकाच व्यासपीठावर झालेला मनोहरी संगम लातूरकरांसाठी निश्चितच संस्मरणीय होता. त्यानंतर नवी दिल्ली येथील सुरजित सिंग यांचे तबला वादन झाले. पंडित विश्वनाथ कान्हेरे मुंबई यांचे हार्मोनियम वादन, दिल्ली येथील पंडित दालचंद शर्मा यांचे पखवाज वादन संपन्न झाले. ३० जून २०१९ रोजी सुप्रसिद्ध गायिका सावनी शेंडे यांच्या गायनाने सुवर्ण महोत्सवी मैफल साजरी झाली. ही मैफल ऐतिहासिक ठरली नुकतेच ९९ वे आवर्तन लातूर येथील प्रसिध्द जेष्ठ गायक सूरमणी पं. बाबुराव बोरगावकर यांच्या बहारदार गायनाने साजरे झाले.

लातूर शहरात 'दिवाळी पहाट' हा कार्यक्रम सुरू करण्याची परंपरा आवर्तन प्रतिष्ठान व अष्टविनायक प्रतिष्ठान यांनी केली. २०१५ साली प्रा. वृषाली देशमुख व हरीश कुलकर्णी यांच्या गायनाने दिवाळी पहाटची सुरुवात झाली. त्यानंतर २०१६ साली पं. रघुनंदन पणशीकर, २०१७ साली सौ. मंजूषा पाटील, २०१८ साली पं. जयतीर्थ मेवुंडी (हुबळी), २०१९ पं. हेमंत पेंडसे व रेवा नातू यांची मैफल संपन्न झाली. २०२० साली विख्यात गायिका मंजुषा पाटील (पुणे) यांनी मैफलीत रंग भरला. २०२१ साली डॉ वृषाली देशमुख यांनी मैफल सजवली. २०२२ या वर्षी पंडित ओंकार दादरकर यांनी लातूरकरांची दिवाळी पहाट आपल्या स्वरांनी मंगलमय केली.

याबरोबरच आवर्तनने 'प्रशिक्षण कार्यशाळे' चे आयोजन केले. यात पंडित राजेंद्र मणेरीकर (सातारा) यांनी 'पंडित राम मराठे यांची गायकी व गायन' या विषयावर सप्रयोग व्याख्यान दिले. श्री अतुल देऊळगावकर यांच्या संकल्पनेतून साकारलेला 'कुमार दर्शन' हाही दृकश्राव्य माध्यमातून सादर केलेला उपक्रम रसिकांच्या पसंतीस उतरला. सुप्रसिद्ध गायक पंडित राहुल देशपांडे यांच्या प्रकट मुलाखतीतून संगीतातील बारकावे, नाट्यसंगीताची स्थिती व रियाज तंत्र या विषयी माहिती उलगडली. पंडित विजय कोपरकर (पुणे) यांची रागाग पद्धतीवर कार्यशाळा संपन्न झाली. नृत्यांगना सौ. मनीषा साठे, तसेच तंतुवाद्यांची निर्मिती करणारे श्री. माजिद सतारमेकर यांची प्रकट मुलाखत असे दर्जेदार कार्यक्रम सादर केले आहेत. रसिकांना व संगीत साधकांना विविध प्रहरामधील राग ऐकायला मिळावेत या हेतूने प्रातःकालीन संगीत सभा, मध्यान:कालीन संगीत सभा व सायंकालीन संगीत सभा अशा कार्यक्रमांचे वैविध्यपूर्ण आयोजन केले आहे. रसिकांना व संगीत साधकांना विविध वाद्यांची ओळख व्हावी यासाठी बासरी, सतार,व्हायोलिन, स्पॅनिशवीणा, संवादिनी, तबला, पखावज व सुंद्री, मोहन विणा अशी बहुविध वाद्य वाजवणाऱ्या कलावंतांना पाचारण केले आहे.गानसरस्वती किशोरीताई आमोणकर, पं. जसराज तसेच स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांनाही आवर्तन परिवाराने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

आवर्तन प्रतिष्ठानचे अध्यक्ष म्हणून श्री अभय शहा तर सचिव म्हणून डॉ. रविराज पोरे हे कार्यरत आहेत. संगीत अभ्यासक श्री अतुल देऊळगावकर व डॉ अजित जगताप यांचे मौलिक मार्गदर्शन मिळत आहे. याचबरोबर प्रा. शाशिकांत देशमुख, प्रा. डॉ. संदिपान जगदाळे, प्रा. हरीसर्वोत्तम जोशी, श्री लक्ष्मीकांत तुबाजी, श्री. संजय सुवर्णकार, श्री विशाल जाधव, श्री केशव जोशी, डॉ. वृषाली देशमुख, देवदत्त कुलकर्णी, दिनकर पाटील, महेश काकनाळे, विवेक डोंगरे, सुनील टाक, शंभुदेव केंद्रे, एकनाथ पांचाळ, इत्यादी सदस्य अविरत परिश्रम घेत आहेत. या मासिक संगीत सभेसाठी लातूरचे कलासक्त समाजसेवक श्री प्रदीपजी राठी हे मैफलीसाठी अष्टविनायक प्रतिष्ठानचा गणेश हॉल निःशुल्क स्वरूपात उपलब्ध करून देतात. तसेच त्यांचे या उपक्रमासाठी नेहमीच मौलिक सहकार्य लाभले आहे. पाहता पाहता आवर्तनाची १०० वी सुवर्णमहोत्सवी संगीत मैफल आज संपन्न होत आहे. त्यानिमिताने विशेष संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या संगीत महोत्सवाचे स्वागताध्यक्ष माजी मंत्री व रसिकाग्रणी श्री. दिलीपरावजी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली दोन दिवस आयोजित होणाऱ्या ह्या शतकपूर्ती संगीत महोत्सवात ख्यातनाम गायक– वादक–नर्तक यांच्या गायन वादन व नृत्याची मेजवानी लातूरकर रसिकांना ऐकावयास व पाहावयास मिळणार आहे. ही मैफल यशस्वी व्हावी यासाठी आवर्तन मधील सर्व सदस्य प्रयत्नशील आहेत.आजपर्यंत या सर्वच मैफलींचे आयोजन नियोजन तसेच कलावंताच्या मानधन व खर्च आवर्तन मधील सर्व सदस्य स्वतःच्या खिशातून करीत आलेले आहेत. अभिजात संगीताचा प्रचार आणि प्रसार व्हावा हीच सर्व सदस्यांची मनोकामना आहे. अभिजात संगीताचा प्रचार आणि प्रसार व्हावा यासाठी सुरू असलेल्या चळवळी महाराष्ट्रातील नव्हे तर इतर प्रांतातील कलावंत सुद्धा गायन–वादन करण्यासाठी उत्सुक आहेत. हीच या चळवळीची यशस्विता आहे असे म्हणता येईल. अशा या चळवळीला लोकाश्रय व राजाश्रय मिळायला हवा असे वाटते. आवर्तनच्या मैफिलींची शेकडो आवर्तने पूर्ण व्हावीत एवढीच मनोकामना!

# अभिजाततेचं ध्यासपर्व

अतुल देऊळगावकर

संपर्क: ९४२२०७१९०५



**ज्ञान आणि तत्त्वज्ञानापेक्षा संगीत हा श्रेष्ठ साक्षात्कार आहे." लुडविग वान बिथोवन**
**संगीतापासून मिळणारा आनंद हा उच्च कोटीचा तृप्ती देणारा आनंद आहे." पं.कुमार गंधर्व**

खेळण्या बागडण्याच्या वयात कानावर पडणाऱ्या सुरांचा, लयीचा व तालाचा मनावर नेमका काय, कसा व किती परिणाम होत असेल? गोडधोड खाण्याचा, खेळण्याचा हट्ट करण्याच्या वयात संगीतापासून मिळणारा आनंद बाकीचे सारे मोह बाजूला सारू शकेल? बालवयातच पोरकेपण आलं आहे, कुणाचाही आधार नाही,घरची अतिशय हलाखी आहे. बालपणातील मुक्त व निर्भेळ आनंद नाही. वडीलधाऱ्यांचं ऐकून शिक्षण व करिअर घडवणारी असंख्य मुलं आसपास आहेत. अशा परिस्थितीत काही मुलं वडीलधाऱ्यांच्या आज्ञेपुढे मान न तुकवता संगीताचा शोध घेण्याचा आपला मार्ग स्वत: शोधण्याच्या दुर्दम्य आत्मविश्वासाने संगीतासाठीच आपले आयुष्य वाहून घेण्याची प्रतिज्ञा करतात आणि अतिशय हालापेष्टा सहन करत हे व्रत मनोभावे जपतात. हे सर्व अकल्पित वाटतं. उद्या काय याचा यत्किंचित अंदाज नसताना अंधारात उडी घेण्याचं धैर्य त्यांच्या अंगी कुठून आलं असेल? त्याकाळी (आजच्या सारखी ) प्रवासाची साधनं नाहीत. झटपट संवाद अजिबात साधता येत नाही. जगाशी तात्काळ जोडल्या जाणाऱ्या सध्याच्या प्रसारमाध्यमाचा मागमूस देखील नाही. तरीही संगीताकर्षणाच्या बलामुळे सगळी नातीगोती सोडून संगीत शिकण्यासाठी गुरूचा शोध घेण्याकरिता ही संगीत वेडी मुलं बाहेर पडतात, हे वास्तव आजही थक्क करून टाकणारं आहे. बालवयात केवळ आणि केवळ संगीत साधनेचा, ज्ञान प्राप्तीचा विलक्षण ध्यास घेतात आणि उर्वरित आयुष्य संगीतासाठी वाहून घेतात. दंतकथा वा मिथक वाटावी असं हे वास्तव आहे. विश्वास ठेवणं कठीण जावं असं कल्पनातीत आयुष्य त्याकाळातील अनेक थोर गायक जगले आहेत.

"दोन दिडक्यांची भिक्षा मागायला मी जन्माला आलो नाही. मला गायक व्हायचंय." बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर (१८४९–१९२६ )यांना संगीताच्या याच उर्मीनं चुलत्याला असं ठणकावून सांगण्याचं धैर्य बालवयातच दिलं. अंगावर धड कपडे नाहीत, पायी वहाण नाही, पोळल्या पायांनी संगीत शिकण्यासाठी गुरूच्या शोधात बाळकृष्णबुवा वणवण फिरले. असाच मार्ग अनेक मुलांनी निवडला. कोणत्याही सत्तेला आव्हान देण्याचं सामर्थ्य असेलेली ही मुलं कणखर होती. स्वयंभू होण्याची सारी लक्षणं बालवयात दिसू शकतात, असं म्हटलं जातं. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रातील अनेक

गायकांनी असे गुण बालवयातच दाखवून दिले.

अतिशय आडगावातील अजाण मुलांनी संगीतावर मोहित होऊन ग्वाल्हेर गाठलं. अक्षरशः काट्याकुट्यांचे, डोंगरदऱ्यांचे, नदीनाल्यांचे रस्ते ओलांडत शिकण्याकरिता या मुलांनी प्रचंड पायपीट केली. हाती पैसा नाही, पाठीशी कसलीच शिदोरी नाही, तरी हजार– दीड हजार किलोमीटर अंतरावर असलेल्या गुरूचा शोध चालू ठेवला. वासुदेवबुवा जोशी, बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, देवजीबुवा परांजपे, रामकृष्णबुवा वझे, बळवंतराव बापट, कृष्णराव लळित, कृष्णशास्त्री शुक्ल, शंकरराव धुळेकर ही मुलं संगीतसाधनेकरिता दक्षिणेतून उत्तरेकडे गेली. त्यांच्या शोधयात्रेमुळे पुढे महाराष्ट्रात संगीताचं सुवर्णयुग अवतरलं. प्रचंड खस्ता खाऊन, अपमान सहन करूनही त्यांनी ज्ञानमार्ग सोडला नाही. या मुलांच्या गायनवेडाची गावात यथेच्छ टिंगलटवाळी व्हायची, अवहेलना व्हायची. तिकडं गाणं शिकतानाच्या यातना वेगळ्याच होत्या. ''गाणं शिकणं म्हणजे सुळावरची पोळी होती. १५–१५ दिवस अंघोळ न करणाऱ्यांची चरणसेवा करावी लागे. नेमकी तालीम देण्याच्या वेळी यांची डोकी फिरत. लहरीत आले तर इतके शिकवत बसतील की तेवढ्या अवकाशात घेणे कठीण. त्याची आठवण ठेवणे कठीण आणि गळ्यातून काढणे त्याहून कठीण. दुसऱ्या वेळी आठवलं नाही तर शिव्याशापांचा वर्षाव. आईबापांचा उध्दार. ... तरी मी या सर्वांना पुरून उरलो. " असं रामकृष्णबुवा वझे यांनी लिहून ठेवलंय. असं भीषण शिक्षण घेता असतानाच ही अघोरी परंपरा खंडित करण्याचा त्यांनी निश्चय केला आणि त्याप्रमाणे पुढील पिढ्यांचा जाच थांबवला. दाहक वास्तवात अजिबात न कोमेजता परिस्थितीशी झुंझण्याचा लढाऊ बाणा त्यांच्या अंगी आला. त्यांचा जीवनानंद केवळ संगीतामध्ये होता.

बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, रामकृष्णबुवा वझे आणि भास्करबुवा बखले यांनी ख्यालगायनाची श्रवणभूमी व कर्मभूमी ग्वाल्हेरहून ओढून खाली महाराष्ट्रात आणली. उत्तरेतील संगीतगंगा महाराष्ट्री आणली. मिरज, कुरूंदवाड, इचलकरंजी, कोल्हापूर, पुणे आणि मुंबई ही गावं शास्त्रीय संगीताच्या मैफिलीसाठी प्रसिध्द झाली. स्वतःचं संगीत नसणाऱ्या महाराष्ट्रात हिंदुस्थानी अभिजात संगीत बहरत गेलं. महाराष्ट्रातील रसिक मनोभावे दाद देऊ लागले. त्यामुळे देशभरातील गायकांना महाराष्ट्रात सादरीकरणाची आस लागली. कित्येक बडे गायक महाराष्ट्रात स्थायिक झाले. संपूर्ण राज्यात संगीतमय वातावरण झालं. म्हणूनच उस्ताद अल्लादियाखाँ कौतुकाने म्हणत, 'उत्तर पैदा करती है मगर दख्खन दाद देती है. "

महाराष्ट्राला आधुनिक व सुसंस्कृत करण्याची पराकाष्ठा अनेक सुधारकांनी केली, हा इतिहास आपल्या कानावरून जातो. भारतीय अभिजात संगीताचा आणि गायन परंपरेचा त्यात अमोल वाटा आहे , इतिहासातील हे ध्यासपर्व मात्र कायम दुर्लक्षिलं जातं. अंजली कीर्तने यांनी अतोनात परिश्रम करून 'गानयोगी– पं द.वि.पलुस्कर ' या ग्रंथातून हा तेजस्वी इतिहास आपल्यासमोर ठेवला आहे. प्रस्तुत ग्रंथ 'संगीताचं सुवर्णयुग' व 'जीवनकहाणी संगीताच्या अग्रदूताची ' ह्या दोन विभागात विभागला आहे.पैकी पहिल्या विभागात या काळी संगीतवेड्या युवकांनी संगीत शिकण्याकरिता तहानभूक विसरून केलेल्या अथक परिश्रमाची कहाणी आहे. दुसऱ्या विभागात विष्णू दिगंबरांचे सुपुत्र , दत्तात्रय विष्णू उर्फ बापूराव पलुस्कर (१९२१–१९५५) यांचा जीवनपट उलगडून दाखवला आहे.

आपल्या मनाला येईल ते तात्काळ समोर हजर करणारी उपकरणे सध्या उपलब्ध आहेत. साहित्य, संगीत व चित्रपट क्षेत्रातील हवं असेल ते क्षणात आपल्या ताब्यात येऊ शकतं. या काळाला 'ज्ञानयुग ' असं संबोधन प्राप्त झालं असलं तरी ज्ञानाची लालसा असणारे अगदी अभावानंच आढळतात. बहुश्रुतपणा, चौफेर वाचन, अथक जिज्ञासा या गुणांचा भीषण दुष्काळ सध्या जाणवत आहे. माहिती म्हणजे ज्ञान नाही. माहितीवर विचार केल्यानंतर आकलन होतं ते ज्ञान ! एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्राभर ज्ञानसाधनेत मग्न झालेले अनेक ज्ञानयोगी एकाचवेळी कार्यरत होते. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महात्मा फुले (१८२७–१८९०),महादेव गोविंद रानडे (१८४२–१९०१), लोकमान्य टिळक (१८५६–१९२०), गोपाळ गणेश आगरकर (१८५६–१८९५),गोपाळ कृष्ण गोखले (१८६६–१९१५), धोंडो केशव कर्वे (१८५८–१९२२), केशवसुत (१८६६–१९०५), विठ्ठल रामजी शिंदे (१८७३–१९४४, ), बाबासाहेब आंबेडकर (१८९१–

१९५६) या प्रभृतींनी महाराष्ट्राला घडवलं. जगातील होत असलेल्या बदलांचे लोण महाराष्ट्रात आणलं. स्वातंत्र्य चळवळ, शिक्षण व समाज सुधारणा या आघाड्यांवर त्यावेळी खरोखरीच 'मराठी पाऊल पडते पुढे ' अशी होती. अस्पृश्यता व जातीप्रथेच्या जोखडात समाज जखडलेला होता. अशा काळात संगीताचं अध्ययन व अध्यापन करताना, जात व धर्माच्या क्षुद्रत्वाला थारा न देण्याचा आधुनिक विचार रूजवला जात होता. संगीताच्या सुवर्णयुगातील शिल्पकारांनी केवळ संगीतप्रसार केला नाही तर समाजमन बदलण्याची प्रिाढया घडवली व गतीमान केली. संगीत क्षेत्रातील सरंजामी व बुरसटलेपण घालवून लोकांपर्यंत संगीत पोहोचवण्याचे भगीरथ प्रयत्न महाराष्ट्रात केले. पं.कुमार गंधर्वांनी म्हटल्याप्रमाणे संगीतापासून मिळणाऱ्या दिव्य आनंदात गायक स्वत: मग्न झाले आणि खेडोपाड्यातील सर्वसामान्यांपर्यंत अगणित रसिकांना आनंदात न्हाऊ घातलं.

त्यामुळे महाराष्ट्र (व बंगाल) संपूर्ण देशाचे बौध्दिक नेतृत्त्व करित असे.राजकारण, सामजिक सुधारणा, संगीत, साहित्य, शिक्षण अशा अनेक आघाड्यांवर महाराष्ट्राचे पाऊल पुढे असायचे. राज्यभर मूलभूत प्रश्नांवर, धोरणांवर सखोल वाद,चर्चा झडत असत. जगात घडणाऱ्या बदलाचे लोण महाराष्ट्री लवकर पोहोचत असे. प्रत्येक क्षेत्रात नवीन काहीतरी घडत असे. काळाच्या ओघात ते चैतन्याचे दिन निघून गेले. एकेक संस्था लयाला गेल्या. आता महाराष्ट्रात दिसते ती सार्वत्रिक सुस्ती आणि मांद्य ! निपियतेच्या संसर्गजन्य रोगाने अवघा महाराष्ट्र नि: त्राण झाला आहे. ज्ञानापासून फारकत व गुणांची उपेक्षा होत गेली. भारतभर अंधार युग असताना महाराष्ट्रात ज्ञानाच्या ध्यासामुळे ज्ञानयुगाचा आरंभ झाला. त्याच महाराष्ट्रात आता जागोजागी ऱ्हासपर्वाच्या खुणा आढळतात.

त्या काळी एवढी कठोर तपश्चर्या करूनदेखील समाजात गायकाला स्थान नव्हते. सभ्य समाज गायकाला चार हात दूर ठेवत होता. गानविद्या मिळवूनही स्वाभिमानाने जगता येत नव्हतं. एखाद्या संस्थानिकाच्या पदरी आश्रित म्हणून जगावं लागे. राजेलोकांच्या मर्जीनुसार गाऊन त्यांचं मनोरंजन करावं लागे. काखेत तंबोरा घेऊन दारोदार वणवण भटकत 'माझी बैठक ठेवा हो ' अशी विनवणी करणारे गायक होते. संगीताचे हे दशावतार बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांचे शिष्य विष्णू दिगंबर पलुस्कर हे पहात होते. ही करूण अवस्था बदलून टाकण्याची उर्मी त्यांच्यात होती. त्यासाठी गुरूची आज्ञा मोडणं भाग होतं. या बंडखोर वृत्तीमुळे दहा वर्षं बाळकृष्णबुवांकडे शिक्षण घेणारे विष्णू गुरूजींना न सांगता पळून गेले. त्यांना लोकांमध्ये जाऊन मैफल करण्याची अभिनव कल्पना सुचली होती. कसदार व सुरेल गायनामुळे त्यांची कीर्ती पसरत गेली. त्यांनी १८९७ साली राजकोट येथे तिकिटं लावून संगीताचा जलसा केला. 'संगीताचा बाजार केला " असे टोमणे खाल्ले. हळुहळू देशभर संगीताचे जलसे होऊ लागले. विष्णूबुवांचं पहाडी गाणं ऐकून कित्येक संस्थानिकांनी त्यांना दरबारी गायक होण्याचा आग्रह केला. परंतु विष्णूबुवांचं यांचं ध्येय एवढं सीमित नव्हतं. त्यांनी संगीत हा धर्म मानला होता. मिशनऱ्यांच्या जिद्दीनं संगीतकलेचा प्रसार करण्याचा निग्रह होता. त्यामुळे त्यांनी गुजराथ, राजस्थान, पंजाब, उत्तर प्रदेश, काश्मीर अशी प्रांतोप्रांती भ्रमंती केली. गायनातून श्रोत्यांची मने जिंकली.परंतु नुस्त्या मैफिलींचे फड जिंकण्यात त्यांचं मन रमलं नाही. मथुरेत आठ महिने तळ ठोकून हिंदी व ब्रज भाषेचा कसून अभ्यास केला. पंडितांच्या सहाय्यानं मूळ संस्कृत ग्रंथांचे अध्ययन केले. या काळातच विष्णूबुवांना स्वरलेखन कला हस्तगत करण्याची आवश्यकता वाटू लागली. घोकंपट्टी व गुरूचं अनुकरण संगीत शिकण्या– शिकवण्याची एकच पध्दत त्या काळी रूढ होती. हा जाच पाहिलेल्या विष्णूबुवांना रागाचं नाव, नियम यांची नीट माहिती विद्यार्थ्यांना देण्याची गरज वाटत होती. स्वरलेखनासाठी रागाची चीज सावकाश म्हणून प्रत्येक अक्षरामागील स्वराचा शोध घेऊ लागले. जोधपूरला त्यांची भेट पाश्चात्य बँडमास्टर जेम्स यांच्याशी झाली. बुवांची जाज्वल्य देशभक्ती व ब्रिटिश विरोध ज्ञानग्रहणाच्या आड आलं नाही. त्यांनी खुल्या मनानं पाश्चात्य स्वरलेखनपध्दती समजून घेतली आणि त्या संकल्पनेचा वापरही केला. उत्तम वक्ता झाल्याशिवाय संगीतप्रसार करणे अवघड जाईल. असा सल्ला मिळाल्यावर विष्णूबुवांनी प्रयत्नपूर्वक भाषण–भयावर मात केली.

५मे १९०१ या दिवशी संगीतक्षेत्रात हलकल्लोळ झाला. विष्णूबुवांनी लाहोरला गांधर्व

विद्यालयाची स्थापना केली. संगीताचे क्लास,पुस्तकं आणि परिक्षा ही कल्पनासुध्दा सनातनी बुजुर्गांना सहन होत नव्हती. ``तुमच्या महाविद्यालयातून किती तानसेन निर्माण करणार?''असं कुत्सितपणे विचारलं जात असे. ``खुद्द तानसेनालाही दुसरा तानसेन निर्माण करता आला नाही.पण तानसेनाला न जमलेली एक गोष्ट मी केली आहे. या देशात हजारो कानसेन तयार केले आहेत.'' असं हजरजबाबी उत्तर विष्णूबुवांनी दिलं होतं. भविष्याचा वेध घेऊन वर्तमान बदलणाऱ्या विष्णूबुवांचं वाक्य प्रमाण ठरलं. महाराष्ट्राच्या कोनाकापेऱ्यात संगीताचे दर्दी तयार झाले.

याच काळात संगीत संशोधनाचा ध्यास घेऊन विष्णू नारायण भातखंडे दक्षिणेतून उत्तरेला गेले. मोठ्या कष्टाने हिंदुस्थानी संगीतातील राग, रागिण्या गोळा केल्या आणि त्यांचे 'थाटांच्या ' आधारे वर्गीकरण केले. १९१८ साली भातखंडे यांनी ग्वाल्हेरला माधव संगीत विद्यालयाची तर १९२६ साली लखनौ मध्ये मॅरिस म्युझिक कॉलेजची स्थापना केली. दक्षिणेतील गायकाने उत्तरेत घडवेलेलं हे परिवर्तन सनातनी गवयांना अजिबात खपलं नाही. परंपरा आणि नवता, गुरूकुल पध्दत आणि पाठशाळा पध्दत यात चकमकी उडाल्या. पण नव्या गायनशाळेला लोकांचा तसेच सयाजीराव महाराजांचा पाठिंबा मिळाला.

गुरूच्या शोधात शिष्य निघत तसेच शिष्योत्तमाच्या शोधात असलेले गुरूही या काळात दिसू लागले. विष्णूबुवांनी वामनराव सडोलीकराचं दहाव्या वर्षी गायन ऐकलं. ``तुमचा मुलगा द्याल का ?'' अशी विचारणा केली. या नवमतवादामुळे भारतीय संगीताने कात टाकली. विनायकबुवा पटवर्धन, नारायणराव व्यास, बा. र.देवधर असे महान गायक ही विष्णूबुवांची देण आहे. पुढे नारायणराव व्यासांनी दत्तात्रय विष्णू (बापूराव)पलुस्कर यांना घडवलं. देवधर मास्तर यांनी शिवपुत्र कोमकळी उर्फ कुमार गंधर्व या प्रतिभावंत गायकाला पैलू पाडले. उस्ताद अब्दुल करीम खान यांनी सवाई गंधर्वांना संगीत संथा दिली. सवाई गंधर्वांनी गंगूबाई हन्गल, भीमसेन जोशी, फिरोज दस्तूर अशी शिष्यपरंपरा निर्माण केली. उस्ताद अल्लादियाखान यांनी मंजी खान, भूर्जी खान, भास्करबुवा बखले, वामनराव सडोलिकर, केसरबाई केरकर, मोगुबाई कुर्डिकर यांना तयार केलं. भूर्जीखान यांनी मल्लिकार्जुन मन्सूर यांना तर मोगुबाईंनी किशोरीबाईंना घडवलं. भातखंडे यांचे शिष्य श्रीकृष्ण उर्फ अण्णासाहेब रातंजणकर यांनी के.जी.गिंडे, सी.आर.भट, दिनकर कैकणी यांची पिढी तयार केली.

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचा उदारमतवाद त्यांचे शिष्य नामदार गोपाळकृष्ण गोखले यांनी पुढे नेला. स्वातंत्र्य चळवळ व सामाजिक सुधारणा दोन्ही आघाड्यांवर गोखले कार्यरत राहिले. गोखले यांचा हा वारसा त्यांचे शिष्य महात्मा गांधी यांनी प्रगल्भ केला. अगदी त्याच रीतीने विष्णूबुवांनी पाया रचलेल्या गायन परंपरेला बा.र.देवधर यांनी उपांत केलं. देवधर शिष्य कुमार गंधर्व यांनी त्यावर कळस चढवला.

संगीताच्या सुवर्णयुगापूर्वी गायन व नर्तन या कला फक्त पेशेवर गायिका, कलावंतिणी व देवदासीच शिकायच्या. सभ्य स्त्रियांचं ते काम नाही हा संकेत शतकानुशतकांपासून चालत आला होता. गाणं शिकण्यासाठी गुरूगृही जाऊन संगीत शिकावं लागत असे. गुरूकडून गंडा बांधल्याशिवाय संथा चालू होत नसे. अशा दिव्यातून जाऊन अनेक गायिकांनी त्यांची प्रतिभा सिध्द केली. परंतु समाजानं त्यांना पेशाच्या भिंतीआड ठेवत कलेच्या क्षेत्रात अजिबात स्थान दिलं नाही आणि पुरूषी क्षेत्र अबाधित राखलं. राजेरजवाड्यांच्या महालात आणि गणिकांच्या कोठ्यात बंदिस्त झालेल्या अभिजात संगीताला लोकाभिमुख करण्याचं ऐतिहासिक कार्य विष्णुबुवांनी केलं. स्त्रियांना शिकवण्यात पुढाकार घेतला. कर्मठपणा दूर सारून स्त्रियासुध्दा गाणं शिकू लागल्या. विष्णुबुवांनी त्यांच्या पत्नी रमाबाई यांना गाण्याची उत्तम तालीम दिली आणि गांधर्व विद्यालयाच्या व्यासपीठावरून गायला लावलं, त्याकाळी ही काही साधीसुधी बाब नव्हती. खळबळ उडवणारी घटना होती. इतिहास घडवणारा हा सामाजिक बदल होता. विष्णबुवांनी काहीही न बोलता पुरूषसत्ता व धर्मसत्तेला सहजगत्या बाजूला सारलं होतं. कमालीचं स्त्री द्वोष्टं वातावरण असूनही , वाटेल तेवढ्या यातना सोसून स्त्रियादेखील मोठ्या हिंमतीनं गाणं शिकू लागल्या.

१९०८ साली विष्णूबुवांनी गांधर्व विद्यालयाचं प्रमुख केंद्र मुंबईला हलवल्यावर स्त्रियांचे स्वतंत्र वर्ग चालू केले. दुपारी ३ते ६ ही वेळ स्त्रियांसाठी राखून ठेवली. त्यांना मुंबईत उत्तम प्रतिसाद मिळाला. प्रार्थना समाजवादी, अन्य सुधारक व पार्शी मंडळींनी

स्त्रियांना गायनशाळेत दाखल केलं. सनानती खवळले नसते तरच नवल ! 'शिकवताना तरूण शिक्षक खोलीचे दार बंद का करतात? इथे अनैतिक प्रकार कशावरून चालत नसावेत? जनतेने सावध व्हावे.' अशा आशयाच्या बातम्या वर्तमानपत्रातून येऊ लागल्या. विष्णूबुवांनी या चारित्र्यहननाची दखल घेऊन तातडीने उत्तर दिलं. ''आमच्या विद्यालयातील वातावरण अतिशय शुध्द आहे. निरनिराळ्या वर्गातील आवाजाचा त्रास होऊ नये यासाठी वर्गाची दारं बंद करणं भाग पडतं.पण ती दारं आतून बंद नसतात. विद्यालयाचे अधिकारी वर्गातील शिक्षण पहाण्यासाठी आत जात असतात. कोणास शंका असल्यास कोणत्याही वर्गाची पाहणी करावी." या आव्हानानंतर सनातन्यांची तोडं बंद झाली.

हिराबाई बडोदेकरांचे (१९०५-१९८९) वडील अब्दुल करिम खान यांचा हिराबाईंच्या गायन शिकण्याला सक्त विरोध होता. परंतु हिराबाईंच्या आई ताराबाई माने खंबीरपणे पाठीशी होत्या. किराणा घराण्याच्या वहिदखान यांची तालीम हिराबाईंना दिली. हिराबाईंचं गाणं ऐकून विष्णुबुवांनीच त्यांना पहिलं व्यासपीठ मिळवून दिलं. हिराबाईंनी स्त्री मैफिलीचं स्वरूप बदलून टाकलं. त्याकाळी गायिकांनी उभं राहून गाण्याचा दंडक होता. बसूनगाण्याची मुभा केवळ पुरूषांना होती. हा लिंगभेद मोडून हिराबाईंनी बसून गाण्याचा प्रघात सुरू केला. त्यांचं काSकिळकंठी गायन आणि सात्विक वर्तनामुळे स्त्रिया व पुरूष दोघेही प्रभावित झाले. स्त्रीचं पाऊल घराबाहेर पडत नव्हतं अशा वातावरणात हिराबाईंमुळे गायिकेची प्रतिमा बदलली गेली. त्यांच्या मैफिलींना स्त्रियांची गर्दी होऊ लागली. भारताच्या स्वातंत्र्यदिनी आकाशवाणी वरून वंदे मातरम् ध्वनीक्षेपित व्हायचे होते. अनेकजणांची इच्छा व प्रयत्न होते. परंतु हा मान हिराबाईंनाच मिळाला. गंगूबाई हन्गल, ज्योत्स्ना भोळे यांच्यापुढे हिराबाईंचा आदर्श होता. हिराबाईंनी घालून दिलेल्या पायंड्यामुळे पुढे केसरबाई केरकर, मोगूबाई कुर्डीकर, लक्ष्मीबाई जाधव, सरस्वतीबाई राणे या गानतपस्वी स्वयंप्रकाशानं तळपू लागल्या. त्यानंतर किशोरी आमोणकर, प्रभा अत्रे, मालिनी राजूरकर या विदूषींनी स्वत:ची मोहोर उमटवली. या गायिकांनी स्वकर्तृत्त्वानं समाजात बदल घडवून आणले. स्त्रियांभोवतीच्या परंपरेच्या भिंती न बोलता उलथून टाकल्या. स्त्री कलावंताविषयी केवळ गैरसमज रूढ होते अशा काळात त्यांनी उत्तराला प्रत्युत्तर दिलं नाही, वाद घातले नाहीत. गायनाचं ध्येय उराशी बाळगलं आणि ही सुधारकता कणखरपणे कृतीत उतरवली.

प्राचीन काळापासून नवता व परंपरा, बुध्दी व भावना अशी अनेक द्वंद्व चालत आली आहेत. ही सारी द्वैते मिटवून त्यांच्यात अद्वैत साधण्याची किमया विष्णूबुवा, टागोर, गांधी व नेहरू यांनी साधली. टिकवून धरावी अशी परंपरा कोणती ? नवतेमधील कशाचा स्वीकार करावा? परंपरा आणि आधुनिकतेचा उत्तम संगम कसा घडवावा ? हे कायम आव्हान असतं. विंदा करंदीकरांनी नेमक्या शब्दात म्हटलंय 'प्रतिभावंताला परंपरेत एकाच वेळी आधार आणि आव्हान दोन्ही दिसत असतात. परंपरेला सामेरे जाताना तो जो नजराणा पुढे करतो त्याचेच नाव नवता." मध्ययुगात रुतलेल्या सुस्त भारताला आधुनिक करणाऱया द्रष्ट्या सुधारकांच्या नामावलीत विष्णुबुवांचा विसर पडणं हे कृतघ्नपणाचं ठरेल.

विष्णू दिगंबरांच्या डोळ्यादेखत बापूची पहिली व एकमेव मैफल झाली. वयाच्या आठव्या वर्षी कानपूरच्या संगीतसभेत बापू 'वातापि गणपती भजे ' ही त्यागराजाची कृती गायला. विष्णू दिगंबरांनी त्या काळात हजारो रूपये कमावले आणि ही कमाई संगीत प्रसारासाठी खर्चून टाकली. त्यांच्या निधनानंतर शिल्लक होती , शंभर रूपयांची फक्त एक नोट ! पतीच्या मागे गायनानं भारलेल्या बापूला वाढावण्याचं आव्हान रमाबाईंपुढे होतं. नाशकात राहून बापूला संगीतशिक्षण मिळणार नाही हे ओळखून त्यांनी आधी मुंबई व नंतर पुण्याला स्थलांतर केलं. नारायणराव व्यास, विनायकबुवा पटवर्धन यांनी बापूला गायनाचे धडे शिकवले. पुण्याच्या गांधर्व महाविद्यालयात बापूनं गाणं शिकण्यास प्रारंभ केला आणि सहा महिन्यांनी विनायकबुवा बापूला जालंधरला घेऊन गेले. याच जालंधरमधील रसिकांनी विष्णूबुवाचं गायन ऐकून गावातून मिरवणूक काढली होती. विष्णूबुवांचा मुलगा वयाच्या चौदाव्या वर्षी गाणार, हे ऐकून आसपासच्या गावातून लोक फुलं, फळं, हार, मिठाई घेऊन आली. या अपेक्षांचा प्रचंड दबाव येऊन बुजलेला बापू व्यासपीठावर गेला अन् खुलला. त्याचा बिहाग ऐकून लोक मंत्रमुग्ध झाले.

बालपणातील अतोनात यशामुळे मोठेपणी अनेक गायक बिघडून जातात. परंतु बापूराव वरचेवर खुलत गेले. प्रो.बा.र देवधर यांनी त्यांना बोलावून सांगितलं होतं. ''तू कोणाचंही अनुकरण करू नकोस. स्वतंत्रपणे गाण्याचा विचार कर. शब्दांच्या उच्चारांकडे लक्ष दे. त्यात मार्दव हवं,गोडवा हवा. शब्द फार स्पष्ट ,रोखठोक उच्चारायचे नाहीत. रूक्ष वाटतात. शब्दातले भाव जाणून घ्यायला हवेत.'' ओंकारानाथ ठाकूर बापूरावांना अधूनमधून सूचना करायचे. बापूराव, अनेक गुरूंकडून 'जे जे, उत्तम ते ते ' घेत गेले. घराण्याच्या कप्पाबंद भिंतीत ते अडकले नाहीत. त्यामुळे त्याचं गाणं बहरत गेलं. इतर सर्व ग्वाल्हेर गायकांपेक्षा ते वेगळे वाटत होते. त्यांनी ग्वाल्हेरीपण ठेवूनही अनानन्यसाधारण रंजकता निर्माण केली. त्यांच्या गाण्यात माधुर्य, सुगमता व भावोत्कटता होती. आलाप, ताना, बोलताना, लय आणि ताल या सर्व घटकांचा आल्हाददायक मेळ ते साधत होते. स्वराकृतींचं सौंदर्य प्रकट करण्याची कला बालगंधर्वांप्रमाणेच बापूरावांना साध्य झाली होती. साहजिक बापूरावाचं गाणं थेट हृदयाला भिडत असे. देशभरातील रसिक त्यांच्या गाण्याची आतुरतेनं वाट पाहत. आकाशवाणीवर त्यांना सदैव मागणी असे. एकदा त्यांचं गाणं आकाशवाणीवर लागलं होत आणि ते शांतपणे ऐकत होते. त्यांच्या विद्यार्थीनीनच विचारलं, ''स्वत:चं गाणं ऐकताना कसं वाटतंय ?'' बापूराव म्हणाले,'' स्वरापासून लांब जात नाही ना हे तपासतोय '' आयुष्यात अनेक शिखरं पार करूनही त्यांची वृत्ती ही विनम्र साधकाची राहिली.

१९५० साली प्रजासत्ताक दिनानिमित्त लाल किल्ल्यावर संगीत समाराहोत अनेक बड्या कलावंताना आमंत्रित करण्यात आलं होतं. अध्यक्ष स्थानी नबाब पतौडी होते. प्रारंभीच महंमद रफी गायले आणि पाच हजारांच्या जनसमुदायानं प्रचंड दाद दिली. त्यांच्यानंतर आलेल्या शास्त्रीय गायकांना गोंधळ करून लोकांनी पळवून लावलं. मिळालेल्या दहा मिनिटात काय करावं असा बापूरावांना पडला. त्यांनी संथ लयीतील विलंबित टाळून बहार रागातील 'कलियन संग करत रंगरलिया'हा द्रुत ख्याल चालू केला. भावपूर्ण आवाजानं हजारोंचा श्रोतृवर्ग मोहित झाला आणि शांत बसला. आठव्या मिनिटाला गाणं संपवून ते उठले. पण श्रोते त्यांना उठू द्यायला तयार नव्हते. टाळ्यांच्या कडकडाटानं परिसर दुमदुमून गेला. बापूरावांनी 'चलो मन गंगाजमना तीर' हे भजन म्हटलं आणि दिल्लीकर त्यांच्यावर फिदा झाले.

१९५२ साली 'बैजूबावरा 'मध्ये तानसेन व बैजू यांची जुगलबंदी चित्रित करायची होती. राजमान्य विरुध्द लोकमान्य गायक अशी ती स्पर्धा होती. चित्रपटात बैजू तानसेनला हरवतो. तानसेनला आवाज देणार होते, उस्ताद अमीरखान. त्यांच्या तोलामोलाच्या गायकाचा शोध चालू होता. अखेर खुद्द अमीरखान यांनीच संगीतकार नौशाद अली यांना बापूरावांचे नाव सुचवले. ''पूनामें वो शेरका बच्चा है ना डी.व्ही.पलुस्कर , उन्हे पूछो. हिंदोस्तामे बैजूके लिये वही एक आवाज है.'' या सिंहाच्या छाव्याकडून हरायला मला आवडेल, असे सांगितल्यावर बापूरावांची बैजूसाठी निवड झाली. चित्रपटात गाणं गैर होणार नाही ना ? विष्णूबुवांच्या इभ्रतीला धक्का लागणार नाही ना ? अशी शंका त्यांना आली. त्यांनी पं.शंकरारव व्यास, आई व अमीरखान यांचा सल्ला घेतला. त्यांच्या होकारानंतर निर्णय घेतला. पुढील अनेक मैफिलीत त्यांना 'आज गावत मन मोरो ...'ची फर्माईश होऊ लागली. बापूराव नम्रपणे ठाम नकार देत, केवळ शास्त्रीय गायन सादर करत राहिले.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर पं.नेहरूंनी शेजारी राष्ट्रांशी संबंध सुधारण्याकरिता ाढाRडा, सांस्कृतिक, आर्थिक उपाम हाती घेतले. १९५४ साली पंडितजी स्वत: चीनला जाऊन आले आणि १९५५ साली चीनच्या दौऱयावर सांस्कृतिक पथक पाठवण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्या शिष्टमंडळात बापूरावांचा समावेश होणं स्वाभाविक होतं. देशोदेशीच्या शिष्टमंडळांचं स्वागत ही औपचारिकता असते. परंतु पंतप्रधान चौ एन् लाय यांनी सर्व जबाबदाऱयातून खूप वेळ काढला. त्यांनी भारतीय शिष्टमंडळांतील निवडक कालवंतांना घरी भोजनाचं आमंत्रण दिलं. तिथं बापूरावाचं गायन झालं. ''मी दुर्गा राग गायलो. तबला– प्रेमवल्लभ , सारंगी– रामनारायण, हा कार्पाम लोकांना आवडला. कार्पाम झाल्यावर श्री. चौ एन् लाय यांनी गुलाबाचे फूल माझ्या शेरवानीस लावले व प्रेमपूर्वक हस्तांदोलन केले. याचे फोटो व न्यूजरील घेण्यात आली.'' अशी नोंद बापूरावांच्या रोजनिशीत नोंद आहे. नंतरच्या अनेक जाहीर व खासगी कार्पामांसाठी चौ एन् लाय यांनी हजेरी लावली आणि

बापूरावांना मनसोक्त दाद दिली.

बापूरावांची गायकी सर्वांना तृप्त करत होती. देशभर नावलौकिक झाला होता. अशा ऐन वसंतात बापूरावांचं मेंदूज्वरानं निधन झालं. 'द इलेस्ट्रटेड वीकली ऑफ इंडिया' मधील लेखात मोहन नाडकर्णी म्हणतात, `` अवघ्या चौतिसाव्या वर्षी अचानक ओढवलेला दत्तात्रय विष्णू पलुस्कर यांचा मृत्यू ही राष्ट्रीय हानी आहे. स्वातंत्र्योत्तर काळात अभिजात संगीताचं पुनरुज्जीवन सुरू झालं होतं. त्याचे पलुस्कर हे सर्वमान्य अव्वल उद्गाते होते. बुजुर्ग कलावंतांची महावस्त्रं परिधान करण्यास सक्षम तरूण पिढीचं ते प्रतिनिधित्व करीत होते. संगीतातील थोर कलावंतांची पिढी अस्तंगत होत असताना त्यांचा मृत्यू झाला आहे. "

बापूरावांच्या गाण्यावर मनस्वी प्रेम करणाऱ्या अंजली कीर्तने यांना त्यांच्यावर वर लघुपट करण्याची आस लागली. १९४४ ते १९५५ या बारा वर्षांच्या बापूरावांच्या रोजनिशींमधून जीवनकथेचा मागोवा त्यांनी घेतला. त्या आधारे अंजली बाई संशोधन करीत गेल्या. पंजाब, उत्तर प्रदेश, बंगाल राज्यात जाऊन आल्या. कुरूंदवाड, मिरज, नाशिक, पुणे, मुंबईत गेल्या. पुण्याच्या मॉडर्न हायस्कूलमध्ये बापूराव शिकले. त्या शाळेतील हजेरीपट पाहून समकालिनांचा शोध घेतला. बापूरावांचे स्नेही, नातेवाईक, संगीतकार, समीक्षकांशी सविस्तर बातचीत करून बापूराव समजून घेतले. हा शोध घेत असताना त्या काळातील सांगीतिक वातावरणाचा अभ्यास करीत गेल्या. संगीतसागरात खोलवर जाऊन त्यांनी भारतीय संगीताच्या सुवर्णयुगाचे बहुमोल रत्न आपल्या हाती ठेवलं आहे. प्रत्येकामध्ये जिज्ञासा असते. परंतु त्या जिज्ञासेचा प्रवास फार लवकर खंडित होतो. कुतुहल लवकर शमतं. मात्र जिज्ञासेच्या अथक यात्रेची वाटचाल संशोधनकडे जाते. हे संशोधन कसं असावा याचा वस्तुपाठ अंजली बाईंनी दिला आहे. त्यासाठी मराठी वाचक त्यांचा सदैव ऋणी राहील.

गानयोगी– पं द.वि.पलुस्कर – अंजली कीर्तने

पृष्ठे–५०३, किंमत–६५०/– रूपये

नवचैतन्य प्रकाशन, मुंबई

# प्रज्ञाचक्षु - पं.शांताराम चिगरी गुरूजी

प्रा.हरीसर्वोत्तम जोशी



[संगीत विभाग] राजर्षी शाहू महाविद्यालय,लातूर

**" वीणा वादन तत्वज्ञ: श्रुति जाति विशारद: ।**
**तालज्ञश्चाप्रयासेन मोक्ष मार्गम् च गच्छति।।"**

परतत्वाचा स्पर्श झाला की सामान्यांचा असामान्य होऊन जातो, त्यालाच आपण चमत्कार असे म्हणतो. अंतर्नीहीत पूर्णत्वाची वाटचाल काय असावी याचं मूर्तीमंत उदाहरण म्हणजे पं. शांताराम चिगरी गुरुजी. जीवनाच्या अगणित अडचणीमध्ये वादळातील दीपस्तंभाप्रमाणे अविरतपणे आपले संपूर्ण जीवन समर्पित भावनेने संगीतकलेला अर्पण केले. पाहणे आणि दृष्टी असणे याची अनुभूती गुरुजीना पाहिले की प्रकर्षाने जाणवते. प्रतिभेच्या साक्षात्कारापुढे अंधत्व अंधार या शब्दांचा मागमुसही उरत नाही, उरते ते आकाशाला गवसणी घालण्याचे सामर्थ्य आणि हेच सामर्थ्य एका प्रज्ञाचक्षुला पुनश्च जन्म देते.

कोवळ्या, मुग्ध वयामध्ये सर्व जगाला डोळ्यात साठवून घेण्याची उत्सुकता नियतीच्या एका फटक्यात अंधःकारमय झाली. एक प्रकारे हा परकाया प्रवेशच होता. सुप्त गुणांचा सप्त स्वरांकडे सुरू झालेला प्रवास स्वतःसह अनेकांच्या जीवनात प्रकाश घेऊन आला. दृष्टीहीन असले तरी अंतर्दृष्टीचा वरदहस्त होता, म्हणूनच हे घडले. काही काही माणसं परीसाचा धर्म घेऊन जन्माला आलेली असतात, गुरुजी, त्यातलेच एक व्यक्तिमत्व. गाणं, तबला, संवादिनी, दिलरुबा, व्हायोलिन, बासरी, मेंडोलीन, शहनाई, पखावज ढोलक, ढोलकी, सतार अशा विविध वाद्यावर व गाण्यावर एकाच वेळी प्रभुत्व निर्माण करणे हे सामान्यांचे काम नव्हे. अष्टपैलुत्वाचा हा कलाविष्कार अष्टावधानीच करू शकतो, आणि हे अवधान गुरुतत्त्वाच्या स्पर्शाने व स्वतःच्या बुद्धीसामर्थ्यावर त्यांनी निर्माण केलेला होता. पं. नारायणराव व्यास, पं. बद्रीप्रसाद मिश्र, उस्ताद अहमद जान थिरकवाँ, पं. विनायकराव पटवर्धन अशा गायन-वादनाच्या क्षेत्रातील सिद्ध हस्त गुरुंनी एक कोहिनूर घडविला. आपला अहंकार, बुद्धिवाद आधी असलेले थोडे ज्ञान या अवडंबरात न राहता पूर्ण श्रद्धेने, मनाची पाटी पूर्ण कोरी करून गुरु समोर बसणे हे खऱ्या शिष्याचं लक्षण असते, आणि तेव्हाच ज्ञान घेणे व देणे खऱ्या अर्थाने सफल होते याचा प्रत्यय गुरुजींकडे पाहिले की सातत्याने येतो. साधना असेल तरच उत्कर्ष साधता येतो.संगीताच्या माध्यमातून आत्मनिवेदन हाच साधनेचा मूलमंत्र आहे याची अनुभूती गुरुजींच्या श्वासागणिक आम्हा संगीत साधकांना नेहमीच येते. कला, कलावंत, शिष्य परिवार यांच्यावर निरातिशय प्रेम करणे हा गुरुजींचा अंतस्थ स्वभाव असला तरी प्रसंगी कठोर प्रहारही ते करायचे. कारण सत्यम शिवम सुंदरम ची कल्पना सत्यात उतरावयाची झाल्यास कलेशी प्रतारणा करणे खऱ्या कलावंतांना जमत नाही.

कलेचे सादरीकरण करताना स्वतःला आतल्या दिशेकडे नेण्याऐवजी बाहेरच्या दिशेला नेण्याकडे कल झाला की, ते दुःखाचं कारण घडते हा संदेश निःसंकोचपणे देणे हे जातीवंत कलाकाराचे लक्षण गुरुजीमध्ये ओतप्रोत भरलेले आहे. कला जगतातल्या अनेक कलावंतांचे गुरु असलेल्या पं. शांताराम चिगरी गुरुजींनी आपल्याकडील सर्व मुक्तहस्ताने दिले. दिल्याने वाढते हा त्यांच्या गुरुनी दिलेला वसा त्यांनी स्वतः गुरु म्हणूनही तेवत ठेवला. म्हणूनच स्व. अण्णु भोसले, मुकेश जाधव, प्रा. संदीप जगदाळे, अंगद गायकवाड, गोंविद शेळके, खंडेराव कुलकर्णी उत्तम चिगरी, हरीश कुलकर्णी अशा अनेक शिष्योत्तमानी गायन– वादनाच्या क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा अटकेपार फडकविला. राग शिकविता येतो, गाण्याच्या बाबतीत गळा, वाद्याच्या बाबतीत हात आपण निरंतर सरावाने तयार करू शकतो, पण आश्वासकता आणि कलेमध्ये पारंगत व्हावे असे वाटत असेल तर मात्र गुरुतत्त्वाचा स्पर्श शिष्यांना झाला पाहिजे. गुरुजींच्या अनेक प्रतिथयश, उदयोन्मुख शिष्यांना पाहिले की याची प्रचिती आपणास येते. अभिजात कलांची जपणूक करण्याचं उत्तरदायित्व गुरुजींनी निष्ठेन सांभाळलेले आहे. शिष्य केवळ मैफिली मारणारा न होता तो प्रबुद्ध असणेही आवश्यक आहे. त्याच्या सौंदर्याकडे पाहण्याच्या कक्षा रुंदावल्या पाहिजेत, संगीतातल्या सौंदर्यविषयक संकल्पना घडवता आल्या पाहिजेत याचा कटाक्ष गुरुजींनी नेहमीच ठेवलेला आहे.

कलेची निर्मिती ही स्वान्त सुखाय असावी, कीर्ती, बहुमान, पैसा या गोष्टी नंतर येतात. चरितार्थ चालविण्यासाठी व पुढे चालून धन, संपत्ती मिळविण्यासाठी जेव्हा कलेचा बाजार मांडला जातो, तेव्हा कला ही हीनरुचीची दासी होते, म्हणूनच कलेचे कलेवर होत असताना गुरुजींसारख्या व्यासंगी संगीत साधकाने आपल्या निरंतर ध्यासाने हा संगीताचा वारसा अव्याहतपणे जपण्याचे काम केले. कर्तृत्व महान असले तरी प्रसिद्धीपासून कोसो दूर राहून “जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी द्यावे, अवघे शहाणे करून सोडावे सकल जन” या समर्थ रामदासांच्या उपदेशाप्रमाणे प्रसिद्धीपेक्षा सिद्धीकडे कसे प्रयाण करता येईल याचाच विचार गुरुजींनी नेहमी केलेला आहे. कलावंतांची वाटचाल ही अंतिम सत्याच्या दिशेला हवी. मजा व केवळ रंजन म्हणून कलेकडे पाहणे गुरुजींच्या स्वभावात बसत नाही. याची देही, याची डोळा! शिष्यांचं कला वैभव पहात असताना मुक्तहस्तानं कोणताही अभिनिवेश न बाळगता पडणारी कौतुकाची थाप शिष्यांना नेहमीच नवसंजीवनी देत राहिलेली आहे. गुरुजींच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेत असताना त्यांनी भारतातील अनेक दिग्गज कलावंतांसोबत केलेली साथसंगती, अलबेला, हमदर्द, साखरपुडा अशा अनेक चित्रपटातील त्यांचे वादन आजही रसिक श्रोत्यांच्या हृदयावर विराजमान असलेले आपल्याला पाहायला मिळते. पण या प्रसिद्धीच्या झोतात ते फार काही रमले नाहीत. खैनूर ते लातूर प्रवासादरम्यान मुंबई, कोलकाता, काठेवाड, पुणे, सोलापूर, नांदेड, उदगीर अशा विविध ठिकाणी भ्रमंती करत– करत आपल्या संगीत साधनेचा समृद्ध वारसा त्यांनी लातूरमध्ये आणला आणि केवळ लातूरच्याच नव्हे, तर पंचक्रोशीतल्या जुन्या जाणत्या रसिक, प्रेक्षक, श्रोत्यांची व संगीताभ्यासू विद्यार्थ्यांची सांगीतिक भूक खऱ्या अर्थाने गुरुजींनी भागविली. कधी अनुकूल तर कधी प्रतिकूल अशा दोन्ही परिस्थितीत अत्यंत शांत व संयमी वृत्तीने संगीत सेवेचे व्रत त्यांनी हाती घेतलं. सुरताल संगीत महाविद्यालयाची प्रतिष्ठापना आणि त्यातील दिव्यत्वाचा साक्षात्कार म्हणजे पं. शांताराम चिगरी गुरुजी, असे समीकरणच जणु झालेले होते. गुरुकुल पद्धती व नव्या शिक्षण पद्धतीचा समन्वय राखून ज्ञानदानाचे हे सत्र निरंतर सुरू राहीले. प्रकृतीच्या कणाकणात ओतप्रोत भरलेल्या संगीताची अनुभूती आपल्या रोमा रोमात भिनलेली आहे. ‘संगीत हाच श्वास आणि संगीत हाच ध्यास’ हीच आपल्या जीवनाची इतीकर्तव्यता” मानून, कलेचा व्यास वाढविण्यातले आपले समर्पण आम्हा कला साधकांच्या मध्ये एक प्रकारचे नवचैतन्य निर्माण करते.

आजचे भौतिक प्रगतीचे युग, वाढलेली गती वगैरे कांहीही असो, आधुनिक गगनचुंबी इमारतीच्या शेजारी जुन्या, प्राचीन मंदिराचं स्थापत्य आपला महिमा घेऊनच उभे असते आणि हा महिमाच क्लासिक असतो. त्या अनुषंगाने निस्पृहतेने आयुष्यभर आपलं संपूर्ण जीवन संगीतासाठी समर्पित केले. आज वर्तमान मध्ये तुम्ही स्वर्गस्थ असलात तरी आमच्या असंख्य मना मना मध्ये मात्र कायम हृदयस्थ आहात. म्हणूनच आवर्तन प्रतिष्ठानच्या मासिक संगीत सभेची शतकपूर्ती तुम्हाला समर्पित करीत आहोत.
दिव्यत्वाची जेथ प्रचिती तेथे कर माझे जुळती

आवर्तनच्या शतकपूर्ती संगीत
महोत्सवास हार्दिक शुभेच्छा!

**Tejas** Travels
**तेजस ट्रॅव्हल्स**
तेजोनिधी व्हेंचर्स एलएलपी चा उपक्रम
अर्थस्य मूलम् उत्थानम्
Comfort with Style

शौचालयाच्या सुविधेसह

**लातूर - पुणे गाडीला दिलेल्या भरघोस प्रतिसादानंतर**
**आपल्या सेवेत सुरु करीत आहोत**

# लातूर - मुंबई

सोलापूर मार्ग

(वाशी, चेंबूर, सायन, दादर, सीएसटी (VT))

## बुकींगसाठी संपर्क : 8275829393




**2 × 1 A/C Sleeper**
Premium Class

Laxmi Towers
Near Deshikendra School
Latur - 413512

Latur Head Office - (02382) 242001
Customer Care No. 9022061118
7588547740
tejastravelslatur@gmail.com
Book online : www.tejastravels.in

लातूर- पुणे | पुणे - लातूर | लातूर- मुंबई | मुंबई - लातूर
लवकरच सुरु होत आहे लातूर - हैदराबाद | हैदराबाद - लातूर

आवर्तनच्या शतकपूर्ती संगीत
महोत्सवास हार्दिक शुभेच्छा!

हॉटेल
# गंधर्व
प्युअर व्हेज

मन तृप्त करणारी चव






**9168163999 | 7447559990**
www.hotelgandhrav.com

**औसा रोड, रिलायन्स पेट्रोलपंपा शेजरी, लातूर**






आवर्तनच्या
शतकपूर्ती संगीत
महोत्सवास
हार्दिक शुभेच्छा!





विश्व सुपर मार्केट

# २४ वर्षांची परंपरा !

Customer Care:-
मो. 8551955000

Download our
Vishwa Super Market
Grocery App

GET IT ON Google Play
Download on the App Store

Our Branches :-
AUSA ROAD I BARSHI ROAD I AMBAJOGAI ROAD I KOKATE NAGAR
AMBAJOGAI I MURUD I OLD AUSA ROAD

आवर्तनच्या शतकपूर्ती
महोत्सवास हार्दिक शुभेच्छा!

आवर्तनच्या शतकपूर्ती संगीत
महोत्सवास हार्दिक शुभेच्छा!

महाराष्ट्रातील अग्रगण्य... सरकारमान्य

# सरस्वती
संगीत कला महाविद्यालय

बी.ए. व एम.ए.म्युझिक साठी प्रवेश सुरू

बार्शी रोड, संगीत नगरी, लातूर

सचिव
सुरमणी पं. बाबूराव बोरगांवकर

अध्यक्ष
डॉ. राम बोरगांवकर

अभिजात संगीत प्रचार सेवेत समर्पित

## मराठवाडा संगीत कला अकादमी व रिसर्च सेंटर

अध्यक्षः तालमणी डॉ. राम बोरगावकर

जेवळीकर के.बी
94213 36566

## के. बी. साऊंड अॅन्ड लाईट
साऊंड सिस्टम, लाईट व जनरेटर भाडयाने मिळेल.
शॉप नं. 4, पथ क्र. 2, देशपांडे कॉलनी, नंदी स्टॉप, औसा रोड, लातूर 413 512

आवर्तनच्या शतकपूर्ती संगीत महोत्सवास हार्दिक शुभेच्छा!

# आवर्तनच्या शतकपूर्ती संगीत महोत्सवास हार्दिक शुभेच्छा!

१९ वर्षापासून नियमित आपल्या सेवेत

**बिराजदार मॅडम यांचे**

VASTU SHREEJA
BUILDCON


# विश्वास हिच आमची परंपरा!

आपल्या सर्वांचे सहर्ष स्वागत करित आहे.

आशिष वि. बिराजदार
985 458 2222

राम एस. फुलारी
914 554 5555

गोपाल दादा
930 917 6621




आवर्तनच्या शतकपूर्ती संगीत
महोत्सवास हार्दिक शुभेच्छा!

Rotary IMAGINE ROTARY RATNA NIDHI

## रोटरी क्लब ऑफ, लातूर सेंट्रल

अध्यक्ष

**हेमंत रामढवे**

सचिव

**रो. बाळासाहेब खैरे**

**समस्त रोटरी क्लब ऑफ, लातूर सेंट्रल**



आवर्तनच्या शतकपूर्ती संगीत
महोत्सवास हार्दिक शुभेच्छा!



r. b. kulkarni

## मे. आर. बी. कुलकर्णी

**संगीत वाद्यांचे व्यापारी**

**महाजन गल्ली कोपरा, हमदनगर**
**मो. नं. - 9850291422**

आवर्तनच्या शतकपूर्ती संगीत
महोत्सवास हार्दिक शुभेच्छा!

TVS

# अजय टीव्हीएस, लातूर

Nanded Rd, HUDCO and CIDCO,
Latur, Maharashtra 413512 | Phone: 098220 80314



इयत्ता नववी ते एम.ए. संगीत
तसेच अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या
विविध परीक्षांसाठी उपयुक्त

# अभिजात संगीत प्रवर्तक

गायन, वादन व नृत्यातील ५१ चरित्रे

**– लेखक –**
**डॉ. संदीपान गुरुनाथ जगदाळे**
एम.ए. (संगीत), एम. ए. (इंग्रजी), बी.एड., नेट (संगीत),
पीएच.डी. (संगीत), संगीत अलंकार, संगीत भास्कर
दयानंद कला महाविद्यालय, लातूर

प्रभाकर पब्लिकेशन

**अभिजात संगीत प्रवर्तक**
**Abhijat Sangeet Pravartak**
**लेखक : डॉ. संदिपान गुरुनाथ जगदाळे**
**Author :** Dr. Sandipan Gurunath Jagdale
Mob. 8275454696

**Paper back**
**ISBN - 978-93-92464-57-7**
**E-Book**
**ISBN - 978-93-92464-60-7**

**प्रभाकर पब्लिकेशन**
३०४, विंग-सी, सिद्धीविनायक अपार्टमेंट,
सुतमील रोड, लातूर
मो. ८६००८८११२७, ८१४९१५३०१८
**© सर्व हक्क लेखकाधीन**
प्रथम आवृत्ती
**३० मे २०२३**
मुद्रक
**आर्टी ऑफसेट, लातूर**
अक्षर जुळवणी
**रोहित टायपिंग सेंटर, लातूर**
मुद्रितशोधन
**डॉ. संदिपान गुरुनाथ जगदाळे**
मुखपृष्ठ
**श्री शिवाजी हांडे**
मूल्य ₹ - २००/-

*सूचना : या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून लेखकाची लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत. या ग्रंथातील लेखकांच्या मताशी प्रकाशक, मुद्रक, वितरक सहमत असतीलच असे नाही.

# लेखकाचे मनोगत

'अभिजात संगीत प्रवर्तक' हा माझा १७ वा ग्रंथ संगीत साधकांच्या हाती देताना मला अत्यानंद होत आहे. इयत्ता अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना मागील २३ वर्षांपासून संगीत विषयाचे अध्यापन करत असताना अनेक सांगीतिक कलावंताच्या कार्याचा जवळून परिचय झाला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी केलेले कार्य निश्चितच डोळे दिपवणारे होते. त्यांच्या कार्यातून ऊर्जा व प्रेरणा मिळत होती. अध्यापन करत असताना मी निश्चय केला आहे की ज्या अभिजात संगीत प्रवर्तकांनी संगीतासाठी मोलाचे योगदान दिले अशा महान कलावंतांच्या जीवन चरित्रांचा संग्रह करावा व ग्रंथरुपाने संगीत साधकांच्या सेवेत अर्पण करावा.

पाहता पाहता गायन, वादन व नृत्य क्षेत्रातील ५१ कलावंतांचे जीवन चरित्र संकलित केले. ती जीवन चरित्रे या ग्रंथरूपाने आज आपल्यासमोर ठेवत आहे. इयत्ता नववी ते बारावी संगीत विषय, विविध विद्यापीठांच्या बीए ते एम.ए. संगीत विषयासाठी तसेच अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या विविध परीक्षांसाठी या ग्रंथाचा लाभ होणार आहे.

या ग्रंथ लेखनासाठी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.लक्ष्मीरमणजी लाहोटी, सरचिटणीस मा.रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव सुरेशजी जैन व समस्त संचालक मंडळ यांनी वेळोवेळी प्रेरणा दिली त्याबद्दल मी अंत:करणपूर्वक आभार मानतो. हा ग्रंथ दर्जेदार व्हावा यासाठी नेहमीप्रमाणे प्रोत्साहन देणारे कार्यकुशल प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ.प्रशांत मान्नीकर, उपप्राचार्य अनिलकुमार माळी, पर्यवेक्षक डॉ.दिलीप नागरगोजे, संगीत विभाग प्रमुख डॉ.देवेंद्र कुलकर्णी व कार्यालयीन अधीक्षक रुपचंद कुरे यांनी वेळोवेळी बहुमोल मार्गदर्शन केले त्याबददल त्यांचेही मी ऋण व्यक्त करतो. या ग्रंथासाठी आकर्षक मुखपृष्ठ करून दिल्याबद्दल श्री शिवाजी हांडे यांचे मनापासून आभार तसेच श्री विरभद्र गुळवे यांनी हा ग्रंथ प्रकाशित केला त्याबद्दल त्यांचेही मनःपूर्वक आभार.

संगीताचे अध्यापन करणारे सर्व गुरुजन, सांगीतिक परीक्षा देणारे विद्यार्थी याबरोबरच संगीताचे जाण असणाऱ्या रसिक श्रोत्यांना हिमालया एवढ्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाच्या थोर अभिजात संगीत प्रवर्तकांचा निश्चितच जवळून परिचय होईल व त्यांच्या प्रेरणेतून भारतीय अभिजात संगीताला एक योग्य दिशा मिळेल यात शंका नाही. माझ्या इतर ग्रंथांप्रमाणे याही ग्रंथांचे आपण स्वागत कराल असा आशावाद बाळगतो.

दिनांक ३०/०५/२०२३

**डॉ. संदीपान गुरुनाथ जगदाळे**

# अनुक्रमणिका


| अनु. क्र. | संगीत प्रवर्तकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | पंडित विष्णु नारायण भातखंडे | ०७ |
| २. | पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर | ११ |
| ३. | पंडित रविशंकर | १७ |
| ४. | लता मंगेशकर | २३ |
| ५. | उस्ताद बिस्मिल्ला खाँ | ३० |
| ६. | पंडित भीमसेन जोशी | ३६ |
| ७. | स्वामी हरिदास | ४० |
| ८. | तानसेन | ४२ |
| ९. | गोपाल नायक | ४४ |
| १०. | अमीर खुसरो | ४६ |
| ११. | मानसिंह तोमर | ४८ |
| १२. | जयदेव | ५० |
| १३. | त्यागराज | ५१ |
| १४. | पुरंदरदास | ५३ |
| १५. | बैजू बावरा | ५६ |
| १६. | सदारंग व आदारंग | ५८ |
| १७. | हस्सू व हद्दु खाँ | ५९ |
| १८. | पंडित बाळकृष्ण बुवा इचलकरंजीकर | ६२ |
| १९. | उस्ताद अब्दुल करीम खान | ६६ |
| २०. | उस्ताद अल्लादिया खाँ | ७० |
| २१. | उस्ताद फैय्याज खाँ | ७३ |
| २२. | उस्ताद अल्लाउद्दीन खाँ | ७६ |
| २३. | पंडित विनायकबुवा पटवर्धन | ७९ |
| २४. | पंडित श्रीकृष्ण नारायण रातंजनकर | ८२ |
| २५. | पं. गोविंद सदाशिव टेंबे | ८५ |

| | | |
|---|---|---|
| २६. | पंडित गजानन बुवा जोशी | ९० |
| २७. | उस्ताद अली अकबर खाँ | ९५ |
| २८. | पंडित पन्नालाल घोष | ९९ |
| २९. | बालगंधर्व | १०४ |
| ३०. | हिराबाई बडोदेकर | ११० |
| ३१. | सिध्देश्वरी देवी | ११४ |
| ३२. | पंडित ओंकारनाथ ठाकूर | ११९ |
| ३३. | पंडित निखिल बॅनर्जी | १२३ |
| ३४. | गाणसरस्वती किशोरी आमोणकर | १२५ |
| ३५. | पंडित शिवकुमार शर्मा | १३० |
| ३६. | वाजिद अली शहा | १३३ |
| ३७. | आचार्य बृहस्पती | १३४ |
| ३८. | गंगूबाई हनगल | १३८ |
| ३९. | डॉ. अशोक दामोदर रानडे | १४१ |
| ४०. | मासित खाँ व गुलाम रझा खाँ | १४४ |
| ४१. | इनायत खाँ | १४५ |
| ४२. | पंडित बिरजू महाराज | १४७ |
| ४३. | रुक्मिणीदेवी अरुंडेल | १५० |
| ४४. | पंडिता मृणालिनी साराभाई | १५४ |
| ४५. | उस्ताद बडे गुलाम अली खाँ | १५६ |
| ४६. | पंडित किशन महाराज | १५९ |
| ४७. | प्रो. बी. आर. देवधर | १६१ |
| ४८. | पंडित हरिप्रसाद चौरसिया | १६५ |
| ४९. | उ. झाकीर हुसेन | १६८ |
| ५०. | पुण्यभूषण डॉ. प्रभा अत्रे | १७० |
| ५१. | पंडित अजय चक्रवर्ती | १७४ |



# १.

# पंडित विष्णु नारायण भातखंडे

**१) प्रस्तावना :**

भौतिक सुख-दुःखाची बंधने पार करून एका अनाम दुनियेत विहरणारे स्वर्गीय स्वर ... पंचमहाभूतांनी निर्मिलेल्या या शरीरात अपार आनंदाची कंपने निर्माण करणारा ताल ... क्षणोक्षणी जन्मणारी व येत्या जात्या श्वासांशी घट्ट सांधा साधणारी लय... हे माणसाच्या जगण्याचे वैभव ! शास्त्रीय संगीताची साधना करणाऱ्या ऋषितुल्य गुरुजनांनी हे वैभव प्राणपणाने जपले. या गुरुजनांमध्ये दोन महान विभूतीचा उल्लेख करावा लागेल. एक म्हणजे पं. वि. वि. पलुस्कर व पं.वि. ना. भातखंडे यांपैकी पं. भातखंडे यांच्या जीवनकार्याचा आढावा खालील मुद्दांच्या आधारे घेऊयात.

**२) जन्म व बालपण :**

पं. वि.ना. भातखंडे यांचा जन्म मुंबई प्रांतातील वाळकेश्वर येथे १० ऑगष्ट, १८६० साली झाला. तो दिवस कृष्णअष्टमीचा होता. भातखंडे यांचे मूळ घराणे राजापूर जवळील अडिवरे या गावचे होते. विष्णूंच्या वडिलांचे नाव नारायण असे होते. ते ठाकूरद्वारच्या ग्रोरा राममंदिरात व्यवस्थापक होते. त्यांना संगीताविषयी रुची होती. त्यामुळेच त्यांनी विष्णुला संगीताचे शिक्षण दिले. लहाण विष्णुला त्याची आई भजने गाऊन दाखवीत असे. शाळेत विविध कार्यक्रमांत विष्णू भाग घेत असत. आपल्या मधुर आवाजाने ते सर्वांना मंत्रमुग्ध करीत असत. अशा प्रकारे अगदी बालवयापासूनच विष्णूंवर संगीताचे संस्कार झाले.

**३) गुरू व शिक्षण :**

महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच ते उत्तम बासरी वाजवीत असत. पं. वल्लभदास दामुलजी यांच्याकडे त्यांनी सतारवादनाचे शिक्षण सुरू यानंतर गोपाळगीर बुवा यांच्याकडे सतारीचे शिक्षण घेतले. १८८५ साली ते बी.ए. झाले. त्यानंतर त्यांनी एल.एल.बी ची पदवी प्राप्त केली. त्यांनी वकिलीचा व्यवसाय सुरू केला परंतु त्यांचे वकिली व्यवसायात मन रमले

नाही. रावजी बेलबागकर, अलि हुसेन आणि विलायत हुसेन यांच्याकडून पं. भातखंडे यांनी धृपदाचे शिक्षण घेतले.

**४) गायक उत्तेजक मंडळीत प्रवेश :**

मुंबई येथे 'गायक उत्तेजक मंडळी' या नावाची एक संस्था संगीत प्रेमी पारशी समाज चालवीत असे. या मंडळीत देशातील श्रेष्ठ कलावंतांचे वादन होत असे. पं. विष्णुजी या संस्थेचे सभासद झाले. पंडितजना संगीत शिकण्याची जिज्ञासा होती. तेथे आलेल्या कलावंतांना काही प्रश्न विचारले असता ते कलावंत उत्तर देण्याचे टाळत असत. त्या काळी अनेक घराणी होती. आपली कला लपवून ठेवण्याचा प्रयत्न ते कलावंत करीत होते. संगीतातील शास्त्र व प्रात्यक्षिक यांबाबत मतभेद व वाद होते. पं. भातखंडे हे सुशिक्षित होते. त्यांना ही संगीताची झालेली अवस्था पाहवेना. पुढे पंडितजी गायक उत्तेजक मंडळीचे संचालक झाले. तेव्हा त्यांनी अनेक कलावंतांच्या कार्यक्रमाचे आयोजन केले. अनेक कलावंतांचा सहवास लाभू लागला. या सहवासातून ते आपल्या शंकांचे समाधान करून घेऊ लागले. मिळालेली माहिती लिहून ठेवू लागले. परंतु प्राप्त झालेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही. घराण्यांची मक्तेदारी, हिंदुस्थानी संगीताचे कोणते? भारतीय संगीताचा विकास कसा झाला? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी भारत भ्रमणाशिवाय दुसरा पर्याय नव्हता. म्हणूनच त्यांनी भारतभ्रमण करण्याचे निश्चित केले.

**५) भाषा आत्मसात केल्या :**

भारतीय संगीताविषयी निर्माण झालेल्या शंकांचे निरसन करण्यासाठी मुंबईत बसून केवळ संस्कृत ग्रंथाचे वाचन करून भागणार नाही. म्हणून त्यांनी अनेक भाषा आत्मसात केल्या. संस्कृत, मराठी व इंग्रजी सोबतच त्यांनी गुजराथी, तामीळ, पारशी, बंगाली, तेलगू इ. भाषा शिकून घेतल्या. या भाषांचा भारतभ्रमण करताना उपयोग झाला. अनेक प्रांतांतील विद्वानांशी चर्चा, विचार विमर्श करण्यासाठी या भाषा त्यांना उपयुक्त ठरल्या. याचबरोबर त्यांना विविध भाषेतील ग्रंथांचे वाचन करता आले.

**६) भारत भ्रमण :**

भाषा आत्मसात करून व ग्रंथांचे वाचन करून संगीतातील समस्या सुटणार नव्हत्या. म्हणून त्यांनी भारतभ्रमण करण्याचे ठरविले. १९०४ मध्ये त्यांनी उत्तर भारताचा प्रवास केला. या प्रवासात त्यांनी संगीत शास्त्रातील बरीच माहिती उपलब्ध केली. बडोदा, अहमदाबाद, सुरत, भडोच, बिकानेर

इ. ठिकाणी जाऊन ग्रंथालयांना भेटी दिल्या. या प्रवासात उ. महमद अली खाँ आणि त्यांच्या दोन पुत्रांकडून ३०० दुर्मीळ चिजा मिळविल्या. अनेक अप्रचलित रागांतील बंदिशीही त्यांनी मिळविल्या. या प्रवासात मिळालेल्या माहितीच्या आधारे भारतीय संगीत हे भारतीय आहे ते इराण किंवा अरबस्थानकडून आले नाही हे सिद्ध करून दाखविले.

**७) दहा थाटांची निर्मिती :**

दक्षिणेतील मथुरा, बेंगलोर, रामेश्वर, मद्रास, त्रिवेंद्रम या भागात प्रवास चालू असताना पं. व्यंकटमखी यांच्याकडून ७२ थाटांची माहिती मिळविली. या थांटांचा हिंदुस्थानी संगीतात प्रचार केला तर रागस्वरूप स्पष्ट होईल म्हणून पं.भातखंडे यांनी दहा थाटांची निर्मिती केली.

१. बिलावल २. खमाज ३. कल्याण
४. काफी ५. आसावरी ६. तोडी
७. पूर्वी ८. मारवा ९. भैरव १०. भैरवी इ.

**८) संगीत विद्यालये :**

पं. वि. ना. भातखंडे यांनी शास्त्रीय संगीताचा प्रचार व प्रसार होण्यासाठी अनेक संगीत विद्यालयांचे स्थापना केली.

१. बडोदा येथे भारतीय संगीत विद्यालय
२. इंदोर येथे होळकर स्टेट संगीत महाविद्यालय
३. ग्वाल्हेर येथे माधव संगीत विद्यालय
४. जांभुळवाडी मुंबई येथे शारदा संगीत मंडळ
५. लखनौ येथे मॅरीस कॉलेज ऑफ इंडियन म्युझिक पुढे यालाच भातखंडे युनिव्हर्सिटी ऑफ म्युझिक असे नाव दिले.

या संगीत विद्यालयांसाठी राजेश्वर, राम उमानाथ, उत्तर प्रदेशचे गव्हर्नर सर विल्यम मॅरिस यांनी मदत केली.

**९) शिष्य संप्रदाय :**

पंडितजी आपले लक्ष शास्त्रपक्षावर अधिक केंद्रित केल्यामुळे त्यांचा मोजका शिष्यवर्ग तयार झाला.

१. पं. श्रीकृष्ण रातंजनकर २. राजाभैय्या पुंछवाले
३. पं. दिलीपचंद्र बेदी ४. हिराबाई जव्हेरी
५. बादीलाल शर्मा ६. हेमेंद्रलाल राय इ.

**१०) संगीत परिषदा :**

संगीत क्षेत्रातील नामवंत गायक वादकांनी एकत्र येऊन विचार विमर्श

करावा, संगीताला एक वेगळे वळण लावावे यासाठी पंडितजींनी संगीत परिषदांचेआयोजन केले.

१) १९१६ मध्ये बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड यांच्या सहाय्याने पहिली संगीत परिषद बडोदा येथे घेण्यात आली. याच परिषदेत 'ऑल इंडिया म्युझिक अकादमी'ची स्थापना करण्यात आली.

२) १९१८ मध्ये रामपूरचे नवाब अली साहेब यांच्या मदतीने दुसरी संगीत परिषद दिल्ली येथे झाली.

३) १९१९ मध्ये रामनगर संस्थानचे महाराज यांच्या सहाय्याने तिसरी संगीत परिषद बनारस येथे पार पडली.

४) १९२४ मध्ये राय उमानाथ यांच्या सहाय्याने चौथी संगीत परिषद बनारस येथे घेण्यात आली.

**११) ग्रंथ संपदा :**

पंडितजींनी भारतभ्रमण करून अनेक भाषा आत्मसात करून ग्रंथांचे लेखन केले. त्यांमध्ये-

१. श्रीमल्ललक्षसंगीतम्? (संस्कृत)
२. हिंदुस्थानी संगीत पद्धती (भाग १ ते ४)
३. अभिनवराग मंजिरी (संस्कृत)
४. अभिनवताल मंजिरी (संस्कृत)
५. हिंदुस्थानी संगीत पद्धती (भाग १ ते ६)
६. अष्टोत्तर शतताल लक्ष्मणम्? (संस्कृत)
७. लक्ष्मणगीत संग्रह
८. गीत मालिका भाग- २३
९. पारिजात प्रवेशिका
१०. राग विबोध प्रवेशिका
११. हृदय कौतुक
१२. हृदय प्रकाश १५, १६, १७, १८.

इ. ग्रंथांचा उल्लेख करता येईल.

**१२) पंडितजींची टोपण नावे :**

पंडितजींनी अनेक ग्रंथ वेगवेगळ्या टोपण नावाने लिहिले आहेत. संस्कृत ग्रंथ त्यांनी 'चतुर पंडित' या नावाने लिहिले. चिजांसाठी 'चतुर' व 'हररंग' हिंदुस्थानी संगीत पद्धतीसाठी 'पं. विष्णुशर्मा' तर काही ग्रंथांसाठी 'भारद्वाज' व 'मंजिरीकार' अशा टोपण नावाने लेखन केले.


**१३) मृत्यू :**

ज्याप्रमाणे मधमाशी विविध फुलांमधून मध एकत्रित करते त्याचप्रमाणे पंडितजीनी संपूर्ण भारतभ्रमण करून ज्ञानकण प्राप्त केले. स्वरलिपीची निर्मिती, अनेक संगीत परिषदांचे आयोजन, संगीत विद्यालयांची स्थापना अशी अनेक कार्य त्यांच्या हातून घडली. त्यांनी संपूर्ण आयुष्यभर संगीताची आराधना केली.

आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांना प्रकृती साथ देईनाशी झाली. १९३३ मध्ये त्यांना पक्षघात झाला. पुढे १९ सप्टेंबर, १९३६ रोजी गणेशचतुर्थी दिवशी पंडितजींची प्राणज्योत मावळली.

**१४) समारोप :**

पंडितजींच्या या महान कार्याबद्दल १९१७ साली काशी येथे भारत धर्म मंडळाने 'संगीत कला निधी' ही पदवी देऊन त्यांचा बहुमान केला. १९६१ साली पंडितजींच्या १०१ व्या जन्मसालानिमित्त केंद्रसरकारने पोष्टाचे तिकीट काढून त्यांना एका अर्थाने श्रद्धांजली अर्पण केली. अशा या थोर विभूतींचे नाव भारतीय संगीताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले.



# २.

# पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर

**१) प्रस्तावना :**

पं. विष्णू दिगंबर पलुस्कर यांच्या कार्याचे स्मरण म्हणजे कंठसंगीत, वाद्यसंगीत किंबहुना संगीत या विषयासाठी या दृष्ट्या कलावंताने केवढे मोलाचे कार्य केले आहे याची कल्पना येते. त्यांच्या संपूर्ण कार्याची व्याप्ती लक्षात घेता आपणांस थक्क व्हायला होते. एकाच व्यक्तीने एवढे मोलाचे कार्य केले यावर आपला क्षणभर विश्वास बसत नाही. अशा या महान कलावंतांच्या जीवनकार्याचा आढावा पुढील मुद्यांच्या आधारे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

पं. विष्णू दिगंबर पलुस्कर यांचा जन्म १८ ऑगष्ट, १८७२ रोजी कुरुंदवाड संस्थानात झाला. त्यांचे मूळ आडनाव गाडगीळ असे होते. परंतु पलुस या गावी राहत असल्यामुळे त्यांचे नाव पलुस्कर असे पडले. त्यांच्या वडिलांचे नाव दिगंबर तर आईचे नाव गंगादेवी असे होते. त्यांचे वडील कीर्तनकार होते. त्यामुळे साहजिकच संगीताचा वारसा पंडितजींना लाभलेला होता. बालपणी विष्णू देखणे व चुणचुणीत असल्यामुळे सर्वांचे त्यांच्यावर प्रेम होते. शालेय शिक्षणातही विष्णु हुशार होता.

**३) एक दुर्दैवी घटना :**

१८८७ साली कुरुंदवाड संस्थानात दत्त जयंतीचा उत्सव चालू होता. या उत्सवात विष्णुजी शोभेची दारू उडवीत होते. परंतु दुर्दैवाने शोभेच्या दारूचा स्फोट झाला. पलुस्करांच्या जीवनात कायमचा काळोख आला. त्या दारूच्या स्फोटामुळे पलुस्करांचे डोळे भाजले व डोळ्यांवर परिणाम झाला. अनेक वैद्यकीय उपचारानंतरही त्यांचे डोळे अधूच राहिले. अशा स्थितीत विष्णूंना शालेय शिक्षण घेणे अशक्य होते. म्हणून काही हितचिंतकांनी विष्णूंना संगीत साधनेचा मार्ग दाखविला. अशा प्रकारे संगीत ज्ञानार्जन हेच त्यांच्या आयुष्याचे मुख्य ध्येय ठरले.

**४) गुरू व शिक्षण :**

पंडितजींच्या सुदैवाने ग्वाल्हेर घराण्याचे भीष्माचार्य पं. बाळकृष्ण इचलकरंजीकर यांच्यासारखे थोर गुरू लाभले. वयाच्या पंधाव्या वर्षापासून मिरज येथे पं. पलुस्करांची संगीत आराधना सुरू झाली. सुरुवातीला त्यांचा आवाज गाण्यायोग्य नव्हता. परंतु गुरूंच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी अथक परिश्रम करून आवाज तयार केला. गुरुगृही कामे करीत असताना विष्णू कधीही थकत नसत. याचाच परिणाम गुरूंच्या आशीर्वादाने विष्णूंची परिपक्व गायकी तयार झाली.

**५) आयुष्याला कलाटणी देणारा क्षण :**

एकदा मिरज येथे सार्वजनिक सभेचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील सर्व प्रतिष्ठित व्यक्तींना या सभेसाठी निमंत्रित केले होते. परंतु या सभेसाठी पं. विष्णू दिगंबरांच्या गुरूंना म्हणजेच पं.बाळकृष्णबुवांना निमंत्रित केले नव्हते. पं. पलुस्करांनी याबद्दल विचारणा केली असता असे उत्तर

मिळाले की, ''वो तो गवय्या है, उन्हें क्यों बुलाना ?'' अशा प्रकारच्या उत्तराने विष्णूंना वाईट वाटले. त्यांच्या लक्षात आले की, आजही संगीततज्ज्ञांना समाजात प्रतिष्ठा नाही. त्याच प्रसंगी पंडितजींनी भीष्मप्रतिज्ञा केली की, ''जोपर्यंत संगीत क्षेत्रातील लोकांना प्रतिष्ठा मिळणार नाही तोपर्यंत मी स्वस्थ बसणार नाही.'' हा क्षण त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. संगीत क्षेत्राला उच्चस्थानी विराजमान करण्यासाठी त्यांनी १८९६ मध्ये मिरज सोडले.

**६) भारत भ्रमण :**

मिरजेहून सातारा, बडोदा असे करत त्यांनी संपूर्ण हिंदूस्थानात भ्रमण केले. त्यांच्या मैफली गाजत होत्या. अनेक ठिकाणी राजदरबारात त्यांना दरबारी गायक म्हणून नौकरी मिळत होती. परंतु क्षणिक मोहाला बळी न पडता ते ध्येय प्राप्तीसाठी भ्रमंती करू लागले. भारतभ्रमण करीत असताना त्यांच्या असे लक्षात आले की, संगीत खालच्या वर्गापुरते मर्यादित राहिले आहे. म्हणून त्यांनी गाण्यातून बिभित्स व शृंगार रस काढून भक्तिरस ओतला. हिंदुस्थानाबरोबरच त्यांनी सिलोन, नेपाळ, ब्रह्मदेश इ. देशांचा प्रवास केला.

**७) स्वरलिपीची निर्मिती :**

अलीगढच्या मुक्कामात एका नापीताने काही धृपदे गाऊन दाखविली. रागांचे विवेचन करणारे काही श्लोकही म्हणून दाखविले. तेव्हा आपण त्याबाबतीत अनभिज्ञ आहोत याची जाणीव त्यांना झाली. त्या काळात गुरू जे सांगतील तेच शिष्यांनी ग्रहण करावे असा दंडक होता. गुरूंच्या चुका काढण्याची किंवा त्यांना प्रश्न विचारण्याची त्यांना अनुमती नव्हती. गुरू-शिष्य परंपरेतील या दोषाचे निवारण करण्यासाठी त्यांनी पाश्चात्त्य स्वरलेखन पद्धतीचा अभ्यास केला. यातूनच पुढे पं. पलुस्कर स्वरलिपी निर्माण झाली.

**८) गांधर्व महाविद्यालयाची स्थापना :**

संगीताचा प्रचार व प्रसार व्हावा, सर्वसामान्य व्यक्तींना संगीताचे धडे देता यावेत यासाठी त्यांनी ५ मे, १९०१ रोजी लाहोर येथे गांधर्व महाविद्यालयाची स्थापना केली. त्यांनी परीक्षा पद्धतीनुसार अभ्यासक्रमाची रचना केली. विविध वाद्यांचा संग्रह केला. त्याचबरोबर वाद्य दुरुस्तीचा कारखानाही सुरू केला. छापखाना, ग्रंथालय, छात्रालय अशा सोयींमुळे अनेक विद्यार्थी संगीताकडे आकर्षित होऊ लागले. १९०८ साली मुंबई येथे व पुढे पुणे व नागपूर येथे महाविद्यालयाच्या शाखा सुरू केल्या. सभागृहातून

मैफली होण्यास सुरुवात झाली. स्त्रियांना संगीत शिकता यावे यासाठी त्यांनी कलावंतांच्या मैफली आयोजित केल्या. १९९८ ते १९२२ या काळात त्यांनी गांधर्व महाविद्यालयात पाच संगीत परिषदा भरविल्या.

**९) पंडितजींचे राष्ट्रप्रेम :**

स्वातंत्र्यलढ्यात पंडितजींनी मोलाचे सहकार्य केले. ते स्वतः टिळक व गांधीजींचे भक्त होते. 'वंदे मातरम्' हे जरी दोन शब्द असले तरी हजारो सूर्यांचे तेज त्यामध्ये होते. अशा या वंदे मातरम्? ला इंग्रजांबरोबरच काँग्रेसमध्येही विरोध होता. परंतु या विरोधाला न जुमानता पंडितजींनी वंदे मातरम्? गाऊन दाखविले. सभेच्या शेवटी वंदे मातरम्? म्हणण्याची प्रथा त्यांनीच सुरुवात केली. यावरून त्यांची राष्ट्रभक्ती दिसून येते.

**१०) पंडितजींची रामभक्ती :**

पंडितजी हे उत्तम वक्ते होते. ते धार्मिक वृत्तीचे होते. तुलसी रामायणावर ते भक्तिभावाने प्रवचन करीत असत. 'रघुपती राघव राजाराम' या रामधुनीची रचना पंडितजींनी केली. आयुष्याच्या उत्तरार्धात ते अध्यात्मातच रमू लागले. १९२४ मध्ये मुंबईतील त्यांच्या विद्यालयाच्या इमारतीचा लिलाव झाला. तेंव्हापासून ते राम भक्तीत रममाण झाले.

**११) गायकी :**

पं. बाळकृष्णबुवांकडून त्यांनी ग्वाल्हेर घराण्याची गायकी आत्मसात केली होती. स्थायी, अंतरा यांची मांडणी करून ते उत्तम प्रकारे ख्याल सादर करायचे. आलाप, विविध तानांचे प्रकार, बेहलावे इ. बाबी ते बेमालूमपणे सादर करीत असत. बड्या ख्यालानंतर ते छोटा ख्याल घेत असत. तराणा गाऊन ते मैफलीची सांगता करायचे. त्यांचा आवाज पहाडी, कसदार, पल्लेदार व बुलंद होता. ध्वनिक्षेपक नसतानाही हजारो श्रोत्यांपर्यंत त्यांचा आवाज पोहोचत असे. ते तालाचे पक्के व स्वरांचे सच्चे होते. त्यांचा आवाज तीनही सप्तकात सहज फिरत असे. ग्वाल्हेर घराण्याचे वैशिष्ट्य असलेला धमार व धृपद हा गीत प्रकार गाण्यात ते तरबेज होते. त्यांची प्रवृत्ती आध्यात्मिक असल्यामुळे त्यांना भजने गाण्यात विशेष रस होता.

**१२) ग्रंथ संपदा :**

भारत भ्रमणातून मिळालेले ज्ञान व अनेक ग्रंथांचा अभ्यास करून पंडितजींनी जवळपास ६० ग्रंथांचे लेखन केले.

| | |
|---|---|
| १. संगीत बाल प्रकाश | २. संगीत बालबोध |
| ३. राष्ट्रीय संगीत | ४. संगीत शिक्षक |
| ५. राग प्रवेश | ६. व्यायाम संगीत |
| ७. स्वरालाप गायन | ८. राग भैरव |
| ९. संगीत तत्त्वदर्शक | १०. होरी |
| ११. कर्नाटकी संगीत | १२. गीतावळी |
| १३. महिला संगीत | १४. भक्त प्रेम लहरी |
| १५. भारतीय संगीत लेखपद्धती | १६. भजन अमृत लहरी |
| १७. बालोदय | |
| १८. संगीत अमृत प्रवाह (मासिक) | |

**१३) शिष्य संप्रदाय :**

पंडितजी संगीताचे गाढे अभ्यासक तर होतेच परंतु त्याचबरोबर ते एक आदर्श गुरू होते. त्यांनी अनेक शिष्य घडविले.

| | |
|---|---|
| १. पं. ओंकारनाथ ठाकूर | २. पं. नारायणराव व्यास |
| ३. पं. विनायक बुवा पटवर्धन | ४. पं. वि. अ. कशाळकर |
| ५. पं. शंकरराव बोडस | ६. पं. लक्ष्मणराव बोडस |
| ७. प्रा. बी. आर. देवधर | ८. पं. शंकरराव सप्रे इ. |

**१४) स्वभाव :**

पंडितजी निर्व्यसनी व चरित्रवान होते. ते स्वाभिमानी होते. त्यांचा स्वभाव मेहनती व कष्टाळू होता. गुरूबद्दल निष्ठा व राष्ट्राविषयी प्रेम हे त्यांच्या रोमारोमांत भिनले होते. पंडितजी हे धार्मिक व श्रद्धाळू होते. लाहोर येथे गांधर्व महाविद्यालयाचा उद्घाटन समारंभ चालू होता. तेव्हा एका शिष्याने त्यांना एक चिठ्ठी आणून दिली. कार्यक्रम संपल्यानंतर शांतपणे त्यांनी एका शिष्याला जवळ बोलावून घेतले आणि सांगितले की, कार्यक्रम चालू असताना माझ्या वडिलांच्या मृत्यूची तार मला आली आहे. उद्घाटन समारंभ पार पडला आहे. तेव्हा आता मी गावी जाऊन येतो. या प्रसंगावरून त्यांचा संयम, सहनशीलता व कर्तव्यनिष्ठा हे गुण दिसून येतात.

**१५) मृत्यू :**

पंडितजींनी आपल्या रक्ताघामाने गांधर्व महाविद्यालयाचे रोपटे पोसले. या रोपट्याचे विशाल वटवृक्षात रूपांतर होत होते. अशातच आयुष्यभर

केलेल्या अथक परिश्रमामुळे पंडितजी थकले होते. मुंबईतील त्यांच्या विद्यालयाचा झालेला लिलाव पाहून ते अधिकच खचले होते. शेवटी त्यांची प्रकृती ढासळत गेली आणि २१ ऑगष्ट, १९३१ रोजी मिरज येथे त्यांनी आपला देह ठेवला.

**१६) श्रद्धांजली :**

पंडितजी काळाच्या पडद्याआड गेले. परंतु त्यांच्या स्मृती कायम राहण्यासाठी समाजाने व राष्ट्राने त्यांना श्रद्धांजली वाहिली.

मुंबई येथील महापालिकेच्या ऑपेरा हाऊसजवळीस चौकाला पं.वि.दि. पलुस्कर चौक असे नाव देण्यात आले.

पंडितजीच्या जन्मशताब्दीनिमित्त अनेक शहरात संगीतमहोत्सवाचे आयोजन व चित्रांचे प्रदर्शन भरविले.

दिल्ली येथील गांधर्व महाविद्यालयाच्या इमारतीजवळील रस्त्याला त्यांचे नाव देण्यात आले.


नासिक येथे पंचवटी रस्त्यास पंडितजीचे नाव देण्यात आले.

२१ जुलै, १९७३ रोजी केंद्र सरकारने पोष्टाचे तिकीट काढून श्रद्धांजली वाहिली. पंडितजींच्या जीवनावर आधारित एक माहितीपट काढून सर्व सिनेमागृहात दाखविण्यात आला.

पंडितजींचे ऋण व्यक्त करण्यासाठी त्यांच्या पुण्यतीथीचे औचित्य साधून संपूर्ण देशात दरवर्षी संगीतमहोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

**१७) समारोप :**

ज्यांनी भारतीय संगीताला देशातच नव्हे तर इतर देशातही प्रतिष्ठा मिळवून दिली. ज्यांनी निष्कलंक चारित्र्याचा ठसा उमटवून संगीताचे पावित्र्य राखले, ज्यांनी गुरुभक्तीबरोबरच राष्ट्रभक्ती दाखविली. ज्यांनी अनेक रचनांना संगीताचा साज चढवून रचना लोकप्रिय केल्या, ज्यांनी स्वरलिपीच्या बरोबरच अनेक ग्रंथांचे लेखन केले, ज्यांनी गांधर्व महाविद्यालयाच्या व्यासपीठावरून सर्वांना संगीताचे ज्ञानामृत पाजले अशा पं. पलुस्करांना कोटीकोटी प्रणाम.



# ३.

## पंडित रविशंकर

**१) प्रस्तावना :**

एका सतारीवर भारतरत्नाचा रत्नजडित मुकुट चढविला. सतारीने संवाद साधला. केवळ भारतीयांशीच नव्हे तर विश्वातल्या प्रत्येक व्यक्तीशी भारतीय संगीताची ध्वजा सातासमुद्रा पलीकडे समर्थपणे फडकावली. आपल्या संगीताला प्रतिष्ठा मिळवून दिली. भारतीय संस्कृतीचा व संगीताचा विजय झाला. हे सर्व घडवून आणले ते एका शांत व जिद्दी कलाकाराने. त्या कलावंताचे नाव आहे भारतरत्न पं. रविशंकर ! त्यांच्या कर्तृत्वाचा वेध खालीलप्रमाणे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

पं. रविशंकर यांचा जन्म ७ एप्रिल, १९२० रोजी बनारस येथे झाला. ते मूळचे बंगालचे. त्यांच्या वडिलांचे नाव श्यामाशंकर तर आईचे नाव हिमांगना. वडील संस्कृत व तत्त्वज्ञानाचे गाढे अभ्यासक होते. त्यांना चार मुले होती.

उदयशंकर, राजेंद्रशंकर, ज्ञानेंद्रशंकर व रविशंकर ही त्यांची नावे. पं. रविशंकरांचे मोठे बंधू उदयशंकर प्रतिभासंपन्न नर्तक होते. घरात संगीतमय वातावरण असल्यामुळे लहानपणापासूनच रविशंकरांना संगीताची आवड निर्माण झाली. वयाच्या १० व्या वर्षी रविशंकरांनी उदयशंकरांच्या नृत्य मंडळीत प्रवेश केला. त्याच वेळी त्यांनी 'चित्रसेना' या नावाने कथा नृत्याची रचना केली. नृत्यातील प्रावीण्याबरोबरच बासरी, सनई, व्हायोलिन, सारंगी इ. वाद्ये ते हाताळू लागले.

**३) गुरू व शिक्षण :**

१९३५ साली मैहरचे उस्ताद अल्लाउद्दिन खाँ हे उदयशंकरांच्या नृत्यदलात आले होते. त्याचवेळी रविशंकर १५ वर्षांचे होते. रविशंकर आणि अल्लाउद्दिन खाँ यांची भेट रविशंकरांच्या आयुष्यातील आणि भारतीय संगीताच्या इतिहासातील एक महत्त्वाची घटना होय. युरोप दौऱ्यावर रविशंकरांनी अल्लाउद्दिन खाँ यांचे दुभाषा म्हणून काम केले. त्याच वेळी त्यांच्या सरोद वादनाचा

आणि व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव रविजीवर पडला. रविशंकरांची बुद्धिमत्ता पाहून अल्लाउद्दिन खाँ यांना वाटले की रवीने नृत्यापेक्षा सतार वादनावर लक्ष केंद्रित करावे. तसा सल्लाही त्यांनी दिला. सुरुवातीला रवीला हे आवडले नाही. परंतु कालांतराने रवीमध्ये परिवर्तन झाले. १९३८ मध्ये रवीने त्यांचे शिष्यत्व पत्करले. त्यानंतर ते युरोप दौरा सोडून मैहरला गेले.

**४) घेतलेले परिश्रम :**

पं. रविशंकर उस्ताद अल्लाउद्दिन यांचे गंडाबंद शागीर्द झाले. त्यांच्याकडे गुरुकुल पद्धतीने अत्यंक कडक शिस्तीत तालीम सुरू झाली. शिष्यांच्या हातातून चुकीच्या जागा निघाल्या तर त्यांना फार राग येत असे. ते शिक्षाही करीत असत. रवीजी युरोपमध्ये असताना त्यांच्या मातोश्रींचे निधन झाले. त्यानंतर वडिलांचेही निधन झाले. त्यामुळे सुखसंपन्न घरात वाढलेल्या रवीला झोपडीवजा जागेत राहावे लागले. त्यांनी स्वतःवर अनेक निर्बंध लादून घेतले. सुरुवातीला रियाज करताना त्यांना त्रास होत होता. त्यानंतर त्यांनी रियाजाचा अवधी वाढवला. १०-१० तास ते रियाज करू लागले. त्यांनी कसून मेहनत घेतली. गुरू अल्लाउद्दिन खाँ यांनीसुद्धा त्यांच्यावर मुलाप्रमाणे प्रेम केले. एवढेच नव्हे तर त्यांनी कन्या अन्नपूर्णा हिच्याशी त्यांचा विवाह करून दिला. रविशंकरांनी अथक परिश्रम घेऊन विद्या संपादन केली. दहा वर्षांच्या कालावधीतच ते मैफलीचे कलावंत होऊ शकतात यात गुरू व शिष्य या दोघांनी किती कष्ट घेतले असतील हे लक्षात येते.

**५) वादनशैली :**

रवीजींची वादनशैली बिनतारी पद्धतीची होती. मैफलीची सुरुवात ज्या रागाने करायचे त्यात आलाप, जोड, झाला वाजवून अतिशय नेटक्या व प्रभावी रितीने रागचित्र उभे करायचे. त्यानंतर कधी त्याच रागात किंवा अन्य रागात गत सादर करायचे. प्रचलित रागांबरोबरच ते अप्रचलित रागसुद्धा पेश करायचे. वादनातील तयारीमुळे श्रोते स्वतःला विसरून भव्यदिव्य उदात्तेची अनुभूती घेत.

'प्रभावी नादाघात' हे त्यांच्या वादन शैलीचे महत्त्वाचे अंग होते. पुढच्या मागच्या स्वराच्या संदर्भाने एखादा स्वरसमूह असा जबरदस्त वाजून जातो की श्रोते रोमांचित व्हायचे. शास्त्रीय, उपशास्त्रीय संगीताबरोबरच ते लोकधुनीही अतिशय प्रभावीपणे सादर करीत. अतिशय अवघड गोष्टी ते सोप्या वाटाव्यात अशा रितीने पेश करायचे. पंडितजींच्या तारा छेडण्यातून जो नाद निघायचा तो रियाजातून परिपक्व झालेला नाद होता. त्यांच्या वादनात

भावप्रदर्शन दिसून यायचे. कधी निर्झराप्रमाणे शांत, कधी सागराप्रमाणे धीरगंभीर, कधी हितगुज केल्यासारखा मऊ मृदू मुलायम, कधी पर्जन्यधारेप्रमाणे जोरदार. यात श्रोत्यांच्या अंतःकरणाला भिडण्याची शक्ती आणि मनाची पकड घेण्याचे सामर्थ्य होते. १५ मात्रांची पंचमसवारी, साडेसहा मात्रांचा अर्धजयताल इ. अप्रचलित तालांतील वादन तीनताल, झपताल अशा तालांमधील वादनाइतके लीलया करू करायचे.

**६) योगदान :**

पंडितजींच्या अलौकिक वादनशैलीमुळे त्यांच्या कीर्तीचा सुगंध भारतातच नव्हे तर परदेशातही जाऊन पोहोचला आहे. त्यांनी आकाशवाणी केंद्रावरही नौकरी केली. भारतीय ऑर्केस्ट्रामध्ये अनेक सुधारणा त्यांनी सुधारणा घडवून आणल्या. त्यांच्या काली बदरिया, निर्झर, उषा, रंगीन कल्पना इ. रचना लोकप्रिय झाल्या, भारतीय संगीताला परदेशात मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी त्यांनी १९५६ मध्ये आकाशवाणीची नौकरी सोडली व विश्वभ्रमण करण्याचा निर्धार केला.

त्यांनी युरोप, अमेरिका, कॅनडा या ठिकाणी जाऊन भारतीय संगीत व रागांविषयी माहिती देऊन सादरीकरण केले. त्यांचे मेहुणे उस्ताद अली अकबर खाँ यांच्या सरोद वादनासोबत जुगलबंदी करून लोकांची मने जिंकली. जगप्रसिद्ध व्हायोलिनवादक यहुदी मेन्युहीन यांच्यासोबत सतारीची जुगलबंदी करून एक अपूर्व विक्रम केला.

**७) राग निर्मिती :**

पंडितजींनी परमेश्वरी, रंगेश्वरी, जनसम्मोहिनी, रसिया, चारुकेशी, अहिरललत इ. नवीन रागांची निर्मिती केली. या रागांतील त्यांचे वादन बिहाग, भूप, दुर्गा, मालकंस इ. रागांप्रमाणे दर्जेदार, सहजसुंदर व आकर्षक असे त्या-त्या रागाचे सांगीतिक व्यक्तिमत्त्व ते फार कलात्मक रीतीने उभे करायचे. ऋषींनी अमुक देवतेला आवाहन केले आणि ती देवता प्रकट झाली वगैरे गोष्टी आपण ऐकतो, वाचतो. त्याचप्रमाणे थोर कलावंत रागाला आवाहन करीत असतात आणि मग त्या रागाचे वातावरण तेथे तयार होते. पं. रविशंकरांच्या मैफलीत अशी अनुभूती अनेक श्रोत्यांनी घेतली आहे.

**८) संगीत दिग्दर्शन :**

पंडित रविशंकरांनी भारतीय संगीतात अनेक रचना तयार केल्या. परंतु याचबरोबर त्यांनी पाश्चात्त्य संगीत व भारतीय संगीताचे समन्वय घडवून आणणारे फ्युजनही तयार केले. 'सारे जहाँ से अच्छा' या गीताला चाल

लावून हे गीत त्यांनी अजरामर केले. 'पाथेर पांचाली', 'काबुलीबाला', 'अनुराधा', 'गोदाम', 'मीरा' 'धरती के लाल' या हिंदी चित्रपटांचे संगीत दिग्दर्शन त्यांनी केले. 'दि चेरिटेल' आणि 'द फ्ल्यूट ॲण्ड दि ॲरो' या इंग्रजी चित्रपटांना त्यांनी संगीत दिले. दुसरी एक आश्चर्याची गोष्ट म्हणजे पीटर सेलर्सच्या 'गुरू' या चित्रपटाला त्यांनी भारतीय पद्धतीने पण पाश्चात्त्यांना रुचेल अशा तऱ्हेने संगीत दिले. याचबरोबर १९८२ मध्ये 'एशियाड' स्पर्धेच्या वेळी 'अथ स्वागतम्? शुभ स्वागतम्' या स्वागत गीताचे संगीत निर्देशन करून या गीताला लोकप्रियता मिळवून दिली.

**९) शैक्षणिक कार्य :**

१९६२ मध्ये पंडितजींनी 'किन्नर स्कूल ऑफ म्युझिक' या संस्थेची स्थापना लॉस एन्जील्स मध्ये केली. जगप्रसिद्ध बिटल्स जॉर्ज हैरिसनसारखे कलावंत पंडितजीचे सतारवादन ऐकून प्रभावित झाले आणि त्यांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले. पंडितजींनी 'कॅलिफोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट' मध्ये काही काळ भारतीय संगीत विभागाचे अध्यक्ष म्हणूनही काम केले. काही वर्षांपूर्वी भारतात वाराणसी येथे त्यांच्या मातोश्री 'हिमांगना' यांच्या नावाने गुरुकुल सुरू केले होते. आयुष्याच्या अखेरीस अमेरिकेच्या कॅलीफोर्निया राज्यात सानडियागो जवळ इन्सिनिटास येथे गुरुकुल तयार केले होते. ७००० स्क्वेअर फुटाचे हे गुरुकुल आतून भारतीय पद्धतीने सजवलेले होते. तेथे अनेक शिष्य संगीताराधना करीत असत.

**१०) शिष्य संप्रदाय :**

श्रेष्ठ कलाकारांची 'गुरू' म्हणून कारकीर्द असावी लागते. किंबहुना असतेच. त्यांचा फार मोठा शिष्य संप्रदाय भारतात आणि परदेशात पसरला आहे. त्यांच्या शिष्यांमध्ये उमाशंकर मिश्र, जयाबोस, गोपाळकृष्ण, विजय राघवराव, शमीम अहमद, कार्तिककुमार, शंकर घोष, जॉर्ज हैरिसन, भास्कर चंदावरकर इ. शिष्यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांची कन्या व शिष्या अनुष्काशंकर हीसुद्धा सतारवादक म्हणून नावारूपाला येत आहे.

**११) ग्रंथलेखन :**

खरे तर गायन, वादन या शंभर टक्के श्रवणीय कला पण रसिकांचे तेवढ्यावरच समाधान होत नाही. त्यावर कुणाचे तरी भाष्य ऐकायचे, वाचायचे असते. आणि ते भाष्य जितके श्रेष्ठ असेल तितकेच ते अमूल्य ठरत असते. अशीच दोन आत्मचरित्रे पंडित रविशंकरांनी लिहिली आहेत. त्यांची नावे 'राग अनुराग' व 'माय म्युझिक माय लाईफ'.

पंडितजींच्या वाढदिवसानिमित्त त्यांची कन्या अनुष्काशंकर हिने एक अप्रतिम भेट आपल्या वडिलांना दिली. 'बापी माय लव्ह' या मथळ्याखाली अनुष्काने आपल्या वडिलांचे चरित्र लिहून त्यांच्या चरणी अर्पण केले.

**१२) पुरस्कार :**

पं. रविशंकर यांनी आजपर्यंत शेकडो पुरस्कार प्राप्त केले आहेत. त्यांपैकी काही महत्त्वाच्या पुरस्कारांची यादी खालीलप्रमाणे करता येईल.

१. १९६७ पद्मभूषण (भारत सरकार)
२. १९७१ 'रागा' ही त्यांच्या जीवनावर डाक्युमेन्ट्री फिल्म (न्यूयार्क)
३.१९८१ पद्मविभूषण (भारत सरकार)
४. १९८६ राज्यसभेवर नियुक्ती (भारत सरकार)
५. १९९० स्पिरीट ऑफ फ्रिडम अवार्ड
६. १९९२ रॅमन मॅगसेसे पुरस्कार
७. १९९३ हावर्ड युनिव्हर्सिटीकडून डॉक्टरेट ही पदवी
८. १९९४ कॅनडा युनिव्हर्सिटीकडून डॉक्टरेट ही पदवी
९. १९९६ ग्लोबल ॲम्बेसॅडर ऑफ म्युझिक अवार्ड
१०. १९९७ प्रिमियम इम्पिरियल अवार्ड (जपान)
११. १९९९ भारतरत्न (भारत सरकार)
१२. २००१ नाईट हुड पुरस्कार (ब्रिटन)

त्यांच्या सांगीतिक कार्यावर 'आलाप' या नावाचा माहितीपट प्रसिद्ध

**१३) पं. रविशंकरांबद्दलचे गौरवोद्गार :**

१. ''पं. रविशंकरांनी भारतीय संगीताचा जेथे प्रसार केला त्या पाश्चात्त्य देशांतील लोकांना या संगीताची अजिबात ओळख नव्हती. अशा लोकांना भारतीय संगीतातील सौंदर्याचा परिचय पं. रविशंकरांनी यशस्वीपणे करून दिला.''

– स्व. पं. जितेंद्र अभिषेकी

२. ''पं. रविशंकर यांच्या सतारवादनात रागाचे शुद्ध स्वरूप मला फार महत्त्वाचे वाटते. रागस्वरूपाबाबत कधीही तडजोड केल्याचे स्मरत नाही. तबलावादकाला ते वाजविण्यास खूप वाव देतात.''

– स्व.पं. शिवकुमार शर्मा

३. ''पं. रविशंकर संगीताच्या आकाशात गेली ६०–६५ वर्षे तेजस्वी सूर्याप्रमाणे तळपत आहेत. आपल्या समकालीनांचे महत्त्व आपल्याला वाटत नाही. पं. रविशंकरांचे संगीतकार म्हणून खरे आणि निःस्पृह मूल्यमापन

झालेले नाही.''

– भास्कर चंदावरकर

**१४) समारोप :**

पंडितजींनी ९९ व्या वर्षापर्यंत रियाज केल्याशिवाय त्यांच्या दैनंदिन व्यवहाराला सुरुवात करीत नसत. पहाटेपासूनच त्यांच्या साधनेला प्रारंभ व्हायचा. प्रथम काही तास आध्यात्मिक व त्यांनंतर सतारीची साधना व्हायची. रोजचा रियाज व नवनवीन नादनिर्मितीबरोबर किती तास तन्मय व्हायचे ते समजत नसत. पंडितजींचे दौरे आखणे, पत्र व्यवहार, ऑफिस सांभाळणे आणि त्यांची काठी होणे ही सर्व कामे त्यांच्या द्वितीय पत्नी सुकन्या या खूप प्रेमाने व आपुलकीने करीत असत. त्यांचे हिंदुस्थानावर प्रेम होते. ते म्हणायचे. ''हिंदुस्थानात आणि साऱ्या जगामधून मला लोकांनी भरभरून प्रेम दिले. मानसन्मानांचा वर्षाव झाला. या जन्मात मी जे करू शकलो नाही ते काम पूर्ण करण्याकरिता देवाने मला पुन्हा माझ्या देशात जन्म द्यावा, हीच देवाकडे प्रार्थना आहे.''

खऱ्या अर्थाने संपूर्ण कलाकार, अगदी नखशिखांत कलाकार असलेल्या पंडित रविशंकरांचे भारतावर आणि जगावर ऋण आहे.

आयुष्याच्या अखेरपर्यंत त्यांनी भारतीय संगीताचा प्रचार केला दिनांक ४ नोव्हेंबर २०१२ रोजी लॉगबिच येथील हेरास थिएटर मध्ये अनुष्का समवेत मैफिल केली. ती त्यांच्या आयुष्यात शेवटची मैफल ठरली. खऱ्या अर्थाने कलाकार अगदी नखशिकांत कलाकार असलेले पंडित रविशंकर वयाची ९२ वर्षे अत्यंत समाधानी जगले. दिनांक १२ जानेवारी २०१२ रोजी येथे त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांना दोन ग्रॅम अवार्ड मिळाले. एक म्हणजे जीवनगौरव पुरस्कार तर द लिविंग रूम सीजन पार्ट वन या अल्बमसाठी दुसरा पुरस्कार मिळाला. हे दोन्ही पुरस्कार त्यांच्या मृत्यूनंतर म्हणजे २०१३ साली प्रदान करण्यात आले. अशा थोर कलावंतास कोटी कोटी प्रणाम.



# ४.

# लता मंगेशकर

**१) प्रस्तावना :**

सातहून अधिक दशकात गायिलेली हजारो गाणी...देशविदेशातून केलेले अनेक जाहिर कार्यक्रम... शेकडो पुरस्कार मानसन्मान... तीन पिढ्यांच्या भारतीय रसिकांच उदंड प्रेम... सामान्य रसिकांपासून जाणकारांपर्यंत सर्वांना रिझवणार स्वर... अविरत परिश्रमाने साकारलेली भारतरत्न लता दिदींची वैभवशाली कारकिर्द... यांचा आलेख मांडायचा तरी कसा? दिव्य स्वरांचे वर्णन करायचे तरी कसे? हे सारं शब्दांच्या पलीकडले आहे. तरीही त्यांच्या गाण्यातून झालेल्या परिचयातून त्यांच्या सांगीतिक कार्याचा हा आढावा...

**२) जन्म व बालपण :**

ईश्वरी देणगी लाभलेल्या लता मंगेशकरांचा जन्म २८ सप्टेंबर, १९२९ रोजी इंदोर येथे झाला. वडिलांचे नाव मा.दीनानाथ मंगेशकर तर आईचे नावशुद्धमती. आशा, उषा, मीना व हृदयनाथ ही लतादीदीची भावंडे. मा.दीनानाथ हे मराठी नाट्य सृष्टीतील लोकप्रिय गायक नट होते. बालपणापासूनच लतादीदींच्या हाती तंबोरा आला. त्यांनी झगमगत्या रंगमंचावरील नाटके पाहिली. त्याहीपेक्षा वडिलांचे तेजस्वी संगीत कानात साठवले. मा.दीनानाथांनी दीदींची कुशाग्र बुद्धिमत्ता व स्मरणशक्ती पाहून संगीताची मेहनत अत्यंत गांभिर्याने करून घेतली. वयाच्या दहाव्याच वर्षी दीदींनी दीडशे चिजा तोंडपाठ केल्या. वडील नट, गायक व सारंगीवादक होते. त्यांच्याकडे असलेले संगीतरूपी धन, वारसा हक्कान लतादीर्दीकडे आले. त्यांनीही ते अल्पावधीत आपलेसे करून घेतले.

**३) बलवंत संगीत मंडळीत प्रवेश :**

त्या काळात मा.दीनानाथांची 'बलवंत संगीत मंडळी' ही नाट्य संस्था नावा-रूपाला आली होती. सौभद्र नाटकात वडिलांबरोबर छोट्या नारदाची भूमिका त्यांनी केली. याच नाटकात 'पावना वामना' या गाण्याला बाबांना सांगून पैजेवर मोअर घेतला. तेव्हाच बाबांनी भाकीत केले, ''लताच्या

रूपाने मला उद्याचा सूर्योदय दिसत आहे.'' 'पुण्य प्रभाव' नाटकात युवराजाची भूमिका केली तर नाटकात श्रीकृष्णाची भूमिका त्यांनी साकार केली. 'त्राटिक' नाटकात 'बागेतलं गोड पाखरू' ही लावणी त्यांनी म्हटली. 'खंजाची' ह्या चित्रपट गीताच्या स्पर्धेत लतादीदीला पहिले बक्षिस मिळाले. बक्षिस म्हणून सोबत दिलरुबाही मिळाला. दिलरूबा घेऊन दिवसभर आनंदाने उड्या मारणाऱ्या कन्येला मा.दीनानाथांनी बजावले, ''यशानं हूरळून जाऊ नकोस. तुला पुढच्या आयुष्यात खूप झेलायचं आहे. यशाच्या शिखरावर पोहंचलं तरी पाय जमीनीवरच हवेत.'' अशी शिकवण वडिलांनी दिली.

**४) लतादीदींवरील पहिला आघात :**

हसत-खेळत बागडणाऱ्या या सुखी कुटुंबावर काळाने झडप घातली. अन्? ऐन तारुण्यात मा.दीनानाथांची जीवनज्योत विझली. दीदींच्या साडेबाराव्या वर्षी तिचे बाबा तिला सोडून गेले. २४ एप्रिल, १९४२ या उष्ण तप्त दिवशी त्यांनी अखेरचा निरोप घेतला. त्याच दिवशी तिचे बालपण संपले. कोवळ्या आवाजाची, मुग्ध, सतत गुणगुणणारी मुलगी कर्तव्यकठोर झाली. संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी या जेष्ठ कन्येवर येऊन पडली. आलेल्या संकटांना, झालेल्या आघाताला कुरवाळीत न बसता त्यांनी शांतपणे, धीराने व संयमाने पुढे मार्गक्रमण केले. स्वतःबरोबरच त्यांनी भावंडांचेही नाव संगीत क्षेत्रात अजरामर केले.

**५) चित्रपट सृष्टीत पदार्पण :**

वडिलांच्या निधनानंतर लतादीदींना कुटुंबाचा चरितार्थ चालवण्यासाठी नोकरीची आवश्यकता होती. मा. दीनानाथांचे मित्र मा. विनायकांनी मंगेशकर कुटुंबीयांना पुण्याहून कोल्हापूरला नेले. मा.विनायकांनी प्रफुल्ल या आपल्या फिल्म कंपनीत लतादीदींना प्रथम काम दिले. त्यानंतर नवयुग स्टुडिओमध्ये दत्ता डावजेकर यांनी त्यांची ऑडीशन घेतली. दीदींनी मा.दीनानाथांचे पद म्हणून दाखविले. ते ऐकूण दत्ता डावजेकर खुश झाले व त्यांनी दीदींना बाल कलाकार म्हणून नोकरी दिली. 'पहिली मंगळागौर' या चित्रपटात त्यांनी काम केले. त्यानंतर 'माझे बाळ', 'गजाभाऊ किती हसाल' इ.चित्रपटातून त्यांनी भूमिका केल्या.

**६) घेतलेले परिश्रम :**

बालपणापासूनच लतादीदींना कठोर परिश्रम करावे लागले. मा.दीनानाथांच्या मृत्यूनंतर हातात तंबोरा, चिजांची वही आणि हृदयात अदम्य आत्मविश्वास घेऊन त्या बाहेरच्या जगाशी सामना करण्यासाठी तयार

झाल्या. बाबांचा फोटो समोर ठेऊन एकलव्याप्रमाणे रियाज सुरू झाला. दिवसभर कामासाठी स्टुडिओत वेळ जायचा. संपूर्ण शालेय शिक्षण घेण्याचे भाग्य त्यांना लाभले नाही असे असले तरी त्यांनी वि.स. खांडेकर, साने गुरुजी, आचार्य अत्रे अशा श्रेष्ठ साहित्यिकांच्या साहित्याचा अभ्यास केला. ''तुम्हारे हिंदी को दाल-भात की बु आती है'' असे म्हणणाऱ्या दिलीपकुमारांना अस्सल उर्दूचा अभ्यास करून जवाब दिला. याचबरोबरच गीतांचा अर्थ समजून घेण्यासाठी त्यांनी हिंदी, बंगाली, संस्कृत, तेलगू, कन्नड इ. भाषा आत्मसात केल्या. त्यांनी जवळपास २२ भाषांत गीतगायन केले.

आयुष्यात संघर्ष व धावपळच नशिबी आली. म्हणून तर दूरदर्शनवरील 'प्रीतीश नंदी शो'मध्ये पुन्हा जन्म मिळाला तर काय व्हायला आवडेल? या प्रश्नावर स्वतः लतादीदी म्हणाल्या, ''काहीही पण लता मंगेशकर नाही.'' यावरून त्यांनी किती परिश्रम घेतले असतील याची आपणांस कल्पना येते.

**७) गुरू आणि शिक्षण :**

लता दीदीचे प्राथमिक शिक्षण वडील मा.दीनानाथांकडेच झाले. लहानपणी बाबांनी त्यांना 'एक, दोन, तीन' ऐवजी 'सारेगमप' म्हणायला शिकविले. पहाटे उठवून त्यांनी 'भैरव बहार' रागातील 'हे मान्दे मह ...' ही चीज शिकविली. दीदींनीही त्यांचे स्वर कानात साठवले. मा.विनायकांनी मुंबईला आल्यानंतर दीदींच्या संगीत शिकवणीची व्यवस्था केली. दि.११ जून, १९४५ रोजी दीदी भेंडीबाजार घराण्याचे उस्ताद अमान अलीखाँ यांच्या गंडाबंद शागीर्द झाल्या. त्यानंतर अमान अलीखाँ हे मुंबई सोडून गेल्यामुळे देवासचे उस्ताद अमानत खाँ यांनी दीदींना उत्तम तालीम दिली. याच सुमारास पं. तुलसीदास शर्मा यांच्याकडूनही त्यांनी मार्गदर्शन घेतले. पागे या नृत्य शिक्षकाकडून त्यांनी काही दिवस नृत्याचे धडे घेतले होते. बाबांच्या तालमीत तयार झालेल्या गळ्याला सारं साध्य होत होते.

**८) यशस्वी युगाची वाटचाल :**

१९ ऑगष्ट, १९४७ रोजी दीदींवर पितृवत प्रेम करणारे मा.विनायक यांचे अचानक निधन झाले. हा त्यांच्या आयुष्यातला दुसरा आघात. परंतु याही आघातातून त्या सावरल्या. १९४७ साली दत्ता डावजेकरांनी 'आपकी सेवा में' या चित्रपटासाठी त्यांच्याकडून एक ठुमरीवजा गाणे गाऊन घेतले. 'पा लागू शाम करी जोरी रे...' आणि लता मंगेशकर यांनी गायलेल्या पहिल्या पार्श्वगीताची नोंद झाली. परंतु दीदींना खरी प्रसिद्धी मिळाली ती 'मजबूर' या चित्रपटातल्या गीतापासून. गुलाम हैदरांनी मजबूरसाठी त्यांच्याकडून गाऊन

घेतले व ग्वाही दिली की, ''ह्या मुलीच्या पायावर चित्रपट सृष्टी लोळण घेईल.'' त्यांचे शब्द खरे ठरले. याच काळात पार्श्वगायन हा प्रकार चित्रपटात रूढ होऊ लागला. याचा फायदा लता दीदींना झाला. अनेक संगीतकारांशी त्यांचा परिचय होत गेला. मदन मोहन, खेमचंद शामसुंदर, नौशादजी, सी रामचंद्र, शंकर जयकिशन, चित्रगुप्त, जयदेव, सलील चौधरी, अनिल विश्वास इ. संगीतकारांनी लतादीदींच्या आवाजाला पारखून त्यांच्या आवाजाचा पार्श्वगायनासाठी उपयोग करून घेतला. सुधीर फडके, वसंत देसाई, वसंत प्रभू, वसंत पवार, श्रीनिवास खळे इ. मराठी संगीतकारांनी लतादीदींकडून गाणी गाऊन घेतली. अशा प्रकारे यशाची अनेक शिखरे पादाक्रांत करीत असताना लतादीदींनी मागे कधी वळून पाहिलेच नाही.

### ९) गायकी :

मा.दीनानाथांच्या जन्मशताब्दीनिमित्त सन २००० साली पुणे येथील एस.पी. महाविद्यालयाच्या प्रांगणात 'मेरी आवाज सुनो' हा कार्यक्रम झाला होता. या कार्यक्रमात निवेदक हरिष भीमाणी यांनी लतादीदींना तुमचे वय किती असा प्रश्न विचारला होता. तेव्हा त्यांनी सांगितले ७१ वर्षे. त्यावर हरिष भीमाणी म्हणाले, ''तुमचे वय ७१ असले तरी ७१ च्या उलट १७ वर्षाच्या मुलीसारखा तुमचा आवाज आहे.'' यातच त्यांच्या गायकीचे दैवी रूप आपणांस दिसून येते. खानदानी डौल व नावीण्याची भरारी असा विलोभनीय संगम त्यांच्या गायकीत दिसून येतो. त्यांच्या आवाजात संमोहनं शक्ती होती. त्यांनी चित्रपट संगीताला संजीवनी दिली. संगीतकारांना काहीतरी वेगळे करून दाखविण्याची चेतना त्यांच्या स्वरातून मिळायची. लतादीदींच्या आवाजाचा परिसस्पर्श होताच साध्या चालीचे सुंदर गीतात रूपांतर व्हायचे. सांदी-कोपरा उजळून टाकणाऱ्या प्रकाशझोतासारखे त्यांचे स्वर होते.चित्रपट चालो की कोसळोत गाणी मात्र लखलखत्या झुंबरासारखी असायची. त्यांच्या गाण्याने मराठी मनाची ओंजळ भरली तर भारतीय भाषांमधून त्यांचा स्वर दरवळला. अमिताभ बच्चन एका ठिकाणी म्हणतात, ''आम्ही परदेशात जातो. तेथील लोक आम्हांला म्हणतात, आमच्याकडे सर्व काही आहे. परंतु दोन गोष्टी नाहीत. एक म्हणजे ताजमहल दुसरी म्हणजे लतादीदींचा स्वर.''

### १०) लतादीदी व चित्रपट :

लतादीदींनी 'आनंदघन' या टोपन नावाने 'साधी माणसं', 'मोहित्यांची मंजुळा', 'तांबडी माती', 'मराठा तितुका मेळवावा' या चित्रपटांचे संगीत दिग्दर्शन केले. 'राम राम पाव्हणं' या चित्रपटाचे संगीत दिग्दर्शन लता मंगेशकर

या नावाने केले. पार्श्वगायन, संगीत दिग्दर्शनाबरोबरच त्यांनी १९८६ मध्ये 'लेकिन' चित्रपटाची निर्मिती केली. ज्या चित्रपटाला अनेक राष्ट्रीय पुरस्कार मिळाले. त्यांनी 'पहिली मंगळागौर', 'चिमुकला संसार', 'माझं बाळ' या मराठी चित्रपटात तर 'छत्रपती शिवाजी', 'बडी माँ', 'जीवन यात्रा', 'सुभद्रा', 'मंदीर' या हिंदी चित्रपटात भूमिका केल्या.

**११) स्वभाव :**

भारतरत्नासारखा मुकुट शिरावर विराजमान असतानाही त्या विनम्रपणे वागायच्या. हजर जवाबीपणा व तीव्र विनोदबुद्धी याही देणग्या त्यांना मिळालेल्या होत्या. त्या धार्मिक वृत्तीच्या होत्या. साईबाबा, गजानन महाराज यांच्यावर त्यांची गाढ श्रद्धा होती. संत-साहित्यातही त्यांना अभिरुची होती. मीरेची भजने, ज्ञानदेवांच्या विराण्या, गालीबच्या गझला, खानोलकरांच्या कविता, गुरुवाणी, गीता ही चित्रपटाच्या व्यस्ततेतूनही त्यांनी परमकर्तव्य भावनेने केल्या. छत्रपती शिवाजी महाराज व स्वातंत्र्यवीर सावरकरांचे तेजस्वी आदर्श त्यांच्यासमोर होते. विवेकानंदांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर दिसून यायचा. त्याग, दातृत्व, सेवाभावी वृत्ती त्यांच्यात दिसून यायची. वैभवशाली स्टेज शो करून कोट्यवधी रुपयांचा मदतनिधी त्यांनी उभा केला. मा.दीनानाथांच्या नावाने प्रतिष्ठान सुरू केले. रुग्णालय सुरू केले. यातून गोरगरिबांना मदत करण्याचे काम केले.

फोटोग्राफीचा छंदही त्यांनी मनस्वी जोपासला होता. त्या फावल्या वेळात पेंटिंग करायच्या. राष्ट्राबद्दलचे प्रेमही त्यांच्या मनात होते. 'फुले वेचिता' हा त्यांचा आत्मचरित्रपर ग्रंथ. यात त्या म्हणतात, ''देशाच्या सेवेसाठीच या देहाला वीरगती प्राप्त व्हावी. पण हे सर्व घडत असताना माझे संगीतही माझ्याबरोबर असावे.'' प्रत्येक गाणे हे गळ्यातून नाही तर आत्म्यातून म्हणायच्या. याची साक्ष 'ये मेरे वतनके लोगो...' ह्या गीताने दिली आहे. त्यांचे हे गीत ऐकून पं.नेहरूच नव्हे तर संपूर्ण भारत रडतो. 'अल्ला तेरे नाम...' 'मिले सूर मेरा तुम्हारा...' अशी गीते गाऊन त्यांनी सर्वधर्म समभावाची भावना प्रकट केली आहे.

**१२) पहिले कार्यक्रम व चित्रपट :**

१. रंगमंचावरील पहिले गायन - वयाच्या ९ व्या वर्षी सोलापूर येथे.
२. शास्त्रीय संगीताची मैफल- दीनानाथांच्या पहिल्या पुण्यतिथी दिनी कोल्हापूर येथे.

३. नाटकातील पहिली भूमिका – सौभद्र नाटकात नारदाची.
४. गायन स्पर्धेतील पहिले बक्षिस – ‘खजांची’ चित्रपट गीताच्या स्पर्धेत.
५. रेडिओवरचे पहिले गाणे – ‘मोरी निंदीया’ – (१६ डिसेंबर, १९४१)
६. चित्रपटातील पहिला स्वतंत्र अभिनय – पहिली मंगळागौर (१९४२)
७. पहिला मराठी चित्रपट – ‘किती हसाल’ (१९४२)
८. पहिले हिंदी चित्रपटातील गाणे – ‘पा लागू शाम करी जोरी रे’.
९. स्वतंत्र पहिली मराठी चित्रपट निर्मिती – वादळ (१९५३)
१०. स्वतंत्र पहिली हिंदी चित्रपट निर्मिती – झांझर (१९५३)
११. परदेशातील पहिला कार्यक्रम – रॉयल अल्बर्ट हॉलमध्ये (१९७४)

**१३) पुरस्कार/मानसन्मान :**

लतादीदींना शेकडो पुरस्कार व मानसन्मान मिळाले. त्यांपैकी काही विशेष पुरस्कारांची यादी खालीलप्रमाणे सांगता येईल.

१. १९५८, १९६२, १९६५ आणि १९६९ – फिल्मफेअर पुरस्कार
२. १९६९ – पद्मभूषण (भारत सरकार)
३. १९८० – जॉर्ज टाऊन नगराची चावी सन्मानपूर्वक अर्पण (द. अमेरिका)
४. १९८० – अमेरिकेचे सन्मानपूर्वक नागरिकत्व प्रदान.
५. १९८४ – पासून मध्यप्रदेश सरकारकडून ‘लता मंगेशकर पुरस्काराची’ सुरुवात.
६. १९८९ – दादासाहेब फाळके पुरस्कार.
७. १९९४ – इंदिरा गांधी पुरस्कार.
८. १९९५ – ‘हम आपके हैं कौन’ – या चित्रपटातील ’दीदी तेरा देवर दिवाना’ या गाण्यासाठी विशेष फिल्मफेअर पुरस्कार.
९. १९९७ – राजीव गांधी सद्भावना पुरस्कार
१०. १९९७ – महाराष्ट्र भूषण – (महाराष्ट्र सरकार)
११. १९९९ – पद्मविभूषण (भारत सरकार)
१२. २००१ – ‘भारतरत्न’ – (भारत सरकार)
१३. २००६ – फ्रान्सचे नागरिकत्व सन्मानपूर्वक प्रदान.

या सोबतच त्यांच्या पार्श्वगायनाच्या उज्ज्वल कारकीर्दीबद्दल गिनीजबुकात नोंद. अनेक विद्यापीठांकडून डॉक्टरेट, डी.लिट. इ. पदव्या बहाल करण्यात आल्या. तिरुपती संस्थानाकडून आस्थाना विद्वान ही पदवी देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

**१४) लता दीदींबद्दलचे गौरवोद्गार :**

१. ''आकाशात देव आहे की नाही हे मला ठाऊक नाही. पण आकाशात चंद्र सूर्य आहेत आणि लताचे सूर आहेत.''

–पु.ल.देशपांडे

२. ''सूर्य रोज़ उगवतो, तरी जसा तो शिळा होत नाही. चांदणे नेहमी दिसते, तरीही ते कधीच कोमेजत नाही. सकाळ–संध्याकाळचे क्षितिजाच्या काठावरील आकाशसौंदर्य जसे कधी विरत नाही तसे लताबाईच्या स्वरांचे मोहन कधी उणावलेले नाही.''

–प्रा.राम शेवाळकर


३. ''स्वर, शब्द, सिद्धी आणि लय ह्या चार गोष्टी एकत्र आल्यानंतर कसा परिणाम होतो ह्याचं लताचं गाणं हे मूर्तिमंत उदाहरण होय.''

– पं.भीमसेन जोशी

४. ''ऐकता मी गायकांना वानितो त्यांच्या स्वरांना ऐकता गाणे लताचे मानितो मी ईश्वराला.''

– मंगेश पाडगावकर

लता मंगेशकर यांनी चित्रपट संगीताला एका उच्च अभिजात संगीताच्या पातळीवर नेले. मधुबाला, नर्गीस, मीनाकुमारीपासून ते आजच्या माधुरी दिक्षीत, ऐश्वर्या रॉयपर्यंत त्यांनी आपला आवाज अनेक नट्यांना दिला. १९४७ पासून त्या अविरतपणे गात होत्या. वयाची ९० व्यावर्षानंतर सुद्धा त्यांचा स्वर यौवनात होता. क्रांतिस्वरांचे तारुण्य त्यांनी अखेरपर्यंत जपले. अशा महान लता दिदींनी वयाच्या ९२ वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. प्रकृती बिघडल्याने त्यांना ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. रुग्णालयात उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. लता मंगेशकर यांच्या निधनामुळे संपूर्ण कलाविश्वावर शोककळा पसरली.



# ५.

# उस्ताद बिस्मिल्ला खाँ

**१) प्रस्तावना :**

सनईचे मंजुळ स्वर ... जे ऐकताना सभोवतालचे वातावरण मंगलमय होते. सनईचा अमृतरस कानावर पडतो आणि मन प्रसन्न होते. लग्न समारंभ असो की कोणताही सामाजिक, सांस्कृतिक उत्सव असो तेथे सनईचा स्वर निनादला नाही तरच नवल ! अशा या मंगल स्वराला लोकमान्यता आणि त्याहीपेक्षा राजमान्यता देण्याचे महान कार्य केले ते स्वर्गीय उस्ताद बिस्मिल्ला खाँ यांनी! लोकधुनीपुरतं मर्यादित असलेल्या या वाद्याला त्यांनी भारतरत्नाचा मुकुट चढविला. अशा महान सनई वादकाच्या जीवन कार्याचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

खाँ साहेबांचा जन्म २१ मार्च, १९१६ साली वाराणसी जिल्ह्यातील भोजपूर या गावी एका गरीब मुस्लीम कुटुंबात झाला. घराण्यातच संगीत होतं. पिढ्यानपिढ्या संगीताचा वारसा असल्याने बिस्मिल्ला खाँ सारखा जातिवंत कलाकार निर्माण झाला नसता तरच नवल ! त्यांच्या वडिलांचे नाव पैगंबर बक्ष तर आईचे नाव मिठ्ठन बेगम असे होते. खाँ साहेबांचे नाव कमरूद्दीन असे होते. मातोश्रीने अल्लाजवळ प्रार्थना केली की, ''कमरूद्दीनला असा बनव की, त्याच्यापेक्षा दुसरा कोणीच मोठा नसेल. त्याचे नाव आकाशात लिहिले जाईल असा हा कीर्तिवंत होऊ दे.'' अशीच प्रार्थना तिने बालाजी व काशीविश्वनाथाजवळ केली व काय चमत्कार की कमरूद्दीन पुढे भारतरत्न बिस्मिल्ला खाँ म्हणून जगासमोर आला. बालपणापासून त्यांनी वडिलांकडून शहनाई शिकण्यास प्रारंभ केला. वयाच्या सहाव्याच वर्षी त्यांच्या हातात शहनाई आली. परंतु कमरूद्दीन लहान असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले.

**३) गुरू व शिक्षण :**

वडिलांचे छत्र हरवलेल्या लहानशा कमरूद्दीनला त्यांच्या मामांनी त्यांना बनारसला आणले. मामा अलीबक्ष बनारसच्या विश्वनाथ मंदिरात सनई

वाजवत असत. त्यावेळी गायणक्षेत्रात उदंड कलाकार मंडळी होती. दुसरा अशा परिस्थितीत मार्ग शोधला पाहिजे असे खाँ साहेबांच्या गुरूंना म्हणजेच मामाला वाटू लागले. सतार, सरोद, सारंगी यातही अनेक कलाकार मंडळी होती. मग असे एखादे वाद्य बघावे, की जे पूर्णत्वाने दुर्लक्षित आहे. मंगलवाद्य म्हणून ओळखली जाणारी, फक्त लग्न समारंभ आणि वरातीत वाजविली जाणारी एकमेव शहनाई डोळ्यांसमोर आली. पूर्वजांना अवगत असलेली गायकी सनईतून प्रकट करायला सुरुवात झाली. खाँ साहेबांनी मामांकडून सनई व गायनाचे शिक्षण घेतले. गायकीतले बारकावे त्यांनी मामांकडून मिळविले. वादन भावपूर्ण कसे होईल यासाठी त्यांनी लखनौ येथील उस्ताद महम्मद हुसेन ख्यालीया यांचे शिष्यत्व पत्करले. लहानपणी उठता-बसता, खाता-पिता, प्रवासात अगदी म्हणतात जळी- स्थळी-पाषाणी त्यांना सर्वत्र संगीताशिवाय दुसरे काहीही दिसत नव्हते.

**४) वादनशैली :**

खाँ साहेबांकडे ज्ञानाचा सागर होता. अनेक दशकांच्या रियाजामुळे फुंकेवर असामान्य प्रभुत्व संपादन झाले होते. वादनातील मींड, गमकांचा अंतर्भाव असे. गायकी अंगाने सनई वाजविण्याचे कौशल्य वर्णनातीत असे. खाँ साहेबांकडे लिखित स्वरूपात काही नव्हते. सगळे राग, स्वर, लय डोक्यात असायची. एकदा वादनाला सुरुवात झाली की, रागाचे स्वरूप बारकाव्यांसह आपोआप स्पष्ट होत जायचे. ''ताल, सूर, राग, बंदिशी, नोटेशन सर्व पुस्तकात मिळते, पण त्याचा असर, अनुभूती दर्शन आपण शोधायचे असते.'' असा सल्ला खाँ साहेब द्यायचे. शास्त्रीय, उपशास्त्रीय वादनात तर त्यांचा हातखंडा होताच परंतु ते लोकधुनीही तयारीने पेश करीत असत. शहनाईच्या साथीसाठी ते 'खुर्दक' या नावाचे वाद्य घ्यायचे.

**५) खाँ साहेबांचे बंधु प्रेम :**

खाँ साहेबांचे मोठे बंधू शमसुद्दीन खाँ हे एक उत्कृष्ट सनईवादक होते. थोरल्या बंधूची वादनात तयारी खूपच होती तर धाकट्या बिस्मिल्लाच्या वादनात माधुर्य अधिक होते. या दोन भावांनी सादर केलेली सनई वादनाची जुगलबंदी अवर्णनीय असायची. हे थोरले बंधू जगले असते तर सनई वादनातील इतिहास वेगळाच घडला असता. परंतु ते अल्पायुषी ठरले. ते हयात होते तोपर्यंत बिस्मिल्लांनी ईर्ष्येने त्यांच्यावर मात करण्याचा, त्यांच्याशी संघर्ष करण्याचा कधीही प्रयत्न केला नाही. थोरल्या बंधूच्या अकाली निधनानंतर बिस्मिल्ला खाँ साहेबांनी शहनाईवादन सोडून दिले. परंतु अनेक हितचिंतकांनी व चाहत्यांनी

त्यांना विनंती केली. त्यामुळे त्यांनी पुन्हा शहनाईवादन चालू ठेवले.

**६) खाँ साहेब एक आदर्श गुरू :**

खाँ साहेबांना त्यांचा शिष्य परिवार गुरुदेव म्हणायचा. गुरुदेव अर्थार्जनासाठी कधीही शिकवायचे नाहीत. समर्पण भावनेने शिकणाऱ्यालाच ते विद्यादान करायचे. ते नेहमी म्हणायचे ''शागिर्दों का एक पैसा भी हम नहीं खाते.'' पैसे घेणे त्यांना आवडत नसे. शिष्यांना ते पितृवत प्रेम करायचे. खायला-प्यायला द्यायचे, क्वचित एखादा सिनेमा दाखवायचे. पण एकदा का शिकवायला बसले की काळ वेळेचे भान नसायचे. कार्यक्रमाची बिदागी घेतो पण विद्येचे दानच करतो असे ते अवर्जून सांगायचे व आचरण करायचे. अतिशय शिस्तप्रिय पद्धतीने ज्ञानदान करणारे गुरुदेव शिष्यांच्या थोबाडीत मारायलाही मागेपुढे पाहायचे नाहीत. एखादी गोष्ट दहावेळा समजावून सांगायचे पण अकराव्यांदा ती वाजवता यायलाच हवी. शिष्यही आशीर्वादस्वरूप मार सहन करायचे.

**७) खाँ साहेबांचे राष्ट्रप्रेम :**

खाँ साहेब कार्यक्रमानिमित्त अनेक वेळा परदेशात जायचे. परदेशातील अनेक लोक त्यांना म्हणायचे, ''पैसे देतो, सोने देतो, घर देतो तुम्ही अमेरिकेत रहा.'' त्यावर खाँ साहेब त्यांना नकार द्यायचे. ते म्हणायचे, ''मला माझ्या हिंदुस्थानात आणि तेही बनारसलाच राहायचे आहे. बनारसची जिलेबी तिकडे मिळेल काय?'' अशा प्रकारे आपल्या राष्ट्राबद्दल त्यांना प्रेम होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही ते भारतातच राहिले. १५ ऑगष्ट, १९४७ साली लाल किल्ल्यावर खाँ साहेबांनी शहनाईवादन करून स्वातंत्र्याच्या गौरवशाली घटनेचा शुभारंभ केला होता. स्वातंत्र्याला ५० वर्षे पूर्ण झाल्यानंतर १५ ऑगष्ट, १९९७ साली भारत सरकारने आयोजित केलेल्या याच लाल किल्ल्यातील दीवाने - आममध्ये पुन्हा खाँ साहेबांनी शहनाईवादन केले. खाँ साहेबांचे राष्ट्रप्रेम व सनईला दिलेल्या योगदानाचा हा मोठा गौरव होता.

**८) खाँ साहेब व सर्वधर्मसमभाव :**

खाँ साहेबांना कोणत्याही जाती-धर्माशी देणे-घेणे नव्हते. फक्त संगीत हाच त्यांचा धर्म होता. एकदा का सनई हातात घेतली की ते अल्लाच्या व परमेश्वराच्या आधीन व्हायचे. ते म्हणायचे, ''तुम्ही कोणत्याही धर्माचे असाल, तरी ईश्वरचिंतन आणि भक्तिमार्ग सोडायचा नाही.'' ही आज्ञा त्यांनी मानली विद्यार्थ्यांनाही दिली. शंकर, सरस्वती, गणपती यांचे नाव घेताय की अल्लाचे नाव घेताय याला त्यांच्या दृष्टीने काही मतलब नसायचा. केवळ

ईश्वरचरणी लीन होत आहात की नाही याच्याशी कर्तव्य आहे असे ते म्हणायचे. बालाजीच्या देवळात ते रोज सनई वाजवायचे. कोणीही त्यांना मुसलमान म्हणून मज्जाव केला नाही. देशात जेव्हा जेव्हा जातीय दंगली झाल्या तेव्हा तेव्हा त्यांनी संकटमोचन हनुमानाच्या मंदिरात शहनाईवादन करून राष्ट्रीय एकात्मतेचा व सर्वधर्मसमभावाचा संदेश दिला. संगीतामध्ये एकता आहे. केवळ संगीतच मानवाला एकता शिकविते असे त्यांचे मत होते.

**९) खाँ साहेबांचे राहणीमान :**

लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचलेल्या या व्यक्तीची राहणी अत्यंत साधी होती. अहंकाराचा लवलेशही त्यांच्या वागण्यात नसायचा. मी कोणी मोठ्ठा हा अहंभावही त्यांच्यात नव्हता. अनेक पुरस्काराने सन्मानित झालेल्या या व्यक्तीचे घर अत्यंत साधे होते. फाईव्ह स्टार किंवा पॉश बंगला नव्हता. नोकर-चाकर नव्हते की चारचाकी वाहन नव्हते. गरिबीतून वर आल्यामुळे त्यांचे पाय जमिनीवरच होते. घरात मुले, सुना, नातवंडे, पतवंडे, पुतणे, त्यांची मुले असे जवळजवळ तीनशे माणसांचे एकत्र कुटुंब होते. खाँ साहेबांची खोली अगदी लहान म्हणजे ८ बाय ८ किंवा १० बाय १० फुटांचीच होती. त्या खोलीत दोऱ्याने विणलेली खाट (बाज), छोटे कपाट, त्यात सनया आणि कुराण ठेवलेले असायचे. जुन्या काळाचा एक पंखाही होता. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी असे त्यांचे राहणीमान होते.

**१०) खाँ साहेबांची वेशभूषा :**

खाँ साहेबांची वेशभूषा अत्यंत साधी असायची. झब्बा, जाकीट, कोट किंवा शेरवाणी व डोक्यावर टोपी असायची. घरात बनियन व चौकटीच्या लुंगीवरच ते असायचे. सुरुवातीला ते फरची टोपी वापरायचे. परंतु उतारवयात त्यांना तीही नकोशी वाटायची. म्हणून ते गांधी टोपी वापरायचे. कोणाला फोटो काढायचा असल्यास आहे त्या पोषाखात फोटो घ्यायला सांगायचे. केवळ फोटोसाठी वेगळे कपडे घालायला त्यांना कंटाळा यायचा.

**११) यशस्विता :**

अथक परिश्रमाचे द्योतक म्हणून यशाने त्यांच्या पायाशी लोळणे घातली. त्यांचा पहिला कार्यक्रम १९२६ मध्ये अलाहाबाद येथे प्रयाग संगीत समितीच्या संगीत समारोहात झाला. पहिल्याच कार्यक्रमात त्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. तेव्हापासून त्यांची कीर्ती सर्वदूर पसरली. त्यांना देशातून व विदेशातून कार्यक्रमाची निमंत्रणे येऊ लागली. वयाच्या २२ व्या वर्षी ऑल इंडिया रेडिओवर त्यांचा कार्यक्रम प्रसारित झाला. रेडिओबरोबरच दूरदर्शनवरही त्यांचे अनेक कार्यक्रम झाले.

पं. व्ही.जी. जोग यांच्या व्हायोलिनसोबत व उ.विलायतखाँ यांच्या सतारीबरोबर त्यांनी शहनाईवादनाची जुगलबंदी केली. या जुगलबंदीचे कार्यक्रम अत्यंत लोकप्रिय झाले. त्यांच्या वादनाच्या अनेक ध्वनिफिती निघाल्या. त्यालाही रसिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. 'गूँज उठी शहनाई' या चित्रपटातील त्यांचे शहनाईवादन घराघरात जाऊन पोहोचले.

**१२) पुरस्कार :**

खाँ साहेबांना अनेक पुरस्कार मिळाले. त्यांची सूची खालीलप्रमाणे देता येईल.

१. १९५६ – संगीत नाटक अकादमी पुरस्कार
२. १९६१ – पद्मश्री (भारत सरकार)
३. १९६३ – अखिल भारतीय शहनाई चक्रवर्ती (एन.सी.ओ.)
४. १९६५ तानसेन पुरस्कार
५. १९६८ – पद्मभूषण (भारत सरकार)
६. १९७३ – नेहरू इंटरनॅशनल पुरस्कार (रशिया)
७. १९८० – पद्मविभूषण (भारत सरकार)
८. १९९४ – स्वरालय पुरस्कार (मद्रास)
९. १९९४ – भारत शिरोमणी पुरस्कार (शिरोमणी संस्था)
१०. १९९४ – राजीव गांधी सद्भावना पुरस्कार (इं. नॅ. काँग्रेस)
११. १९९५ – संगीत नाटक अकादमीचा राष्ट्रपती पुरस्कार
१२. २००१– भारतरत्न (भारत सरकार)

**१३) स्वभाव :**

यशाची परिसिमा गाठलेले उस्तादजी 'विद्या विनयेन शोभते' प्रमाणे नम्र होते. अहंकार, मोठेपणा, झगझगीत दुनियेतले रीतिरिवाज, शिष्यांचा नको एवढा मागे–पुढे ताफा इ. गोष्टी त्यांच्यात दिसत नव्हत्या. त्यांना भोंदूगिरी अजिबात आवडत नसे. ते निर्व्यसनी होते. सुवासिक उदबत्त्यांचा त्यांना शोक होता. चहा मनस्वी आवडायचा. फोनवर बोलताना मी बिस्मिल्ला खाँ बोलतोय म्हणून सांगायचे. नावामागे उस्ताद म्हणत नसत. तरुण वयात त्यांना फुटबाल व कुस्तीची विशेष आवड होती. स्वभावाने साधे व घरेलू असल्याने समोरचा नतमस्तक व्हायचा. ते थोरा–मोठ्यांविषयी व सनया बनवणाऱ्या कारागिरांविषयी आदर बाळगायचे. त्यांच्या वागण्यात व व्यवहारात व्यापारीपणा नव्हता. तो त्यांना जमला नाही. त्यामुळे ते अनेक वेळा फसले जायचे. व्यवहारातले छक्के पंजे त्यांना जमले नाहीत.

**१४) ईश्वरी साक्षात्कार :**

खाँ साहेबांना ईश्वरी साक्षात्कार झाला होता. ते आपल्या शिष्यांना सांगत. एकदा गंगामाईच्या तीरावर बालाजीच्या देवळात रियाज करताकरता एक घटना घडली. नदीच्या पाण्यावर शांतता पसरली होती. माणसांची वर्दळ थंडावली होती. ते स्वरांच्या धुंदीत स्वतःला हरवून बसले. तेवढ्यात हीना अत्तराचा वास आला. रियाजाची तंद्री भंग पाऊ लागली. छोटा बिस्मिल्ला थोडा घाबरला. अशातच समोर साक्षात बाबांचे दर्शन झाले. ''बेटा तुम्हारा भला हो जायेगा, तेरा नाम रोशन हो जायेगा.'' खाँ साहेब भानावर आले तोच पुढ्यातले दर्शन अदृश्य झाले.

**१५) मृत्यू :**

गायकी अंगाने सनईवादन करणाऱ्या उस्ताद बिस्मिल्ला खाँ साहेबांचे नाव इतिहासामध्ये सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले. संगीताचा हा युगपुरुष आयुष्याची ९० वर्षे समाधानाने जगला. संगीतरूपी यज्ञकुंडात समिधेसम जळणाऱ्या या महान ऋषीने २१ ऑगष्ट, २००६ रोजी पहाटे २ वाजून ४५ मिनिटांनी अखेरचा श्वास घेतला आणि सनई मूक झाली.

**१६) समारोप :**

खाँ साहेबांनी सतत ७५ वर्षे रसिकांना सनई ऐकविली. आजही कुठेतरी सनईचे स्वर निनादले की खाँ साहेब डोळ्यांसमोर उभे राहतात. त्यांच्या जाण्याने सनई पोरकी झाली. प्रत्येक भारतीयांचे मन द्रवले. शासनाने राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला. ते आजही आपल्यात असायला हवे होते, असे सर्वांना वाटते. अशा या महान कलावंताला भावपूर्ण श्रध्दांजली.



# ६.

# पंडित भीमसेन जोशी

**१) प्रस्तावना :**

भारतीय संगीताला पडलेलं एक सोनेरी स्वप्न म्हणजेच पंडित भीमसेन जोशी होय. ज्यांनी अभंगवाणीतून महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यातील घराघरात आपला स्वर पोहोंचविला, आपल्या बुलंद व पहाडी आवाजाने देश विदेशात अभिजात शास्त्रीय संगीत पोहोचविले असे महान भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांच्या जीवन कार्याचा आढावा खालील मुद्द्यांच्या आधारे पाहूयात.

**२) जन्म व बालपण :**

पंडित भीमसेन जोशी यांचा जन्म ८ फेब्रुवारी १९२२ रोजी कर्नाटकातील रोना या गावी झाला. त्यांचे वडील गुरुराज हे एक शिक्षक होते. भीमसेनने संगीताकडे न वळता वैद्यकीय अथवा अभियांत्रिकी शिक्षण घ्यावे असा त्यांचा आग्रह होता. परंतु संगीतात रमणाऱ्या भीमसेनला हे पटले नाही. अखेर भीमसेनांनी घर सोडण्याचे निश्चित केले. त्याकाळी शास्त्रीय संगीतासाठी ख्यातनाम असलेल्या ग्वाल्हेर, लखनौ, रामपूर या शहरांपैकी एका ठिकाणी जावे असे त्यांना वाटू लागले.

संगीत शिक्षणाची अभिलाषा मनात ठेवून त्यांनी इ.स. १९३३ साली वयाच्या अकराव्या वर्षी घर सोडले आणि ते ग्वाल्हेरात दाखल झाले. त्यांच्या खिशात पैसे नव्हते. पोटात अन्न नसून देखील त्यांनी गायनाच्या तळमळीपायी उत्तर भारतात अनेक ठिकाणी पायपीट केली. उस्ताद अब्दुल करीम खाँ, वझेबुवा, केसरबाई केरकर, उस्ताद बिसमिल्ला खाँ आशा थोर कलावंतांचे गायन-वादन त्यांनी ऐकले.

**३) गुरू आणि शिक्षण :**

सुरुवातीला त्यांनी इनायत खाँ यांचे शिष्य जनाप्पा कुर्तकोटी यांच्याकडून गायनची तालीम घेतली. त्यानंतर जालंदर येथे पंडित मंगतराम यांच्याकडे व

ग्वाल्हेर येथे राजाभैय्या पूंछवाले यांच्याकडेही गाण्याचे शिक्षण घेण्याचे त्यांना भाग्य लाभले. त्यानंतर ते रामपूर येथे मुश्ताक हुसेन खाँ यांच्याकडे काही काळ शिकले. अशा प्रकारे काही वर्षे ग्वाल्हेर, लखनौ, रामपूर येथे पायपीट केली. त्यानंतर त्यांचा शोध घेत असलेल्या वडिलांशी त्यांची भेट झाली आणि भीमसेन यांना पुन्हा घरी परत आणले. भीमसेनांची संगीत शिक्षणाची तीव्र ओढ पाहून वडीलांनी भीमसेनांना जवळच असलेल्या कुंदगोळ गावातील रामभाऊ कुंदगोळकर यांच्याकडे घेऊन गेले आणि रामभाऊंनी भीमसेनांना त्यांचे शिष्यत्व दिले. रामभाऊ 'सवाई गंधर्व' म्हणून ख्यातनाम होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली, भीमसेनांनी हिंदुस्थानी शास्त्रीय गायनाचे धडे घेतले.

### ४) घेतलेले परिश्रम :

रामभाऊ हे किराणा घराण्याचे गायक होते. त्या काळातील परंपरेनुसार भीमसेनांनी गुरुगृही राहून कष्टपूर्वक गायनाचे धडे घेतले. रामभाऊ त्यांच्याकडून तोडी, पुरिया, मुलतानी वगैरे रागांवर रोज सुमारे आठ तास मेहनत करवून घेत. त्यांच्याकडून भीमसेनांनी इ.स. १९३६ ते इ.स. १९४१ पर्यंतच्या काळात संगीताचे ज्ञानामृत प्राप्त केले. त्यावेळी आणि त्यानंतरही ते रोज सोळा तासांचा रियाज करण्याचा स्वतःचा दंडक पाळीत. त्यानंतर गुरू रामभाऊंच्या आज्ञेनुसार भीमसेनांनी त्यांचा निरोप घेतला आणि ते पुणे येथे आले.

### ५) कारकीर्द :

भीमसेनांनी त्यांची पहिली संगीत मैफिल इ.स. १९४२ साली वयाच्या केवळ एकोणविसाव्या वर्षी पुण्यातील हिरा बागेत झाली. त्यापुढील वर्षीच त्यांच्या काही कानडी आणि हिंदी भाषेतील गीतांचे पहिल्यांदा ध्वनिमुद्रण झाले. सवाई गंधर्वांच्या षष्ट्यब्दी सोहळ्यानिमित्त त्यांनी गायन केले आणि महाराष्ट्रात त्यांच्या कीर्तीचा सुगंध पोहोचला.

### ६) गायकी :

भीमसेन जोशींना हिंदुस्थानी शास्त्रीय गायन पद्धतीचे ख्याल गायक म्हणत असले तरी त्यांनी १९४० च्या दशकात लखनौमध्ये एक वर्ष राहून तेथील ख्यातनाम गायकांकडून ठुमरी शिकून घेतली होती. ते ठुमरीही अतिशय छान गात. भीमसेन जोशींनी 'संतवाणी' या नावाने मराठी अभंग गायनाचे अक्षरशः हजारो कार्यक्रम केले. कवि वसंत बापट त्यांच्या अभंगवाणी कार्यक्रमात अनेकदा अतिशय सुरेख निरूपण करीत.

## ७) लोकप्रिय रचना :

'संतवाणी' आणि 'अभंगवाणी' हे संगीतकार राम फाटक आणि श्रीनिवास खळे ह्यांनी अनुक्रमे स्वरबद्ध केलेले आणि पंडीतजींनी स्वरसाज चढवलेले अल्बम खूप गाजले. त्यातील काही उल्लेखनीय रचना खालील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| –आता कोठे धावे मन | –आरंभी वंदीन, |
| –अयोध्येचा राजा | –इंद्रायणी काठी |
| –काया ही पंढरी, आत्मा हा विठ्ठल | –तीर्थ विठ्ठल, क्षेत्र विठ्ठल |
| –मन, रामरंगी रंगले | –माझे माहेर पंढरी |
| –याचसाठी केला होता अट्टाहास | –रूप पाहता लोचनी |
| –ज्ञानियांचा राजा, गुरु महाराव | |

इत्यादी रचना अजरामर झाल्या.

## ८) पुरस्कार व मानसन्मान :

भीमसेन जोशी यांनी केलेल्या अथक परिश्रमाचे द्योतक म्हणून त्यांना अनेक मानसन्मान मिळाले.

इ.स. १९७२ साली त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले.

इ.स. १९७६ साली संगीत नाटक अकादमी पुरस्कार मिळाला.

इ.स. १९८५ साली पद्मभूषण या पुरस्काराने सन्मानित केले.

जयपूर येथील गंधर्व महाविद्यालयाने त्यांना संगीताचार्य ही पदवी दिली.

पुण्याच्या टिळक विद्यापीठाने डी. लिट्. ही पदवी दिली.

इतर पुरस्कारांमध्ये पुण्यभूषण पुरस्कार,तानसेन पुरस्कार इत्यादींचा समावेश आहे.

२००८ साली त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित केले.

## ९) हवाई गंधर्व पदवी :

त्यांची लोकप्रियता आणि त्यामुळे संगीत मैफिलींसाठी करावी लागणारी त्यांची धावपळ वाढली. त्यांच्या त्या काळी वारंवार होणार्या विमान प्रवासांमुळे, त्यांना पु.ल.देशपांडे यांनी गमतीने 'हवाईगंधर्व' ही पदवी बहाल केली होती. कित्येक वेळा एकाच दिवसात दोन शहरांतील मैफली घेण्यासाठी ते दोनदा विमानप्रवास करीत.

### १०) सवाई गंधर्व महोत्सव :

भीमसेन जोशींनी त्यांचे गुरू सवाई गंधर्व यांच्या स्मरणार्थ १९५२ सालापासून पुणे येथे दरवर्षी होणारा सवाई गंधर्व संगीत महोत्सव सुरू केला.त्यांनी सुरू केलेला सवाई गंधर्व संगीत महोत्सव हा भारतातील एक मोठा संगीतोत्सव समजला जातो. पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्रात पंडित भीमसेन जोशी यांच्या नावाने अध्यासन स्थापण्यात आले आहे.

### ११) मृत्यु :

अशा या महान गायकाचे सोमवार दिनांक २४ जानेवारी २०११ रोजी सकाळी ८:०५ वाजता पुणे येथे वयाच्या ८८ व्या वर्षी वृद्धापकाळाने देहावसान झाले.


### १२) श्रद्धांजली :

त्यांनी केलेल्या संगीत सेवेमुळे भारतीय शास्त्रीय संगीतात पंडित भीमसेन जोशींचे स्थान अजरामर झाले आहे. महाराष्ट्र सरकार दरवर्षी भीमसेन जोशी यांच्या नावाचा 'भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवनगौरव पुरस्कार' देते. आतापर्यंत हा पुरस्कार किशोरी आमोणकर, पंडित जसराज, सतारवादक अरविंद पारीख यांना मिळाला आहे.

पुणे महानगरपालिका दरवर्षी भीमसेन जोशींच्या जन्मदिनी म्हणजे ४ फेब्रुवारीला त्यांच्या स्मरणार्थ, स्वरभास्कर पुरस्कार या नावाचा पुरस्कार देते. या पुरस्कारासोबतच तीन दिवसांचा संगीत महोत्सवही असतो. १,११,१११ रुपये रोख, मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

भीमसेन जोशी यांच्या गायकीचा आणि संगीतक्षेत्रातील त्यांच्या योगदानाचा वेध लेखिका डॉ. सुचेता बिडकर यांनी त्यांच्या 'स्वरसुरभीचा राजा' या पुस्तकात घेतला आहे.वसंत पोतदार यांनी 'भीमसेन' या नावाने ग्रंथ लिहून त्यांच्या जीवन कार्याचा उहापोह केला आहे.

भीमसेन जोशी यांच्या द्वितीय पत्नी वत्सला या गायिका होत्या. मुले राघवेंद्र आणि श्रीनिवास हे गायक आहेत. पं भीमसेन जोशी यांनी सुरू केलेला 'सवाई गंधर्व संगीत महोत्सव' पुढे आर्य संगीत प्रसारक मंडळ 'सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सव' या नावाने चालावीत आहेत.



# ७.

# स्वामी हरिदास

**१) प्रस्तावना :**

ज्याप्रमाणे संस्कृत साहित्यात कालिदास होऊन गेले. ज्याप्रमाणे हिंदी साहित्यात वाईट कालखंडात तुलसीदास माधवाप्रमाणे धावून गेले, त्याचप्रमाणे भारतीय संगीताच्या रक्षणार्थ स्वामी हरिदास जन्माला आले. त्यांनी आपल्या ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वाने भारतीय संगीतावर छाप पाडली. अशा थोर कलावंताच्या जीवन कार्याचा आढावा खालील मुद्द्यांच्या आधारे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

भारतीय संगीताचे पालक स्वामी हरिदास यांचा जन्म 'भक्त चरितामृत' नुसार सावंत १४८१ च्या भाद्रपद महिन्यात जन्माष्टमीला झाला. त्यांचे जन्मगाव उत्तर प्रदेशातील अलीगड जिल्ह्यातील राजपुर होते. त्यांच्या वडिलांचे नाव आशुधर स्वामी तर आईचे नाव गंगादेवी असे होते. संगीताची प्रतिभा घेऊन ते जन्माला आले होते. प्रथेप्रमाणे त्यांचा बालपणातच विवाह झाला. परंतु ते वैवाहिक जीवनात रमले नाहीत. त्यांची वृत्ती अध्यात्मिक होती. ते श्रीकृष्ण भक्तीत लीन होत होते.

**३) घर सोडले :**

वयाच्या २५ व्या वर्षातच त्यांनी संन्यास घेतला. ते वृंदावनात आले. येथे विधिवन विकुंज येथे एका छोट्याशा झोपडीत राहू लागले. एक गोधडी व एक मातीच्या भांडे एवढीच त्यांची संपत्ती होती. साधी राहणी व उच्च विचारसरणी या म्हणीनुसार ते कमीत कमी गोष्टीत अधिक अधिक आनंद मानत होते. ते ईश्वरभक्ती व संगीत साधनेत आपला अधिक समय व्यतीत करू लागले. त्यांचे आपली संगीत साधना कृष्ण भक्तीसाठी वापरली. त्यांनी अनेक ध्रुपदे रचली. ती सर्व भक्तीरसात डुंबलेली आहेत. त्यामुळे काही ग्रंथात स्वामीजींचा उल्लेख 'नाद ब्रह्मयोगी' असा केलेला आहे.

**४) अकबर व हरिदास यांची भेट :**

अकबर बादशहाने तानसेनकडून स्वामी हरिदासांबद्दल बरेच ऐकले

होते. त्यामुळे अकबर स्वामीजींचे गाणे ऐकण्यासाठी उतावीळ झाला होता. तो तानसेनला घेऊन वृंदावनात आला. त्यावेळी एका झाडाखाली बसून अकबर स्वामी हरिदासांचे गाणे ऐकण्यासाठी एका झाडाआड बसून राहिला. स्वामीजींसमोर तानसेन बसला. तो मुद्दाम अशुद्ध ध्रुपदे गाऊ लागला. तेव्हा स्वामीजींनी ते सहन झाले नाही. ते त्याच्यावर रागावले व ते अशुद्ध धृपदे शास्त्रशुद्ध पद्धतीने गाऊन दाखवले. झाडाआड बसलेला अकबर आश्चर्यमुग्ध होऊन स्वामीजींचे गायन ऐकू लागला. ही गोष्ट जेव्हा स्वामीजींच्या लक्षात आली तेव्हा ते म्हणाले, ''तानसेना तू माझे गाणे अकबराला ऐकवले आहेत हे तू योग्य केले नाहीस. आता अकबर आलाच आहे तर त्याला मध्ये बोलव.'' आणि अशाप्रकारे स्वामी हरिदास यांनी अकबराला गाणे ऐकविले. यांचे गाणे ऐकून अकबर मंत्रमुग्ध झाला. देहभान हरपून तो बादशहा आहे हे सुद्धा विसरला. नकळत तो स्वामीजींपुढे झुकला व त्याने त्यांचे चरण स्पर्श केले.

**५) शिष्य संप्रदाय :**

स्वामीजींनी अनेकांना संगीताचे शिक्षण दिले परंतु 'नाम विनोद' या ग्रंथात त्यांच्या प्रमुख शिष्यांची नावे दिलेली आहेत. यामध्ये तानसेन, बैजू बावरा, गोपाल लाल, रामदास, दिवाकर पंडित भावराव गोपाल लाल रामदास दिवाकर पंडित व राजा सैरसेन इत्यादींचा नामोल्लेख केलेला आहे.

**६) अष्टपैलू व्यक्तिमत्त्व :**

स्वामीजी धृपद तर गात होतेच त्याचबरोबर ते उत्तम विनावादक होते. त्यांनी वीना या वाद्यात अमुलाग्र बदल केले. काही विद्वानांच्या मते स्वामीजी नृत्यात सुद्धा प्रवीण होते. याचबरोबर ते उत्तम कवी सुद्धा होते. त्यांनी विविध भक्ती रचना तयार केल्या. रागानुरूप रचनांची भर टाकून त्यांनी भारतीय संगीताला समृद्ध केले. ब्रज भाषेत जी रासलीला दिसते ती स्वामीजींचेच देण आहे. जी आजपर्यंत भावनिक,धार्मिक व कलात्मक रूप देत आहे.

**७) मृत्य :**

असे थोर कलावंत वयाच्या ६५ व्या वर्षी इसवी सन १६६४ मध्ये स्वर्गवासी झाले. आजही भाद्रपद शुक्ल अष्टमी दिवशी वृंदावनात स्वामी हरिदास यांची जयंती निमित्त स्वामी हरिदास संगीत महोत्सवाचे आयोजन केले जाते. अशा थोर कलावंतास विनम्र अभिवादन.



# ८.

# तानसेन

**१) प्रस्तावना :**

भारतीय संगीताला पडलेले एक सोनेरी स्वप्न म्हणजेच तानसेन होय. भारतीय संगीतात तळपणारे जे काही तेजस्वी तारे होऊन गेले त्यात त्यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. 'आईने अकबरी' या ग्रंथात अबुल फजल असे म्हणतो की, ''गेल्या १००० वर्षात तानसेन सारखा गायक झाला नाही.'' खरोखरच त्याचा मृत्यू होऊन ५०० वर्षे होत आली तरीसुद्धा त्याची लोकप्रियता सूर्यासारखी अमर आहे. अशा या महान कलावंताच्या जीवन कार्याचा आढावा खालील मुद्द्यांच्या आधारे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

तानसेन याचे खरे नाव तन्ना मिश्र असे होते. मकरंद पांडे हे त्यांच्या वडिलांचे नाव होते. काही लोक पांडे यांना मिश्र असेही म्हणायचे. इसवी सन १५०० मध्ये हे पांडे कुटुंब ग्वाल्हेर शहराजवळ बेहर या गावात राहत होते. मकरंद पांडे पूजा पाठासोबतच संगीतात निष्णात होते. त्यांना मूलबाळ होत नव्हते. मुलाबाळाच्या चिंतेत असलेल्या पांडे यांना मोहम्मद गौस या नावाचे एक फकीर भेटले. सिद्धी प्राप्त फकीराच्या आशीर्वादाने पांडे यांना १५३२ मध्ये एक पुत्ररत्न जन्माला आले. ते पुत्ररत्न म्हणजेच तानसेन होय. तानसेन याला तन्नू, तन्ना, त्रिलोचन, तनसुख व रामतनु या नावाने संबोधित केले जायचे.

खूप दिवसांनी घरात बालक जन्माला आल्यामुळे आई वडील त्याचे खुप कोडकौतुक करायचे. बालपणी तन्ना खुप चुणचणीत व खोडकर होता. विविध पशु-पक्षांचे आवाज काढण्याची प्रतिभा त्यांना लाभलेली होती. खोडकर असल्यामुळे वाघ सिंहाचे आवाज काढून तो सर्वांना घाबरवायचा.

**३) गुरु दर्शन :**

एकदा स्वामी हरिदास आपल्या शिष्यांसोबत जंगलातून प्रवास करीत होते. अशातच त्या चिमुकल्या तन्नाने वाघाची डरकाळी फोडली. सर्वजण घाबरून गेले. पाहतो तो काय? तेथे वाघ नव्हता तर हा छोटा तन्ना होता.

स्वामी हरिदास आश्चर्यमुग्ध झाले. त्याचीही प्रतिभा पाहून स्वामींनी त्याच्या वडिलांची भेट घेतली व तन्नाला संगीत शिकवावे अशी विनंती केली. वडिलांनीही ती विनंती मान्य केली. अशाप्रकारे स्वामी हरिदास त्याला वृंदावनात घेऊन गेले. तेथे चिमुकल्या तन्नाची संगीताचे आराधना सुरू झाली.

**४) तानसेन असे नामकरण :**

वृंदावनात राहून जवळपास दहा वर्षे गुरु सेवा करून व अथक परिश्रम करून तन्नाने गायकी आत्मसात केली. तन्ना आता प्रतिथयश गायक बनला होता. त्यामुळे त्याचे नाव तन्ना ऐवजी तानसेन असे पडले. गुरु आशीर्वाद घेऊन तन्ना आपल्या घरी परतला. घरी आल्यानंतर वडिलांनी ज्या फकीरांच्या आशीर्वादाने तन्ना जन्माला आला होता त्या फकिराच्या म्हणजेच महंमद गौस याचा दर्शनाला घेऊन गेले. त्या फकीरा समोर तानसेनचे गायन झाले. तानसेनचे गाणे ऐकून फकीर प्रसन्न झाला व त्याने आपल्या मुखातले पान तन्नाच्या तोंडात घातले. प्रसाद म्हणून मिळालेले पान तन्नाने खाल्ल्यामुळे तानसेनला अनिच्छेन मुस्लिम धर्म स्वीकारावा लागला. तेव्हापासून तानसेनचे मिया तानसेन असे नामकरण झाले.

**५) तानसेनचा विवाह :**

काही दिवसांनी तानसेनच्या वडिलांचे निधन झाले. असे म्हटले जाते की मृत्यूपूर्वी तानसेनच्या वडिलांनी तानसेनला असे सांगितले होते की, ''ग्वाल्हेरच्या गौस मोहम्मदचे आपण फार ऋणी आहोत. त्यांच्या आज्ञेबाहेर तू जाऊ नकोस.'' वडिलांच्या उपदेशामुळे तानसेन फकीर मोहम्मद गौस यांच्याकडे आले. तानसेन फकीर गौस यांच्याकडे आले. ते फकीराकडे राहू लागले. काही दिवसांनी तानसेन त्या फकीराचे उत्तराधिकारी झाले.

काही दिवसांनी तानसेन याची ग्वाल्हेर नरेश राजा मानसिंह तोमर यांची विधवा पत्नी मृगनयनी यांचा परिचय झाला. ती उत्तम गायिका होती. त्यांचे गायन ऐकून ती प्रभावित झाली. तेथे हुसेनी नावाची एक मृगनयनीची दासी होती. ती अत्यंत सुंदर तर होतीच परंतु ती उत्तम गात सुद्धा होती. मृगनयनीने या दोघांचा विवाह लावून दिला. त्यानंतर तानसेनला चार मुले झाली. सुरतसेन, शरद सेन, तरंगसेन व विलायत खान ही त्याची नावे तर सरस्वती ही एक त्याची मुलगी होती.

**६) अकबराच्या दरबारात :**

सर्वप्रथम तानसेन रिवा संस्थानाचा राजा राजाराम यांच्या दरबारात दरबारी गायक म्हणून रुजू झाले. हे महान रत्न राजारामने दिल्लीच्या दरबारात

अकबराकडे नजर केले. बादशहा तानसेनचे गायक ऐकून खुश झाला. अशा प्रकारचे तानसेन अकबराच्या नवरत्नांपैकी एक रत्न झाले.

**७) संगीतातील चमत्कार :**

यांच्या संदर्भात अनेक आख्यायिका आहेत. असे म्हटले जाते की तानसेनने राग दीपक गायल्यानंतर सर्व दिवे पेटत असत. राग मल्हार गायल्यानंतर पाऊस पडत असे. रोगी रोगमुक्ती होत असे. तो पशु पक्षांना मोहित करून टाकायचा. असे अनेक चमत्कार त्याने आपल्या गायनातून केल्यामुळे तानसेन याच्या गायनाचा जबरदस्त प्रभाव त्या काळात समाजावर पडला होता. तानसेनने अनेक रागांची निर्मिती केली. त्यामध्ये दरबारी कानडा,मिया की सारंग, मिया मल्हार इत्यादींचा नाम उल्लेख करता येईल

**८) समारोप :**

असा एक थोर कलावंत आपल्या गायकीचा ठसा उमटवून मृत्यू जवळ आला. त्याची इच्छा होती की आपण मृत्यू समय ग्वाल्हेर येथे असावे परंतु अकबराच्या प्रेमामुळे त्याला दिल्लीतच राहावे लागले. फेब्रुवारी १५८५ मध्ये ते पैगंबरवासी झाले. त्याचे इच्छेनुसार त्याचा मृतदेह ग्वाल्हेर येथे पोहोचविण्यात आला. फकीर मोहम्मद गौस यांच्या कबरी शेजारीच त्याची समाधी बांधण्यात आली.



# ९.

# गोपाल नायक

**१) प्रस्तावना :**

धृपद गायकी प्रचारात येण्यापूर्वी प्रबंध गायकी अस्तित्वात होती. प्रबंध गायकीचा प्रचार व प्रसार करण्यात ज्यांनी मोलाचे योगदान दिले किंबहुना अमीर खुसरो यांचे गुरु होण्याचा बहुमान ज्यांना मिळाला असे थोर कलावंत म्हणजेच गोपाल नायक होय. दुर्दैवाने गोपालनायकाच्या जीवनपटाची ऐतिहासिक सामग्री न मिळाल्यामुळे गोपाल नायक यांचा थोडक्यात परिचय खालील प्रमाणे देता येईल.

**२) अल्लाउद्दीन खिलजीचे आक्रमण :**

गोपाल नायक हे दक्षिणेत वास्तव्यास होते. ते देवगिरीचा राजा

रामदेव यांच्या दरबारात दरबारी गायक होते. अल्लाउद्दीन खिलजी याने इसवी सन १२६४ साली देवगिरी राज्यावर आक्रमण केले. त्यात देवगिरीच्या राजा रामदेव पराभूत झाले.

**३) खुसरोचा धूर्तपणा :**

गोपालनायक सरळ व शांत स्वभावाचे होते. एकदा खिलजीने गोपाल नायकांकडून गाणे ऐकण्याची इच्छा प्रदर्शित केली. गोपाल सहा दिवस खिलजीला गाणे ऐकवत राहिले. याच दरम्यान खिलजी बरोबर अमीर खुसरो हा सुद्धा भारतात आला होता. खिलजीच्या सिंहासनाखाली बसून अमीर खुसरो गोपाल नायक यांचे गाणे ऐकत राहिला. त्यानंतर अमीर खुसरो प्रत्यक्ष दरबारात उपस्थित झाला. गोपाल यांनी खुसरोशी स्पर्धा करण्यासाठी निमंत्रित केले. खुसरो स्पर्धेसाठी तयार झाला. गोपाल यांचे गायन सुरू झाले. गाणे उत्तम व दर्जेदार होत होते परंतु कावेबाज आणि धूर्त खुसरोने सरळ स्वभावाच्या गोपालनायकांना मध्येच थांबविले व म्हणाला, ''हा राग चुकीचा आहे.'' त्यावर गोपाल म्हणाले, ''माझा राग चुकीचा आहे तर आपण हा राग गाऊन दाखवा.'' त्याने फारशी राग तयार करून तो सादर केला. आणि बिचारे गोपाल यांनी आपला पराभव मान्य केला.

**४) गोपाल यांचे दिल्लीत आगमन :**

खुसरो चाणाक्ष होता. त्याने गोपाल नायक यांची प्रतिभा आणि बुद्धिमत्ता ओळखली होती. त्याने गोपाल यांना साधारणपणे इस १२६४ ते ६५ या काळात दिल्ली येथे आणले गेले. तेथे खुसरो याने गोपाल नायक यांच्याकडून गायन शिकून घेतले. दिल्लीत आल्यानंतर गोपाल नायक यांना गायक म्हणून सन्मान मिळाला.

**५) आख्यायिका :**

गोपाल यांच्याबद्दल एक आख्यायिका आहे की, गोपाल जेंव्हा दिल्लीच्या बाहेर जायचे तेव्हा ते बैलगाडीने प्रवास करायचे. त्यांनी आपल्या गाडीला जुंपलेल्या बैलांच्या गळ्यात राग समायानुसार रागांचे स्वर काढणाऱ्या घंटा बांधत असतात.

**६) प्रबंध गायकीचा प्रचार :**

इसवीसाच्या १२९४ ते ९५ या काळात ध्रुवापद या शब्दाचा उल्लेख दिसून येत नाही. या काळात प्रबंध गायकी अस्तित्वात होती. चतुर कल्लीनाथ राग कदंब गाण्यात निष्णात होते. राग कदंब हा तालयुक्त महाप्रबंध होता. त्यांनी ३२ राग व विविध अशा या प्रबंध गायकीचा प्रचार प्रसार केला.

**७) मृत्यू :**

गोपाल नायक त्यांचा आयुष्याचा पूर्वार्ध दक्षिणेत गेला तर उत्तरार्ध दिल्लीत गेला. असे हे दक्षिण भारतीय संगीतातील पंडित, एक उच्च कोटीचे गायक कलाकार दिल्ली येथे कालवश झाले.



# १०.

# अमीर खुसरो

**१) प्रस्तावना :**

भारतीय संगीताला ज्यांनी आधुनिक रूप दिले. ज्यांनी विविध रागाची निर्मिती केली. ज्यांनी विविध वाद्याचा अविष्कार केला. ज्यांचे ऋण भारतीय संगीत साधक विसरणार नाहीत असे थोर व्यक्तीमत्त्व म्हणजेच अमीर खुसरो होय. अशा या महान कलावंताच्या जीवन कार्याचा आढावा पुढीप्रमाणे पाहता येईल.

**२) जन्म व बालपण :**

अमीर खुसरो यांच्या जन्मसालाबद्दल मतभेद आहेत. असे असले तरी त्यांचा जन्म इसवी सन १२५३ या काळात उत्तर प्रदेशातील एटा जिल्ह्यात मोमीनपुर या गावी झाला. अमीर मोहम्मद सैफुद्दिन हे त्यांच्या वडिलांचे नाव. ते बालपण येथून पटियाला येथे येऊन स्थायिक झाले होते. अमीर खुसरो लहानपणी बुद्धिमान, चतुर व प्रज्ञावंत होते. वडिलांच्या निधनानंतर ते दिल्ली दरबारी घियासुद्दीन बल्कन यांच्या दरबारी सेवक म्हणून होते. काही दिवसांनी घियासुद्दिन यांची राजवट संपुष्टात आली व अलीउद्दीन खिलजी दिल्लीपती झाला. सहाजिकच अमीर खुसरो खिलजी यांचा नोकर झाला.

**३) देवगिरीवर आक्रमण :**

सन १२९४ मध्ये अलाउद्दीन खिलजीने दक्षिणेवर स्वारी केली. देवगिरीचा राजा राजाराम याचा पराभव झाला. त्यावेळी अमीर खुसरो खिलजीबरोबर आलेला होता. तेथे गोपाल नायक उत्तम गायक होता. अमीर खुसरो याने गोपाल यांच्याकडून संगीताच्या बऱ्याच गोष्टी शिकून घेतल्या. कालांतराने त्याला एक स्पर्धेत खुसरो याने छलकपटाने पराभूत केले. असे

असले तरी गोपाल नायक यांची प्रतिभा तो ओळखून होता. त्यामुळे गोपाल नायक यांना तो दिल्लीला घेऊन गेला.

**४) राग निर्मिती :**

अमीर खुसरो याने त्या काळातील लोकांची अभिरुची ओळखली. त्याने गोपालनायक यांच्याकडून दक्षिण नृत्य संगीत शिकून घेतले. त्याने दक्षिणेतील शुद्ध स्वर सप्तकाची योजना करून प्रचलित केली. त्यातून लोकांना आवडतील अशा रागाची रचना केली. त्याने पुरिया, सांजगिरी, पूर्वी, जिला इत्यादी रागाची निर्मिती केली. त्याचबरोबर त्याने त्रिताल झुमरा, पश्तो, आडाचौताल, सुलताल इत्यादी नवीन तालांची निर्मिती केली.

**५) गीत प्रकार व वाद्यांची निर्मिती :**

राग व ताल याबरोबर खुसरो याने काही गीत प्रकारांची निर्मिती केली. आधुनिक युगातील लोकप्रिय गीतकार छोटा ख्यालाची निर्मिती त्याने केली. त्याचबरोबर तराना व कव्वालीची निर्मिती सुद्धा अमीर खुसरो याने केली. त्याने दक्षिणेतील वीणा या वाद्याच्या चार तारा ऐवजी तीन तारा लावल्या व त्यातून सहतार हे वाद्य निर्माण केले. यातूनच पुढे सतार या वाद्याचा जन्म झाला. काही विद्वानांच्या मते तबल्याचा अविष्कार सुद्धा त्यानेच केला परंतु हे चुकीचे आहे कारण तबला हे वाद्य अमीर खुसरोच्या आधीपासून भारतात प्रचलित आहे. असे असले तरी तबल्याला आधुनिक स्वरूप देण्याचे श्रेय खुसरो यालाच जाते.

**६) खुसरो एक लेखक :**

अमीर खुसरो याने फारशी भाषेतून अनेक ग्रंथ लिहिलेले आहेत. त्याने जवळपास ९९ पुस्तके लिहिली आहेत. त्यापैकी २८ पुस्तके आजही उपलब्ध आहेत. फारशी व भारतीय संगीताचा मिलाफ घडवून त्याने काही नवीन रागाची निर्मिती केली. या रागाची माहिती या ग्रंथात नमूद केलेली आहे.

**७) मान सन्मान :**

दिल्लीचे सुलतान कैक बाद यांनी अमीर खुसरो यांना मलिकुश्शअरा (कवीश्वर) ही उपाधी दिली. जलालुद्दीन खिलजी यांनी मालिक - उन - नुरमा या उपाधीने सन्मानित केले तर अल्लाउद्दीन खिलजीने यांनी खुसराए-शाइरॉ ही उपाधी देवून गौरविण्यात आले.

**८) समारोप :**

ज्याने नवीन वाद्याचा अविष्कार करून भारतीय संगीत समृद्ध केले, ज्याने विविध गीत प्रकारांची बरसात करून भारतीयांना स्वरात चिंब भिजविले,

अशा थोर अवलिया सन १३२५ उस्ताद निजामुद्दीन यांच्या निधनानंतर दुःखी झाला. तेव्हापासून तो या संसारापासून अलिप्त राहू लागला. त्याच्या वयाच्या ७२ व्या वर्षी म्हणजेच १३२५ मध्ये त्याने जगाचा निरोप घेतला. दिल्लीतच त्याची कबर गुरूच्या कबरीच्या पायथ्याला बांधलेली आहे. अशा या थोर कलावंताचे ऋण भारतीय संगीतातील कलावंत कधीच विसरणार नाहीत.



# ११.

# मानसिंह तोमर

**१) प्रस्तावना :**

मानवाच्या विकासाबरोबरच संगीताचाही विकास होत गेला. असे म्हणतात की, आवश्यकता ही अविष्काराचे जननी आहे. त्यामुळे मानवाने विविध गीत प्रकार निर्माण केले. पूर्वी संगीताला राजाश्रय होता. राजे संगीताचे संवर्धक होते. परंतु १४८५ ते १५१८ या कालावधीत एक राजा होऊन गेला. त्याने संगीताचे संवर्धन तर केलेच परंतु त्याने धृपदासारख्या गीत प्रकाराचा अविष्कार करून संगीत जगतावर अनंत उपकार केले आहे. तो थोर राजा म्हणजे ग्वाल्हेर नरेश राजा मानसिंह तोमर होय. त्याच्या जीवन कार्याचा आढावा खालील मुद्द्याच्या आधारे घेता येईल.

**२) बहुगुणी राजा :**

ग्वाल्हेरच्या तोमर वंशाचा शासन काळ शंभर वर्षांपेक्षा अधिक राहिलेला आहे. ते लोक अत्यंत कलाप्रेमी व कलेचे पालनोषणकर्ते होते. तोमर घराण्यात सम्राट झालेल्या सर्व राजांना इतिहासकारांनी एकमताने सांगितले आहे की तोमर घराण्याचे सर्व राजे अत्यंत विद्वान आणि धार्मिक, शूर, पराक्रमी आणि उदार, त्याग, विद्वत्ता आणि औदार्य, युद्धकौशल्य यात प्रसिद्ध होते. यात ग्वाल्हेरचे महाराजा मानसिंग तोमर यांचे नाव प्रथम येते. ते एक अत्यंत उच्च दर्जाचे लेखक, धर्मवादी, संस्कृतीचे रक्षक आणि सनातन धर्माचे सर्वोच्च सेवक मानले जातात.

### ३) संगीत कार्य :


महाराजांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे संगीत, नृत्य, साहित्य आणि परमेश्वराशी असलेली आसक्ती आणि प्रेममुर्ती अशी त्यांची ख्याती होती. याशिवाय महाराजा मानसिंग तोमर यांच्या दरबारात प्रसिद्ध लेखक आणि संगीतकार बक्षू, महमूद लोहंग, नायक, पांडे, देवचंद्र, रतनरंग, माणिक हे कवी होते. थेघनाथ, सूरदास (बालपणीचे), गोविंददास, नाभदास, हरिदास, कर्ण, नायक गोपाळ, भगवंत, रामदास इ. त्यांच्या दरबारात होते. महाराजा मानसिंग स्वतः तोमर यांनी सावंती, लीलावती, शाधव, मानशाही, कल्याण इत्यादी रागांसाठी गीते लिहिली आहेत. ''रास'' नावाच्या नृत्यनाट्याचा शोध स्वतः महाराजा मानसिंग तोमर यांनी लावला होता. जो आज रास म्हणून प्रसिद्ध आहे. महाराजा मानसिंग तोमर यांनी ग्वाल्हेरजवळ बाराई येथे एक विशाल रास मंडळ बांधले, हरिराम, हरिवंश आणि हरिदास यांनी रास नृत्यशैली ब्रिज प्रदेशात नेली आणि त्याचा कळस गाठला. राजा मानसिंह तोमर यांनी धृपद या गायकीचा आविष्कार केला. त्याने संगीत परंपरा तर पुढे चालवली त्याचबरोबर भारतीय संगीत जनमानसात रुजविण्याचे कार्य केले.

### ४) मान कुतुहल ग्रंथाची निर्मिती :

एक राजा असतानाही केवळ संगीताच्या जिज्ञासा आणि कुतुलापोटी मानसिंह याने संगीत शास्त्रावर प्रकाश टाकला आहे. त्याचबरोबर त्याने काही स्वर लिपी सुद्धा दिलेल्या आहेत. 'मानकुतूहल' या ग्रंथाची रचना केली. त्याने त्यात अनेक पदे दिलेली आहेत.यावरून राजा मानसिंहाच्या साहित्यिक ज्ञानाचा बोध होतो. इसवीसन १६७३ मध्ये फकिरुल्ला याने या ग्रंथाचा फारशी भाषेत अनुवाद केला आहे. या ग्रंथाला 'संगीत दर्पण' असे नाव दिले. दुर्दैवाने मानकुतूहल हा ग्रंथ आज अस्तित्वात नाही.

### ५) समारोप :

अशा या महान राजा व कलावंताचा मृत्यू १५१९ मध्ये झाला. फकिरुल्ला याने मानसिंह तोमर याचे खुप कौतुक केलेले आहे. तो म्हणतो की, ''ही ईश्वराची कृपा आहे की मानसिंह तोमर सारखा राजा जन्माला आला. ज्याने धृपद या गायकीचा अविष्कार केला. भविष्यात अशा थोर प्रतिभेचा जन्म होणे अशक्य आहे.'' अशा या थोर राजास विनम्र अभिवादन.



# १२.

# जयदेव

**१) प्रस्तावना :**

संगीत... स्वर्गीय सुखाची अनुभूती करून देणारी एक कला.! ती हजारो गायक कलावंतांनी, गीतकारांनी, शास्त्रकारांनी आपल्या रक्त घामाचे जतन करून ठेवली. संगीतात ज्याप्रमाणे गायक, वादक व नर्तक यांना महत्त्व महत्त्वाचे स्थान आहे तशाच पद्धतीने कवीचे सुद्धा अनन्यसाधारण महत्त्व आहे. ज्यांनी 'गीत गोविंद' हा ग्रंथ लिहिला, संगीत विश्वात एक भरीव कामगिरी केली असे थोर गायक कवी म्हणजेच जयदेव गोस्वामी. यांच्या जीवन कार्याला कार्याचा आढावा खालील मुद्द्याच्या आधारे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

जयदेव यांचा जन्म बंगालमधील वीरभूमी जिल्ह्यातील केंडुला या गावी बाराव्या शतकात झाला. वडिलांचे नाव भोजदेव तमादेवी असे होते. बालपणातच त्यांचे मातृ-पितृछत्र हरवले. आई-वडिलांच्या मृत्यूमुळे त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. त्यामुळे ते दुःखी होऊन जगन्नाथ पुरी येथे आले. तेथे पुरुषोत्तम धाम येथे राहू लागले त्यानंतर विविध धार्मिक स्थळांना त्यांनी भेटी दिल्या काही दिवस त्यांनी गजभूमितीही वास्तव्य केले.

**३) गीत गोविंद ग्रंथाची निर्मिती :**

काही दिवसांनी त्यांचा पद्मावती यांच्यासोबत त्यांचा विवाह झाला. पत्नीसोबत त्यांनी पुन्हा भ्रमण केले. याच काळात त्यांनी गीतगोविंद हा ग्रंथ लिहिला. जयदेव हे कवी तर होतेच त्याचबरोबर ते उत्तम गायक आणि नृत्याचे जाणकार होते. त्यामुळे त्यांनी गीतगोविंद या ग्रंथात ज्या अष्टपदीची रचना केली त्यात राग व तालाची माहिती सापडते. या ग्रंथात भगवान श्रीकृष्ण वृंदावन मध्ये जे विहार करत होते त्याचे वर्णन या काव्यात केले आहे. या काव्यात १२ सर्ग, २४ प्रबंध व २४ अष्टपद्या समाविष्ट आहेत. त्याच्या या कविता आजही विष्णू मंदिरात राग व तालबद्ध करून गायल्या जातात. दक्षिणेतील मंदिरात त्यांच्या अष्टपद्या साभिनय नृत्य करून पेश केल्या जातात. स्वर, ताल व लय बरोबरच भाव दर्शवून त्यांचे सादरीकरण केले

जाते.

**४) गीत गोविंद ग्रंथाचे वैशिष्टे :**

गीत गोविंद हा ग्रंथ त्यांनी संस्कृत भाषेत लिहिला. परंतु त्यांच्या धृपदावरून असे दिसून येते की त्यांनी संगीतातील प्रबंध हे हिंदीत भाषेत सुद्धा झालेले आहेत. यातील छंद, पदविण्यास व छंद वैचित्र्यामुळे तसेच सौंदर्य व स्वर मधूर्यामुळे या ग्रंथाचे भारतातील विविध भाषांत भाषांतर झाले आहे. तसेच इंग्रजी, जर्मन व लॅटिन इत्यादी भाषेत सुद्धा त्यांचे भाषांतर झालेले आहे. स्वर व तालांनी नटलेला हा ग्रंथ सर्व अर्थाने एक आदर्श ग्रंथ आहे.

**५) राजाश्रय :**

या महान कलाकृतीमुळे जयदेव यांना राजदरबारात मानाचे स्थान मिळाले. सेना वंशाचे शेवटचे राजा बंगालचे लक्ष्मण सेन (१११६) यांच्या दरबारात पाच महान कवी होते. त्या पैकी कवी जयदेव हे सर्वश्रेष्ठ कवी होते.

**६) समारोप :**

ऐन तारुण्यात त्यांच्या पत्नीचे दुःखद निधन झाले. त्यामुळे पुन्हा ते निराशेच्या गर्तेत अडकले. त्यामुळे त्यांनी राजवैभव सोडून देऊन संन्यास घेतला पत्करला. पुढे ते वैष्णव संप्रदायाचे महात्मा यशोदा नंदन यांचे शिष्य झाले. राजवाडा सोडून आपल्या गावी परत आले. साधू वृत्तीत राहून ते श्रीकृष्णाची भक्ती करू लागले. आपल्या जन्मगावी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. आजही मकर संक्रांतिदिवशी त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी संगीत संमेलनाचे आयोजन करण्यात येते.



# १३.

# त्यागराज

**१) प्रस्तावना :**

ज्याच्या नावातच त्याग आहे, ज्यांनी आपल्या सर्वस्वाचा होम करत संगीत जगतासाठी मोलाचे योगदान दिले, ज्यांना दक्षिणेतील वाल्मिकी ऋषी म्हटल्यास वावगे ठरणार नाही, असे थोर संगीतकार व कवी म्हणून ज्यांचा नावलौकिक आहे ते थोर कलावंत म्हणजे त्यागराज होय. त्यांच्या जीवन कार्याचा आढावा पुढील मुद्द्यांच्या आधारे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

त्यागराज यांचा जन्म तंजावूर जिल्हाच्या तिरुवारुर (श्रीनगर) येथे इसवी सन ४ मे १७६७ मध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव रामब्रह्म तर आईचे नाव सितम्मादेवी असे होते. लहानपणापासूनच त्यांना कविता करण्याची प्रतिभा लाभलेली होती. लहानपणापासून त्यांच्यावर संगीताचे संस्कार झाले.

**३) गुरू व शिक्षण :**

त्यागराजाने संगीत शिक्षण एस. वेंकटरामन यांच्याकडून प्राप्त केले. जे तंजावरच्या दरबारातील एक प्रसिद्ध संगीतकार होते. त्यागराज यांनी संगीताचे ज्ञान तर घेतलेच, पण ते श्रध्देने व भक्तीभावाने गायचे. भगवान राम हे त्यांचे आराध्य दैवत होते. त्यामुळे त्यांनी रामाच्या स्तुतीसाठी शेकडो भक्ती रचना (कृती) केल्या. राग देसिका तोडीमध्ये त्यांनी वयाच्या आठव्या वर्षी 'नमो नमो राघव अनिशम्' ही रचना संगीतबद्ध केली. जेंव्हा ते रामाच्या भक्तीत तल्लीन होत, तेंव्हा ते अनेक भक्ती रचना तयार करायचे. म्हणूनच जेव्हा तंजावरच्या राजाने त्यांना दरबारात आमंत्रित केले, तेव्हा त्यांनी त्यांच्या आमंत्रणाचा स्वीकार केला नाही. त्याच प्रसंगावरून त्यांनी 'निधी चालमा सुखमा' (संपत्ती मनुष्याला सुख देऊ शकते का?) ही रचना तयार केली. तंजावरच्या कावेरी नदीच्या काठावर बसून ते संगीता आराधना करायचे. रामाप्रती भक्तीभाव प्रकट करण्यासाठी संगीत हेच माध्यम मानत होते. त्यामुळे त्यांच्या सर्वच रचना भक्ती पूर्ण झाल्या.

**४) सांगीतिक कार्य :**

उत्तर हिंदुस्थानात महर्षी वाल्मिकींनी रामायण लिहिले. त्याचप्रमाणे त्यागराज यांनी वाल्मिकी प्रमाणे २४००० श्लोक युक्त कीर्तनाच्या रचना केल्या. त्यामुळे त्यांना दक्षिणेतील वाल्मिकी असे म्हणतात. त्यांनी असंख्य रचना केल्या. यामध्ये ५०० पदावलीयुक्त, त्यागराज हृदय, दिव्य नाग संकीर्तन, उत्सव समुदाय संकीर्तन इत्यादी ग्रंथांचा उल्लेख करता येईल. तसेच तेलगू भाषेमध्ये त्यांनी प्रल्हाद भक्तिविजयम्? व नौका चरितम्? ही दोन नाटके लिहिली. या रचनांमध्ये त्यांनी ५०० रागांचा प्रयोग केला आहे.

**५) रचानांचे वैशिष्ट्ये :**

त्यागराज यांनी आपल्या कृतींच्या रचना आदी तालात स्वरबद्ध केल्या आहेत. काही रचना मिश्र चापू व रूपक अशा अन्य तालात स्वरबद्ध केले आहेत. त्यांच्या पूर्वी प्रत्येक रचनाकार समेपासून रचनांची सुरुवात करायचे परंतु त्यागराज हे पहिले कलावंत होते की ज्यांनी अनागत समेपासून

रचनांची सुरुवात केली. ही त्यांच्या कृतीची खासियत मानली जाते. त्यामुळे अनेक शिष्य त्यांच्या जवळ आले आणि त्यांच्या कृती शिकून त्याचा प्रचार आणि प्रसार केला. त्यांनी ७२ थाटामध्ये या सर्व कलाकृती बनवल्या. याचबरोबर त्यांच्या काही रचना सामूहिक पद्धतीने गायले जात होत्या. ज्यात नऊ किंवा पाच कलाकार एकत्र येऊन गात होते. त्यांचे गायन हे साक्षात्कारी होते. त्यामुळे त्यांच्या गायनाचा प्रभाव जनमानसावर तर पडतच होता परंतु प्रकृती, पशुपक्षी यांच्यावर सुद्धा रसभावात्मक प्रभाव पडत होता. अशा प्रकारची दैवी सिद्धी त्यांना प्राप्त झाली होती. त्या घरात जेव्हा आपल्या शिष्यांना नवीन रचना शिकवायचे तेव्हा शिष्य त्या रचना तात्काळ आत्मसात करायचे तसेच ते स्वरबद्ध करून हे ठेवायचे त्यामुळे आजही त्यांच्या सर्व रचना मूळ स्वरूपात आपल्याला पहावयास मिळतात.

**६) समारोप :**

त्यागराज यांच्या या अथक परिश्रमाने तयार केलेल्या ग्रंथामुळे त्यांना उत्तर भारतातील सूरदास, कबीर व तुलसीदास यांच्या समान मानले जाते. असा हा थोर साहित्यिक संगीत सेवक कलावंत इसवी सन ६ जानेवारी १८४७ मध्ये स्वर्गवासी झाला. त्यांच्या शिष्यांनी तिरूवायूर येथे त्यांच्या स्मृती कायम राहावे यासाठी एक स्मारक बांधले आहे. जिथे प्रत्येक वर्षी त्यागराज आराधना समारोहाचे आयोजन करण्यात येते. ज्यात अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कलावंत सहभागी होऊन गायन सेवा करतात व त्यागराज यांना श्रद्धांजली अर्पित करतात. या थोर कलावंतास कोटी कोटी प्रणाम.



# १४.

## पुरंदरदास

**१) प्रस्तावना :**

भारतीय संगीतात दोन प्रकार आहेत. १ उत्तर हिंदुस्तानी संगीत, २ कर्नाटकी संगीत. कर्नाटकी संगीताला दक्षिण भारतीय संगीत असे म्हणतात. अशा दक्षिण भारतीय संगीताला ज्यांनी शुद्ध शास्त्रीय स्वरूप देण्याचे कार्य केले, ते थोर कलावंत म्हणजे पुरंदरदास होय. त्यांचें जन्मनाव श्रीनिवास

नायक असे होते. ते संत, संगीतकार, गायक, कर्नाटक संगीताच्या आद्य प्रवर्तकांपैकी एक होते. त्यांच्या संगीत कार्याबद्दल खालील मुद्द्यांच्या आधारे माहिती घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

परमभक्त पुरंदर यांचा जन्म दक्षिण भारतातील बिलारी जिल्ह्यातील क्षेमपुर वर्तमान कर्नाटकातील शिमोगा जिल्हात १४८४ साली झाला. त्यांच्या आईचे नाव लीलावती तर वडिलांचे नाव वरदप्पा नायक असे होते. श्रीनिवास नायक हे महाराष्ट्रातील पुरंदरगड या छोट्या शहरात राहत होते. जे त्या काळात विजय साम्राज्यामध्ये होते. त्यांचे वडील सोने, चांदी व हिऱ्याची व्यापारी होते. लहानपणी ते आपल्या वडिलांचा व्यवसाय सांभाळू लागले. श्रीनिवास हे स्वभावाने अत्यंत कंजूस होते. पैसे आणि संपत्तीच्या शिवाय दुसरी कोणतीही गोष्ट ते करत नसे. खूप श्रीमंत असल्याकारणामुळे त्यांना नवकोट नारायण असे म्हटले जायचे. परंतु नंतरच्या काळात एक अशी घटना घडली की ते 'नवकोट नारायण' ऐवजी 'नारायण भक्त' बनले.

**३) भगवान विष्णूचा साक्षात्कार :**

श्रीनिवास नायक हा पैशांचा लालची झाला होता. त्यामुळे भगवान विष्णूने त्याची परीक्षा घ्यावी यासाठी एका ब्राह्मणाचे रूप घेतले व तो पैसे मागण्यासाठी त्याच्या दारात आला. परंतु श्रीनिवास याने त्याला हाकलून दिले. असे असले तरी त्याची पत्नी मात्र अत्यंत दानशूर व धार्मिक स्वभावाची होती. तिने आपल्या नाकातली नथनी काढून त्या ब्राह्मणाला दिली. त्या ब्राह्मणाने श्रीनिवास याच्या जवळ जाऊन ती नथनी दाखवली. त्याच वेळेस श्रीनिवास नाराज झाला व त्याच्या पत्नीला रागावू लागला. पतीच्या रागामुळे पत्नीने विष प्राशन करण्याचा प्रयत्न केला. त्याच वेळी ब्राह्मणाचे रूप घेऊन आलेल्या भगवान विष्णूने चमत्कार केला आणि श्रीनिवासच्या हातात असलेली ती नथनी त्याच्या पत्नीच्या हातात आणून दिली आणि तिला वाचविले. या चमत्कारामुळे ब्राह्मण दुसरे तिसरे कोणी नसून ते विष्णूच आहेत हे त्याच्या लक्षात आले. प्रत्यक्ष भगवान दारात आल्यानंतर सुद्धा मी त्याला ओळखू शकलो नाही. त्यांना अपमानित करून मी बाहेर काढले. संपत्तीच्या मोहापुढे मी ईश्वराचा अनादर केला. यासाठी ते दुःखी झाले. त्यांना पश्चाताप झाला. त्यामुळे त्याने आपल्या जवळ असलेली सर्व संपत्ती दान करून टाकली आणि

ते हरिभक्त झाले. ज्यांच्या हातामध्ये सोने चांदी होते, तिथे त्यांच्या हातात तंबोरा आला. ज्यांच्या गळ्यामध्ये सोन्याच्या माळा होत्या तिथे तुळशीमाळा परिधान केल्या आणि ओठात केवळ हरिनामाचा जप सुरु झाला. अशाप्रकारे श्रीनिवास नायक याचा पुरंदर दास कधी झाला हे त्यांनाही कळले नाही.

**४) भक्ती मार्गाचा स्वीकार :**

अशाप्रकारे त्यांनी घराचा त्याग केला. ऐहिक सुखाच्या कोषातून ते बाहेर पडले आणि देशभ्रमण करण्यास प्रारंभ केला. सुख संपत्ती सोडून ईश्वराच्या चरणी लीन होणे व त्यांचे गुणगान करणे यातच मानव जन्माची सार्थकता आहे म्हणून ते सर्वांना सांगू लागले. तशा प्रकारच्या आशयाची गीते ते लिहू लागले. अशाप्रकारे त्यांनी व्यास तीर्थ यांच्याकडून कर्नाटक संगीताचे धडे घेण्यास सुरुवात केली.

**५) सांगितिक कार्य :**

हे कन्नड संत व कर्नाटक संगीतातील संगीतकार, रचनाकार होते. असे म्हंटले जाते की, त्यांनी जवळपास चार लाख पंच्याहत्तर हजार रचना केल्या. त्यातील केवळ एक हजार रचना आज प्रचलित आहेत. कर्नाटकातील हरिदासांमध्ये सर्वश्रेष्ठ हरिदास म्हणून त्यांची गणना केली जाते त्यांनी सर्व रचना 'पुरंदर विठ्ठला' या नावाने केल्या आहेत.

त्यांनी रचलेल्या कर्नाटक संगीतातल्या कृतींपैकी बऱ्याचशा कृती कन्नड भाषेत असून, काही संस्कृत भाषेत आहेत. पुरंदर दास यांना कर्नाटक संगीताला लाभलेले अशुद्ध वळण काढून शुद्ध व शास्त्रीय रूप देण्याचे कार्य केले. पुरंदर दास हे पहिले संगीत तज्ञ होते की ज्यांनी कर्नाटक संगीताच्या शिक्षण कसे द्यावे यासाठी एक शास्त्रीय पद्धती तयार केली. त्यामुळे त्यांना कर्नाटकी संगीताचे पितामह म्हटले जाते. त्यांनी असंख्य भजन व कीर्तनाच्या रचना केल्या. त्यांनी संगीत शिक्षण व साधना याचे सुंदर व प्रमाणबद्ध नियम विधी सांगितले आहेत. त्यांनी स्वर व अलंकाराचा क्रम निश्चित केला. त्यांनी केलेल्या माया मालव गौल व मल्हारी रागाच्या रचना आजही कर्नाटक संगीताच्या आधारशीला बनलेल्या आहेत. रागाबरोबरच सप्तसुलादी ताल रचनेचे श्रेय सुद्धा पुरंदर दास यांना जाते. असे हे महान रचनाकार इसवी सन १५६४ मध्ये कालवश झाले.



# १५.

## बैजू बावरा

**१) प्रस्तावना :**

संगीत जगतात जे थोर कलावंत होऊन गेले त्यामध्ये बैजू बावरा यांचे नाव अग्रक्रमाने येते. परंतु बैजू बावरा यांच्याबद्दलची इतिहासात माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. बैजू, बैजनाथ, बैजू बावरा अशा विविध नावांचा उल्लेख अनेक ग्रंथात दिसून येतो. 'राग कल्पदृम' या ग्रंथात बैजू बावरा यांच्या नावाने अनेक गीत प्रकार दिसून येतात. असे असले तरी या महान कलावंताचे कार्य निश्चितच दीपस्तंभाप्रमाणे आहे. त्यांच्या जीवन कार्याचा आढावा पुढील मुद्यांच्या आधारे आपण पाहुयात.

**२) आख्यायिका :**

बैजू बावरा यांच्या जीवनपटलाबद्दल जरी माहिती उपलब्ध नसली तरी काही अख्यायिका सांगितल्या जातात. असे म्हटले जाते की बैजू बावरा हा ग्वाल्हेर नरेश राजा मानसिंह तोमर यांच्या समकालीन आहे व त्यांच्या दरबारात राणी मृगनयनी हिला तो संगीताचे धडे द्यायचा. तसेच बैजूने स्वामी हरिदास यांच्याकडून संगीताचे धडे घेतले होते किंबहुना तानसेन याला पराजित केले होते. असे असले तरीही इतिहासात यांचा उल्लेख आढळत नाही. केवळ 'बैजू बावरा' या चित्रपटातच असा प्रसंग दाखविला आहे. चित्रपटातील मनोरंजनासाठी अशाप्रकारे काल्पनिक घटना जोडल्या जातात. तिसऱ्या आख्यायिकेत असे म्हटले आहे की, स्वामी हरिदास यांच्या शिष्यात बैजू बावरा, गोपाल नायक आणि तानसेन हे प्रमुख शिष्य होते. 'नाद विनोद' या ग्रंथात स्वामी हरिदास यांचे शिष्य असल्याचा उल्लेख सापडतो.

**३) जन्म बालपण :**

बैजू बावरा यांचा जन्म गुजरात प्रांतातील चंपानेर या छोट्याशा गावात एका ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे खरे नाव वैजनाथ मिश्रा असे होते. त्यांच्या जन्मसालाबद्दल मतभिन्नता आहे. काही ग्रंथात १४५५ ते १४६० या कालावधीत त्यांचा जन्म झाला तर काही ग्रंथात या काळात अकबर बादशहाच्या काळात दिल्लीत राहत होता असे म्हटले आहे. बैजूची आई धार्मिक स्वभावाची होती. पतीच्या निधनानंतर तिने बैजूला वृंदावनात आणले.

वृंदावनात स्वामी हरिदास यांची भेट झाली. बैजूची आकलन क्षमता व प्रतिभा पाहून स्वामी हरिदासांनी बैजूला संगीत शिकविण्यास प्रारंभ केला. स्वामीजींकडून रात्रंदिवस परिश्रम करून संगीताचे अध्ययन केले व त्यानंतर बैजूने ग्वाल्हेरला प्रस्थान केले.

**४) राग व तालाची निर्मिती :**

बैजू बावरा यांनी अनेक रागांची निर्मिती केली. त्यात गुजरी तोडी, मृगरंजनी तोडी, मंगल गुजरी इत्यादी रागांचा उल्लेख करता येईल. धमार तालाचा अविष्कार बैजू बावरा यांनी केलेला आहे. राजा मानसिंह तोमर व त्याची पत्नी मृगनयनी यांच्या विवाह प्रित्यर्थ एका संगीत मैफलीचे आयोजन करण्यात आले होते. या मैफिलीत विजय जंगम जे ग्वाल्हेर संगीत विद्यापीठाचे कुलपती होते. त्यांच्या सोबतच बैजू बावरा यांचेही गायन ठेवण्यात आले होते. त्यावेळी मृगनयनी हिला बैजू बावरा यांचे गाणे खूप आवडले. त्यामुळे आपल्या संगीत विद्यापीठाचे कुलपती बैजू बावरा असावे असे तिला वाटले. परंतु विजय जंगम यांना अचानपणे पदावरून काढून टाकने योग्य नव्हते. त्यामुळे दोघांमध्ये स्पर्धा ठेवण्यात आली. त्या स्पर्धेत जो कोणी नवीन कलाकृतीचा आविष्कार करेल त्याला कुलपती म्हणून नेमण्यात येणार असे जाहीर केले. यापूर्वी प्रत्येक तालाची सुरुवात 'ध' या अक्षराने होत होती. परंतु बैजू बावरा यांनी तालाची सुरुवात 'ध' या अक्षराऐवजी 'क' या अक्षरापासून एका नवीन तालाची निर्मिती केली. आणि तो म्हणाला, ''मैने किस ताल में 'ध' को मार दिया है इसीलिए इस ताल का नाम 'धमार' हुआ है।'' असे म्हणत त्याने धमार या तालाची निर्मिती केली. यामध्ये जो गीत प्रकार गायला जातो त्यालाही धमार हा गीत प्रकार म्हटला जातो. अशा प्रकारे धमार या तालाची व धमार या गीत प्रकाराची निर्मिती बैजू बावरा यांनी केली. ते स्वतः होरी या गीत प्रकारात निष्णात होते. त्यांनी अनेक होरींची रचना सुद्धा केलेली आहे.

**५) समरोप :**

त्यांचा स्वभाव विचित्र असल्यामुळे त्यांना बावरा असे म्हटले जात असे. तर काहींच्या मध्ये बावरा संप्रदायात ते असल्यामुळे त्यांचे नाव बावरा पडले असावे. काही लोक असे म्हणतात की आयुष्याच्या अखेरीस त्यांना वेड लागले होते. त्यातच त्यांचा कश्मीरच्या जंगलात निधन झाले. अशा थोर कलावंताचे भारतीय संगीताला मोलाचे योगदान लाभले आहेत.



# १६.

# सदारंग व आदारंग

### १) प्रस्तावना :

धीर गंभीर पहाडी व मर्दानी आवाजात आवेशपूर्ण गायला जाणारा धृपद गीत प्रकार हळूहळू मागे पडू लागला. धृपदाची जागा मधुर आणि शृंगार रसपूर्ण गायकीने घेतली. ती गायकी म्हणजेच ख्याल गायकी. अशा या ख्याल गायकीचा प्रचार व प्रसार करण्यामध्ये दोन महान रचनाकार होऊन गेले. ते म्हणजे सदारंग व आदारंग. त्यांच्या सांगीतिक कार्याचा आढावा खालील मुद्द्यांच्या आधारे घेऊयात.

### २) टोपण नावे :

सन १७१९ ते १७४८ पर्यंत दिल्लीच्या तख्तावर मोहम्मद शहाची राजवट होती. त्यांच्या दरबारात नियामत खाँ व फिरोज खाँ हे दोन कलावंत होते. या दोन कलावंतांनी सदारंग व आदारंग आहे टोपन नावाने छोट्या ख्यालाच्या रचना केल्या. सदारंगाचे नाव नियामत खाँ तर आदारंग याचे नाव फिरोज खाँ असे होते. आदारंग हा सदारंगाचा मुलगा होता. त्यांचे आडनाव सदारंगीले असे होते. नियमित खाँ हे तानसेनच्या मुलीच्या खानदानातील दहावे व्यक्ती होते.

### ३) मोहम्मद शाहची नाराजी :

मोहम्मद शाह दिल्लीपती असताना त्याला वाटले की नियामत खाँ याने सारंगीबरोबर वादन करावे.परंतु ते नियामत खाँ हा बिन वादक होता. त्याला सारंगीबरोबर वादन करणे कमीपणाचे वाटले. त्यामुळे त्याने सारंगीबरोबर वादन करण्यासाठी नकार दिला. मोहम्मद बादशहाला त्याचा राग आला. त्याने नाराज होऊन नियामत खाँ याला दरबारातून हाकलून दिले.

### ४) ख्याल प्रचार :

ख्यालाची सुरुवात अमीर खुसरो यांनी केली. त्यानंतर सुलतान हुसेन शर्की, बाज बहादुर अशा अनेक विद्वानांनी ख्यालाचा प्रचार व प्रसार करण्याचा प्रयत्न केला. परंतु ते अपयशी ठरले. त्यानंतर नियामत खाँ हा ख्यालाचा प्रचार करण्यासाठी बाहेर पडला. त्याने विचार केला की जर आपण ख्यालाच्या रचनेत बादशहाचे नाव लिहिले तर ख्यालाचा प्रचार होईल व बादशहाची

नाराजीही दूर होईल.

**५) सदा रंगीले मोहम्मदशाहचा अर्थ :**

अशाप्रकारे नियामत खाँ याने अनेक रचना 'सदारंग' या नावाने केल्या. रंगीले हे त्याचे आडनाव असल्यामुळे तो 'सदारंगीले' या नावाने ख्यालाच्या रचना करु लागला. त्याही पलीकडे बादशाह खुश व्हावा यासाठी त्याने आपल्या नावापुढे मोहम्मद शहा हे बादशहाचे नाव लिहिले. या रचना जेव्हा मोहम्मद शाह ऐकू लागला तेव्हा तो आनंदित झाला. त्याचे नाव रचनेत आल्यामुळे तो कौतुकाने व उत्सुकतेने त्या रचना ऐकू लागला.या रचना लोकप्रिय होईपर्यंत नियामत खाँ याने आपले नाव कोणालाही सांगितले नाही. एकदा बादशहाने विचारले की हा सदारंग कोण आहे? तेव्हा नियामत खाँ हाच सदारंग आहे असे बादशहाला समजले. अशाप्रकारे त्याने नियामत खाँ याचा जुना अपराध क्षमा केला. पुन्हा आपल्या दरबारात स्नेहपूर्वक व आदरपुर्वक स्थान दिले.

**६) समारोप :**

सदारंग यांनी शृंगाररसप्रधान ख्यालाच्या रचना केल्या. बादशहाला खुश करण्यासाठी त्याने ख्यालाच्या रचना केल्यामुळे त्याने स्वतःसाठी किंवा स्वतःच्या खानदानीसाठी या रचनेचे गायन केले नाही. असे असले तरी ख्यालाच्या प्रचाराबरोबरच सदारंगाचे नाव भारतीय संगीतात सुवर्ण अक्षराने लिहिले गेले. आदारंग हा सदारंग याचा मुलगा असल्यामुळे अनुवंशिकतेने साहित्य रचनेचा वारसा त्याला तिच्या पित्याकडून मिळाला होता. या पिता-पुत्राच्या रचनांनी भारतीय संगीत पावन झाले एवढे मात्र निश्चित.

# १७.

# हस्सू व हद्दु खाँ

**१) प्रस्तावना :**

ग्वाल्हेर घराण्याला ज्यांनी कीर्तीचा कळस चढविला, ज्याने अथक परिश्रमाने ग्वाल्हेर गायकीचा प्रचार व प्रसार केला. आपल्या मधूर आवाजाने साऱ्यांचे रंजन केले असे ग्वाल्हेर घराण्याचे थोर गायक बंधू म्हणजे हस्सू खाँ व हद्दु खाँ. अशा या कलावंताच्या सांगीतिक कार्याचा आढावा खालील

मुद्द्यांच्या आधारे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

हस्सू खाँ व हद्दु खाँ यांचा जन्म ग्वाल्हेर येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव कादिर बख्श होते तर आजोबांचे नाव नथ्थन पिरबख्श होते. ते लखनऊ सोडून ग्वाल्हेर येथे स्थायिक झाले होते. ग्वाल्हेर घराण्याचे मुहूर्तमेढ रोवली अशा दोन पिढ्यांचा सांगीतिक वारसा घेऊन हस्सू खाँ व हद्दु खाँ जन्माला आले त्यावेळेस दौलतराव शिंदे हे ग्वाल्हेरचे राजा होते. ते संगीताचे रसिक होते. त्यांनी  नथ्थन पिरबख्श यांना आपल्या दरबारात गायक म्हणून नियुक्ती केले. त्यानंतर कादिर बख्श यांना आपल्या राजश्री दिला पुढे हा सुखा व हात दुखः यांनीही आपल्या दरबारात दरबारी गायक म्हणून नियुक्त केले.

**२) हस्सू खाँ- एक प्रतिभावंत कलावंत :**

हस्सू खाँ यांना गोड आवाजाची ईश्वरी देणगी लाभलेली होती. त्यांच्या आवाजात विलक्षण चमक होती. त्यामुळे महाराजांनी दरबारातील इतर कलावंतांपेक्षा त्यांना अधिक सुख सुविधा दिल्या होत्या. दरबारात मोहम्मद खाँ नावाचा एक बुजुर्ग कलाकार होता. तो आपले गायन  हस्सू खाँ व हद्दु खाँ यांना काही झाले तरी आपले गाणे ऐकवायचा नाही. त्याला भीती होती की हस्सू खाँ व हद्दु खाँ आपली गायकी चोरतील. परंतु झाले ही तसेच. राजाच्या आदेशानुसार हस्सू खाँ व हद्दु खाँ यांना लपून-छपून मोहम्मद का यांचे गाणे सहा महिन्यापर्यंत ऐकवले. कुशाग्र बुद्धिमत्तेच्या व गुणग्राहक स्वभावामुळे दोघा भावंडांनी मोहम्मद खाँ यांच्या गायकीतील चांगल्या गोष्टी आत्मसात केल्या.

**३) जुगलबंदी :**

एके दिवशी राजाने मैफलीचे आयोजन केले. दरबारातील सर्वजण मैफिलीचा आस्वाद घेण्यासाठी उपस्थित झाले. प्रथेप्रमाणे मोहम्मद खाँ यांचे गायन झाले. गाणे अप्रतिम झाले. सर्वजण मोहम्मद खाँ यांचे कौतुक करू लागले. त्यानंतर हा हस्सू खाँ व हद्दु खाँ यांचे गायन झाले. या दोन भावंडांनी मोहम्मद खाँ यांच्या तोडीस तोड गायन करून उत्तर दिले. किंबहुना त्यांनी श्रोत्यांना मोहम्मद खाँ यांच्या गायकीचा असा काही सुंदर समन्वय घडवून आणला दाखविला की, श्रोते आश्चर्यमुग्ध झाले. सहाजिकच पुन्हा त्यांची प्रतिष्ठा वाढली. ही गोष्ट मोहम्मद खाँ यांच्या जिव्हारी लागली.

**४) मोहम्मद खाँ याचा धूर्तपणा :**

दरबारात पराभूत झालेल्या मोहम्मद खाँ यांचा स्वाभिमान जागा

झाला. झालेल्या अपमानाचा बदला घ्यायचे असे त्यांनी ठरवले. त्याने हस्सू खाँ याला मिया मल्हार राग गाण्यास सांगितले. हस्सू खाँ सरळ स्वभावाप्रमाणे गाऊ लागले लागले. त्यामागे काही षड्यंत्र असेल याची त्यांना येथे किंचितही कल्पना आली नाही. असे म्हटले जाते की मिया मल्हार या रागात एक तान असते तिला 'कडक बिजलीची तान' असे म्हणतात. सर्वसामान्यपणे एखादा दमदार गायक आशी तान एकाच वेळी घेऊ शकतो. ती ही अधिक कठीणपणे काळजाच्या ताकतीने. परंतु हस्सू खाँ तारुण्याचा जोशात सहज गाऊन गेले. परंतु मोहम्मद खाँ याला सूड घ्यायचा होता. त्यामुळे पुन्हा एकदा ती तान घेण्यासाठी सांगितले. हस्सू खाँ यांनी पुन्हा ती तान घेतली. परंतु दुर्दैवाने अवरोहात गाताना त्यांची डावी फासळी वर चढली व त्यांच्या तोंडातून रक्त बाहेर येऊ लागले. अशाही अवस्थेत त्यांनी ती तान पुर्ण केली. या घटनेनंतर १८५६ मध्ये त्यांचा मृत्यू झाला.हस्सू खाँ यांच्या जाण्याने ग्वाल्हेर दरबार शोकसागरात डुंबला. परंतु मोहम्मद खाँ मात्र आपला डाव साधून घेतला.

**५) हद्दू खा :**

**हद्दू खाँ यांची गायकी :** हद्दु खाँ यांचा आवाज हस्सू खाँ यांच्याप्रमाणे नव्हता.निसर्गदत्त देणगी त्यांना लाभलेली नव्हती. असे असले तरी त्यांनी अथक परिश्रमाने आपल्या गळ्यावर सुंदर असे संस्कार करून घेतले होते. रियाजाने आपला आवाज मधुर व आकर्षक करून घेतला होता. त्यांचा आवाज तीनही सप्तकात सहज फिरत असे. ते अत्यंत तयारीने स्वच्छ व स्पष्ट आलाप व तानांची बरसात करायचे. त्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक व्हायचे. ते सुंदर पद्धतीने ख्याल सजवायचे. यमन,मालकंस,तोडी, मिया मल्हार, दरबारी कानडा, बिहाग इत्यादी त्यांच्या आवडीचे राग होते.

**६) विवाह :**

हद्दू खाँ यांनी दोन विवाह केले होते.त्यांना पहिल्या पत्नीपासून दोन मुले झाली होती. मोहम्मद खाँ व रहिमत खाँ अशी त्यांची नावे होती. तर दुसऱ्या पत्नीपासून दोन मुली झाल्या होत्या. पहिल्या मुलीचा विवाह इनायत खाँ यांच्याबरोबर तर दुसरीचा बिनकार बंदे अली खाँ यांच्याशी विवाह झाला होता. हे सर्वजण संगीताशी जोडलेले होते.

**७) महाराजांचे प्रेम :**

ग्वाल्हेरचे महाराज हद्दु खाँ यांच्यावर खूप प्रेम करायचे. ते जिथे जिथे यात्रेसाठी जात तिथे हद्दु खाँ यांना घेऊन जायचे. प्रवासात महाराज मैफिलीचा आस्वाद घ्यायचे. महाराजांसोबत पुणे, कलकत्ता, जयपुर इत्यादी अनेक ठिकाणी त्यांचे गायन झाले. सर्वांनीच त्यांचे कौतुक केले.

हस्सू खाँ यांच्या अकाली निधनामुळे हद्दु खाँ विक्षिप्तासारखे वागू लागले. एकदा हद्दु खाँ व महाराज यांच्यात शाब्दिक चकमक झाली. त्यामुळे ते ग्वाल्हेर सोडून लखनऊ येथे निघून गेले. परंतु ग्वाल्हेर नरेशानी पुन्हा हद्दु खाँ यांना परत ग्वाल्हेर येथे बोलावून घेतले.

**७) समारोप :**

हद्दु खाँ यांना आयुष्याच्या अखेरीस पक्षघात झाला होता. त्यामुळे त्यांच्या कमरेखालील भाग शिथिल झालेला होता. दरबारात मैफिली त्यांना उचलून आणले जायचे. मृत्यूच्या एक महिना पूर्वीपर्यंत ते सहा-सहा तास नियमित रियाज करीत होते. असा हा थोर कलावंत ग्वाल्हेर येथे इसवी सन १८७५ मध्ये पैगंबर वासी झाला. त्यांच्या निधनानंतर ग्वाल्हेरचे महाराज अत्यंत दुःखी झाले. हद्दु खाँ यांच्या निधनामुळे त्यांनी एक आठवडा मौन धारण केले होते. खरोखरच ग्वाल्हेर घराण्याचे हे स्तंभ होते.आजही या दोन भावंडांपुढे प्रत्येक कलावंत मोठ्या श्रद्धेने व विनम्रतेने नतमस्तक होताना दिसून येतो.



# १८.

# पंडित बाळकृष्ण बुवा इचलकरंजीकर

**१) प्रस्तावना :**

महाराष्ट्रात ग्वाल्हेर गायकी ज्यांनी रुजविली, ज्यांनी अभिजात शास्त्रीय संगीताचा प्रचार व प्रसार केला. अफाट परिश्रम घेऊन प्राप्त केलेली गानविद्या स्वतःपुरती न ठेवता शिष्यांच्या माध्यमातून महाराष्ट्रात प्रसारीत केली. ज्यांनी अभिजात संगीताला प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न केला असे संगीताचे अध्वर्यू, संगीतातील भिष्माचार्य म्हणजेच पं.बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर हे होत. त्याच्या जीवनकार्याचा आढावा खालील मुद्यांच्या आधारे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

बाळकृष्णबुवांचा जन्म भाद्रपद वद्य पंचमी शके १७७१ म्हणजेच १८४९ साली बेडग या गावी झाला. बेडग हे इचलकरंजीपासून २२ मैलावर

आहे. त्यांच्या वडिलांचे नाव रामचंद्रजी भट असे होते. घरात परंपरागत जोशीपण चालायचे. परंतु रामचंद्रजींनी मात्र गायकाचा पेशा स्विकारला होता. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात या म्हणीप्रमाणे बाळकृष्णबुवांना सुद्धा संगीताबद्दलची आवड निर्माण झाली. त्यांचा आवाज मुळातच संस्कारक्षम होता. लहानपणापासूनच त्यांनी वडिलांकडून प्रबंध व धृपद गायकीचे शिक्षण घेण्यास प्रारंभ केला. यातच बाळकृष्णबुवांच्या आईचे निधन झाले. त्यामुळे वडिलांनी बाळकृष्णांना काकाकडे ठेवले व ते जत संस्थानात दरबारी गायक म्हणून रुजू झाले.

**३) काकांकडून मिळालेली वागणूक :**

बाळकृष्णांचे काका भिक्षुकीचा व्यवसाय करायचे. बाळकृष्णांनी सुद्धा तोच व्यवसाय करावा असे त्यांना वाटायचे. परंतु चिमुकल्या बाळकृष्णाचे मन भिक्षुकी व्यवसायात रमत नव्हते. आपणही वडिलांच्या इच्छेप्रमाणे गायन क्षेत्रात नावलौकिक मिळवावा असे त्यांना नेहमी वाटायचे. ते अत्यंत स्वाभिमानी होते. अशातच एके दिवशी घरात उद्रेक झाला. ते काकांना म्हणाले, ''मी भिक्षुकी करण्यासाठी जन्माला आलो नाही.'' त्यावर काका म्हणाले. ''असा ताठा विद्वानांनाच शोभतो.'' त्यावर बाळकृष्णबुवा म्हणाले, ''मी विद्वान झाल्यानंतरच तुम्हाला तोंड दाखविण.'' असे बाणेदार उत्तर देऊन त्यांनी काकांचे घर सोडले.

**४) गुरु आणि शिक्षण :**

बाळकृष्णबुवा म्हैसाळला गेले. तेथे त्यांच्या वडिलांचे स्नेही कीर्तनकार जोगळेकर यांच्याकडून दोन वर्षे संगीताचे शिक्षण घेतले. बाळकृष्णांची कुशाग्र बुद्धी पाहून त्यांनी त्यांना वडिलांकडे जत संस्थानात पाठविले. तेथे त्यांनी अलिदातखाँ यांच्याकडून ज्ञानार्जनास प्रारंभ केला परंतु पुन्हा एकदा दुःखाची कुऱ्हाड बाळकृष्णांवर कोसळली. ते पंधरा वर्षांचे असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यामुळे त्यांना जत संस्थान सोडावे लागले.

**५) गुरुशोधार्थ पायपीट :**

योग्य गुरु लाभावा यासाठी बाळकृष्णबुवांना मैलोनमैल पायपीट करावी लागली.पुढे ते कोल्हापूर येथे आले. तेथे भाऊराव कागवाडकर यांच्याकडे आले. त्यांच्याकडे संगीत अध्ययन सुरु झाले परंतु एकदा गुरुंची चिलीम भरण्यास उशीर झाला त्यामुळे ''तुला गानविद्या कधीही येणार नाही व मी तुला शिकविणार नाही.'' असा शाप मिळाला. परंतु ''मला गाणे येईल त्याचदिवशी मी तुम्हांला तोंड दाखविण.'' असे तेजस्वी उत्तर देऊनते तेथून बाहेर पडले.

### ६) उत्तरेकडे प्रयाण :

तेथून ते मिरजेला आले. तिथे त्यांना एका सत्पुरुषाचा अनुग्रह मिळाला. ‘तू उत्तरेकडे जा, तुझ्या मनोकामना पूर्ण होतील. गुरुंचा शोध घेत ते पुण्याला आले. तिथे त्यांच्या वडिलांच्या मित्राने धारच्या देवजीबुवा परांजपे यांची भेट घालून दिली. देवजीबुवांची पत्नी अत्यंत कजाग व कडक स्वभावाची होती. ती बाळकृष्णांना शिळे व विटलेले अन्न द्यायची. कधी कधी त्यांना उपाशी ठेवायची. रियाजाच्या वेळी कांहीतरी काम सांगून त्यांना बाहेर पाठवायची. हा त्रास त्यांना असह्य होत असतांनाही त्यांनी चार वर्षे देवजीबुवांकडून विद्या संपादन केली. या काळात त्यांनी धृपद-धमार व टप्पा इ. गायकीचा अभ्यास केला. गुरुकृपा असूनही गुरुपत्नीच्या स्वभावामुळे बाळकृष्णबुवांना गुरुंचे घर सोडावे लागले.

### ७) देवीचा दृष्टांत :

अनेक ठिकाणी भटकंती करुनही गुरु प्राप्ती होत नव्हती. त्यामुळे त्यांच्या जीवनात नैराश्य आले. तीर्थयात्रा करावी या उद्देशाने ते काशी येथे गेले. तेथे त्यांना एका साधूची भेट झाली. त्याने त्यांना ग्वाल्हेर घराण्याचे हस्सू व हद्दू खाँ यांचे शिष्य पं.वासुदेवबुवा जोशी यांच्याकडे ग्वाल्हेरला पोहंचविले. परंतु जोशीबुवांनी त्यांना संगीत शिकविण्यास नकार दिला. त्यावर बाळकृष्ण म्हणाले, ‘मी आपणाकडूनच गानविद्या प्राप्त करीन’ असे म्हणून पुन्हा काशीला आले. तेथे एका टेकडीवर बिल्वपत्रे खाऊन कडक अनुष्ठान केले. अशातच त्यांना तेथे देवीचा दृष्टांत झाला. ‘‘बाळा गंगाकिनारी जोशीबुवा तुझी वाट पहात आहेत, तू त्यांच्याकडे जा.’’

### ८) गुरुंचा आशीर्वाद :

संगीत ज्ञानप्राप्तीसाठी असलेली तळमळ पाहून वासुदेवबुवा प्रसन्न झाले. तंबोरा काढून त्यांनी बाळकृष्णबुवांना शिकविण्यास प्रारंभ केला. तब्बल नऊ वर्षे त्यांनी त्यांच्याकडून ग्वाल्हेर घराण्याची अस्सल तालीम घेतली. गुरुमर्जी संपादन केल्यामुळे गुरुंनी त्यांना ‘‘विजयी हो’’ असा आशीर्वाद दिला. त्यानंतर मैफली करण्यासाठी ते उत्तरेकडे निघाले. त्यांनी अनेक मैफली गाजविल्या. ग्वाल्हेर येथे वसंतोत्सवात बुवांचे गाणे झाले. श्रोत्यांमध्ये वासुदेवबुवाही उपस्थित होते. बाळकृष्णांचे गाणे ऐकून तेही भावविभोर झाले व म्हणाले, ‘‘बाळकृष्णा, तुला गाणं शिकवल त्याचं तू चीज केले. जा सत्पात्री विद्यादान कर. तुझे कल्याण होईल.’’

याच काळात हद्द खाँ यांचे चिरंजीव महम्मद खाँ यांचे गाणे ऐकण्याचा योग बाळकृष्णबुवांना आला. गुरु आज्ञेवरुन त्यांनी महम्मद खाँ यांच्याबरोबर

दौरा केला. या दरम्यान त्यांनी महम्मद खाँ यांच्याकडून त्यांची गायकी व जबड्याची तान शिकून घेतली.

### ९) महाराष्ट्रात पदार्पण :

अनेक वर्षे पायपीट करुन मिळालेले संगीतरूपी धन महाराष्ट्रातल्या संगीत साधकांपर्यंत पोहोचवावे या दृष्टीने बाळकृष्णबुवांनी महाराष्ट्रात पदार्पण केले. सुरुवातीला त्यांनी मुंबई येथे गायन विद्यालयाची स्थापना केली. परंतु त्यांना मुंबईचे दमट वातावरण असह्य झाले. त्यातच त्यांना दम्याचा विकार जडला. त्यामुळे त्यांनी आपला मोर्चा मिरजेकडे वळविला. तेथे ते श्रीमंत बाळासाहेब मिरजकरांच्या आश्रयास राहिले. त्यानंतर त्यांनी इचलकरंजीला स्थलांतर केले. तेथे राहून त्यांनी अनेक शिष्य घडविले. ते अनेक वर्षे इचलकरंजी येथे राहिल्यामुळे त्यांचे आडनांव इचलकरंजीकर असे पडले.

### १०) शिष्यसंप्रदाय :

ग्वाल्हेर घराण्याची परंपरा पुढे चालू ठेवण्यासाठी त्यांनी महाराष्ट्रात अनेक शिष्य निर्माण केले. यामध्ये पं. विष्णु दिगंबर पलुस्कर, गुंडोपंतबुवा इंगळे, अनंतबुवा जोशी, निलकंठबुवा जोशी, वासुदेवबुवा चाफेकर, यशवंतबुवा मिराशी, बुवांचे पुत्र आण्णाबुवा, गोव्याच्या दत्तीबाई व चंदीबाई इ. शिष्यांचा नामोल्लेख करता येईल.

### ११) गायकी :

वाल्हेर घराण्याची गायकी त्यांनी आत्मसात केली होती. त्यामुळे ग्वाल्हेर घराण्याची सर्वच वैशिष्ट्ये त्यांच्या गायकीत दिसून यायची. ते बंदिशीची स्थायी दोन वेळा म्हणत असत. त्यानंतर ते अंतरा गात असत. तीनही सप्तकांत त्यांचा आवाज सहज फिरत असे. त्यांचे गाणे शिस्तबद्ध होते. ते आलापचारीतील बोल अंग वैशिष्ट्यपूर्ण पेश करीत असत. त्यानंतर ते ताना व बोलताना घेत असत. बड्या ख्यालानंतर ते छोटा ख्याल त्याच रागात घेत असत. त्याची लय जलद असायची. त्यानंतर ते तराना गाऊन राग पूर्ण करीत असत. त्यांची गायकी सरळ, सोपी व सौंदर्ययुक्त होती. एकाच रागातील अनेक चिजा त्यांना मुखद्गत होत्या.

### १२) योगदान :

संगीताला प्रतिष्ठा मिळावी व संगीताचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी त्यांनी अहोरात्र प्रयत्न केले. महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने ख्याल गायकीचे रोपटे त्यांनीच लावले. ग्वाल्हेर घराण्याची परंपरा जोपासण्यासाठी त्यांनी अनेक शिष्य महाराष्ट्राला दिले. पं.वि. दि. पलुस्करांसारखा शिष्य देशाला देऊन त्यांनी भारतीय संगीताला मोलाचे योगदान दिले. तसेच त्यांनी मुंबई येथे

'गायन समाजा'ची स्थापना केली. संगीताचा प्रचार व्हावा यासाठी त्यांनी 'संगीत दर्पण' या नावाचे मासिकही सुरु केले.

**१३) समारोप :**

इचलकरंजी येथे संगीताच्या प्रचार व प्रसाराचे काम चालू असतांनाच त्यांच्यावर दोन संकटे कोसळली. त्यांच्या पत्नींचे देहावसन झाले. तसेच त्यांचा तरुण मुलगाही कालवश झाला. दुःखाची कुऱ्हाड कोसळल्यामुळे त्यांची प्रकृती अधिकच ढासळत गेली. दम्याच्या विकारानेही पुन्हा जोर काढला. यातच माघ शुद्ध अष्टमी शके १८४८ म्हणजे इ.स. १९२६ मध्ये संगीतातील या भिष्माचार्यांना देवाज्ञा झाली. दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणाऱ्या या महान ऋषीतुल्य कलावंताचे ऋण भारतीय संगीत रसिक कधीही विसरणार नाहीत.



# १९.

# उस्ताद अब्दुल करीम खान

**१) प्रस्तावना :**

ग्वाल्हेर घराणा म्हटल्यानंतर पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, जयपूर म्हटल्यानंतर उ. अल्लादिया खाँ, आग्रा घराणा म्हटल्यानंतर उ.फैय्याज डोळ्यासमोर दिसतात त्याच प्रमाणे किराणा घराणा म्हटल्यानंतर उस्ताद अब्दुलकरीम खाँ आपल्या डोळ्यांसमोर दिसतात. ज्या अब्दुल करीम खाँ साहेबांनी १९ व्या शतकांच्या उत्तरार्धात एक आगळी-वेगळी, कारुण्याने भरलेली व हृदयाचा ठाव घेणारी किराणा गायकी ज्यांनी महाराष्ट्रात आणली त्यांच्या जीवनकार्याचा आढावा खालील मुद्यांच्या आधारे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

उस्ताद अब्दुल करीम खाँ यांचा जन्म ११ नोव्हेंबर, १८७२ रोजी पानिपत जवळील साहरनपूर जिल्ह्यातील किराणा या गावी झाला. वडिलांचे नाव काले खाँ तर आईचे नाव जिलईबेगम असे होते. त्यांना तीन भाऊ होते. अब्दुल लतीफ, अब्दुल मजीद खाँ व अब्दुल हक खाँ ही त्यांची नावे. खाँ साहेबांच्या घराण्यात गायक, सतार व सारंगीवादक होते. एकंदरीत खाँ साहेबांच्या घरी जन्मापासूनच संगीताचे वातावरण होते.

### ३) गुरू व शिक्षण :

खाँ साहेबांचे संगीताचे प्राथमिक शिक्षण वडील काले खाँ व चुलते अब्दुल्ला खाँ यांच्याकडे झाले. वयाच्या सहाव्याच वर्षी खाँ साहेबांनी एका मैफलीत गायन केले तेव्हा अनेक गवई थक्क झाले. खाँ साहेबांनी रात्रंदिवस संगीत साधना केली वयाच्या पंधराव्या वर्षी संगीताच्या मैफली करण्यासाठी ते घराबाहेर पडले. प्रवास करीत असताना ते बडोदा येथे आले. तेथील नरेशांनी त्यांना दरबारी गायक म्हणून ठेवले. याच काळात भूगंधर्व रहिमत खाँ यांचे गाणे ऐकून खाँ साहेबांनी त्यांना गुरू मानले. अशारितीने त्यांनी अहोरात्र परिश्रम करून किराणा घराण्याला प्रतिष्ठा मिळवून दिली.

### ४) आर्य संगीत विद्यालयाची स्थापना :

खाँ साहेबांनी १८९८ मध्ये महाराष्ट्रात पदार्पण केले. पाहतापाहता खाँ साहेबांची कीर्ती संपूर्ण महाराष्ट्रात पसरली. १९१३ मध्ये खाँ साहेबांनी 'आर्य संगीत विद्यालया'ची मुहूर्तमेढ रोवली. या विद्यालयातून गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना विनामूल्य शिक्षण देण्यास प्रारंभ केला. त्यांनी या विद्यालयातून सढळ हाताने विद्यादान केले. १९१७ मध्ये याच संगीत विद्यालयाची शाखा मुंबई येथे सुरू केली. खाँ साहेब तबला, बिन, जलतरंग, सारंगी इ. वाद्ये वाजवीत. संगीत विद्यालयातील विद्यार्थ्यांना घेऊन त्यांनी अनेक जलसे केले.

### ५) संशोधन :

अब्दुल करिम खाँ साहेब गायक, वादक व गुरू तर होतेच. परंतु याचबरोबर ते संगीत विषयाचे चिंतकही होते. संगीत विषयाचे चिंतन करून.त्यांनी काही प्रघात पाडले. तंबोऱ्याची पहिली तार निषादाला लावण्याचा प्रघात त्यांनी पाडला. २२ श्रुतींचा त्यांनी सूक्ष्म अभ्यास केला. फिल हार्मोनिक सोसायटी, पुणे या संस्थेचे ते सभासद होते. क्लेमंट व रा. ब. देवल यांच्या बरोबरीने त्यांनी संगीतात संशोधन केले. त्यांच्यासोबत खाँ साहेब संगीतविषयक प्रात्यक्षिके सादर करीत असत.

### ६) संगीत शिकविण्याची पद्धत :

खाँ साहेब शिष्यांवर पुत्रवत प्रेम करीत असत. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांचा खर्च ते स्वतः करत असत. 'सूर गया तो सर गया, ताल गया तो बाल गया' हा कानमंत्र त्यांनी शिष्यांना दिला. मंद्रसाधनेवर त्यांची निष्ठा होती. रात्री कितीही वेळ मैफलीसाठी जागरण झाले तरी त्यांनी पहाटेच्या मंद्रसाधनेत कधीही खंड पडू दिला नाही. तशी शिकवण त्यांनी त्यांच्या शिष्यांना दिली.

खुल्या दिलाने विद्यादान करणारे ते एकमेव मुस्लीम कलावंत असावेत.

**७) गायकी :**

धोंडू नायक हे किराणा घराण्याचे आद्य पुरुष. गायी–गुरांना मंत्रमुग्ध करण्याचे वैशिष्ट्य असलेल्या या किराणा घराण्याच्या गायकीस 'गहरणवाणी' किंवा 'गोबरहारी' असे म्हणतात. ही गायकी शांत व करुण रस निर्माण करण्यासाठी प्रसिद्ध होती. याचाच परिणाम म्हणून खाँ साहेबांची गायकीसुद्धा करुण व शांत रसासाठी प्रसिद्ध होती. त्यांची गायकी आलापप्रधान, भावपूर्ण व कणयुक्त होती. कणयुक्त गायकी महाराष्ट्रात रुजविण्याचे श्रेय खाँ साहेबांकडे जाते. खाँ साहेबांची तान जोरकस आणि गमकयुक्त असे. खाँ साहेबांना मधुर व हृदयस्पर्शी आवाजाची देणगी मिळालेली होती.

**८) खाँ साहेबांच्या आवडीचे राग :**

खाँ साहेब सर्वच राग रंगवित असत. भैरव, ललत, जौनपुरी, तोडी, भिमपलास, मारवा, पटदीप, मुलतानी, यमन, शुध्द कल्याण, भूप, बिहाग, बागेश्री, मालकंस, बसंत इ. राग त्यांच्या विशेष आवडीचे होते. श्रोत्यांच्या फरमाइशीनुसार इतरही राग ते गात असत. त्यांनी अभोगी, सावेरी सारखे दक्षिण संगीतातील काही राग उत्तर हिंदुस्थानी संगीतात आणले.

**९) खाँ साहेबांचे ठुमरी प्रेम :**

खाँ साहेबांचा शास्त्रीय संगीताबरोबरच नाट्य संगीत, भजने, दादरे व ठुमऱ्या गाण्यामध्ये हातखंडा होता. वास्तविक पाहता ठुमरी ही शृंगारिक असते. परंतु खाँ साहेबांनी ठुमरीमध्ये भावसौंदर्य व माधुर्य आणले. ठुमरीमध्ये आसयुक्त सरगमाचा प्रयोग खाँ साहेब करीत असत. त्यांची ठुमरी शांत व सौम्य होती. स्वरांग, सौदर्यांग व भावांग या गोष्टींचा मिलाफ म्हणजेच खाँ साहेबांची ठुमरी होय.

**१०) खाँ साहेबांची लोकप्रिय गीते :**

खाँ साहेबांचे गाणे आकाशवाणीवरसुद्धा प्रसारित झाले. त्या काळात 'सजन तुम काहे को नेहा लगाये', 'जमुना के तीर' 'पिया बिन आवत नाही चैन' यासारख्या रेकॉर्डस्? लोकप्रिय झाल्या. 'गोपाला मेरी करुणा क्यों नहीं आवे' यासारखे भजन ते तल्लीन होऊन गात असत. ठुमरी, दादरे, भजनाबरोबरच ते मराठी नाट्यगीतेही गात असत. त्यांनी गायिलेले 'उगीच का कांता....' 'दे हाता या शरणागता...' यांसारखी नाट्यगीते अजरामर झाली.

**११) स्वभाव :**

खाँ साहेब धार्मिक वृत्तीचे होते. मिरजच्या दर्ग्यात ते दरवर्षी हजेरी लावत असत. खाँ साहेबांना संस्कृत मंत्रोच्चारण येत होते. त्यामुळे त्यांना

मंदिरामध्येही मंत्रपठणाची अनुमती होती. खाँ साहेब कधीही जातपात मानीत नसत. त्यांच्याकडे दातृत्व होते. वेळप्रसंगी गोरगरीब लोकांना उदार होऊन दान-धर्म करीत घोड्यावर बसणे, शिकार करणे हे त्यांचे छंद होते. ते अनेक वाघांच्या शिकारी करून त्यांचे कातडे घरी आणून ठेवत असत. वाजंत्री, ताशेवाले त्यांच्या स्पर्धा घेऊन त्यांना प्रोत्साहन देत असत. जुन्या कलांचे संवर्धन करण्यासाठी खाँ साहेब प्रयत्नशील असत.

**१२) शिष्य संप्रदाय :**

खाँ साहेबांनी किराणा घराण्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी मोठा शिष्यवर्ग निर्माण केला. त्यामध्ये रामभाऊ कुंदगोळकर ऊर्फ सवाई गंधर्व यांनी १९०८ मध्ये गंडा बांधून खाँ साहेबांचे शिष्यत्व पत्करले. सवाई गंधर्वांनी पुढे गंगूबाई हनगल व पं. भीमसेन जोशीसारखे दिग्गज कलावंत निर्माण करून किराणा घराण्याची गायकी जिवंत ठेवली. याचबरोबर खाँ साहेबांनी दशरथबुवा मुळे, अनंतराव गाडगीळ, बेहरेबुवा, विष्णुनाथबुवा जाधव, बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी शंकरराव सरनाईक, रोशन आरा बेगम, संगीतकार राम कदम यासारखे शिष्य निर्माण केले. पुत्र सुरेश बाबू माने, कन्या हिराबाई बडोदेकर यांचेदेखील प्राथमिक शिक्षण त्यांच्याकडे झाले. तसेच बळवंतराव रूकडीकर, शमसुद्दीन खाँ, दत्ताराम पर्वतकर इ. वादकांना खाँ साहेबांनी शिक्षण दिले.

**१३) गायनाचा प्रभाव :**

खाँ साहेबांनी अनेक शिष्य तर निर्माण केलेच परंतु त्यांच्या गाण्याचा प्रभाव त्यांच्या कुत्र्यावरही झाला होता. खाँ साहेबांचे गाणे ऐकून त्याचा कुत्राही स्वर द्यायला शिकला होता. ही गोष्ट जेव्हा इंग्लंड येथील ग्रामोफोन ॲण्ड टाईपरायटर लिमीटेडच्या कंपनी मालकाला समजली तेव्हा तो मालक आश्चर्यचकित झाला. त्याने प्रभावित होऊन त्याच्या कंपनीचे नाव म्हणजे 'त्याच्या मालकाचा आवाज' असे ठेवले. च्या ध्वनिमुद्रिकांवर खाँ साहेबांच्या कुत्र्याचे चित्र आजही दिसून येते.


**१४) मृत्यू :**

उ. अब्दुल करिम खाँ साहेबांचा कार्यक्रमांसाठी प्रवास चालू होता. मद्रास येथे त्यांच्या दोन मैफली झाल्या. त्यानंतर योगी अरविंदांच्या सांगण्यावरून ते पाँडेचेरीला निघाले. रेल्वेतून प्रवास करीत असताना त्यांना अस्वस्थ वाटू लागले. बहुधा त्यांना त्यांचा मृत्यू दिसला असावा. गौस मोहिद्दीन व सोहनी हे शिष्य समवेत होते. पुढे सिंगापेरूमल कोईलम या स्टेशनवर उतरले. सर्व शिष्यांना त्यांनी एकत्रित केले. काबाच्या दिशेने तोंड करून नमाज पडला. देवाजवळ त्यांनी क्षमायाचना केली. राग दरबारी कानड्याच्या धीरगंभीर

आलापीत ते अल्लाचे नाव आळवू लागले. ईश्वरभक्तीत विलीन होत ते निद्राधीन झाले ते कायमचेच. तो दिवस होता २७ ऑगष्ट, १९३७. खाँ साहेबांचे दफन मिरज येथील मिरा साहेबांच्या दर्ग्याजवळ दक्षिण बाजूस केले.

**१५) समारोप :**

खाँ साहेब इहलोक सोडून गेले. तरीही त्यांच्या मधुर आवाजाने पावन झालेल्या ध्वनिमुद्रिका आजही आहेत. ज्या माध्यमातून खाँ साहेब आजही आपल्यात असल्याचा भास होतो. त्यांचे ज्या दर्ग्याजवळ दफन करण्यात आले त्या मिरासाहेबांच्या दर्ग्यात आजही उरसाच्या वेळी अनेक कलावंत हजेरी लावतात.



# २०.

## उस्ताद अल्लादिया खाँ

**१) प्रस्तावना :**

ग्वाल्हेर घराणा म्हटले की पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांचे नांव आपल्या डोळ्यासमोर येते. किराणा घराणा म्हटले की उ. अब्दुल करीम खाँ, आग्रा घराणा म्हटले की उ.फैय्याज खाँ आपल्या डोळ्यासमोर उभे राहतात. त्याचबरोबर जयपूर घराणा म्हटले की उ. अल्लादिया खाँ हे आपल्या डोळ्यासमोर उभे राहतात. ज्यांनी आपल्या कौशल्याने व अथक परिश्रमाने जयपूर गायकीला वळण लावले त्या महान कलावंताचा जीवनपट खालीलप्रमाणे उलगडून पाहता येईल.

**२) जन्म व बालपण :**

उस्ताद अल्लादिया खाँ साहेबांचा जन्म जयपूर संस्थानातील उनियारा या गावी १० ऑगस्ट, १८५५ रोजी झाला. गुलाम अहमद हे त्यांच्या वडिलांचे नांव. अल्लादिया खाँ यांच्या आधी पाच भावंडे दगावली. मुले जगत नाहीत म्हणून त्यांच्या वडिलांनी अल्लाजवळ मन्नत मागितली. अल्लाने दिलेल्या या सहाव्या मुलाचे नाव 'अल्लादिया' असे ठेवण्यात आले. संत विश्वंभर हे या घराण्याचे मूळ पुरुष हिंदू गायक होते. तानसेनचे गुरु स्वामी हरिदास हे सुद्धा याच घराण्यात जन्मले होते. परंतु शहाजहानच्या कारकिर्दीत या घराण्याला मुस्लिम धर्म स्विकारावा लागला. खाँ साहेबांचे पूर्वज अतरोली गावचे होते

त्यामुळे या घराण्याला अतरोली घराणा या नावानेही संबोधतात. अल्लादिया खाँ यांचे वडील उत्तम दरबारी गायक होते. खाँ साहेब १५ वर्षांचे असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले.

**३) गुरु आणि शिक्षण :**

उस्ताद अल्लादिया खाँ यांचे संगीताचे प्राथमिक शिक्षण वडिलांकडेच झाले. परंतु त्यांच्या निधनानंतर त्यांनी त्यांचे चुलते जहाँगीर खाँ यांच्याकडून गायनाचे शिक्षण घेतले. जहाँगीर खाँ हे उत्तम गवई होते. खाँ साहेबांनी त्यांच्याकडून बारा वर्षे शास्त्रशुद्ध संगीताची तालीम घेतली. त्यांनी अनेक कलावंताच्या मैफली ऐकून त्यावर चिंतन केले. यातूनच त्यांनी गमकयुक्त व दर्जेदार गायकी निर्माण केली. याच काळात त्यांनी प्रसिद्ध धृपदिये लल्लू गोस्वामी यांच्याकडून खंडमेरु पद्धतीने गायनाची तालीम घेतली. तसेच प्रसिद्ध रचनाकार 'रंगीले' म्हणजेच रमजान खाँ व 'दरसपिया' म्हणजेच मेहबूब खाँ यांच्याकडून त्यांनी अनेक बंदिशी आत्मसात केल्या.

**४) घेतलेले परिश्रम**

संगीताचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी ते मध्यप्रदेशात आले. अखंड मैफली व कठोर रियाज यामुळे त्यांच्या स्वर इंद्रियावर ताण पडला. यातच त्यांचा आवाज बसला. तरीही हिंमत न सोडता त्यांनी रियाजातील सातत्य टिकवून ठेवले परंतु त्यांचा आवाज व्यवस्थित होऊ शकला नाही. त्यांनी आपल्या आवाजाला पूरक अशी एक नवीन गायनशैली निर्माण केली. आपली प्रतिभा व बुद्धिचातुर्याने निर्माण केलेली ही गायकी त्यांनी स्वतःच्या नावाने प्रचारात न आणता ती जयपूर गायकी म्हणून पुढे आणली.

**५) गायकी :**

उस्ताद अल्लादिया खाँ साहेबांची गायकी आकारयुक्त होती. लयीवरील प्रभुत्व, चमत्कृतीपूर्ण आलाप हे त्यांच्या गायकीचे वैशिष्ट्य होते. अवघड, पेचदार व गुंतागुंतीच्या तानांमुळे लोक त्यांना 'अवघडदास' असे म्हणत असत. त्यांच्या या आगळ्यावेगळ्या गायकीमुळे 'भगीरथ', 'गौरीशंकर' व 'अजब गायक' या नावाने लोक संबोधित असत. ते अप्रचलित राग गाऊन श्रोत्यांना मंत्रमुग्ध करायचे. एकंदरीत जयपूर घराणे म्हणजेच अल्लादिया खाँ व अल्लादिया खाँ म्हणजेच जयपूर घराणे असे समीकरण झाले.

**६) योगदान :**

खाँ साहेबांनी एका आगळ्यावेगळ्या गायकीची निर्मिती करुन संगीत जगतासाठी मोलाचे योगदान दिले. अवघड गायकी असूनही ती लोकप्रिय

करण्याचे श्रेय खाँ साहेबांनाच जाते. त्यांनी 'एमदपिया' व 'एमदगुणी' या टोपण नावाने अनेक बंदिशींच्या रचना केल्या. त्यांनी पूर्वी, खट, बहादुरी तोडी, सावनी, नट, बसंतीकेदार, मालीगौरी इत्यादि अप्रचलित रागसुद्धा प्रचारात आणले.

**७) मानसन्मान :**

त्यांनी पहिली मैफल अज़यगड संस्थानात सादर केली. या मैफलीत त्यांना अनेक श्रोत्यांनी दाद दिली. अथक परिश्रमाने त्यांनी तयार केलेल्या गायकीमुळे अनेक राजे महाराजे त्यांच्यावर खुश होते. नेपाळच्या नरेशांनी त्यांचे गाणे ऐकून ३०० रुपये तनखाँ व हत्ती देऊन सन्मानित केले व आपल्या दरबारात दरबारी गायक म्हणून नियुक्त केले. अनेक संस्थानिकांनी त्यांची कदर केली. महाराष्ट्रातील रसिकांनी त्यांना 'संगीतसूर्य' या पदवीने सन्मानित केले. बँ.जयकर यांनी त्यांना संगीतातील गौरीशंकर या नावाने संबोधित केले. खाँ साहेबांच्या बुद्धिप्रधान गायकीचे सर्वत्र कौतुक झाले. कोल्हापूरच्या शाहू महाराजांनीसुद्धा त्यांना दरबारी गायक म्हणून नियुक्त केले होते.

**८) शिष्यसंप्रदाय :**

उस्ताद अल्लादिया खाँ उत्तम गायक व रचनाकार होतेच परंतु ते एक उत्तम गुरुसुद्धा होते. त्यांनी अनेक नामवंत शिष्य निर्माण केले. यात पं. भास्करबुवा बखले, त्यांचे सुपूत्र मंजी खाँ व भूर्जी खाँ, केसरबाई केरकर, मोगूबाई कुर्डुकर, मल्लिकार्जुन मन्सूर, गोविंदराव शाळीग्राम, शंकरराव सरनाईक, निवृत्तीबुवा सरनाईक, गुल्लूभाई जसदनवाला इत्यादि शिष्यांचा उल्लेख करता येईल.

**९) समारोप :**

१९२२ मध्ये शाहू महाराजांच्या निधनानंतर खाँ साहेब मुंबई येथे वास्तव्यास आले. त्यातच त्यांचे पट्टशिष्य भास्करबुवा बखले व त्यांच्या गायकीचे खरे वारसदार सुपूत्र मंजी खाँ यांचे अकाली निधन झाले. या धक्क्यातून ते सावरलेच नाहीत. अशाप्रकारे १६ मार्च १९४६ रोजी त्यांची प्राणज्योत मावळली. खाँ साहेबांच्या स्मृती चिरकाल स्मरणात रहाव्यात यासाठी कोल्हापूर येथील एका चौकात त्यांचा अर्धपुतळा बसविला व त्या चौकाला अल्लादिया खाँ चौक असे नांव दिले. अशा या थोर कलावंतास कोटि कोटि प्रणाम.



# २१.

# उस्ताद फैय्याज खाँ

**१) प्रस्तावना :**

आग्रा घराण्याला कितीचा कळस चढविणारे थोर कलावंत म्हणजेच उस्ताद फैयाज खाँ साहेब होत. ज्यांनी आपल्या परिपक्व गायकीने आग्रा घराण्याला प्रतिष्ठा मिळवून दिली. ज्यांना विनासायास संगीत शिकता आले, ज्यांनी अनेक शिष्यांच्या माध्यमातून संगीत कला जिवंत ठेवली अशा थोर कलावंताच्या जीवन कार्याचा आढावा खालील मुद्यांच्या आधारे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

उस्ताद फैयाज खाँ साहेबांचा जन्म आग्राजवळील सिकंदराबाद येथे ८ फेब्रुवारी, १८८६साली झाला. त्यांच्या वडिलांचे नांव सफदर हुसैन खाँ असे होते. फैयाज खाँ यांच्या जन्मापूर्वी तीन चार महिन्याअगोदर त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यामुळे खाँ साहेबांच्या पालनपोषणाची जबाबदारी आईचे वडील गुलाम अब्बास खाँ यांच्यावर आली. त्यांनीही आपल्या नातवाचे पालनपोषण चांगल्या तऱ्हेने केले. बालपणातच त्यांना मातृ-पितृ कुळाकडून संगीताचे ज्ञानामृत मिळाले.

**३) गुरु आणि शिक्षण :**

ज्याप्रमाणे माशाला पोहायला शिकविण्याची आवश्यकता नसते त्याचप्रमाणे उ. फैयाज खाँ यांना संगीत शिक्षण घेण्यासाठी फार परिश्रम घेण्याची आवश्यकता पडली नाही कारण त्यांना मातृ-पितृ कुळाकडून अनुवंशिकतेने संगीताचा वारसा मिळाला. बालपणातच त्यांच्या आईचे वडील गुलाम अब्बास यांच्याकडून त्यांनी संगीताचे धडे घेण्यास प्रारंभ केला. तसेच वडिलांचे वडील महमद अली खाँ यांच्याकडून सुद्धा त्यांनी गानविद्या प्राप्त केली. याचबरोबर त्यांच्याकडून विविध रचना करण्याचा सुद्धा वारसा मिळाला.

**४) गायकी :**

खाँ साहेबांचा आवाज मर्दानी व भारदस्त होता. तसेच त्यांचा

आवाज जवारीदार होता. अथक परिश्रम करुन त्यांनी त्यांचा आवाज कसदार व गुंजनयुक्त बनविला होता. ते तीनही सप्तकांत मुक्त संचार करीत असत. स्वरावरील नियंत्रण, स्वरलगाव, मींडकाम अतुलनीय होते. त्यांची आलापचारी कल्पक व रंजक होती. गायनाची सुरुवात नोमतोमने करीत असत. सुरुवातीच्या नोमतोमीत रागाचे चित्र स्पष्ट होऊन जायचे. ख्यालाबरोबरच ते धृपद धमारही तेवढ्याच आवडीने व तयारीने पेश करीत असत. ख्याल गायनात बोल उपज, बोल बॉट, बोल बनाव, बोल आलाप व बोलताना यांची मुक्त बरसात करायचे. ते लयीचे पक्के होते. विलंबीत लयीबरोबरच दृतलयीत सुद्धा ते तेवढ्याच अधिकाराने गायन करायचे.

**५) आवडीचे गीतप्रकार :**

खाँ साहेब चतुरस्त्र गायक होते. शास्त्रीय गायनाबरोबरच ते उपशास्त्रीय संगीतातील प्रकार गात असत. यामध्ये होरी, दादरा, कजरी, त्रिवट, गझल इत्यादि प्रकार ते बेमालूमपणे पेश करीत असत. भैरवीमधील 'बाजूबंद खुलखुल जाये', खमाज मधील 'न मानूँगी' ही ठुमरी ते आवडीने गायचे. ते अनवट राग सुद्धा विशेष अधिकाराने गायचे. यामध्ये मलुहा, पंचम, खट, सिंधूरा, रामगौरी इ. रागांचा उल्लेख करता येईल. 'प्रेमपिया' या टोपण नावाने त्यांनी अनेक रचना केल्या.

**६) शिष्य संप्रदाय :**

खाँ साहेबांनी अनेक शिष्य घडविले यात दिलीपचंद्र बेदी, शराफत हुसैन, सोहनी सिंग, श्री. ना. रातंजनकर, के. एल. सायगल, विश्वदेव चटर्जी, अझमत हुसैन खाँ, अताहुसैन व बशिर खाँ इ. नामवंत शिष्यांचा उल्लेख करता येईल.

**७) मानसन्मान :**

उस्ताद फैयाज खाँ यांनी केलेल्या अथक परिश्रमाचे द्योतक म्हणून त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित केले. म्हैसूरचे नरेश कृष्णराव वाडियार हे खॉ साहेबांचे गाणे ऐकून प्रभावित झाले. त्यांनी खाँ साहेबांना 'सुवर्णपदक व आफताबे मौसिकी' (संगीतसूर्य) ही पदवी देऊन सन्मानित केले. बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड हेही खाँ साहेबांचे गाणे ऐकून प्रसन्न झाले. त्यांनी त्यांना 'ज्ञानरत्न' ही पदवी देऊन गौरविले तसेच त्यांची दरबारी गायक म्हणून नियुक्ती केली. त्यांच्या विविध ध्वनिफिती निघाल्या. आकाशवाणी केद्रांवरुन

त्यांचे गाणे प्रसारित झाले तसेच विविध संगीत संमेलनातून त्यांनी आपले गाणे सादर केले.

**८) स्वभाव :**

खाँ साहेब शांत स्वभावाचे होते. तसेच त्यांचा स्वभाव दिलदार, मनमिळावू व आगत्यशिल होता. त्यांना कार्यक्रमातून अमाप बिदागी मिळाली परंतू त्यांनी सढळ हाताने गोरगरीबांना वाटून टाकली. शिष्यांना ते मुलाप्रमाणे वागवित असत. शिष्यांना ते सढळ हाताने विद्यादान करीत असत. ते भावुक होते. महात्मा गांधीजीची हत्या झाल्यानंतर ते बडोदा आकाशवाणी केंद्रावर गेले. आकाशवाणी संचालकास ते म्हणाले, ''मला गावयाचे आहे.'' संचालकांनाही आनंद झाला. त्यांनी गाण्याची व्यवस्था केली. काय गाणार हे त्यांनी सांगितले नव्हते. त्यामुळे ''आता उस्ताद फैयाज खाँ गाणार आहेत.'' असे सांगितले. त्यांनी गावयास सुरुवात केली. रघुपती राघव राजाराम .. ईश्वर अल्ला तेरोनाम' हे गांधीजीचे आवडीचे भजन गाऊ लागले. गातागाता त्यांच्या मनावरील नियंत्रण सुटले व त्यांच्या डोळ्यातून अश्रु वाहू लागले. हे त्यांच्या संगीताचे पवित्र रुप होते.

**९) व्यक्तिमत्व :**

खाँ साहेबांचे व्यक्तिमत्त्व भारदस्त व रुबाबदार होते. शरीर धडधाकट, भरपूर उंची व जबडा मोठा होता. ते नेहमी डोक्यावर काळी उंच टोपी घालायचे. कल्लेदार मिशा त्यांना शोभून दिसायच्या. अंगात शेरवानी, बोटांत अंगठ्या, हातात चांदीची मूठ असलेली काठी व पायांत पंपशू असायचे. त्यांना मिळालेली सर्व पदके ते अभिमानाने कोटावर लावायचे. अशा या रुबाबदारपणामुळे त्यांचे व्यक्तीमत्व खुलून दिसायचे.

**१०) समारोप :**

ज्यांनी सढळ हाताने विद्यादान करुन अनेक शिष्य घडविले. ज्यांनी अथक परिश्रमाने आग्रा घराण्याची गायकी लोकप्रिय केली. ज्यांनी ३५० च्या वर रचना करुन भारतीय संगीतात भर टाकली असे उस्ताद फैयाज खाँ दोन वर्षे क्षयाने आजारी होते. यातच ५ नोव्हेंबर, १९५० रोजी बडोदा येथे त्यांचे देहावसन झाले. अशा थोर कलावंताचे कार्य भारतीय संगीत जगत कधीही विसरणार नाही.



# २२.

## उस्ताद अल्लाउद्दीन खाँ

**१) प्रस्तावना :**

माणसाला एका आयुष्यात एका वाद्यावर प्रभुत्व मिळविणे कठीण असते. परंतु ज्यांनी एकाच आयुष्यात सतार,व्हायोलिन, सुरबहार, सरोद, शहनाई यासारखे अनेक वाद्यें वाजविण्याची कला आत्मसात केली. किंबहुना ती सढळ हाताने अनेक शिष्यांना शिकवून भारतीय संगीत समृद्ध केले. ज्यांना मेहेर के बाबा म्हणून सारे संगीत विश्व ओळखत होते, किंबहुना २० व्या शतकातील महान गुरु म्हणून ज्यांचा उल्लेख करता येईल असे थोर वादक व कलावंत उस्ताद अल्लाउद्दीन खाँ यांच्या जीवन कार्याचा आढावा खालील मुद्द्यांच्या आधारे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

उस्ताद अलाउद्दीन खाँ यांचा जन्म इसवी सन १८६२ मध्ये ब्राह्मणबारीया जिल्ह्यातील शिवपूर (सद्या बांगलादेश) या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सबदार हुसेन खान तर आजोबांचे नाव मदार खाँ असे होते. वडील सबदार हुसेन खान यांनी प्रसिद्ध रबाब वादक उस्ताद काजीम अली खाँ यांच्याकडून संगीताचे शिक्षण घेतले होते. त्यामुळे अनुवंशिकतेने संगीताचा वारसा अल्लाउद्दीन खाँ यांच्याकडे आला. वयाच्या आठव्या वर्षाचे असताना त्यांना तालासुराचे ज्ञान अवगत झाले. अल्लाउद्दीनचा मोठा भाऊ फकीर आफताबुद्दीन याने त्यांना प्रथम संगीताची ओळख करून दिली.

**३) संगीत शिक्षणासाठी घर सोडले :**

घरात संगीताचे वातावरण असल्यामुळे आपणही कलकत्त्याला जावे व संगीत शिकावे असे त्यांना वाटले. आणि एके दिवशी त्यांनी घर सोडले. वय लहान परंतु संगीत शिकण्याची त्यांची इच्छा अगाध होती. कलकत्त्यात पोट भरण्याचे कोणताही साधन नव्हते. ते भिकाऱ्यांच्या रांगेत उभे राहायचे व एक वेळच्या जेवणावर ते समाधान मानायचे.

**४) गुरु व शिक्षण :**

कलकत्ता येथे पायपीट करीत असताना त्यांची गोपालचंद्र भट्टाचार्य यांची भेट झाली. त्यांच्याकडून गायन शिकण्यास प्रारंभ झाला. लोलो मास्टर आणि मुन्ने खान यांसारख्या संगीतकारांकडून स्टाफ नोटेशनचे शिक्षण घेतली. नंदा बाबू यांच्याकडून तबला व पखवाजाचे शिक्षण सुरू झाले. गोपाल चंद्रांचे निधन झाले. त्यानंतर स्वामी विवेकानंदांचे बंधू अमृतलाल दत्त ज्यांना लोक हबूल दत्त असे म्हणायचे त्यांची भेट झाली. त्यांच्याकडून त्यांनी फीडल व्हायोलिन, क्लॅरोनेट व बासरी शिकण्यास प्रारंभ केला. तेवढ्यावरच त्यांची सांगीतिक तृष्णा शमली नाही. त्यांनी उस्ताद अहमद अली खाँ यांच्यापासून सरोद वादनाचे शिक्षण घेतले. त्यानंतर अहमद अली खाँ त्यांना म्हणाले, ''माझ्याजवळ जेवढे ज्ञान होते ते मी तुला दिले आहे. पुढील ज्ञानार्जनासाठी तू उस्ताद वजीर खाँ यांच्याकडे जा.''

**५) रामपूरला प्रयाण :**

उत्तर प्रदेशात रामपूर हे संगीताचे प्रमुख केंद्र होते. उस्ताद वजीर खाँ यांच्या शोधात ते रामपूरला आले. तेथेही राहणे व जेवण्याची व्यवस्था होत नव्हती. एखाद्या मज्जिदीमध्ये कोपऱ्यात बसून राहायचे. मिळेल ते खायचे. त्यामुळे ते निराश झाले व आत्महत्येचा विचार त्यांच्या मनात येऊ लागला. अशातच एका मज्जिदीमध्ये एका मुल्लाची भेट झाली. त्यांनी उस्ताद अल्लाउद्दीन खाँ यांना आत्महत्येच्या विचारापासून परावृत्त केले. मौलवीने त्यांच्या मनात उत्साह भरला. ते रस्त्यावरून जात असताना रामपूरचा नवाब बग्गी मधून जात होता. तेव्हा अल्लाउद्दीन त्या बग्गी समोर उभा राहिले. नवाबने जवळ बोलावून त्यांची विचारणा केली.त्यांनी नवाबाला सर्व हकीकत सांगितली. अशाप्रकारे नवाबाच्या शिफारशीवरून अल्लाउद्दीन खाँ यांना वजीर खाँ यांच्याकडे संगीत शिक्षणासाठी पाठविले. गुरु घरची कामे करून गुरूला प्रसन्न करून घेतले. गुरुने घेतलेल्या विविध परीक्षेत ते पास झाले. तेव्हापासून त्यांना रबाब, सूरबहार इत्यादी वाद्ये वाजविण्यास शिकविली. उस्ताद अल्लाउद्दीन खाँ यांच्याकडून त्यांनी अनेक धृपदे व धमारांच्या बंदीची आत्मसात केल्या.

**६) मेहर दरबारात नोकरी :**

गुरूंचा आशीर्वाद घेऊन ते रामपूरहून संगीत प्रचार व प्रसारासाठी बाहेर पडले. काही दिवस कलकत्त्यात राहिल्यानंतर मेहरच्या दरबारात १५०

रुपये प्रति महा वेतनावर नोकरी करू लागले. तेथील राजा ब्रजनाथ हे सुद्धा त्यांचे शिष्य बनले. तेथेच त्यांनी मेहेर बँडची स्थापना केली. मेहेर येथे राजाचे मनोरंजन करत असतानाच अनेक शिष्य घडवले आणि मेहर घराण्याचे विशाल वटवृक्षात रूपांतर केले.

**७) एक आदर्श गुरु :**

उस्ताद अल्लाउद्दीन खाँ यांना संगीत शिकण्यासाठी अत्यंत कष्ट घ्यावे लागले. त्या कष्टाची जाणीव असल्यामुळे त्यांनी आपल्याकडे शिष्यांना कधीही विन्मुख पाठविले नाही. विद्यार्थ्यांकडून ते कधीही गुरुदक्षिणा घेत नव्हते. शिष्यांचा निवास आणि भोजन त्यांच्या घरीच व्हायचे. कठोर परिश्रम घेऊन विद्यार्जन केल्यामुळे त्यांनी शिष्यांना कठोर तालीम दिली. त्यांनी सढळ हाताने विद्यादान केले. त्यांच्या शिष्यावर नजर टाकली तर सर्व जाती धर्माचे शिष्य त्यांनी तयार केलेली दिसून येतात.

**८) शिष्य संप्रदाय :**

खा साहेब स्वतः दोनशे वाद्य वाजत होते. त्यामुळे विविध वादक शिष्य त्यांच्या हातून निर्माण झाले. खुल्या दिलाने विद्यार्थ्यांना विद्यादान करणारे ते एकमेव मुस्लिम गुरु असतील. त्यांनी पुत्र अली अकबर खाँ, पंडित रविशंकर, मुलगी अन्नपूर्णा देवी,पंडित पन्नालाल घोष,वसंत राय, बहादूर राय इत्यादी यशस्वी संगीतकार शिष्य घडविले.

**९) उदय शंकर यांच्या समवेत दौरा :**

१९३५ मध्ये खाँ साहेबांनी पंडित उदय शंकर यांच्या बॅले ग्रुपसोबत युरोपचा दौरा केला. त्यांनी त्यांच्यासमवेत फ्रान्स, अमेरिका बेल्जियम, इटली इत्यादी देशांचा दौरा केला. त्यानंतर ते उत्तराखंडमधील अल्मोरा येथे असलेल्या 'उदय शंकर इंडिया कल्चर सेंटर'शीही बराच काळ जोडले गेले.

**१०) स्वभाव :**

मुस्लिम असतानाही ते सात्विक व शाकाहारी जेवण घ्यायचे. राजा महाराजांच्या दरबारात दारू, गांजा, अफीम अशा नशिल्या वस्तू सहज उपलब्ध व्हायच्या. परंतु ते आयुष्यभर निर्व्यसनी राहिले. मेहरच्या देवीवर त्यांची विशेष श्रद्धा होती. ते दररोज देवीचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात जात असत. ते दयाळू होते. परंतु शिकवित असताना ते तेवढेच कठोर व्हायचे. त्यांच्या घरात अनेक हिंदू देवी देवतांचे फोटो लावलेले होते.

**११) यशस्वीता :**

विदेशात त्यांना अनेक मानसन्मान मिळाले. विविध संगीत संमेलनातून व आकाशवाणी केंद्रातून त्यांचे गायन प्रसारित झाले. उस्ताद अल्लाउद्दीन खान यांना १९५८ मध्ये कला क्षेत्रात पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याआधी १९५४ साली संगीत नाटक अकादमीने सर्वात मोठा सन्मान 'संगीत नाटक अकादमी फेलोशिप' बहाल केला होता.

**१२) समारोप :**

उस्ताद अल्लाउद्दीन खाँ यांनी अथक परिश्रमाने अनेक शिष्य निर्माण करून भारतीय संगीताला सातासमुद्राच्या पलीकडे पोहोचविले. असे थोर कलावंत ६ सप्टेंबर १९७२ रोजी पैगंबरवासी झाले. आपल्या हयातीत त्यांनी अनेक रागांची रचना करून जगप्रसिद्ध मैहर घराण्याचा पाया घातला. त्यांच्या सर्वात उल्लेखनीय रेकॉर्डिंगपैकी, १९५०-६० च्या दशकातील ऑल इंडिया रेडिओवरील रेकॉर्डिंग सर्वात प्रसिद्ध आहेत. त्यांच्या सरोद, व्हायोलिन व सूरबहार वाद्यातल्या अनेक ध्वनिफिती तयार झालेले आहेत. त्या आजही आकाशवाणीच्या विविध केंद्रावरून प्रसारित होत असतात. त्यांच्या अमर वादनातून त्यांची प्रतिभा शक्ती दिसून येते.



# २३.

## पंडित विनायकबुवा पटवर्धन

**१) प्रस्तावना :**

भारतीय संगीताचा सुगंध आज साता समुद्र पलीकडे पोहोचला आहे. परंतु एकेकाळी संगीत हे मर्यादित लोकांपुरतेच सीमित होते. अशावेळी महाराष्ट्रातील अनेक कलावंतांनी भारतीय संगीताचा प्रचार व प्रसार करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेतले. अशा परिश्रम घेणाऱ्या कलावंतांमध्ये पंडित विनायकबुवा पटवर्धन यांचा नामोल्लेख करावा लागेल. ग्वाल्हेर घराण्यातील या कलावंताच्या

जीवन कार्याचा आढावा पुढील मुद्द्यांच्या आधारे घेता येईल.

**२) जन्म व शिक्षण :**

पंडित विनायकराव पटवर्धन यांचा जन्म २२ जुलै इसवी सन १८८९ मध्ये मिरज येथे झाला. घरात संगीताचे वातावरण होते. त्यांचे काका केशवराव पटवर्धन हे उत्तम गायक होते. बालपणापासूनच विनायकरावांनी केशवराव पटवर्धन यांच्याकडून संगीताचे धडे घेण्यास प्रारंभ केला. अत्यंत मेहनत घेऊन त्यांनी मनःपूर्वक संगीताचे अध्ययन केले. त्यानंतर वयाच्या नवव्या वर्षापासून त्यांनी पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर यांच्याकडून संगीताचे शिक्षण घेण्यास प्रारंभ केला. संगीताचे ज्ञान आयोजन करीत असतानाच त्यांनी पंडित पुरस्कारांसमवेत अनेक ठिकाणी प्रवास केला. त्या काळात गांधर्व महाविद्यालयाच्या मुंबई,नागपूर व लाहोर येथे शाखा होत्या. त्या शाखांमधून संगीत अध्यापनाचे कार्य विनायकरावांनी केले.

**३) गंधर्व नाटक मंडळीत प्रवेश :**

त्या काळात बालगंधर्वांची गंधर्व नाटक मंडळी नावारूपाला येत होती. गायक मंडळींना नाटकात मानाचे स्थान होते. विनायकराव व बालगंधर्वांचा परिचय झाला. त्यामुळे त्यांनी गंधर्व नाटक मंडळी प्रवेश केला. अनेक नाटकात आपल्या गायन व अभिनय कौशल्याने त्यांनी काही नाटकात समर्थपणे भूमिका साकारल्या.

**४) गांधर्व महाविद्यालयातून संगीत सेवा :**

पंडित विष्णू दिगंबर पलुस्करांना नाटकाचे क्षेत्र आवडत नव्हते. कारण त्याकाळी नाटकात काम करणे अप्रतिष्ठेचे समजले जाई. त्यामुळे पंडित पुरस्कारांच्या सांगण्यावरून पंडित विनायकरावांनी गंधर्व नाटक मंडळी सोडावी लागली. १९६७ मध्ये गांधर्व महाविद्यालयाची पुणे येथे शाखा स्थापन करण्यात आली होती. त्या शाखेतून संगीताचा प्रचार व प्रसार करावा असे पंडित पुरस्कारांनी विनायक बुवांना सांगितले. तेव्हापासून पंडित विनायकराव पुणे येथे स्थायिक झाले व विद्यार्थ्यांना संगीताचे धडे देऊ लागले.

**५) गायकी :**

पंडित विष्णू दिगंबर पुरस्कारांसारख्या महान गुरूंकडून त्यांनी ज्ञान संपादन केल्यामुळे ग्वाल्हेर घराण्याची सर्व वैशिष्ट्ये त्यांनी आत्मसात केली होती. त्यांचा आवाज पहाडी व दमदार होता. बडा ख्याल व छोटा ख्याल

गायल्यानंतर ते तराना गात असत. ते तराना गाण्यांमध्ये पारंगत होते. ते तराना अतिदृत लयीत सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध करायचे. तराना गाताना ते विविध लयकारी करीत असतात. त्यामुळे श्रोते ताल ब्रह्मात डुंबून जात असत. तबल्याबरोबरची लढत भिडंत करण्यात त्यांना रुची होती. या सर्व गान वैशिष्ट्यांमुळे श्रोत्यांबरोबरच संगीतातील जाणकार सुद्धा त्यांच्या गायनाला दिलखुलासपणे दाद द्यायचे.

**६) नवोदित गायकांना सल्ला :**

विनायकराव नवोदित गायकांना कसे गायन करावे या संदर्भात मार्गदर्शन करायचे. ते म्हणायचे की, ''गायन करताना गायकांनी शब्दांच्या उच्चाराकडे बारकाईने लक्ष द्यावे. मग तो कोणताही प्रकार असो. चित्रपट संगीतापेक्षा शास्त्रीय संगीत हे श्रेष्ठ आहे हे दाखवण्यासाठी गायकांनी ठुमरी गाऊन दाखवावी. परंतु ठुमरी गायन इतके सोपे नाही. बोलताना गाताना गीतातील शब्द तुटणार नाहीत याची दक्षता गायकाने घ्यावी.'' ते म्हणायचे, ''मैफलीत भजन गाऊन त्यांना भक्ती रसाची अनुभूती करून द्यावी. तसेच ते म्हणायचे की भावगीत गात असताना गीताचा अर्थ महत्त्वाचा असतो परंतु अनेक वेळा भावगीत हे चालीत बसण्याच्या अट्टाहासापोटी आपण त्या भावगीताच्या अर्थाची हत्या करून टाकत असतो.'' खरोखरच त्यांचे हे मार्गदर्शन नवोदित गायकांना निश्चितच दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक आहे या शंका नाही.

**७) योगदान :**

पंडितजींनी 'राग विज्ञान' या ग्रंथाची निर्मिती करून सांगीतिक साहित्यात भर टाकलेली आहे. ज्या ग्रंथात त्यांनी प्रचलित व अप्रचलित रागातील संगीतशास्त्रावरील बंदिशींचा संग्रह केला आहे. याचबरोबर त्यांनी संगीत शास्त्रावरही विवेचन केलेले आहे. आकाशवाणी केंद्रावरून त्यांचे अनेक वेळा गायन प्रसारित झालेले आहे. त्याचबरोबर त्यांच्या अनेक ध्वनीफितींचे प्रकाशन झाले आहे. त्यातील जयजयंती रागाची ध्वनिफीत सर्वाधिक खपाची ठरलेली आहे.

**८) पुरस्कार :**

पंडितजींनी केलेल्या अथक परिश्रमांचे द्योतक म्हणून त्यांना अनेक पुरस्काराने सन्मानित केले.

१) त्यांना डिसेंबर १९६५ मध्ये संगीत नाटक अकादमी पुरस्कार मिळाला.

२) मार्च १९७२ मध्ये भारत सरकारकडून पद्मभूषण पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले.

३) भारतीय सांस्कृतिक शिष्टंडळासमवेत रूस या देशाचा त्यांनी सांगीतिक दौरा केला. त्याबरोबरच अनेक सामाजिक, सांस्कृतिक संस्थांकडून शेकडो पुरस्कार व मानसन्मान त्यांना प्राप्त झालेले आहेत.

**९) समारोप :**

ज्यांनी ग्वाल्हेर गायकीचा देश विदेशात प्रचार केला, ज्यांनी अथक परिश्रमाने गांधर्व महाविद्यालयाच्या पुणे शाखेत आयुष्यभर संगीताचे अध्यापन केले, असे थोर कलावंत २३ ऑगस्ट १९७५ रोजी पुणे येथे कालवश झाले.



# २४.

## पंडित श्रीकृष्ण नारायण रातंजनकर

**१) प्रस्तावना :**

भारतीय संगीतात अंधार पसरत असतानाच महाराष्ट्र भूमीने अनेक कलावंत भारत देशाला दिले. यामध्ये पं. विष्णू दिगंबर पलुस्कर कर, पं. वि.ना. भातखंडे याचबरोबर ओंकारनाथ ठाकूर, नारायणराव व्यास, श्रीकृष्ण रातंजनकर यांचा नाम उल्लेख करावा लागेल. अशा अनेक कलावंतांनी भारतीय संगीताच्या संवर्धनासाठी मोलाचे योगदान दिले. त्या अनेक कलावंतांपैकी पं.श्रीकृष्ण रातंजनकर यांच्या कार्याचा आढावा खालील मुद्द्यांच्या आधारे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

पं. श्रीकृष्ण रातंजनकर यांचा जन्म ३१ डिसेंबर १८९९ मध्ये मुंबई येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव नारायण गोविंद असे होते. ते पोलीस

विभागात कार्यरत होते परंतु संगीताबद्दल त्यांच्या मनात प्रचंड अस्था होती. ते रोज संगीताचा रियाज करायचे. त्या काळात संगीताला प्रतिष्ठा नव्हती.अशा काळात त्यांनी आपल्या दोन मुलांना संगीताचे शिक्षण दिले.

**३) गुरु व शिक्षण :**

श्रीकृष्ण यांना लहानपणी अण्णा असे म्हणत असतात. अण्णांचे संगीतातील प्राथमिक शिक्षण कृष्णानंद भट्ट यांच्याकडे झाले. त्यानंतर त्यांनी पंडित अनंत मनोहर जोशी यांच्याकडून संगीताचे उच्चस्तरीय शिक्षण घेतले. अशातच त्यांच्या वडिलांच्या एक मित्र पंडित वि.ना. भातखंडे यांचे मित्र होते. त्यांनी श्रीकृष्णांना वयाच्या तेरा वर्षी पंडित भातखंडे यांच्याकडे नेहले. पंडित भातखंडे यांनी या छोट्याशा श्रीकृष्णाचे गाणे ऐकले व म्हणाले, ''हा होतकरू मुलगा एके दिवशी निश्चितच थोर गायक आणि विद्वान होईल.'' तेव्हापासून पंडित विष्णू नारायण भातखंडे यांनी श्रीकृष्णांना संगीताची तालीम देण्यास प्रारंभ केला. इसवी सन १९१६ मध्ये बडोदा येथे पहिले संगीत संमेलन संपन्न झाले. ज्यात श्रीकृष्णजी यांना गाण्याची संधी मिळाली. गाणे अत्यंत प्रभावी व श्रवणीय झाले. त्यामुळे सर्व श्रोते मंत्रमुग्ध झाले. त्याचाच परिणाम म्हणून बडोदा संस्थानाचे नरेश श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांनी त्यांना छात्रवृत्ति दिली व उस्ताद फैय्याज खाँ यांच्याकडे गाणे शिकविण्यासाठी पाठवून दिले. त्यानंतर श्रीकृष्ण मुंबईहून बडोद्याला गेले. तेथे जवळपास पाच वर्षापर्यंत त्यांनी उस्ताद फैय्याज खाँ यांच्याकडून आग्रा घराण्याची तालीम घेतली.

**४) योगदान :**

अथक परिश्रमाने संपादन केलेल्या गानविद्यामुळे त्यांची सर्वत्र ख्याती पसरू लागली. देशातील मोठमोठ्या शहरातून त्यांना मैफलीसाठी निमंत्रण येऊ लागली. पंडित भातखंडे यांनी मुंबई येथे शारदा संगीत महाविद्यालयाची स्थापना केली. तिथे सुरुवातीच्या काळात श्रीकृष्णजी यांना शिक्षक म्हणून काम करता आले. १९२६ मध्ये पंडित वि.ना भातखंडे यांनी लखनऊ येथे मॅरिस कॉलेजची स्थापना केली. या महाविद्यालयातून संगीताचे अध्यापक म्हणून त्यांनी कार्य केले. त्यानंतर १९२८ मध्ये त्या महाविद्यालयाचे प्राचार्य झाले. त्यानंतर त्यांनी इंदिरा कला संगीत विश्वविद्यालय, खैरागड येथे सुद्धा प्र -कुलगुरू म्हणून तीन वर्ष कार्य केले. त्यानंतर आकाशवाणी केंद्रावर

त्यांनी नोकरी केली. त्यांनी अनेक सांगीतिक ग्रंथाचे लेखन केले. तसेच काही संस्कृत ग्रंथाचे भाषांतर सुद्धा केले. त्यापैकी 'संगीत शिक्षा' 'तान संग्रह ३ भाग' हे ग्रंथ उपयुक्त ठरलेले आहेत.

**५) गायन शैली :**

श्रीकृष्ण रातंजनकर यांच्या गायकीवर उस्ताद फैय्याज खाँ यांचा प्रभाव दिसून येतो. ते ख्याल सुरू करण्यापूर्वी रागाचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी नोम तोमची आलापी करीत असत. स्वर लगाव अत्यंत भावपूर्ण असायचे. ख्याल भरण्याची शैली सुद्धा हुबेहूब उस्ताद फैय्याज खाँ यांच्यासारखीच होती. पंडितजींनी 'हरप्रिया' ह्या रागाची निर्मिती केली. याबरोबरच त्रिवेणी, पंचम, रजनी कल्याण, लक्ष्मी तोडी, सालगवराली, नारायणी, धनश्री असे अप्रचरित राग सुद्धा ते लीलया गात होते. आकाशवाणीच्या माध्यमातून त्यांचे गायन अनेक वेळा प्रसारित झाले. त्यांच्या शिष्यांमध्ये डॉ. सुमती मुरारकर व डॉ. शत्रुघ्न शुक्ल, डॉ.सुशील मिश्र, यशवंत महाले, पंड, के जी. गिंडे यांचा उल्लेख करता येईल.

**६) पुरस्कार :**

इसवी सन १९४२ मध्ये लखनऊ येथील मॅरेज कॉलेज ऑफ मॅरेज म्युझिक कॉलेज यांच्या वतीने संगीताचार्य या पद्धतीने त्यांना सन्मानित करण्यात आले. पंडितजींच्या संगीत सेवेबद्दल त्यांना भारत सरकारने १९५७ साली पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन सन्मानित केले. त्याचबरोबर संगीताचार्य ही पदवी सुद्धा त्यांना बहाल करण्यात आली. याचबरोबर विविध सांस्कृतिक, सामाजिक तसेच शैक्षणिक संस्थांनी त्यांना अनेक पुरस्कार देऊन सन्मानित केले.

**७) समारोप :**

ज्यांनी संपूर्ण आयुष्य संगीत सेवेसाठी समर्पित केले. ज्यांनी विविध महाविद्यालय व विद्यापीठातून संगीताचे अध्यापन कार्य केले असे निष्काम कर्मयोगी पंडित श्रीकृष्ण रातंजनकर यांचा १४ फेब्रुवारी १९७४ मध्ये निधन झाले. अशा या थोर कलावंताचे ऋण भारतीय संगीत जगत कधीही विसरणार नाही.



# २५.

## पं. गोविंद सदाशिव टेंबे

**१) प्रस्तावना :**

नदी कधीही सरळ वाहत नाही. ती कधी डोंगरातून, कधी दरीतून वाहते.वाटेत येणाऱ्या काट्याकुट्यांना आपल्यात सामावून घेत कधी शांत तर कधी चंचलपणे धावत असते. रस्त्यात येणाऱ्या दगडधोंड्यांना व अडथळ्यांना न जुमानता वेडीवाकडी वळणे घेत ती पुढे मार्गक्रमण करीत असते. त्यामुळेच ती सुंदर दिसत असते. आयुष्याच्या रंगमंचावर एकाच प्रकारच्या भूमिका न करता कधी हार्मोनियमवादन तर कधी संगीत दिग्दर्शक, कधी सर्कस मॅनेजर, कारकून तर कधी लेखक म्हणून विविध भूमिका यशस्वीपणे पार पाडल्या. त्यामुळेच पं. गोविंदराव टेंबे यांना त्या नदीप्रमाणे सौंदर्य लाभले. अशा प्रकारे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व लाभलेल्या पं. गोविंदराव टेंबे यांच्या जीवनकार्याचा आढावा खालील मुद्यांच्या आधारे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

श्रेष्ठ हार्मोनियमवादक पं.गोविंदराव टेंबे यांचा जन्म ५ जून, १८८५रोजी कोल्हापूर जवळील सांगवडे या गावी झाला. त्यांचे बालपण अगदी सुखात गेले. अनेक कलावंतांना सांगीतिक वारसा लाभलेला असतो. परंतु घरात कुणीही संगीतकार नसताना त्यांनी हार्मोनियमसारख्या सुषिर वाद्यावर भारतीय दर्जाचे प्रभुत्व मिळविले हे त्यांचे उल्लेखनीय श्रेष्ठत्व होय. त्यांचे शालेय शिक्षण कोल्हापूर येथे झाले. लहानपणापासूनच त्यांना नाटके पाहण्याची आवड निर्माण झाली. वयाच्या ११ व्या वर्षापासूनच ते कीर्तनाबरोबर हार्मोनियम वाजवीत असत. याच काळात नाट्यपदांना हार्मोनियमवर वाजवून पाहत असत. शालेय शिक्षण संपल्यानंतर त्यांनी वकिलीचा अभ्यास केला. पुढे त्यांनी वकिलीचा व्यवसायही सुरू केला. परंतु संगीताची अभिरुची असल्यामुळे ते आपला अधिक वेळ संगीत साधनेतच घालवित असत.

### ३) गुरू व शिक्षण :

बहुदा असे म्हटले जाते की, संगीताचा वारसा पितृत्वाकडून किंवा की संगीताचे संस्कार मुलावर होतात. परंतु असे मातृत्वाकडून चालत आला नसतानाही पं. गोविंदरावांनी स्वतःच्या प्रतिभेने संगीतविद्या आत्मसात केली. वास्तविक पाहता त्यांनी कोणत्याही गुरूकडून संगीताचे शिक्षण घेतले नाही. तरीसुद्धा जयपूर घराण्याचे आद्य प्रवर्तक उस्ताद अल्लादिया खाँ व पं. भास्करबुवा बखले यांच्या गायनाचा प्रभाव त्यांच्यावर होता. पं. भास्करबुवा बखले यांना तर ते गुरू मानीत असत. आग्रा घराण्याचे नत्थन खाँ तर ग्वाल्हेर घराण्याचे रहिमत खाँ यांचाही त्यांच्यापुढे आदर्श होता. त्यांच्या वादनशैलीत गोहरजान, मलकाजान व जोहराबाई यांच्याही कला-नैपुण्याचा प्रभाव होता. पुढे ते बर्कतुल्ला यांचे गंडाबंद शागीर्द झाले. पण त्यांना त्यांच्याकडून संगीताचे धडे घेता आले नाही. असे असले तरी त्यांनी बर्कतुल्ला यांच्या अनेक मैफली ऐकल्या.आधुनिक युगातील शिष्यांना संगीत शिक्षणासाठी अनेक साधने उपलब्ध आहेत. परंतु अशा सोयी-सवलती उपलब्ध नसतानाही त्यांनी एकलव्याप्रमाणे संगीत साधना करून ज्ञानप्राप्ती करून घेतली. एवढेच नव्हे तर स्वबळावर त्यांनी उत्कृष्ट हार्मोनियमवादक व संगीत दिग्दर्शक म्हणून नावलौकिक मिळविला.

### ४) घेतलेले परिश्रम :

मुळातच तुटक आणि कर्कशतेकडे झुकलेल्या हार्मोनियम या वाद्याला भारतीय संगीताचा मुलामा चढविला. या वाद्याला साथ संगतीचे वाद्य म्हणून प्रतिष्ठा मिळवून दिली. अथक परिश्रम घेऊन या वाद्याला लोकप्रियतेचा कळस चढविला. गोविंदरावांच्या काळात सर्व संगीत नाटके होती. नाटकातील सांगीतिक बाजू भक्कम करण्यासाठी त्यांनी कष्ट घेतले. नाट्यगीतांच्या चाली देताना ते गायन नाटकास कसे अनुरूप होईल याचाही विचार त्यांनी केला. टेंबे हे कल्पक संगीतकार होते. नाटकाच्या चाली देताना त्या चाली कशा अजरामर होतील याबाबत ते जागरूक असत. लहानपणापासूनच त्यांनी भरपूर श्रवणभक्ती केल्यामुळे त्यांची कल्पनाशक्ती वाढली होती. ऑपेरासारखे प्रयोग त्यांनी महाराष्ट्राच्या रंगभूमीवर आणले.

### ५) शिवराज नाटक कंपनीची स्थापना :

पं. गोविंदराव टेंबे यांनी सुरुवातीच्या काळात बालगंधर्वांच्या गंधर्व नाटक मंडळीत संगीत दिग्दर्शक म्हणून काम पाहिले. त्यानंतर त्यांनी स्वतःच्या

नाटक कंपनीची सुरुवात केली. त्या नाटक कंपनीचे नाव 'शिवराज नाटक कंपनी' असे होते. ही नाटक कंपनी १९१५ मध्ये स्थापन केली. या नाटक कंपनीच्या माध्यमातून त्यांनी अनेक महत्त्वाच्या भूमिका यशस्वीरित्या पार पाडल्या. नाटकामध्ये संवाद साधण्यासाठी निसर्गदत्त आवाजाची देणगी असायला हवी. परंतु तशा प्रकारचा आवाज नसतानाही त्यांनी केवळ गाणकौशल्यावर अनेक भूमिका सांगीतिक बाजूने यशस्वी केल्या. त्यांनी 'वरवंचन' या नाटकात कृष्णकांचन व 'विद्याहरण' या नाटकात कचाची भूमिका केली. काही काळानंतर कर्जबाजारीपणामुळे त्यांना शिवराज नाटक कंपनी बंद करावी लागली.

### ६) दिग्दर्शन :

गोविंदरावांनी ठुमरी, कजरी, दादरा यांसारख्या उपशास्त्रीय संगीताचा अभ्यास केला होता. याचाच फायदा त्यांना पदांना चाली देण्यासाठी झाला. १९१० साली नाट्याचार्य खाडिलकर यांनी गोविंदरावांकडे मानापमान नाटकाला चाली देण्याचे काम सोपविले. मानापमान या नाटकाला त्यांनी ठुमरी व कजरी या गीतप्रकाराच्या चाली लावल्या. पुरब बाजाचे संगीत असले तरी पदांवर काही परिणाम होणार नाही याची काळजी त्यांनी घेतली. या नाटकातील पदे इतकी लोकप्रिय झाली की ती आजही मराठी माणसाच्या हृदयावर अधिराज्य करीत आहेत. त्यांनी अनेक भजनांना चाली दिल्या. त्यांनी संगीतबद्ध केलेले 'मन रामी रंगले' हे भजन आजही लोकप्रियतेच्या शिखरावर आहे.

### ७) रंगमंचावर आणलेली नाटके :

गोविंदरावांनी सिद्धसंसार, चंद्रग्रहण, मृच्छकटीक, देशदीपक, संगीत भामिनी इ. नाटके रंगमंचावर आणली. पौराणिक नाटकांमध्ये वरवंचन, संगीत पटवर्धन, तारकाराणी, वत्सलाहरण, द्रौपदी स्वयंवर, तुलसीदास इ. नाटकांचे लेखन केले व ही नाटके रंगमंचावर आणली. त्यांनी 'सौभद्र' व 'शाकुंतल' यांसारख्या स्वरनाटिका रंगमंचावर आणल्या. अशा स्वरनाटिकांमध्ये प्रत्येक संवाद हा काव्यातून केला जातो. हा अभिनव प्रयोग त्यांनी महाराष्ट्रात केला. वास्तविक पाहता यातील प्रत्येक काव्याला प्रसंगानुरूप चाली देणे तसे कठीणच असते.

परंतु टेंबे यांनी या काव्यांना अभिजात संगीताच्या चाली लावल्या. या प्रयोगाचे सर्वत्र कौतुक झाले. 'जयदेव' व 'महाश्वेता' यांसारखी नाटके

पाश्चात्त्यांच्या ऑपेराच्या धरतीवर सादर केली. यामध्ये संपूर्ण नाटक हे नृत्याच्या माध्यमातून साकारायचे असते. हाही शिवधनुष्य त्यांनी लीलया पेलला. या ऑपेराचे संगीत दिग्दर्शन व लेखनाचे काम त्यांनीच केले.

**८) ग्रंथलेखन :**

पं. गोविंदराव टेंबे यांनी नाट्यलेखनाबरोबरच चरित्रपर ग्रंथ व टीकात्मक ग्रंथाचे लेखन करून सांगीतिक साहित्यात भर पाडली. त्यांनी 'माझा जीवन व्यासंग', 'माझा संगीत व्यासंग' व 'जीवन विहार' हे आत्मचरित्रपर ग्रंथ लिहिले. तसेच जयपूर घराण्याचे अध्वर्यू गाणसम्राट अल्लादिया खाँ यांचे चरित्र लिहिले. राग पद्धतीचे वर्णन करून त्या रागात स्वरबद्ध केलेल्या नाट्यगीतांचा आढावा घेणारा 'कल्पना संगीत' हा समीक्षा ग्रंथ लिहिला. याशिवाय मासिकातून संगीताच्या मैफलीचे रसग्रहणपर टीकात्मक लेखनही त्यांनी केले.

**९) वादनशैली :**

गोविंदरावांच्या अद्वितीय हार्मोनियम वादनशैलीमुळेच मैफलीमध्ये साथीसाठी सारंगीऐवजी हार्मोनियम या वाद्याने जागा घेतली. संगीताच्या बैठकीत रागादि शास्त्र नियमांचे योग्य पालन करून विविध ख्याल ठुमरी, भजने, चिजा, नाट्यपदे आपल्या अंगुली नैपुण्याने ते असे काही पेश करायचे की जणू गोविंदराव हार्मोनियममधून अतिशय सुरेल आणि रंगेल गातच आहेत. याचाच प्रत्येक वेळी प्रत्यय यायचा. ख्याल शैली जितकी संथ, कल्पक, डौलदार तितकीच त्यांची भजने भक्तिरसप्रधान असायची. नाट्यसंगीत वाजवीत असताना तर प्रत्यक्ष रंगदेवताच अवतीर्ण व्हायची. त्यांचे हार्मोनियमवादन ऐकून एखादा कलावंतच नाट्यगीत गातोय की काय असा भास व्हायचा. आलाप, ताना, गमक, खटका, स्वरलगाव, मींड इ. अलंकारिक सौंदर्यस्थळे जशीच्यातशी टिपण्याचे कौशल्य त्यांच्याकडे होते. ते तालासुरात पक्के होते. अंगुलीचापल्य, अंगुलीनैपुण्य, अचुक स्वरस्थाने आणि त्यांची कलात्मकता अद्वितीय होती. भात्यावरील दाब व नियंत्रण,स्वरांमधील चढउतार, हाताची तयारी, कुठे जोरकस उठाव तर कुठे हळुवार इ.बाबीवर त्यांचा अधिकार होता. चेहऱ्यावरील सुहास्यपूर्ण हावभाव, अर्थपूर्ण हातवारे आणि देखणे व्यक्तिमत्त्व या गोविंदरावांच्या कलाकारीतेच्या जमेच्या बाजू होत्या.साथसंगतीचे वाद्य असलेल्या हार्मोनियम या वाद्याला स्वतंत्र वादनाचा दर्जा त्यांनी प्राप्त करून दिला. त्यांनी स्वतःच्या नावाचा आणि हार्मोनियमचा

जबरदस्त ठसा निर्माण केला होता. हार्मोनियम आणि गोविंदराव असे समीकरणच झाले होते.

**१०) यशस्विता :**

१९३५ मध्ये पुणे येथे संपन्न झालेल्या नाट्यसंमेलनामध्ये अध्यक्ष होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. परदेशी दौरा करण्याचे भाग्यही त्यांना लाभले. प्रथम म्हैसूरच्या युवराजाबरोबर कोलंबो, सिंगापूर, हाँगकाँग, जपान या देशांचे भ्रमण केले. तर दुसऱ्या वेळेस युरोप दौरा करून भारतीय संगीताचे स्वर सातासमुद्राच्या पलीकडे नेण्याचे भाग्य त्यांना लाभले. 'अयोध्येचा राजा' या पहिल्या बोलपटात भूमिका व संगीत दिग्दर्शन करण्याचा मान त्यांना मिळाला. याचबरोबर त्यांनी 'माया मच्छिंद्र' या सिनेमात मच्छिंद्रनाथांची भूमिका सुरेख वठवली. 'तुलसीदास', 'उषा स्वप्न' व 'मीराबाई' इत्यादी चित्रपटांमध्ये रागदारी संगीताचे अप्रतिम संगीत दिग्दर्शन केले. त्यांच्या हार्मोनियम वादनाच्या अनेक ध्वनिमुद्रिकाही प्रसारित झाल्या. गोविंदरावांनी वसंत देसाई, गुंडोपंत वालावलकर, व्ही. एन. पाबळकर यांच्यासारखे शिष्य निर्माण केले.

**११) अष्टपैलू व्यक्तिमत्त्व :**

पं. गोविंदराव टेंबे यांचे व्यक्तिमत्त्व अष्टपैलू होते. ते हार्मोनियमवादक तर होतेच परंतु ते चतुरस्र संगीततज्ज्ञ, दर्जेदार साहित्यिक, प्रतिभासंपन्न संगीत दिग्दर्शक, कुशल नट, नाट्यलेखक, कल्पक कवी, कारकून, सर्कस व्यवस्थापक, वकील, तालीम मास्तर, नाटक मंडळाचे संचालक, समीक्षक व चित्रपट दिग्दर्शक होते. लहानपणी ते उत्तम क्रिकेटपटू व टेनिसपटूही होते. ते नाकीडोळी लावण्यपूर्ण कलावंत होते. ते मुळातच गौर वर्णीय असलेले गोविंदराव पोशाखाच्या बाबतीतही जागरूक असत. अशा प्रकारे अंतर्बाह्य सौंदर्याने त्यांचे व्यक्तिमत्त्व खुलून दिसत असे.

**१२) समारोप :**

महाराष्ट्राच्या रंगभूमीवर क्रांती घडवून आणणारे कलावंत वयाच्या ७४ व्या वर्षी दिल्ली येथे सेंट्रल ऑडीशन बोर्डाच्या कामानिमित्त गेले परंतु दुर्दैवाने तेथेच त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि ते काळाच्या पडद्याआड निघून गेले. तो दिवस होता ९ ऑक्टोबर, १९५५ ज्यांनी महाराष्ट्राच्या रंगभूमीवर अनेक अभिनव प्रयोग केले अशा कलावंताला कोटीकोटी प्रणाम!



# २६.

## पंडित गजानन बुवा जोशी

**१) प्रस्तावना :**

शहनाई म्हटले की उ. बिस्मिल्ला खाँ, सतार म्हटले की पं. रविशंकर, बासरी म्हटले की पं. पन्नालाल घोष, सरोद म्हणले की उ. अलिअकबर खाँ, हार्मोनियम म्हटले की पं. गोविंदराव टेंबे, तबला म्हटले की उ. झाकीर हुसेन आपल्या डोळ्यांसमोर दिसतात. तसेच व्हायोलिन म्हणताच पं. गजाननबुवा जोशी यांचे नाव आपल्या डोळ्यांसमोर येते. व्हायोलिन वादनात आणि गाण्यात ज्यांनी अतिउच्च शिखर गाठले. अशा महान कलावंतांच्या जीवनकार्याचा आढावा खालील मुद्यांच्या आधारे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

पं. गजाननबुवा जोशी यांचा जन्म मुंबई येथे झाला. त्यांच्या जन्मसालाबाबत काही मतभेद आहेत. काहींच्या मते ३० जानेवारी, १९९१ तर काहींच्या मते ३० जानेवारी, १९१० असा त्यांचा जन्मदिनांक आहे. साताराजवळील किन्हई हे त्यांचे मूळ गाव. गजाननबुवांचा जन्म सांगीतिक वारसा असलेल्या घरात झाला. बुवांचे आजोबा मनोहर जोशी हे गायक होते. वडील अनंत मनोहर जोशी हे सुद्धा घरंदाज गायक होते. त्यांनी ग्वाल्हेर घराण्याची तालीम पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांच्याकडून घेतली होती. वडिलांच्या गाण्याचे संस्कार बाल गजाननावर होऊ लागले. १९५५ मध्ये बुवांच्या वडिलांचा राष्ट्रपतीकडून सन्मान करण्यात आला होता. बालपणातच, गजाननबुवांच्या आईचे निधन झाले. त्यानंतर भाऊ व दोन्ही बहिनींचे निधन झाले. अशा प्रकारे गजाननबुवा पोरके झाले. कुटुंबावर कुऱ्हाडच कोसळली. साहजिकच अनंतरावांचे लक्ष लागेना, विद्यालय चालेना. अशा प्रकारे पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी पितापुत्रांनी अनेक ठिकाणी पायपीट केली.

**३) बालपणातच व्हायोलिनची सोबत :**

१९२१ मध्ये पितापुत्रांनी मुंबई सोडली व नौकरीच्या शोधासाठी

भटकंती सुरू झाली. अशा परिस्थितीत त्यांना औंध संस्थानात नोकरी मिळाली. औंध संस्थानात बाळासाहेब पंत प्रतिनिधी होते. औंध संस्थानात नोकरी मिळाल्यानंतर देवीच्या देवळात हजेरी लावायची व बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांच्या कीर्तनाला साथ द्यायची असे त्यांच्या कामाचे स्वरूप होते. चिमुकल्या गजाननाचे संगीत प्रेम पाहून बाळासाहेबांनी त्यांना एक व्हायोलिन आणून दिले व म्हणाले, ''तू शिकून घे आणि माझ्या कीर्तनाला साथ कर.'' वडिलांनी गजाननबुवांना व्हायोलिन कसे वाजवायचे हे शिकविले. अशा प्रकारे वडिलांनी दिलेले गाण्याचे संस्कार त्यांना व्हायोलिनवादनात उपयुक्त ठरले. याच काळात त्यांनी बासरी, तबला, हार्मोनियम, जलतरंग अशी विविध वाद्ये वाजविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांच्या बोटात चापल्य तर आलेच त्याचबरोबर सुरेलपणा त्यांच्या रोमारोमात भिनला. अशा प्रकारे कीर्तनाची साथसंगत करीत असतानाच एक व्हायोलिनवादक घडला.

**४) गुरू आणि शिक्षण :**

घरात संगीताचा वारसा असल्यामुळे बुवांना संगीताचे बाळकडू वडिलांकडूनच मिळाले. मिळालेल्या ज्ञानावर ते समाधानी नव्हते. अल्पज्ञानाचे मनात शल्य होते. घरात एकटेच होते. आपण आपल्या पायावर उभे रहावे व चांगले ज्ञान संपादन करावे असे त्यांना मनोमन वाटत होते. संगीत ज्ञानामृत प्राप्तीची अभिलाषा उराशी बाळगून ते औंध दरबारातून बाहेर पडले, औंध सोडून ते कराड, सातारा असा प्रवास करीत ते पुण्याला आले. सुदैवाने ग्वाल्हेर घराण्याचे गायक रामकृष्णबुवा वझे यांची योगायोगाने त्यांची भेट झाली. त्यांच्याकडे गायनाचे धडे घेण्यास प्रारंभ झाला. चार-पाच वर्षे त्यांनी त्यांच्याकडून तालीम घेतली. त्यानंतर त्यांना केसरबाई केरकर यांचे गाणे ऐकण्यांचा योग आला. त्यांचे गाणे ऐकून बुवा प्रभावीत झाले. आपणही लयदार, आगळे वेगळे जयपूर घराण्याचे. गाणे शिकावे असे बुवांना वाटू लागले. त्यासाठी त्यांनी मजल-दरमजल करीत कोल्हापूर गाठले. तेथे जयपूर घराण्याचे प्रसिद्ध गायक उ. अल्लादिया खाँ यांचे पुत्र व शिष्य भुर्जी खाँ यांचे शिष्यत्व पत्करले. ग्वाल्हेर गायकीवर जयपूर घराण्याचा मुलामा चढला. पुढे त्यांनी उस्ताद विलायत हुसेन यांच्याकडून आग्रा घराण्याची तालीम घेतली. परंतु बुवांना जयपूर गायकीच अधिक आवडली. पं. विनायकराव घांग्रेकर यांच्याकडून त्यांनी काही काळ तबलावादनाचे शिक्षण घेतले. लयकारी, कायदे, टुकडे,

परण इत्यादींचा त्यांनी रियाज केला. त्यामुळे त्यांची लय व ताल पक्का झाला. गायनाची साधना करीत असतानाच ते व्हायोलिनचाही रियाज करीत होते. अशा प्रकारे ग्वाल्हेर, जयपूर व आग्रा घराण्याची तालीम घेऊन त्रिवेणी संगम साधला. ज्याचा उपयोग त्यांना त्यांच्या गायनासाठी व व्हायोलिन वादनासाठी झाला.

**५) गायन व वादनशैली :**

गजाननबुवांना जेवढी व्हायोलिनवादक म्हणून लोकप्रियता मिळाली. तेवढीच लोकप्रियता गायक म्हणून सुद्धा मिळाली. तीन-तीन घराण्यांचे शिक्षण घेतल्यामुळे घरंदाज गायन अथवा वादन ऐकण्याचा योग रसिकांना येत असे.बसंत केदार, सावनी, बिहागडा, ललिता गौरी, देवखास असे अनेक अप्रचलित राग ते सहज गात असत. तीनताल, झुमरा, तिलवाडा हे त्यांचे आवडीचे ताल होते. ते एकाच श्वासात समेपासून दुसऱ्या समेपर्यंत एखादी तान गाऊन रसिकांना मंत्रमुग्ध करायचे. ते आपल्या कल्पनाशक्तीच्या जोरावर वादनात व गायनात नावीण्य आणायचे. त्यामुळे रसिकांना त्यांचे गायन-वादन एक पर्वणीच वाटायचे. आयुष्याच्या उत्तरार्धातही त्यांनी आपली गायकी तरुण ठेवली होती. कल्पकता, रंजकता, विविधता इत्यादी गोष्टी त्यांच्या गायकीत सामावलेल्या होत्या. त्यांचे व्हायोलिनवादन गायकी अंगाने व्हायचे त्यामुळे ते व्हायोलिन मधून गात आहेत की काय असा भास श्रोत्यांना व्हायचा. त्यांच्या गाण्यातून अवघड शब्दफेक, विभिन्न लयकारीचे आलाप व दाणेदार तानांची बरसात व्हायची. गायन व वादन ऐकल्यानंतर रसिकांची तृष्णा शमली नाही तरच नवल.

**६) सांगीतिक कार्य :**

आयुष्यभर संगीत आराधना केल्यामुळे त्यांचे नाव संगीताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले. गजाननबुवांनी मुंबई व दिल्ली आकाशवाणी केंद्रावर संगीत निर्देशक म्हणून कार्य केले. याचबरोबर लखनऊ, इंदूर आकाशवाणी केंद्रावर सल्लागार म्हणून कार्य केले. अनेक आकाशवाणी केंद्राहून त्यांचे गायन व व्हायोलियनवादन प्रसारित झाले. आकाशवाणीचे ते 'अ' श्रेणीचे कलावंत होते. अनेक राष्ट्रीय कार्यक्रमात त्यांना हजेरी लावण्याचा मान मिळाला. मुंबई विश्वविद्यालयात त्यांनी काही दिवस प्रोफेसर म्हणून काम केले. कलकत्त्याच्या आय. टी. सी. या संस्थेत त्यांनी प्राध्यापक म्हणून कार्य

केले. 'अयोध्येचा राजा' या पहिल्या बोलपटात व्हायोलिनचे पार्श्वसंगीत देण्याचे भाग्य त्यांना लाभले. त्यांच्या अनेक गायन व वादनाच्या ध्वनिफितीही निघाल्या.

**७) आदर्श गुरू :**

पं. गजाननबुवा जोशी हे उत्तम गायक व वादक तर होतेच परंतु ते एक आदर्श गुरू होते. गायन समाज, पुणे या संस्थेत त्यांनी १९३५ मध्ये गायन-वादनाचे शिक्षक म्हणून कार्य केले. त्यानंतरही त्यांनी अनेक शिष्य निर्माण केले. शिष्याचे यश हे गुरूचे यश व शिष्याचे गाणे हे गुरूचे गाणे असे ते म्हणत असत. बुवांनी संगीताचा व्यवसाय केला पण व्यापार केला नाही. संगीत शिक्षण घेण्याची आंतरिक इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांना पाहून त्यांना खूप समाधान वाटायचे. त्यांनी स्वतः अनेक घराण्यांची तालीम घेतल्यामुळे त्यांनी शिष्यांना कधीही एका घराण्याचे शिक्षण घेण्याचा हट्ट धरला नाही. विद्यार्थ्यांना झेपेल ते शिक्षण घेण्याचे स्वातंत्र्य त्यांनी दिले होते. गायन-वादनातील गुप्त रहस्ये त्यांनी शिष्यांना उलगडून सांगितली. संगीत शिकण्याच्या ध्येयाने प्रेरित झालेल्या शिष्यांना त्यांनी कधीही विन्मुख पाठविले नाही. शिष्यांच्या माध्यमातूनच कला जिवंत राहते यावर त्यांचा विश्वास होता. अशा प्रकारे आदर्श गुरू होण्यासाठी जे गुण असायला हवेत ते सर्व गुण बुवांकडे होते.

**८) शिवानंद संगीत प्रतिष्ठानची स्थापना :**

स्वामी शिवानंद हे पं. गजाननबुवा जोशी यांचे आध्यात्मिक गुरू होते. स्वामी शिवानंद यांनी 'तू गायनाचार्य होशील' असा आशीर्वाद त्यांना दिला होता. या प्रतिष्ठानच्या माध्यमातून अनेक गायक-वादकांचे गायन-वादन ऐकता यावे हा बुवांचा प्रामाणिक उद्देश होता. याचबरोबर शिवानंद संगीत प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून विविध सांगीतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात यायचे. हे प्रतिष्ठाण संगीत सेवेसाठी समर्पित केले होते. गुरूंचे ऋण चिरकाल स्मरणात राहावे म्हणून या प्रतिष्ठानची स्थापना केली होती. या संस्थेचे कार्य आजही त्यांचे शिष्य पुढे चालवीत आहेत.

**९) शिष्य संप्रदाय :**

शिवानंद संगीत प्रतिष्ठानच्या माध्यमातून त्यांनी अनेक शिष्य घडविले. त्यांनी पण क्षेत्रात वा. वि. केतकर, मधुकर कानिटकर, जयश्री पाटकर, सुधीर दातार, विकास कशाळकर, उल्हास कशाळकर, शुभदा पराडकर, वीणा

सहस्रबुध्दे, पद्मा तळवलकर इ. शिष्य निर्माण केले. त्यांच्या शिष्यांमध्ये मुलगा मधुकर जोशी व कन्या मालिनी जोशी यांचाही उल्लेख करावा लागेल. बुवांनी वादन क्षेत्रात श्री. त्रिंबकराव तारे, श्रीधर पार्सेकर, डी. आर. निंबर्गी, शंकरराव बिनीवाले इ. शिष्य घडविले.

**१०) पुरस्कार :**

बुवांनी केलेल्या अथक परिश्रमाचे फळ म्हणून त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांना अनेक पुरस्कार मिळाले.

१. १९७२ व १९७७ साली संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार.

२. सूरसिंगार संसदेचा तंत्रविलास पुरस्कार.

३. १९७० मध्ये त्यांच्या एकसष्टीनिमित्त ट्रिनिटी क्लबच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार.


४. १९८७ साली मध्यप्रदेश सरकारकडून 'तानसेन पुरस्कार' देऊन गौरव.

**११) स्वभाव :**

बुवांचा स्वभाव शांत, प्रेमळ व गंभीर होता. गप्पा मारण्यापेक्षा ते आपला अधिक वेळ रियाजात घालवीत असत. ते चोखंदळ वृत्तीचे होते. ते कोणाचीही भीडभाड न बाळगता स्पष्ट बोलत असत. ते बुजुर्ग लोकांना आदराने वागवीत असत. वडिलांचे व गुरूंचे ऋण ते अभिमानाने सर्वांना सांगत. मैफलीत दाद देताना ते काटेकोरपणा दाखवत असत. कोणाचेही शिष्टाचार म्हणून कौतुक करीत नसत. आयुष्याच्या पूर्वाधात संगीतविद्या प्राप्त करण्यासाठी त्यांना भरपूर पायपीट करावी लागली. अथक परिश्रम करावे लागले. यातून त्यांच्या दृढनिश्चयी शांत व संयमी स्वभावाचे दर्शन घडते.

**१२) समारोप :**

व्हायोलिनवादनाबरोबरच ज्यांनी गायन क्षेत्रात नावलौकिक मिळविला, ज्यांनी ग्वाल्हेर, जयपूर व आग्रा घराण्याची तालीम घेऊन रसिकांना घरंदाज गायन-वादन ऐकविले, ज्यांनी मायेच्या ममतेने शिष्यांना ज्ञानामृत पाजले, ज्यांनी व्हायोलिन व गायनाबरोबरच तबला, हार्मोनियम, जलतरंग व बासरी इ. वाद्ये वाजविण्याचा प्रयत्न केला असा थोर कलावंत १८ जून, १९८७ रोजी मुंबई येथे कालवश झाला. अशा थोर कलावंताला विनम्र अभिवादन.



# २७.

# उस्ताद अली अकबर खाँ

## १) प्रस्तावना :

प्राचीन काळात शिकार करताना धनुष्याच्या टणत्कारातून एका विशिष्ट प्रकारच्या ध्वनीची निर्मिती झाली. कदाचित यातूनच मानवाने तंतुवाद्याची निर्मिती केली असावी. पुढे यात विणा, शततंत्री, सतार, सरोद, सारंगी, व्हायोलिन, दिलरुबा अशी अनेक वाद्ये जन्माला आली. सतार या वाद्याला पं. रविशंकरांनी प्रतिष्ठा मिळवून दिली तर व्हायोलिन हे वाद्य पं. गजाननबुवा जोशी यांनी नावारूपाला आणले. संतुराच्या झंकारातून पं. शिवकुमार शर्मा यांनी सर्वांच्या हृदयातील तारा छेडल्या. त्याचप्रमाणे सरोद या वाद्याला सातासमुद्रापलीकडे नेण्याचे कार्य उ. अलिअकबर खाँ यांनी केले. अशा या महान सरोदवादक असलेल्या उ.अलिअकबर खाँ यांच्या जीवनकार्याचा आढावा खालील मुद्यांच्या आधारे घेता येईल.

## २) जन्म व बालपण :

उ.अलिअकबर खाँ यांचा जन्म बंगालमधील शिवपूर या गावी १४ एप्रिल, १९२२ रोजी झाला. उ.अलिअकबर खाँ हे उस्ताद अल्लाउद्दिन खाँ यांचे सुपुत्र व शिष्य आहेत. अल्लाउद्दिन खाँ हे मेहेरच्या दरबारात वादक होते. संपूर्ण कुटुंबात संगीताचे अधिष्ठान होते. संगीताचा वारसा जन्मतःच घेऊन आलेल्या उ. अलिअकबर खाँ यांना संगीतामध्ये अभिरुची निर्माण व्हायला वेळ लागला नाही. वडील उ. अल्लाउद्दिन खाँ हे अनेक वाद्ये वाजविण्यात निष्णात होते. ते दरबारी वादक असल्यामुळे अनेक गायक-वादकांचे गायन-वादन ऐकण्याचा योग अलिअकबरांना आला. लहानपणापासूनच उस्ताद अलिअकबर खाँ विविध वाद्ये वाजवू लागले. त्यानंतर त्यांनी सरोदवादनावर लक्ष केंद्रित केले. वडिलांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची संगीत आराधना सुरू झाली. त्यांचे वडील अत्यंत कडक शिस्तीचे होते. ते रोज आठ-आठ तास वेळ मिळेल तेव्हा रात्री बेरात्रीसुद्धा अलिअकबरांकडून रियाज करून घेत असत. रियाज मनाजोगा झाल्याशिवाय अलिअकबरांची सुटका होत नसे.

## ३) घरातून पलायन :

बालपणातच अलिअकबरांकडून कठोर मेहनत करून घेतली जात

होती. रियाज झाला नाही तर उपाशीही राहावे लागायचे. या जाचाला कंटाळून त्यांनी घरातून पळून जाण्याचा निर्णय घेतला. एके दिवशी वरच्या मजल्यावरून दोरीच्या साहाय्याने ते खाली उतरले. ते सरळ रेल्वे स्टेशनकडे निघाले. कुठे जायचे, काय करायचे हेही त्यांना माहीत नव्हते. हातात एक सरोद, खिशात दोन रूपये व हाताला एक घड्याळ होते. खांडव्याला जाणाऱ्या रेल्वेत ते बसले. विनातिकीट प्रवास करीत असल्यामुळे खाँ साहेबांना गाडीतून उतरवण्यात आले. तेथून ते पायपीट करीत खांडव्याला पोहोचले. तेथे 'एक का दस' असा जुगार चालू होता. जवळ असलेल्या दोन रुपयांपैकी एक रुपया रेल्वेत खर्च झाला होता. उरलेला एक रुपया व हातातले घड्याळसुद्धा ते जुगारात हरले. हातातले सरोद तेवढे शिल्लक राहिले होते. ते घेऊन उपाशीपोटी ते रेल्वे स्टेशनवर भटकू लागले. अशातच एक बंगाली माणूस त्यांना भेटला. त्यांनी सर्व वृत्तांत त्या बंगाली माणसाला सांगितला. त्या माणसाने त्यांना जेवू घातले. त्यानंतर त्या बंगाली माणसाने खाँ साहेबांच्या सरोद वादनाचे दोन कार्यक्रम घेतले व मुंबईला जाण्यासाठी पैसे उपलब्ध करून दिले.

**४) मुंबई आकाशवाणीवर कार्यक्रम :**

अनेक संकटांना सामोरे जात अखेर त्यांनी मुंबई गाठली. नोकरीचा शोध घेत ते मुंबईच्या आकाशवाणी केंद्रावर आले. श्री. बुखारी हे त्यावेळी आकाशवाणी केंद्राचे संचालक होते. ते अलि अकबर खाँ यांचे सरोदवादन ऐकून प्रसन्न झाले व अलि अकबर खाँ यांना आकाशवाणी केंद्रावर नोकरी दिली. आकाशवाणी केंद्राहून त्यांचे सरोदवादन प्रसारित झाले. हा कार्यक्रम मेहेरच्या महाराजांनी ऐकला व उ. अल्लाउद्दिन खाँ यांना अलिअकबर खाँ यांचा ठावठिकाणा सांगितला. त्यानंतर अलिअकबर खाँ यांना मुंबईहून मेहेरला आणले. त्यांच्यावरील रियाजाची सक्ती कमी करण्यात आली. पुन्हा वडिलांच्या मार्गदर्शनाखाली नित्य तालीम सुरू झाली. अलि अकबरांनाही त्यांच्याकडून झालेली चूक कळाली. रियाजाचे महत्त्व कळून चुकले. त्यामुळे त्यांनी पुन्हा रियाज करण्यास सुरुवात केली. ते सरोदवादनाशी इतके एकरूप झाले की सरोद आणि उस्ताद अलि अकबर खाँ असे समीकरणच होऊन बसले.

**५) योगदान :**

१९३६ मध्ये म्हणजेच वयाच्या चौदाव्या वर्षी त्यांनी अलाहाबाद संगीत संमेलनात भाग घेतला. तेथे 'गौरी मंजिरी' ही त्यांनी तयार केलेली रचना व.पात्र ठरली. त्यांनी उदयशंकर यांच्या छाऊ नृत्य मंडळात प्रवेश घेऊन अनेक विदेशी दौरे केले. आकाशवाणी आणि राष्ट्रीय संगीत समारोहात त्यांनी

पहाडी, झिंझोटी, जोगीया, कलिंगडा इ. राग पेश केले. रसिकांनीही त्यांना डोक्यावर घेतले. अफताबुद्दिन हे त्यांचे काका. त्यांच्याकडून त्यांनी तबला व मृदंगाचे शिक्षण घेतले होते. पं. रविशंकर हे त्यांचे मेहुणे आहेत. त्यांच्यासोबत सतार व सरोद वादनाच्या जुगलबंदीचे कार्यक्रम अनेक ठिकाणी सादर करण्यात आले. त्यांच्या साथीसाठी स्वर्गीय तबला नवाज अल्लारखाँ साहेब असायचे. याही जुगलबंदीच्या कार्यक्रमाला रसिकांनी उदंड प्रतिसाद दिला. अलिअकबर खाँ साहेबांनी भारतीय संगीताचे स्वर सरोदवादनाच्या माध्यमातून सातासमुद्राच्या पलीकडे नेऊन पोहोचवले. त्यांनी इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, अफगानिस्तान, बेल्जीयम इ. देशांत जाऊन तेथील रसिकांवर भारतीय संगीताची मोहिनी घातली.

**६) वादनशैली :**

खाँ साहेबांच्या सरोदवादनात माधुर्य दिसून येते. आलाप, जोड, झाला व मिजराबीचे संतुलन अचूक असते. स्वरलगाव मीडकाम गतेची मांडणी आकर्षक असते. सौंदर्यशास्त्राचा विचार करून ते वादन करतात. काका अफताबुद्दीन यांच्याकडून त्यांनी तबला व मृदंग वादनाचे शिक्षण घेतल्यामुळे ते विविध तालांत सराईतपणे वादन करतात. लयकारी करण्यात ते पक्के आहेत. त्यांना रूपक व तिनतालात वादन करण्यास आवडते. त्यांच्या वादनात गायकी तंत्राबरोबरच तंत्रकारी तंत्राचे संतुलन दिसून येते. विलंबित लयीतील आलापचारी बरोबरच द्रुतलयीतील वादनसुद्धा मधुर होते. त्यांच्या वादनात नजाकत दिसून येते. त्यांच्या वादनशैलीचे यहुदी मेनुहिनसारख्या जगप्रसिद्ध कलावंताने कौतुक केले आहे.

**७) राग-चित्रपट व संस्था :**

उ. अलि अबकर खाँ हे उत्तम वादक तर आहेतच त्याचबरोबर ते संशोधकही होते. त्यांनी 'चंद्रनंदन' या रागाची निर्मिती केली तर 'गौरीमंजिरी ही नवीन वाद्यवृंदाची रचना केली. त्यांनी 'गौरी', 'नटमंजिरी', 'मेघावी', 'लाजवंती', 'हिंडोलम', 'अलगिरी' असे राग प्रचारात आणले. राग निर्मितीबरोबरच त्यांनी चित्रपटांनाही संगीत दिले आहे. खाँ साहेबांनी 'आँधिया', 'क्षति पाषाण' अशा काही चित्रपटांचे संगीत दिग्दर्शन केले. भारतात व भारताबाहेर संगीताचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी त्यांनी कलकत्ता व कॅलिफोर्निया येथे 'अलिअकबरखाँ कॉलेज ऑफ म्युझिक' या संस्थेची स्थापना केली आहे.

**८) मानसन्मान :**

उस्ताद अलिअकबरखाँ यांच्या अथक परिश्रमाचे द्योतक म्हणून

त्यांना अनेक पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. त्याची सूची खालीलप्रमाणे देता येईल.

१. अमेरिकन टेलिव्हिजनवर कार्यक्रम सादर करणारे पहिले भारतीय कलावंत होण्याचा बहुमान.
२. १९६३ साली संगीत कला अकादमीचा पुरस्कार.
३. १९६७ साली भारत सरकारचा 'पद्मभूषण' हा पुरस्कार.
४. १९७२ मध्ये संगीत नाटक अकादमीकडून फेलोशिप.
५. १९९० मध्ये मध्यप्रदेश सरकारचा 'कालिदास' पुरस्कार.
६. १९९६ साली संगीत क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय कीर्तीचा 'ग्रॅमी अवार्ड'.
७. १९९८ साली एक लाख रुपयांचा 'स्वरालय' पुरस्कार
८. १९९९ मध्ये अमेरिकेचे प्रतिष्ठित हेरिटेज फेलोशिप अवार्ड.
९. जोधपूर दरबारात संगीततज्ज्ञ म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली होती.

**९) शिष्य संप्रदाय :**

संगीताचा प्रचार व प्रसार करण्यासाठी त्यांनी अनेक शिष्य घडविले. त्यांपैकी काही शिष्यांचा उल्लेख खालीलप्रमाणे करता येईल.

१. निखील बॅनर्जी    २. शरणराणी माथूर
३. बीरेन बॅनर्जी    ४. दामोदरलाल
५. शिशिर कणाधर चौधरी    ६. क्षिप्रा बॅनर्जी
७. दिलीप बसू    ८. अजय सिंहराय इ.

**१०. समारोप :**

ज्यांनी सरोद या वाद्याला प्रतिष्ठा मिळवून दिली, ज्यांनी भारतीय संगीताचे .ज्ञानामृत विश्वाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्याचे कार्य केले. असे जगप्रसिद्ध सरोदवादक उस्ताद अलिअकबर खाँ हे आयुष्याच्या अखेरीस अमेरिकेत वास्तव्यास होते. तेथे राहून भारतीय संगीताची शान आणि मान उंचावण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. असे सरोदवादक उ. अली अकबर खाँ दिनांक २१ जून, २००९ रोजी भारतीय वेळेनुसार शुक्रवार सकाळी १०.०० वाजता अमेरिकेतील सॅनफ्रान्सिस्को येथे कालवश झाले. अशा थोर कलावंताला विनम्र अभिवादन.



# २८.

## पंडित पन्नालाल घोष

**१) प्रस्तावना :**

सुसाट वेगाने धावणारे वारे व बांबूला असलेल्या नैसर्गिक छिद्राचा संयोग झाला. आणि बासरी हे वाद्य जन्माला आले. जी सुषिर वाद्यांत सर्वांत लहान व हाताळायला सुलभ आहे. जी स्वर माधुरी ऐकताना श्रोते मंत्रमुग्ध होतात. जेव्हा या मुरलीचा ओठांना स्पर्श होतो तेव्हा मधुर ध्वनीने आसमंत निनादून जातो. रसिकमन आनंदाने डोलायला लागते. महाभारतकाळात श्रीकृष्णाने आपल्या मधुर बासरीच्या स्वराने गायी-गोपिकांना आपल्याकडे आकर्षित करून घेतले. त्याचप्रमाणे आधुनिक युगात पं. पन्नालाल घोष यांनी संपूर्ण भारतवासीयांना आपल्या बासरीवादनाने वेड लावले. जे वाद्य साथसंगती पुरते मर्यादित होते त्या वाद्याला स्वतंत्र वादनाचा दर्जा प्राप्त करून दिला. असे थोर बासरी वादक पं. पन्नालाल घोष यांच्या जीवनकार्याचा आढावा खालील मुद्यांच्या आधारे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

पंडित पन्नालाल बाबू मूळचे बंगालचे. त्यांचा जन्म २४ जुलै, १९११ रोजी बारीसाल या गावी झाला. बारीसाल हे गाव सध्या बांगलादेशात आहे. त्यांच्या वडिलाचे नाव पं. अक्षयकुमार तर आजोबाचे नाव हरकुमार असे होते. त्यांचे वडील पं. अक्षयकुमार हे उत्तम सतारवादक होते. सतारीच्या नाद-झंकारातून बाल पन्नालाल स्वतःला हरवून जात असे. आजोबा हरकुमार हे सुद्धा धृपदीये होते. आई, आजी व भावंडे ही सुद्धा संगीताचे जाणकार होते. ज्याप्रमाणे माशाला पोहायला शिकविण्याची आवश्यकता नसते त्याचप्रमाणे पन्नालाल बाबूंना संगीताबद्दल गोडी निर्माण करून देण्याची आवश्यकता पडली नाही. घरात संगीताच्या ध्वनिलहरी निनादत असल्यामुळे ते कधी सतारीवर बोटे छेडत असत तर कधी हार्मोनियमवर अंगुलीनैपुण्य दाखवीत असत. योगायोगाने बासरीचे मधुर गुंजन त्यांच्या कानावर पडले आणि वयाच्या सातव्या वर्षीच ते बासरीच्या प्रेमात पडले. बासरीवर वेगवेगळे

प्रयोग सुरू झाले. ते प्रयोग करून गावकऱ्यांना दाखवू लागले. बालपणातच त्यांनी बांबू, पितळ, अँल्युमिनियमच्या बासऱ्या तयार केल्या. चिमुकल्या पन्नालालांची बासरी ऐकून गावातील लोकही त्यांची स्तुती करू लागले.

**३) गुरू व शिक्षण :**

घरात संगीताचे वातावरण असल्यामुळे पं. पन्नालाल बाबूंना संगीताविषयी अभिरुची निर्माण झाली. त्यांचे वडील सतारवादक असल्यामुळे पन्नालाल बाबूंनी संगीताचे प्राथमिक धडे वडिलांकडून घेतले. संगीत ज्ञानार्जनासाठी त्यांनी अनेक ठिकाणी भ्रमण केले. अनेक बुजुर्ग संगीत तज्ज्ञांच्या सान्निध्यात राहून त्यांनी ज्ञान संपादन केले. वयाच्या १४ व्या वर्षीच म्हणजे १९२५ मध्ये ते घराबाहेर पडले. ते कलकत्याला येऊन पोहोचले. तेथे एका फिल्म कंपनीत काम करू लागले. अशातच त्यांची खुशी महम्मद यांची भेट झाली. ते उत्तम हार्मोनियमवादक होते. त्यांच्याकडून पं. पन्नालाल बाबूंनी हार्मोनियमवादनाचे धडे घेण्यास प्रारंभ केला. वास्तविक पाहता त्यांना बासरीवादनाचे धडे घ्यायचे होते. परंतु खुशी महम्मद यांच्याकडून मिळालेल्या हार्मोनियमवादनाच्या शिक्षणावरून ते बासरी वादनाचा रियाज करू लागले. जेथे पं. पन्नालाल घोष जात असत तेथील कलावंताने सादर केलेल्या बासरीवादनाचे ते सूक्ष्म निरीक्षण करू लागले. एकलव्याप्रमाणे ते दुसऱ्याच्या बासरी वादनाचे अनुकरण करू लागले. खुशी महम्मद यांच्या निधनानंतर त्यांनी पं. गिरीजाशंकर चक्रवर्ती यांच्याकडून संगीताचे शिक्षण घेतले. १९३४ मध्ये त्यांनी न्यू थियटर कंपनीमध्ये बासरी वादक म्हणून काम करण्यास सुरुवात केली. श्री रामचंद्र बोराल हे न्यू थियटर कंपनीचे संगीत दिग्दर्शक होते. त्यांनी पं. पन्नालाल बाबूंना ऑर्केस्ट्रा व चित्रपट संगीताचे तंत्र शिकविले. याच काळात हिमांशूदल यांचेही मार्गदर्शन त्यांना मिळाले. पं. पन्नालाल घोष हे जिज्ञासू वृत्तीचे होते. त्यांनी आपल्या घरी तज्ज्ञांचे कार्यक्रम आयोजित केले व मनसोक्त श्रवणभक्ती केली. मिळालेल्या ज्ञानावर ते संतुष्ठ नव्हते. एखादा उत्तम गुरू आपल्याला लाभावा या प्रतीक्षेत ते होते. अशातच सुदैवाने १९४७ साली पन्नालाल घोष यांना उस्ताद अल्लाउद्दीन खाँ साहेबांसारखे चतुरस्त्र गुरू लाभले. ते त्यांचे गंडाबंद शागीर्द झाले. अशा प्रकारे पन्नालाल बाबूंची मनीषा पूर्ण झाली.

**४) पन्नालाल घोष - एक मुष्टियोद्धा :**

लहानपणापासूनच पन्नालाल बाबू यांना व्यायामाची आवड होती.

आपले शरीर सुदृढ करून स्वातंत्र्यलढ्यात भाग घ्यावा असे त्यांना वाटे. सुकद्दा व बरकद्दा यांच्याकडून त्यांनी व्यायामाचे धडे घेतले. याचबरोबर त्यांनी मुष्टियुद्धाचे (बॉक्सिंग) शिक्षण अशोक चटर्जी यांच्याकडून घेतले. पुढे चालून त्यांना बॉक्सिंग या खेळात अनेक पुरस्कारही मिळाले. बॉक्सिंग बरोबरच. बासरीवादनाचा रियाजही ते तेवढ्याच तन्मयतेने करीत असत. तसे पाहता बॉक्सिंग हे राकट माणसाचे काम आहे तर बासरीवादन हे हळुवार, संवेदनशील माणसाचे काम आहे. परंतु ही दोन टोकांची कामे एकच व्यक्ती करतोय हे पाहून अनेकांना आश्‍चर्य वाटायचे.

**५) वादन शैली :**

पंडित पन्नालाल घोष यांनी आपल्या वादनात गायकी अंगाबरोबरच बीन अंगाचे वादन विकसित केले होते. पंडितजींनी गायनाची तालीम घेतल्यामुळे ख्याल, धृपद, धमार इ. गायन प्रकारांबरोबरच ठुमरी, कजरी, भटीयारीधून यांसारखे गीत प्रकार ते तयारीने पेश करीत असत. त्यांच्या वादनातून नोमतोम, ततकार, जोड, झाला,गमक,ताना इ.कलाविष्कार दिसून येत असे. त्यांच्या वादनात मुलायमपणा होता. सोहनी, आडाणा यांसारखे वेगळ्या रागांबरोबरच मारवा, दरबारी यांसारखे गंभीर प्रवृत्तींचे राग ते सहज सादर करीत असत. पूर्वी बासरीचे विश्‍व लोकसंगीतापुरते मर्यादित होते. परंतु पन्नालाल बाबूंनी शास्त्रीय, उपशास्त्रीय संगीत वाजवून बासरी वादनाच्या कक्षा रुंदावल्या. पंडितजी तिन्ही सप्तकात मुक्त संचार करीत असत. मंद्र सप्तकातून तार सप्तकात वादन करण्यासाठी ते दोन वेगवेगळ्या बासर्‍यांचा उपयोग करीत असत. सप्तक बदलत असतांना स्वरात कुठेही खंड पडत नसे. त्यांच्या तबल्याच्या साथसंगतीसाठी त्यांचे बंधू पं. निखिल घोष असत. त्यांना बासरी आणि तबला वादनाची जुगलबंदी आवडत नसे. त्यांचे मधुर वादन ऐकून रसिक श्रोते स्वतःला विसरून आनंदात तल्लीन व्हायचे.

**६) पन्नालाल घोष व चित्रपट :**

पन्नालाल घोष यांनी वयाच्या १४ व्या वर्षीच चित्रपट क्षेत्रात पदार्पण केले. सुरुवातीला कलकत्त्याच्या फिल्म कंपनीत त्यांनी काम केले. या अनुभवावरच पुढे त्यांनी न्यू थियटर कंपनीत काम केले. त्यानंतर त्यांनी बॉम्बे टॉकीजमध्ये १९४१ ते १९४६ पर्यंत संगीतकार म्हणून कार्य केले. 'झुला' या चित्रपटाचे साहाय्यक संगीत निर्देशक म्हणून काम पाहिले. 'पुलीस', 'अंजान सवाल', 'आंदोलन' इ. चित्रपटांना बाबूजींनी संगीत दिले. त्यांना संगीत

दिग्दर्शक म्हणून प्रसिद्धी मिळाली ती 'वसंत' या चित्रपटाला. या चित्रपटात त्यांच्या पत्नी पारूल घोष यांनी गायिलेल्या गीतांना प्रचंड लोकप्रियता मिळाली.

**७) पं. पन्नालाल बाबूंचे संशोधन कार्य :**

पं. पन्नालाल लहाणपनापासूनच वेगवेगळ्या बासऱ्या तयार करण्याचा प्रयत्न करायचे. बासरीच्या आकारात व लांबीत बदल केला तर स्वरांचे गांभीर्य व माधुर्य वाढते. तसेच तार सप्तकातील स्वर लावण्यास मदत होते हे त्यांच्या लक्षात आले. त्यांच्या या संशोधनातूनच बासरीच्या सहा छिद्रांऐवजी सात छिद्रे पाडून त्यांनी बासरींना संपूर्ण वाद्याचे रूप दिले. पंडितजी संगीताचे चिंतक होते. त्यांनी आपल्या कल्पनाशक्तीच्या व प्रतिभाशक्तीच्या जोरावर नवीन रागांची निर्मिती केली. त्यामध्ये 'दीपावली', 'जयंत', 'चंद्रमौली' आणि 'नूपुरध्वनी' इ. रागांची नावे सांगता येतील. बाबूजींनी दक्षिण भारतीय संगीतातील राग उत्तर भारतीय संगीतात परिवर्तित करून 'कलिंग विजय', 'ऋतुराज' अशा वाद्यवृंदांच्या रचना त्यांनी निर्माण केल्या.

**८) योगदान:**

पंडित पन्नालाल घोष यांनी भारतीय संगीताला मोलाचे योगदान दिले आहे.

१. १९३६ साली त्यांनी अखिल बंगाल परिषदेत बासरीवादन केले व प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले.
२. १९३८ मध्ये त्यांनी छाऊ नृत्य मंडळीत संगीत दिग्दर्शक म्हणून काम केले.
३. दिल्ली आकाशवाणी केंद्रावर त्यांनी वाद्यवृंदाचे संयोजक म्हणून काम केले.
४. वाद्यवृंदामध्ये बासरीला स्थान दिले.
५. अनेक चित्रपटांना त्यांनी संगीताचा साज चढविला.
६. नवराग निर्मितीबरोबरच अनेक वाद्यवृंदाच्या रचना त्यांनी केल्या.
७. बासरीमध्ये संशोधन करून बासरीला आधुनिक स्वरूप दिले.
८. १९४४-४५ मध्ये मुंबईतील विक्रमादित्य संगीत संमेलनात बासरीवादन करून रसिकांकडून दाद मिळविली.
९. श्री, भैरवी, यमन, मारवा, हंसध्वनी, खमाज पिलु अशा अनेक रागांतील ध्वनिफिती तयार केल्या.

१०. विदेशातही त्यांनी अनेक दौरे केले

**९) स्वभाव :**

पं. पन्नालाल घोष यांच्या अंगी राष्ट्रभक्ती, परिश्रमाची तयारी, गुरूवरील श्रद्धा अशा गोष्टी ठासून भरल्या होत्या. त्यांचा स्वभाव आध्यात्मिक होता. त्यांनी स्वामी गिरिजानंदाकडून आध्यात्मिक दीक्षा घेतली होती. स्वामी गिरिजानंद स्वामी विवेकानंदांचे शिष्य होते. त्याचबरोबरच रामकृष्ण परमहंस यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर दिसून येत होता. तसेच रवींद्रनाथ टागोर व काझी नझरूल इस्माल यांचा प्रभाव त्यांच्या जीवनावर पडला होता. त्यांचा स्वभाव मेहनती होता. लांबलांब बासऱ्या ते सहज वाजवीत असत. अनेकांना असे वाटायचे की त्यांनी बोटांच्या पडद्यांचे ऑपरेशन केले आहे. परंतु तसे काहीही नव्हते. त्यांच्या अथक परिश्रमामुळे ते बासऱ्या लीलया हाताळायचे.

**१०) शिष्य संप्रदाय**

पं. पन्नालाल बाबू हे उत्तम कलावंत तर होतेच त्याचबरोबर ते एक आदर्श गुरूही होते. त्यांनी संगीत जगताला अनेक शिष्य दिले. त्यामध्ये देवेंद्र मुर्डेश्वर, हरिपाद चौधरी, रघुनाथ सेठ, प्रकाश वढेरा इ. शिष्यांचा समावेश करता येईल. अनेकांनी घोष बाबूंचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवला. मूळ बंगालचे पन्नालालजी महाराष्ट्रातच ख्यातनाम झाले. त्यांच्या शिष्यांनी व चाहत्यांनी मलाड मुंबई येथील त्यांच्या निवासस्थानाच्या रस्त्याला 'पन्नालाल घोष मार्ग' असे नाव दिले. तसेच त्यांच्या शिष्यांनी बाबूंच्या स्मृती चिरकाल स्मरणात राहण्यासाठी 'पन्नालाल घोष स्मारक समितीची' स्थापना केली.

**११) समारोप :**

ज्यांनी बासरीतून पाझरणाऱ्या सप्तसूरांना चांदण्याची शीतलता दिली, ज्यांनी बासरी या वाद्याची लोकांमध्ये अभिरुची वाढवून बासरीला सांस्कृतिक व सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून दिली, ज्यांनी अथक परिश्रम करून बासरीवादनाला अति उच्च शिखरावर पोहोचविले, ज्यांनी बासरीवादन करून रसिकांना स्वर्गीय सुखाची अनुभूती करून दिली त्यांचे बासरीवादन ऐकून स्वर्गातील देवताही मंत्रमुग्ध झाल्या असाव्यात. म्हणूनच की काय वयाच्या ४९ व्या वर्षीच म्हणजे २० एप्रिल, १९६० रोजी ईश्वराने त्यांना आपलेसे केले. त्यांच्या अकाली निधनाने संगीतविश्व पोरके झाले. अशा या महान बासरीवादकाचे ऋण कधीही विसरता येणार नाही.



# २९.

## बालगंधर्व

**१) प्रस्तावना :**

महाराष्ट्रीयन नाट्यसंगीताच्या इतिहासात मानाचा तुरा खोवणारे, ज्यांनीआपल्या मधुर आवाजाने व परिपक्क अभिनयाने महाराष्ट्राची रंगभूमी गाजवली, ज्यांनी गंधर्वयुगाची सुरुवात केली. पुरुष असूनही तब्बल ५० वर्षे ज्यांनी स्त्री-भूमिका सादर करून रसिकांच्या मनावर अधिराज्य केले, असे दैवी कलावंत म्हणजे बालगंधर्व होय.

बालगंधर्वाबद्दल ग. दी. माडगुळकरांनी लिहून ठेवले आहे.

रतीचे जया लावण्य लाभे
कुलस्त्री जसे हास्य ओठात शोभे
सुधेसारखा सार स्वर्गीय गाणे
असा बालगंधर्व आता न होणे.
जसा जन्मतो तेज घेऊन तारा
जसा मोर घेऊन येतो पिसारा
तसा येई कंठात घेऊन गाणे
असा बालगंधर्व पुन्हा न होणे.

अशा या बालगंधर्वाच्या जीवन कार्याचा आढावा खालील मुद्यांच्या आधारे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

नारायण श्रीपाद राजहंस हे बालगंधर्वांचे नाव. त्यांचा जन्म २६ जून,.१८८८ रोजी पुण्याच्या शुक्रवार पेठेत झाला. बालगंधर्वांच्या आईचे नाव अन्नपूर्णाबाई तर वडिलांचे नाव श्रीपादराव. श्रीपादराव हे जलसिंचन विभागात नौकरी करायचे. श्रीपादरावांना गाण्याची आवड होती. ते सतारही वाजवीत असत. बालगंधर्वांच्या काकांचे नाव गणपतराव हे होते. ते

पं.बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांचे शिष्य होते. आई अन्नपूर्णाबाई व आत्या हिराबाई यांचाही आवाज मधुर होता. त्या जात्यावरच्या ओव्या व इतर लोकसंस्कृतीतील गीते गात असत. एकंदरीत संपूर्ण राजहंस कुटुंब संगीतप्रेमी होते. त्यांचे मामा वासुदेवराव पुणतांबेकर हे 'नाट्य कला प्रवर्तक' नाटक मंडळीच्या संस्थापकांपैकी एक होते. बालगंधर्वांना त्यांच्या वडिलांनी शिक्षणासाठी जळगावला पाठवले. तेथे बालगंधर्वांना अनेक नाटके पाहण्याचा योग आला. अशा प्रकारे त्यांना गायन व नाट्याचे धडे बालपणातच मिळाले.

**३) गुरू आणि शिक्षण :**

बालगंधर्वांना लहानपणापासून संगीताची आवड होती. त्यामुळे त्यांचे शालेय शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले. त्यांच्या एका गुरुजींनी नारायणरावांना गायन अथवा अभिनय शिकण्याचा सल्ला दिला. त्या वेळी जळगावाला मेहबुब खाँ हे एक उत्तम गायक राहत होते. त्यांच्याकडे नारायणरावांनी संगीताचे धडे घेण्यास प्रारंभ केला. खाँ साहेबांच्या गायनात सुरेलपणा होता. त्यामुळे त्यांनी बालगंधर्वांना स्वरसाधना, स्पष्ट शब्दोच्चार व रागदारीचे शिक्षण देऊन त्यांचा गायनाचा पाया पक्का केला. याच काळात प्रसिद्ध गायक भास्करबुवा बखले यांनीसुद्धा बालगंधर्वांना शिक्षण देण्यास प्रारंभ केला. मुळातच सुरेल आवाज असलेल्या बालगंधर्वांना साभिनय पदे, रंगभूमीवरील गायनकौशल्य, घरंदाज गायकी इ. बाबी शिकविल्या. पं. गोविंदराव टेंबे व उ. अल्लादिया खाँ यांच्याही गायकीचा प्रभाव बालगंधर्वांवर होता. स्वतःची मेहनत, गुरूंच्या आशीर्वादामुळे व योग्य मार्गदर्शनामुळे बालगंधर्व हे उत्तम नट व गायक होऊ शकले.

**४) बालगंधर्व पदवी :**

१८९८ साली नारायण दहा वर्षांचे होते. तेव्हा ते पुण्याला. त्यांच्या काकांकडे गेले होते. काका यशवंतराव लोकमान्य टिळकांच्या केसरी या वृत्तपत्राच्या व्यवस्थापन विभागात नौकरी करीत होते. त्याच वेळी लोकमान्य टिळकांना चिमुकल्या नारायणाचे गाणे ऐकण्याचा योग आला. नारायणचे गाणे मोहक व मधुर होते. ते ऐकून लोकमान्य टिळक भारावून गेले. त्यांनी उत्स्फूर्तपणे उद्गार काढले, ''अरे ! हा तर साक्षात बालगंधर्व !'' तेव्हापासून नारायणरावांना बालगंधर्व ही पदवी मिळाली ती कायमचीच.

## ५) किर्लोस्कर नाटक मंडळीत प्रवेश :

लहानपणापासूनच नाटकात रमणाऱ्या बालगंधर्वांना शालेय शिक्षणात रस वाटेना. त्या काळात नाटकाला समाजमान्यता नव्हती. त्यामुळे त्यांचे आई- वडील चिंताग्रस्त झाले. ही बाब त्यांनी टिळकांच्या निदर्शनास आणून दिली. तेव्हा लोकमान्यांनी २५ ऑक्टोबर, १९०५ रोजी किर्लोस्कर नाटक मंडळीत प्रवेश मिळवून दिला. तेव्हा नाटकातील स्त्री भूमिका पुरुषच करत. वर्तमानपत्रात जाहिराती देऊनसुद्धा स्त्रिया रंगमंचावर येत नसत. अशा काळात सौंदर्य लाभलले व गोड गळ्याची देणगी लाभलेले बालगंधर्व हे रंगभूमीसाठी वरदानच ठरले.

## ६) गंधर्व नाटक मंडळीची स्थापना :

अण्णासाहेब किर्लोस्करांच्या निधनानंतर बालगंधर्वांचे किर्लोस्कर नाटक मंडळीतील अधिकाऱ्यांशी पटले नाही. त्यामुळे बालगंधर्वांनी ५ जुलै, १९१३ रोजी गंधर्व नाटक मंडळीची स्थापना केली. पाहतापाहता ही नाटक मंडळी नावारूपाला येत होती. गंधर्व नाटक मंडळीच्या उत्कर्षाबरोबरच मराठी रंगभूमीला सोन्याचे दिवस येऊ लागले. त्या काळात दिग्गज नाटककार खाडिलकर आणि गडकरी यांनीसुद्धा बालगंधर्वांना आपली नाटके देऊन गंधर्व युगाच्या अरूणोदयास हातभार लावला.

## ७) गंधर्व युगाची सुरुवात :

परंपरागत गोष्टींना छेद देत बालगंधर्वांनी नवनवीन बाबी रंगमंचावर आणल्या. विविध देखाव्यांचे पडदे आणून नैपथ्यात आमूलाग्र बदल केले. वेशभूषा, साजशृंगारांची साधने, रंगभूषेसाठी विविध उपकरणे त्यांनी रंगमंचावर आणली. नाट्यानुरूप संगीत, प्रसंगानुरूप रंगमंचावरील हालचाली, प्रभावशाली नाट्याभिनय इ. बाबींचा त्यांनी विचार केला. अशा प्रकारे, बालगंधर्वांनी गंधर्वयुगाची सुरुवात केली.

## ८) बालगंधर्वांची लोकप्रियता :

बालगंधर्व रसिकांना मायबाप, पालक, अन्नदाता म्हणून संबोधित असत. बालगंधर्व एक गुणी कलावंत होते. स्त्रियांचे नटणे, मुरडणे, हावभाव या गोष्टींबरोबरच स्त्रियांचे मोहक सद्गुण दाखविणे, स्त्रियांचे अंतरंग प्रकट करणे इ. बाबी ते लीलया करीत असत. त्यामुळे त्यांच्या स्त्री-भूमिका पाहण्यासाठी व त्यांचे गायन ऐकण्यासाठी नाट्यप्रेक्षक एकच नाटक अनेकवेळा

पाहत असत. तसेच त्यांच्या पदांना अनेकवेळा ‘वन्समोअर’ मिळत असे. बालगंधर्वांचे कपडे दागिने पाहून कित्येक कुलीन स्त्रिया त्यांचे अनुकरण करीत असत. त्या काळी गंधर्व फॅशनच रूढ झाली होती. अशा प्रकारे त्यांनी रसिकांच्या मनावर अधिराज्य केले. केवळ मराठीच नव्हे तर कन्नड, गुजराथी, फारशी, राजस्थानी रसिकांच्या मनावर त्यांनी मोहिनी घातली होती.

**९) संगीत नाटके व स्त्री- भूमिका :**

बालगंधवानी १९०६ ते १९५५ या काळात जवळपास २७ स्त्री भूमिका रंगविल्या. यात सिंधूची भूमिका ही गरीब कुटुंबातील होती. अन्य सर्व भूमिका राजघराण्यातल्याच होत्या. त्यांनी पहिली स्त्री भुमिका शाकुंतल नाटकात शकुंतलेची केली. त्यानंतर सौभद्रमधील सुभद्रा, मानापमानमधील भामिनी, स्वयंवरमधील रूक्मिनी, विद्याहरणमधील देवयानी, शारदामधील शारदा, मृच्छकटीक मधील वसंतसेना व एकच प्याला या नाटकातील सिंधू अशा अनेक भूमिका त्यांनी अजरामर केल्या.

**१०) गायकी :**

बालगंधर्वांनी भास्करबुवा बखले यांच्याकडून संगीताचे धडे गिरविले. भास्करबुवांच्या गायकीत ग्वाल्हेर, जयपूर, आग्रा इ. घराण्यांच्या गायकीचा संगम झाला होता. याचा प्रभाव बालगंधर्वांवर असला तरी त्यांनी आपली वेगळी गायनशैली विकसित केली होती. त्यांचे मधुर गायन श्रोत्यांच्या अंतःकरणाला भिडत असे. ते लयीचे पक्के होते. स्पष्ट शब्दोच्चार, दाणेदार तान, याचबरोबर लडिवाळपणा व मादकता यांचा मिलाफ त्यांच्या गायकीत झाला होता. त्यांच्या गायकीचे अनुकरण करण्याचा प्रयत्न अनेक कलावंतांनी केला. त्यामध्ये.डॉ.वसंतराव देशपांडे, छोटा गंधर्व, कुमार गंधर्व, जयमाला शिलेदार, माणिक वर्मा इ.कलावंतांचा नामोल्लेख करता येईल. बालगंधर्व तालात पक्के होते. प्रसिद्ध तबलानवाज अहमदजानं थिरकवा म्हणायचे, ‘हा लयीचा बादशहा आहे’ नाट्यगीत गात असताना ते मागच्या व पुढच्या संवादाची जाण ठेऊनच गात असत.

**११) लोकप्रिय नाट्यगीते :**

बालगंधर्वांच्या स्वरमयी मोहकतेमुळे आजही त्यांची नाट्यगीते लोकप्रिय आहेत

| नाटक | नाट्यगीते |
|---|---|
| मृच्छकटीक | - रजनीनाथ हा, माडीवरी चल ग गडे |

| | |
|---|---|
| शाकुंतल | – वेड्या मना तळमळसी, वद जाऊ कुणाला शरण. |
| स्वयंवर | – नाथ हा माझा, स्वकुल तारक सुता, नरवर कृष्णा समान |
| एकच प्याला | – प्रभू अजी गमला, सत्य वदे वचनाला |
| शारदा | – मूर्तिमंत भीती उभी, हृदयी धरा हा बोध खरा |
| मानापमान | – नयने लाजविल, खरा तो प्रेमा |

बालगंधर्वांची अनेक नाट्यगीते अब्दुल करीम खाँ साहेबांनी गायलेली आहेत. बालगंधर्वांचे गाणे ऐकण्यासाठी ते स्वतः हजर राहत असत. बालगंधवांनी शास्त्रीय संगीताबरोबरच उपशास्त्रीय संगीत, नाट्यसंगीत व भजने गाऊन त्या गाण्यांचे सोने केले.

**१२) फिल्मकंपनीत पदार्पण :**

बालगंधर्वांची लोकप्रियता वाढत होती. त्यामुळे व्ही. शांताराम यांनी त्यांना १९ मे, १९३४ मध्ये चित्रपटात भूमिका करण्याची संधी दिली. बालगंधवांनी प्रभात फिल्म कंपनीशी करार केला. याच काळात गंधर्व नाटक मंडळी बंद झाली. बालगंधर्वांनी 'धर्मात्मा' या चित्रपटात संत एकनाथांची भूमिका केली. ७ डिसेंबर, १९३५ मध्ये धर्मात्मा हा चित्रपट प्रदर्शित झाला. परंतु तो तेवढा लोकप्रिय झाला नाही. त्यांचे मन चित्रपटात रमले नाही. तीन चित्रपटांऐवजी एकाच चित्रपटानंतर बालगंधर्वांनी प्रभात फिल्म कंपनी सोडली.

**१३) मानसन्मान :**

१९२९ रोजी पुणे येथे भरलेल्या 'नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष' होण्याचा बहुमान त्यांना मिळाला.

१९५५ सालापासून शासनाने त्यांना रु.३००/- दरमहा मदत सुरू केली व पुढे ती १९६४ मध्ये अमृत महोत्सवापर्यंत रू. ७५०/- पर्यंत वाढविली.

१९५५ मध्ये संगीत नाटक अकादमीने अभिनयासाठी 'राष्ट्रपती पदक' देऊन त्यांचा गौरव केला.

१९६४ मध्ये त्यांचा 'अमृत महोत्सव' साजरा केला.

१९६४ मध्ये भारत सरकारने त्यांना 'पद्मभूषण' हा पुरस्कार देऊन सन्मानित केले.

१९८७-८८ हे त्यांचे 'जन्मशताब्दी वर्ष' म्हणून उत्साहात साजरे करण्यात आले.

**१४) बालगंधर्वाविषयी प्रशंसोद्गार :**

१. ''संगीत ऐकावेसे वाटले तर मी गंधर्वांच्या नाटकांना जाऊन बसतो. त्यांच्या गोड आवाजामुळे त्यांचा चुकीचा स्वरही मला प्रिय वाटतो. त्यांच्यासारखा गोड निषाद माझ्याही गळ्यातून निघत नाही.''

– उ. अल्लादिया खाँ

२. ''बालगंधर्वांवर परमेश्वरापेक्षाही अधिक प्रेम केलेला मी माणूस आहे. त्यांच्यासारखा अष्टपैलू नट शतकांनी जन्म घेतो.'' – पु. ल. देशपांडे

३. '' बालगंधर्व हा परमेश्वराने पाठवलेला माणूस खुद्द परमेश्वरालाही पुन्हा तसा घडवता येईल की नाही याची शंका वाटते. अभूतपूर्व अलोकिक संगीताचा अध्याय संपला.'' – पं. सुधीर फडके

**१५) मृत्यू :**

४ जून, १९५५ पर्यंत म्हणजेच वयाच्या ६७ व्या वर्षांपर्यंत त्यांनी रंगमंचावर भूमिका केल्या. 'एकच प्याला' तील सिंधूची भूमिका अखेरची ठरली.बालगंधर्वांना कौटुंबिक सुख कधीही लाभलेले नाही. आयुष्याच्या शेवटी तर त्यांना पक्षघात झाला. पत्नी गोहरबाई यांनी त्यांची अखेरपर्यंत सेवा केली. पुढे बालगंधर्वांचे पाय अधू झाले. तरीसुद्धा ते हसतमुख असायचे. ते निमोनियाने आजारी पडले. यातच दि. १५ जुलै, १९६७ रोजी पुण्याच्या जहांगीर नरसिंग होममध्ये त्यांनी आयुष्याच्या रंगमंचाचा अखेरचा निरोप घेतला.

**१६) समारोप :**

ज्यांनी संपूर्ण आयुष्य रंगभूमीची सेवा केली. ज्यांनी गंधर्व युगाची सुरुवात केली, ज्यांनी महाराष्ट्रीयांना रसिकता शिकविली, ज्यांनी रंगभूमीला लोकप्रियता मिळवून दिली अशा बालगंधर्वांचे ऋण कदापिही विसरणे शक्य नाही. मल्लिकार्जून मन्सूर म्हणतात, ''नारायणराव म्हणजे एकटे नारायणराव, परत तसा दुसरा कोणी होणार नाही. काळ अनंत आहे. पृथ्वी विपुल आहे. आवडी–निवडीच्या चाळण्याही खूप आहेत, होतील, तुम्ही–आम्ही कालौघात नामशेष होऊ, पण बालगंधर्व अजरामर राहतील.''



# ३०.

## हिराबाई बडोदेकर

**१) प्रस्तावना :**

'यत्र नार्यस्तु पुज्यंते रमन्ते तत्र देवता', असे ज्या देशात स्त्रियांबददल म्हटलं जायचे, त्या देशात पुर्वी स्त्रियांना मानाचे स्थान नव्हते. एक काळ असा होता की, स्त्रियांना स्वतंत्रपणे गाता येत नव्हते. गाणारी स्त्री ही स्त्रीत्वाला लागलेला कलंक आहे असे म्हटले जायचे.

तसेच गाणारी स्त्री ही हमखास अकुलीनंच असते. ती समाजाला लागलेला कलंक आहे. समजले जाई. अशी संकुचित दृष्टी असतानांही ज्यांनी घरसंसार सांभाळुन समाज धुरीनांना जिंकून घेत संगीत क्षेत्रात पदार्पण केले आणि सर्व स्त्रि कलावंताच्या आद्यगुरु होण्याचा बहुमान त्यांनी पटकविला. अशा या थोर कलावंत हिराबाई बडोदेकर यांचा जीवनपट खालीलप्रमाणे उलगडुन पाहता येईल.

**२) जन्म व बालपण :**

सांगितिक वारसा घेऊन जन्माला आलेल्या हिराबाईचा जन्म २९ मे. १९०५ रोजी मिरज येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव उस्ताद अब्दुल करीमखाँ तर आईचे नाव ताराबाई असे होते. हिराबाईना लहाणपणी चंपूताई असे म्हणत. वडील किराणा घराण्याचे अध्वर्यू तर आई उत्तम गायिका होती. अनुवंशिकतेने हिराबाईंकडे गायनाचा वारसा आला. घरात वडिलबंधू सुरेशबाबू माने, हिराबाई, कृष्णराव, सरस्वतीबाई राणे आणि कमल अशी ही पाच भांवडे. घरात वडिल थोर गायक असतांनाही हिराबाईना त्यांच्याकडुन गाणविद्या मिळाली नाही. वडिलांची इच्छा होती को हिराबाईने शिकुन डॉक्टर व्हावे परंतू आई ताराबाईना मात्र हिराबाईनी संगीत शिकून नावलौकिक मिळवावा असे वाटायचे.

**३) गुरु व शिक्षण :**

हिराबाईंचे प्राथमिक शिक्षण बंधु सुरेशबाबु माने यांच्याकडे झाले. त्यानंतर आईने हिराबाईना आग्रा घराण्याचे उस्ताद महम्मद खाँ यांच्याकडे

संगीत अध्ययनासाठी पाठविले. परंतु त्यांच्याकडे जास्त काळ शिक्षण घेता आले नाही त्यांनंतर ताराबाईनी हिराबाईना किराणा घराण्याचे उस्ताद वहिद खाँ यांच्याकडे सोपविले. उस्ताद वहिद खाँ हे उस्ताद अब्दुलकरिम खाँ यांचे भाचे होते. वहिद खाँ हे कडक शिस्तीचे होते. त्यांनी हिराबाईकडून कसून रियाज करुन घेतला. हिराबाईंनीही अथक परिश्रमाने, जिद्द व चिकाटीने गुरुकडील ज्ञान आत्मसात केले. हिराबाईनी ठुमरीची तालीम गोहरजान यांच्याकडून नाट्यसंगीताचे मार्गदर्शन बालगंधर्व, सवाई गंधर्व व गोविंदराव टेंबे यांच्याकडून घेतले याचबरोबर बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी, शंकरबुवा, फैजमहम्मद खाँ व वझेबुवा यांच्याकडून सुध्दा त्यांनी मार्गदर्शन घेतले.

**४) घेतलेले परिश्रम :**

हिराबाईंनी कठोर साधना केली. एकदा तोडी रागातील ऋषभ बरोबर लागला नाही म्हणून त्यांना गुरुंची थप्पड खावी लागली. तरी रागाला न येता तंबोरा घेऊन त्यांनी ऋषभ लावून दाखविला. सहाजिकच गुरुंची शाबासकी मिळविली. आई ताराबाईंनी हिराबाईंकडून भरपूर रियाज करवून घेतला. 'स्वराकडे लक्ष असू दें', या अब्दुल करिम खाँ साहेबांच्या मंत्राचे त्यांनी कटाक्षाने पालन केले.

**५) गायनशैली**

हिराबाईंचा आवाज मधुर व सुरेल होता. किराणा घराण्याची सर्वच गाण वैशिष्ट्ये त्यांनी आत्मसात केली होती. त्यांची गायकी रसेली होती पण रंगेली नव्हती..स्वरफेक कल्पनाजन्य स्वरविलास,आलापचारी भरपूर, स्वर, ताल, लय व शब्दांवर हुकूमत, तार सप्तकातील षड्ज लावण्याची अनोखी रीत, स्वच्छ दानेदार व नागमोडी गिरकी फिरकीच्या ताना इ.वैशिष्ट्यांनी त्यांची गायकी नटलेली होती. मैफलीत सुरुवातीला त्या आकर्षक व डौलदार पद्धतीने ख्यालाची मांडणी. करायच्या. त्यानंतर छोटा ख्याल व तराणा पेश करायच्या. याशिवाय भजन, भक्तीगीते व भावगीते गाण्यातही त्यांना रस होता.

पु.ल.देशपांडे म्हणतात, ''हिराबाईचा सूर मला गाभऱ्यातील नंदादिपाप्रमाणे तेवताना दिसतो.''

**६) योगदान :**

हिराबाईंनी गायनाची पहिली मैफल सजविली ती वयाच्या १६ व्या वर्षी १९२१ मध्ये पं. वि. दि. पलुस्करांनी आयोजित केलेल्या संगीत मैफलीत

त्यांनी पटदीप राग सादर करुन श्रोत्यांची मने जिंकली. १९२१ साली त्यांनी नूतन संगीत विद्यालयाची स्थापना केली. त्या काळात एखाद्या धनिकाच्या घरी सुपारी देऊन मैफली व्हायच्या, परंतु हिराबाईंनी मात्र १९२४ साली एक धाडसी निर्णय घेतला. पुण्याच्या आर्यभूषण थिएटरमध्ये तिकीट लावून स्वतःच्या गाण्याचा कार्यक्रम केला. अनेकांनी दोन रुपयात गाणे विकत मिळत आहे अशी टिका केली. परंतु या टिकेला भीक न घालता त्यांनी हा प्रयोग यशस्वी करुन दाखविला. आज सर्वत्र तिकीट लावून कार्यक्रम होत आहेत. एका आगळ्यावेगळ्या मैफलीची मुहूर्तमेढ हिराबाईंनी रोवून संगीत जगताला एक महत्त्वपूर्ण योगदान दिले. हिराबाईच्या अनेक ध्वनिमुद्रिका प्रसारित झाल्या.

**७) नाट्यक्षेत्रात पदार्पण :**

गायनाबरोबरच त्यांनी काही नाटकातून भूमिका केल्या. ५ सप्टेंबर, १९२९ रोजी बॉम्बे थिएटर मध्ये यांनी सर्वप्रथम 'संगीत सौभद्र' या नाटकाचा प्रयोग केला. यात त्यांनी सुभद्रेची भूमिका वठविली. त्यानंतर हिराबाईंनी सुद्धा नाटक कंपनी सुरु केली. त्यात सर्व भावंडे काम करीत असत. हिराबाईंनी विद्याहरण, पुण्यप्रभाव, संशयकल्लोळ इ. नाटकात भूमिका केल्या. कांही दिवसांनी कर्जापोटी नाटक कंपनी बंद करावी लागली. कर्जवसुलीसाठी देणेकऱ्यांनी हिराबाईंना न्यायालयात उभे केले. हिराबाईंकडे तेवढे पैसे नव्हते. न्यायाधिशांनी त्यांना नादारीसाठी अर्ज करण्यासाठी सांगितले. तेंव्हा हिराबाई म्हणाल्या, ''माझ्या गळ्यात आहेत. ते माझे भांडवल आहे. मी लाचारी पत्करणार नाही.'' हिराबाईंनी अविश्रांत मेहनत करुन सावकाराचे कर्ज देऊन टाकले. सूर याच काळात त्यांनी कांही चित्रपटातूनसुद्धा भूमिका केल्या. त्यांनी प्रतिभा, सुवर्णमंदीर, संत जनाबाई इ. चित्रपटातून भूमिका साकार केल्या.

**८) पुरस्कार :**

१) १९२६ मध्ये पुण्याच्या किर्लोस्कर थिएटरमध्ये चुनीलाल मेहता यांनी त्यांना 'गानहिरा' ही पदवी बहाल केली.
२) दादासाहेब खापर्डे यांनी त्यांना 'गानकोकिळा' ही पदवी दिली.
३) १५ ऑगस्ट, १९४७ साली स्वतंत्र भारताचे राष्ट्रगीत म्हणण्याचा पहिला बहुमान मिळाला.
४) १९४९ साली अफ्रिकेचा सांगितीक दौरा केला.
५) १९६५ साली संगीत नाटक अकादमीचा राष्ट्रीय पुरस्कार.
६) १९६६ साली महाराष्ट्र शासनाने चांदीची वीणा, शाल, श्रीफळ देऊन

सत्कार केला.

७) १९७० साली भारत सरकारचा पद्मभूषण पुरस्कार.

८) १९७४ साली विष्णुदास भावे सुवर्ण पदक.

९) सूरसिंगार संसदेकडून तीन वेळा सत्कार व १० हजार रुपयांचे भवालका पारितोषिक.

१०) १९७९ साली आय. टी. सी. तर्फे आचार्य पदावर नियुक्ती.

११) षष्ट्यब्दीपूर्ती निमित्त औरंगाबाद येथे मोठा सत्कार.

**९) शिष्यसंप्रदाय :**

हिराबाईंनी किराणा घराण्याची परंपरा जोपासण्यासाठी अनेक शिष्य निर्माण केले. यामध्ये त्यांच्या भगिनी सरस्वतीबाई राणे, जानकी अय्यर, माणिक वर्मा, मालती पांडे, प्रभा अत्रे. सुलभा ठकार. शैलजा आपटे, मीरा परांजपे, बकुळ पंडित यांचा नामोल्लेख करता येईल.

**१०) स्वभाव :**

हिराबाईची वर्तणूक सोज्वळ होती. त्यांनी संगीताला शालिनतेचा साज चढविला. कष्ट करण्याची तयारी, सहनशील वृत्ती, स्थिर बुद्धी, नितांत सामंज्यसपणा, बाणेदार वृत्ती इ. सद्गुण त्यांच्यात होते. ईश्वरावर श्रद्धा, तत्वनिष्ठा, त्याग, हजरजवाबीपणा इ. सद्गुणांचे मिलन म्हणजेच हिराबाई. छछोरपणा व थिल्लरपणा याचा लवलेशही त्यांच्यात नव्हता. त्या डोळस सौंदर्यशोधक व मितभाषी होत्या.

**११) समारोप :**

चित्रपट व रंगभूमीची सेवा करीत असतांना त्यांनी अविश्रांत मैफली चालूच ठेवल्या. त्यामुळे त्यांचा स्वर खंड्यापाड्यापर्यंत पोहंचला. ताराबाई, सुरेशबाबू आणि कृष्णराव यांच्या निधनानंतर २०-२५ माणसांच्या कुटुंबाचा चरितार्थ चालविण्याची जबाबदारी त्यांनी समर्थपणे पेलली. एक समर्थ गायिका व एक आदर्श गृहिणी अशा दोन्ही भूमिका त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्या. वृद्धापकाळामुळे २० नोव्हेंबर, १९८९ मध्ये त्यांचे देहावसान झाले. त्या निघून गेल्या तरी त्यांच्या ध्वनिमुद्रिकांच्या माध्यमातून त्यांचा स्वर विलास आजही ऐकावयास मिळतो.



# ३१.

## सिध्देश्वरी देवी

**१) प्रस्तावना :**

एक काळ असा होता की, स्त्री ही समाजाच्या कोंडवाड्यात सामाजिक संकेताच्या दाव्याने जखडलेली गायच होती. परमेश्वराला पती मानण्याचे धाडस करणारी मिराबाई, शुन्यातून स्वराज्य निर्माण करणाऱ्या शिवाजी महाराजांना घडवणाऱ्या जिजामाता, 'मैं मेरी झांशी नही दूंगी' असे इंग्रजांना कणखरपणे बोलणारी झाशीची राणी, अशिक्षित असूनही काव्याचे वेड असलेल्या बहिनाबाई चौधरी या सर्व स्त्रिया ज्या अन्यायरूपी तिमिरात घडल्या, तशाचप्रकारे संगीताला जेव्हा समाजमान्यता नव्हती, तेव्हा सिद्धेश्वरी देवींनी कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या ठुमरीला शास्त्रीय संगीताच्या मैफलीत आणून बसवले. अशा या सिद्धेश्वरी देवी यांच्या जीवन कार्याचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

सिद्धेश्वरी देवींचा जन्म ८ ऑगष्ट, १९०८ रोजी बनारस येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव शामजी मिश्र तर आईचे नाव चंदाबाई असे होते. सिद्धेश्वरी देवींच्या वडिलांच्या आई मैनाबाई ह्या प्रसिद्ध गायिका होत्या. तर सिद्धेश्वरी देवींच्या आईचे वडील बद्रीराय हे तत्कालीन काशी नरेशांच्या दरबारात तबलावादक होते. एकंदरीत संपूर्ण परिवार संगीताचा भोक्ता होता. त्यामुळे त्यांना संगीताचे ज्ञानामृत घरातच मिळाले. अशा या सुखी, संपन्न व संगीतमय कुटुंबाला काळाची दृष्ट लागली. सिद्धेश्वरी देवी दीड वर्षांच्या असतानाच आई चंदाबाई यांचे निधन झाले. त्यानंतर पुढे सिद्धेश्वरी देवी ११ वर्षांच्या असतानाच वडिलांचा मृत्यू झाला. जे वय हसून-खेळून बागडायचे असते त्याच वयात त्यांचे मातृ-पितृ छत्र हरवले.

**३) मावशीकडून मिळालेली वागणूक :**

आई-वडिलांच्या निधनानंतर सिद्धेश्वरी देवी मावशीकडे राहू लागली.

सिद्धेश्वरी देवींची मावशी राजेश्वरी ही काशी नरेशाच्या दरबारात राजगायिका म्हणून होती. 'माय मरो पण मावशी राहो' अशी एक म्हण आहे. परंतु सिद्धेश्वरी देवींना मावशीकडून प्रेम मिळू शकले नाही. मुळातच संगीताचा वारसा घेऊन जन्माला आलेल्या सिद्धेश्वरी देवींना संगीत शिकण्याबद्दल ओढ होती. याउलट मावशीने सिद्धेश्वरी देवींना घरची कामे सांगून संगीतापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. मावशी दरबारी गायिका असल्यामुळे घरी अनेक कलावंत यायचे. त्यामुळे सिद्धेश्वरी देवींना आपणही कलावंत व्हावे असे मनोमन वाटायचे. मावशीने तिच्या मुलीस म्हणजेच कमलेश्वरी देवी हिला पं. सियाजी मिश्र यांच्याकडे संगीत शिकण्यासाठी पाठविले. परंतु सिद्धेश्वरी देवी यांची इच्छा असूनही मावशीने त्याकडे दुर्लक्ष केले. फुले लपवली तरी त्याचा सुगंध लपून राहत नाही. त्याचप्रमाणे सिध्देश्वरी देवींना मावशीने संगीतापासून दूर करण्याचा प्रयत्न केला तरी सिद्धेश्वरी देवीची संगीताबद्दलची ओढ कमी झाली नाही. त्या शेजारच्या घरी जाऊन गोहरजान, मलकाजान यांच्या रेकॉर्डस्? ऐकून आपली संगीत श्रवणाची इच्छा पूर्ण करायच्या. अशातच मावशीने सिद्धेश्वरी देवींना घराबाहेर काढले. अंगावरील कपड्याव्यतिरिक्त त्यांच्याकडे काहीच नव्हते. हा त्यांच्या आयुष्यातला सर्वांत वाईट काळ होता.

**४) गुरू आणि शिक्षण :**

संगीत शिकण्याची अभिलाषा उराशी बाळगलेल्या सिद्धेश्वरी देवींना संगीत शिकायचे होते. पं. सियाजी मिश्र हे त्या काळात प्रसिद्ध सारंगीवादक होते. पं. सियाजी मिश्र हे कमलेश्वरी देवींना शिकवीत असताना सिद्धेश्वरी देवी ते लपून-छपून ऐकत असत. संगीत शिकण्याची उत्कंठा पाहून पं. सियाजी यांनी त्यांना संगीताचे धडे देण्यास प्रारंभ केला. पं. सियाजी मिश्र यांच्याकडे ख्याल, टप्पा, ठुमरी यांचे भांडार होते. सिद्धेश्वरी देवी गुरु घरची सर्व कामे करीत असत. गुरूही तिला मुलगी म्हणून वागवीत असत. गुरुसेवा करून सिद्धेश्वरी देवींनी गुरूंची मर्जी संपादन केली. परंतु दुर्दैवाने पं. सियाजी मिश्र यांचे निधन झाले. त्यानंतर सिद्धेश्वरी देवींना बनारसचे गायक पं. बडे रामदास यांच्याकडून मार्गदर्शन मिळाले. अर्थात बडे रामदास यांच्या कृपादृष्टीमुळे सिद्धेश्वरीदेवींच्या गायकीस एक वेगळे वळण मिळाले. त्यांना गायिका म्हणून मान मिळवून देण्यामध्ये पं. बडे रामदास यांचे उल्लेखनीय योगदान आहे.

त्यानंतर त्यांनी लाहोरचे इनायत खाँ व देवासचे रजबअली खाँ यांच्याकडूनही संगीताचे शिक्षण घेतले.

### ५) गायकी

सिद्धेश्वरी देवींनी शास्त्रीय संगीताचा शास्त्रशुद्ध अभ्यास केला होता त्यामुळे त्या धृपद, धमार व ख्याल इ. प्रकार लीलया गात असत. परंतु त्यांची अभिरुची होती ती ठुमरी, टप्पा, होरी, चैती, कजरी, दादरा, भजन इ. उपशास्त्रीय प्रकार गाण्यामध्ये. विशेषता ठुमरी या गीत प्रकाराला प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी त्यांनी ठुमरी या गीतप्रकारावर विशेष लक्ष केंद्रित केले. बनारस व पुरब अंगाची ठुमरी त्या सराईतपणे गात असत. ठुमरी सादर करताना बोलबाट, बोलबनाव हे विशेष कौशल्याने प्रस्तुत करीत असत. त्यांचा आवाज दाणेदार होता. गीताचे शब्द त्या मोकळेपणाने, आवाज न चोरता गात असत. त्यामुळे गीतातील भावना श्रोत्यांच्या अंतःकरणाला सहज भिडत असत. ख्यालाच्या बढतप्रमाणे त्या ठुमरीची बढत करीत असत. ठुमरीमधील सैंय्या, पिया असे शृंगार व बिभित्स रसपूर्ण शब्द असल्यामुळे ठुमरीला सामाजिक प्रतिष्ठा नव्हती. हे लक्षात घेऊन त्यांनी सैंया, पिया यांसारखे शब्द गातांना भक्तिरसाचे दर्शन रसिकांना घडवून दिले. अशा प्रकारे ठुमरीमध्ये आपला भाव ओतून ठुमरीला सामाजिक मान्यता प्राप्त करून दिली. त्यामुळेच त्यांना 'बनारस ठुमरीची राणी' म्हणून लोकप्रियता मिळाली.

### ६) सिद्धेश्वरी देवी यांच्या ठुमरी संदर्भातील गौरवोद्गार :

मुंबई येथे एका मैफलीमध्ये सिद्धेश्वरी देवींचे गायन होते. त्याच ठिकाणी श्रोत्यांमध्ये उस्ताद फैय्याज खाँ हे उपस्थित होते. सिद्धेश्वरी देवींनी 'काहे को डारी गुलाल रे ब्रजलाल कन्हाई' ही भैरवी रागातील ठुमरी पेश केली. ती इतकी रंगली की फैय्याज खाँ साहेब म्हणाले, ''गोहरजान आणि मलकाजान यांच्यानंतर ठुमरीवर सिद्धेश्वरी देवींचाच हक्क आहे.'' जयपूर घराण्याच्या प्रसिद्ध गायिका केसरबाई केरकर यांची १९६२ मध्ये मुंबई येथे मैफल चालू होती. उपस्थित श्रोत्याने त्यांना ठुमरी गाण्याची फरमाईश केली. ही मैफल चालू असतानाच सिद्धेश्वरी देवी याही रसिकांमध्ये बसलेल्या होत्या. तेव्हा केसरबाईंनी आपले गाणे थांबवले व सिद्धेश्वरी देवीकडे बोट दाखवून म्हणाल्या की, ''जोपर्यंत आमच्यामध्ये ठुमरीची सम्राज्ञी सिद्धेश्वरी देवी उपस्थित आहे तोपर्यंत मी ठुमरी कदापिही गाणार नाही.' उपरोक्त दोन

प्रसंगांवरून सिद्धेश्वरी देवीची ठुमरीवरील असलेली हुकमत स्पष्ट होते.

**७) योगदान :**

सिद्धेश्वरी देवी यांचा पहिला कार्यक्रम वयाच्या १७ व्या वषी पंछगछिया संस्थानात झाला. त्यानंतर त्यांचा दुसरा कार्यक्रम वयाच्या १९ व्या वर्षी अलाहाबाद जवळील मांडा या संस्थानात खास दरबारात झाला. सिद्धेश्वरी देवी यांच्या गायकीची मोहिनी संपूर्ण हिंदुस्थानाच्या रसिकांवर पडली होती. त्यामुळे त्यांचे अनेक संस्थानिकांच्या दरबारात व देशातील प्रमुख शहरात गाण्याचे कार्यक्रम होऊ लागले. आकाशवाणीवरूनही त्यांचे अनेक कार्यक्रम प्रसारित झाले. देशातच नव्हे तर अफगाणिस्तान, नेपाळ, इंग्लंड, रोम, काबूल इ. देशांकडून त्यांना निमंत्रणे. येऊ लागली. सिध्देश्वरी देवींनी गायनाबरोबरच. अभिनय क्षेत्रातही ठसा उमटविला. मुंबईच्या 'उषा सिनेटोन' या कंपनीच्या माध्यमातून त्यांनी काही चित्रपटांत भूमिका केल्या. याच काळात त्यांचा विवाह सैन्यामध्ये काम करणाऱ्या एका पंजाबी ब्राह्मणाशी झाला. त्यानंतर बनारस सोडून त्या दिल्ली येथे स्थायिक झाल्या. तेथे त्यांची 'भारतीय कला केंद्रात' ठुमरीचे शिक्षण देण्यासाठी नियुक्ती झाली.

**८) सन्मान :**

सिद्धेश्वरी देवींनी केलेल्या कार्याची पावती म्हणून त्यांना अनेक मान-सन्मान देऊन गौरवण्यात आले. त्यांपैकी काही मान-सन्मानाची सूची खालीलप्रमाणे देता येईल.

१. १९४० साली उस्ताद फैय्याज खाँ यांनी सिद्धेश्वरी देवींना 'ठुमरी सम्राज्ञी' या संज्ञेने गौरविले.
२. १९६६ साली भारत सरकारने त्यांना 'पद्मश्री' हा किताब देऊन सन्मानित केले.
३. १९६७ मध्ये त्यांना संगीत नाटक अकादमीची फेलोशिप मिळाली.
४. १९७२ साली रवींद्रभारती विश्वविद्यालयाने त्यांना डी.लिट्. ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला.
५. विश्वभारती विश्व विद्यालयाने 'देशीकोत्तम' ही मानाची उपाधी दिली.
६. महाराष्ट्र सरकारने त्यांना सुवर्ण पदक प्रदान केले.
७. राष्ट्रीय प्रोफेसर होण्याचा बहुमान त्यांना मिळाला.

याचबरोबर अनेक संस्थानिक, सामाजिक, सांस्कृतिक व

शैक्षणिक.संस्थांकडून त्यांना अनेक पदके, मानपत्रे व मानसन्मान मिळाले.

**९) सिद्धेश्वरी देवींचे मत :**

सिद्धेश्वरी देवींचे संगीत अध्ययन करणाऱ्या शिष्यांच्या बाबतीत काही.निश्चित मते होती. त्यांच्या मृत्यूच्या काही महिन्यांपूर्वी त्यांनी संगीताच्या स्थितीबद्दल.व कलावंतांबद्दल मतप्रदर्शन केले होते. त्या म्हणतात, ''पूर्वीच्या काळात कलाकार एकाच विषयावर प्रभुत्व मिळवीत असे. धृपदिया धृपद गात असे, ख्यालिया ख्याल गात असे, तर ठुमरीया हा ठुमरी गात असे. त्यामुळे त्या त्या विषयातील सखोल ज्ञान त्याला प्राप्त होत असे. आता मात्र कलाकाराचे लक्ष सर्वच गायन प्रकारांकडे असते. त्यामुळे कलाकाराची माहिती वाढते व तेवढ्यापुरती त्याची प्रगती होते असे वाटते. परंतु त्याच्या कलेत परिपक्वता येत नाही.'' खरोखरच त्यांचे हे मत वर्तमान काळातील कलावंतांनासुध्दा दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरते.

**१०) मृत्यू :**

ज्यांनी परंपरागत सामाजिक बंधनांना झुगारून देत संगीत क्षेत्राला एक नवे परिमाण मिळवून दिले, ठुमरीसारख्या कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या गीत प्रकाराला ज्यांनी सुवर्णमुकुट चढविला. किंबहुना ज्यांनी संगीत क्षेत्रात ठुमरी आणि सिद्धेश्वरी देवी असे समिकरण जुळविले अशा थोर ठुमरी सम्राज्ञी सिद्धेश्वरी देवी १५ मार्च, १९७७ रोजी आपल्यातून कायमच्याच निघून गेल्या.

**११) श्रद्धांजली :**

संगीत प्रचारासाठी एक गुरुकुल काढावे अशी त्यांची अंतिम इच्छा होती. या इच्छेला पूर्णत्व देण्याचे कार्य त्यांची कन्या सविता देवी यांनी केले. सविता देवी या सतारवादक तर आहेतच पण त्याचबरोबर त्या कुशल गायिकासुद्धा आहेत. मातेची स्मृती चिरकाल राहावी यासाठी सविता देवींनी १९७८ मध्ये 'श्रीमती सिद्धेश्वरी देवी अकॅडमी ऑफ इंडियन म्युझिक' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून ठुमरी, दादरा इ. गीतप्रकारांचे संवर्धन करण्याचे महान कार्य केले जात आहे.



# ३२.

## पंडित ओंकारनाथ ठाकूर

**१) प्रस्तावना :**

भारतीय संगीताचा विशाल वटवृक्ष व्हावा हे पंडित विष्णू दिगंबर पलुस्करांचे एक सोनेरी स्वप्न होते. भारतीय संगीताचा प्रचार व प्रसार व्हावा ही त्यांची मनस्वी इच्छा होती. या इच्छेला मुर्त रूप देण्यात व हे सोनेरी स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी त्यांच्या अनेक शिष्याने जीवापाड परिश्रम घेतले त्या शिष्यांमध्ये पंडित ओंकारनाथ ठाकूर यांचे नाम अग्रक्रमाने घ्यावे लागेल. संगीतशास्त्र व संगीत कला यांचा मनोहरी संगम साधण्याचे कार्य ज्यांनी केले असे मोजक्या कलावंतांमध्ये पंडित ओंकारनाथ ठाकूर हे एक कलावंत होते.त्यांच्या जीवनकार्याचा आढावा खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**२) जन्म :**

पंडित ओंकारनाथ ठाकूर यांच्या वडिलांचे नाव गौरीशंकर तर आईचे नाव झवेरबा असे होते. वडील अत्यंत धार्मिक अध्यात्मिक व पारमार्थिक स्वभावाचे होते.ते ओंकाराचे उपासक होते. त्यांचे आई सुद्धा पूजा, अर्चा व उपासनेमध्ये रममान असायची. ती सुशील होती. ईश्वर भक्त होती व एक महान साध्वी होती. ओंकारनाथ पोटात असताना ती म्हणायची माझ्या पोटी मुलगाच होणार आणि त्याचे नाव ओंकारच ठेवणार. यावर लोक हसायचे व त्यांची टिंगलटवाळी करायचे. परंतु गौरीशंकर याची तपस्या व आत्मविश्वास दांडगा होता. आणि ठरल्याप्रमाणे आणि २४ जून १८९७ रोजी बडोदा जवळील जहाज या गावी या दांपत्याच्या पोटी एका तेजस्वी बालकाचा जन्म झाला. ठरल्याप्रमाणे त्या मुलाचे नाव ओंकरनाथ असे ठेवण्यात आले.

**३) बालपण :**

घरात धार्मिक व आध्यात्मिक वातावरण होते. 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' या उक्तीप्रमाणे चिमुकल्या ओंकारावर सुसंस्कार होऊ लागले. लहानपणापासूनच ओंकारनाथांचा आवाज गोड, उंच व पल्लेदार होता. त्यांची स्मरणी शक्ती दांडगी होती. तसेच श्रवण भक्ती ही तल्लख होती. ते लहानपणापासून कविता करायचे. गायन करण्यातही ते तरबेज होते.ते अनेक कलावंतांच्या गायनाची हुबेहूब नकल करायचे. या सर्व गुणांमुळे त्यांचे शाळेत कौतुक व्हायचे. त्यांचे वडील म्हणायचे, ''ओंकार स्वरुपी असलेला हा माझा ओंकार नाद उपासक आहे.तो सरस्वतीचा पुत्र आहे. तो निश्चितच एके दिवशी महान गायक होणार.''

**४) आयुष्यातील वाईट कालखंड :**

ओंकारनाथांचे वडील तपस्वी होते. त्यांना मृत्यूची तारीख व वेळ सुद्धा माहीत होती. त्यांनी ती त्यांच्या मृत्यूपूर्वी सात दिवस आधी सांगून ठेवली होती. ते ओंकार साधनेत मग्न झाले आणि ठरलेले वेळी ते समाधीस्थ झाले. त्यांच्या मृत्यू नंतर ठाकूर कुटुंबीयावर दुःखाची कुऱ्हाड कोसळली. घरची आर्थिक परिस्थिती ठीक नसल्यामुळे ओंकारनाथांच्या आईला मोल मजुरी करावी लागली. चिमुकल्या ओंकारनाथाला सुद्धा मिल मध्ये काम करावे लागले. तर काही वेळा रामलीलेत अभिनय करून कुटुंबाच्या पालन पोषणाकरिता हातभार लावावा लागला.

**५) आयुष्याला कलाटणी देणार क्षण :**

ओंकारनाथांना एकदा भडोच येथे एका पारशी शंकर डुंगाजी शेठजी पुढे गाणे गाण्याचा संधी मिळाली. छोट्याशा ओंकारनाथाचे गाणे ऐकून ते शेठजी अत्यंत आनंदी झाले. त्याची असाधारण प्रतिभा पाहून ते थक्क झाले. अशा मुलाला पंडित विष्णू दिगंबर पुरस्कारांसारख्या गुरूकडे घेऊन जायला जायला हवे असे त्यांना वाटले. अशाप्रकारे ओंकारनाथ ठाकूर यांना वयाच्या तेराव्या वर्षी पंडित विष्णू दिगंबर पुरस्कारांकडे संगीत शिक्षण घेण्यासाठी मुंबईला पाठवावे असा निर्णय त्यांनी घेतला. हा त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारा क्षण ठरला.

**६) गंधर्व महाविद्यालयात प्रवेश :**

अशाप्रकारे पारशी शेठजींच्या प्रयत्नातून १९१२ मध्ये ते गांधर्व महाविद्यालय, मुंबई येथे दाखल झाले. तेथे त्यांनी त्यांचे राहणे, खाणे व

गायन शिकण्याची नि:शुल्क सोय करण्यात आली.अथक परिश्रमाने त्यांनी गुरूंची मर्जी संपादन केली. अल्पावधीतच ते उत्तम गायक होऊ लागले. पाहता पाहता ९ वर्षाच्या साधनेनंतर ते उत्तम गायक व शिक्षक झाले. गुरु सेवा, कठोर साधना व प्रतिभा संपन्न व्यक्तिमत्त्वामुळे हे पंडित पुरस्कारांचे पट्टशिष्य झाले. त्यांनी ओंकारनाथांना आशीर्वाद दिला व गायन प्रचार व प्रसार करण्यासाठी महाविद्यालयातून मुक्त केले.

**७) साक्षात्कारी गायक :**

पंडित ओंकारनाथ हे नावाप्रमाणे ओंकाराचे नाद उपासक होते. ते भारदस्त गायक होते. त्यांचा आवाज दमदार व पहाडी होता. ते तीनही सप्तकात मुक्त संचार करायचे. त्यांचे श्वासोस्वासावर पूर्ण नियंत्रण होते. त्यांचा आवाज जितका जोरकस तितकाच लवचिक होता. त्यांचे गायन सुरेल, भावपूर्ण व स्वरप्रधान होते. षडज भरताना मजा यायची. कल्पक आलापचारी बेहलावे, भरदार व दाणेदार ताना, रेखीव बंदिश स्पष्ट शब्दोचार इत्यादीमुळे त्यांना विविध संमेलन, जलसे व महोत्सवातून निमंत्रणे येऊ लागली.

**८) भारदस्त व्यक्तिमत्व :**

त्यांचे गायन असे दमदार तसेच त्यांचे व्यक्तिमत्व सुद्धा भारदस्त होते.त्यांची शरीर यष्टी धडधाकट व उंची पुरी होती. लांब अंगरखा, धोतर किंवा चुडीदार, उपरणे अशी त्यांची वेशभूषा असायची. प्रसन्न मुद्रा व मानेवर वाढलेल्या केसांचे आयाळ इत्यादीमुळे त्यांचे व्यक्तिमत्व भारदस्त दिसायचे. असे दैवी व्यक्तिमत्व पाहून प्रत्यक्ष रंगदेवता अवतीर्ण झाल्याची अनुभुती श्रोत्यांना झाली तरच नवल. प्रत्यक्ष गाताना सुद्धा त्यांची एक वेगळीच ऐट होती. मैफलीचा तोल संभाळत ते गायन करायचे. मागे चार जबारीदार तंबोरे, बाजूला सारंगी, व्हायोलिन व तबल्याचे साथीदार. या सर्वांच्या मध्ये पंडित ओंकारनाथ आसनस्थ व्हायचे. श्रोते कानात व डोळ्यात प्राण ओतून हे विलोभनीय दृश्य डोळ्यात साठवून घेत असत. अशा प्रसन्न वातावरणात पंडितजी गुरुस्तवन व ओंकाराची साधना करित षडज लावायचे.आणि श्रोत्यांना नादब्रह्मात डोलवायला लावायचे.

**९) योगदान :**

ते १९२१ मध्ये लाहोर येथील गांधर्व महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी विराजमान झाले. त्यांनी हे पद अत्यंत यशस्वीपणे व समर्थपणे पेलले. त्यांनी लेखक, वाग्गेयकार, शास्त्रकार, रचनाकार, व्याख्याता अशा अनेक भूमिका

आपल्या आयुष्यात निभावल्या.१९३८ मध्ये ‘संगीतांजली भाग-१’ या ग्रंथाचे प्रकाशन केले.त्यांनी शास्त्र व क्रियात्मक या दोन्ही अंगावर प्रकाश टाकलेला आहे.याचबरोबर त्यांनी ‘प्रणव भारती’ हा ग्रंथ लिहून सांगीतिक साहित्यात भर टाकली. एवढेच नाही तर त्यांनी संगीत विषयावर अनेक ठिकाणी व्याख्याने दिली. नेपाळ, इटली फ्रान्स अशा अनेक देशात त्यांनी संगीताचा प्रचारार्थ दौरे केले. बनारस हिंदू विश्व विद्यापीठात त्यांनी ‘कला संगीत भारती’ या संस्थेची स्थापना केली.

**१०) शिष्यसंप्रदाय :**


ते एक उत्तम ज्ञानसाधक तर होतेच त्याचबरोबर ते एक ज्ञानदातेही होते. त्यामुळे त्यांच्या हातून अनेक शिष्य निर्माण झाले. त्यांच्या शिष्यांमध्ये बळवंतराव भट, डॉ. प्रदीप कुमार दीक्षित कनकराव त्रिवेदी, डॉ. एल काबरा, बासूलालजी भट्ट, श्रीमती एम्? राजम इत्यादी कलावंतांचा नामोल्लेख करता येईल.

**११) मानसन्मान :**

पंडित ओंकारनाथ ठाकूर यांना संगीत प्रभाकर, संगीत मार्तंड अशा पदव्याने सन्मानित केले. १९५२ मध्ये सांस्कृतिक शिष्य मंडळासमवेत अफगाणिस्तानचा दौरा केला. १९५३ मध्ये त्यांनी युरोप यात्रा केली. इसवी सन १९५३ मध्ये बुडापेस्ट येथे व इसवी सन १९५४ मध्ये जर्मनी येथे आयोजित केलेल्या विश्वशांती परिषदेसाठी भारताचे नेतृत्व केले. १९५५ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मश्री हा पुरस्कार देऊन सन्मानित केले.

**१२) समारोप :**

ओंकारनाथ विदेशी दौरे करीत असतानाच विदेशात त्यांच्या पत्नीचे निधन झाले.त्यामुळे ते परत भारतात आले. ज्या व्यक्तीमुळे आपण संगीत अध्ययन केले त्यांच्या स्मृती कायम ठेवून ते भडोच तेथे आले व तेथे स्थायिक झाले. वर्धापकाळात त्यांचे शरीर थकले होते. यातच २९ डिसेंबर १९६७ रोजी ते ओंकार नादात विलीन झाले. ते जरी आपल्यातून निघून गेले तरी त्यांच्या ध्वनिफितीच्या माध्यमातून ते आजही आपल्यात असल्याचे अनुभूती रसिकांना येते.



# ३३.

## पंडित निखिल बॅनर्जी

**१) प्रस्तावना :**

पंडित पन्नालाल घोष यांनी आपल्या मधुर बासरी वादनाने साऱ्यांना मंत्रमुग्ध केले. उस्ताद अल्लार खाँ यांनी आपल्या तबलावादनाने रसिकांना डोलवायला लावले. पंडित गजाननबुवा जोशी यांनी व्हायोलिन वादनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून टाकले. पंडित गोविंदराव टेंबे यांनी हार्मोनियम वादनाने साऱ्यांना वेड लावले तर पंडित निखिल बॅनर्जी यांनी आपल्या सतार वादनाने साऱ्या देशवासीयांच्या हृदयातल्या तारा छेडल्या. अशा थोर सतार वादकाच्या जीवनकार्याचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

पंडित निखिल बॅनर्जी यांचा जन्म १४ ऑक्टोबर १९३१ मध्ये कोलकत्ता येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जितेंद्रनाथ बॅनर्जी असे होते. ते संगीताचे उत्तम जाणकार होते. त्यामुळे बालपणापासूनच निखिल यांना त्यांनी संगीताचे धडे देण्यास प्रारंभ केला. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात या म्हणीप्रमाणे लहानपणापासूनच त्यांची संगीत शिकण्यातील गती पाहून ते भविष्यात मोठा कलावंत होतील असे वडिलांनी भाकीत केले आणि झाले ही तसेच. अत्यल्प वयात पंडित निखिल बॅनर्जी उच्च कोटीचे कलावंत झाले.

**३) गुरु व शिक्षण :**

पंडित निखिल बॅनर्जी यांनी सातारवादनाचे प्राथमिक शिक्षण त्यांचे वडील जितेंद्रनाथ बॅनर्जी यांच्याकडून घेतले. त्यानंतर त्यांनी गौरीपुरच्या महाराजांकडून शिक्षण घेतले.महाराजांच्या सहकार्याने ते पुढे मेहरला उस्ताद अल्लाउद्दीन खाँ यांच्याकडे गेले. परंतु ते त्यांना आपला शिष्य म्हणून घ्यायला उत्सुक होते. कारण उस्ताद अलाउद्दीन खाँ यांना जास्त विद्यार्थी घ्यायचे नव्हते, पण बॅनर्जींनी रेडिओवर प्रसारित केलेला आवाज ऐकून त्यांनी आपला विचार बदलला आणि त्यांना शिष्य म्हणून स्वीकारले.तेथे त्यांनी उस्ताद अल्लाउद्दीन खाँ यांच्याकडून सरोद वादनाचे शिक्षण घेतले. खाँ साहेबांनी

मोठ्या प्रेमाने त्यांना सरोद वादनाची तालीम त्यांना दिली. त्यानंतर त्यांनी सतार वादनाची ही ज्ञान संपादन केले. १९५२ पर्यंत खाँ साहेबांकडून शिक्षण घेतल्यानंतर इसवी सन १९५६ पासून उस्ताद अल्लाउद्दीन खाँ यांचे पुत्र उस्ताद अली अकबर खाँ यांच्याकडून ज्ञानार्जनास प्रारंभ केला. रात्रंदिवस अविरत परिश्रम घेतल्यामुळे त्यांना उच्च कोटीचे सतार वादक होण्यास उशिर लागला नाही.

**४) योगदान :**

पंडित निखिल बॅनर्जी यांच्या अथक परिश्रमाचे द्योतक म्हणून हळूहळू त्यांची कीर्ती सर्वदूर पसरू लागली. त्यांना नावलौकिक मिळाल्यानंतर ते विविध संगीत संमेलनामध्ये सतार वादन करू लागले. याचबरोबर विविध आकाशवाणी केंद्रावरून त्यांचे सतार वादन प्रसारित झाले.भारतीय सांस्कृतिक मंडळाबरोबर त्यांनी अनेक देशांमध्ये सतारवादन करून भारताची शान मान उंचावण्याचा प्रयत्न केला. उस्ताद अली अकबर खाँ म्युझिक कॉलेज,कलकत्ता व कॅलिफोर्निया येथे प्रोफेसर म्हणून सुद्धा त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. ते रवींद्र भारती विश्वविद्यालयाशी सुद्धा जोडले गेले होते.भारत सरकारच्या वतीने त्यांना पद्मभूषण हा पुरस्कार देऊन सन्मानित केले.

**५) वादन शैली :**

अथक परिश्रमाने त्यांचे वादन सुरीले झाले होते. विलंबित त्यांचे वादन जेवढे मधुर होत होते तेवढेच त्यांचे दृत लयीत वादन विलक्षण व्हायचे. त्यांची वादनातील तयारी कल्पनातीत होती.ते मसितखानी गतीत छोटे छोटे तोडे घेऊन वादनातील रंजकत्व वाढवायचे. त्रिताल बरोबरच इतर तालात सुद्धा ते लीलया वादन करायचे.त्यांच्या वादनावर कधी कधी सरोद वादनाची छाप दिसून येते.कारण त्यांचे शिक्षण सरोद वादक उस्ताद अली अकबर खाँ यांच्याकडे झाले होते. खुसरुबानी व मध्यमी या रागांची त्यांने निर्मिती केली.

**६) समारोप :**

पंडित निखिल बॅनर्जी यांनी सतार वादनात एक स्वतंत्र स्थान प्राप्त केले होते. कठीण परिश्रमामुळे व अजोड वादन शैलीमुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होऊ लागले. आयुष्याच्या अखेरीस ते कलकत्ता येथे वास्तव्यस होते. असे थोर कलावंत वयाच्या ५४ व्या वर्षी म्हणजे २७ जानेवारी १९८६ रोजी स्वर्गवासी झाले. त्यांच्या अकाली जाण्याने भारतीय संगीत विश्व पोरके झाले.



# ३४.

# गाणसरस्वती किशोरी आमोणकर

**१) प्रस्तावना :**

भारतीय अभिजात संगीताचा प्रचार आणि प्रसार करण्यात अनेक कलावंतांनी आपला सर्वस्वाचा होम केला, कठोर साधना करून अभिजीत संगीत कला आत्मसात केली. गुरुकृपेने मिळालेली ही कला केवळ देशातीलच नव्हे तर जगभरातील रसिकांना भरभरून दिली, असा कलावंतांमध्ये गाणसरस्वती किशोरीताई आमोणकर यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. त्यांच्या सांगीतिक कार्याचा आढावा पुढील मुद्द्यांच्या आधारे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

हिंदुस्थानी अभिजात शास्त्रीय संगीतातील जयपूर घराण्याच्या एक प्रतिभासंपन्न गायिका किशोरीताई यांचा जन्म १० एप्रिल १९३२ मध्ये मुंबई येथे झाला. जयपूर घराण्याच्या विख्यात गायिका गानतपस्विनी मोगूबाई कुर्डीकर व माधवदास भाटिया यांच्या त्या ज्येष्ठ कन्या. किशोरीताईंचे शालेय शिक्षण मुंबई येथील बालमोहन व प्रार्थना समाज या शाळांमध्ये झाले. त्यानंतर जयहिंद महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेत पदवीपर्यंतचे शिक्षण त्यांनी घेतले.

**३) गुरु व शिक्षण :**

किशोरीताई यांच्यावर बालपणापासूनच संगीताचे संस्कार होऊ लागले. जयपूर घराण्याचे थोर गायक उस्ताद अल्लादिया खाँ मोगूबाईंना गायनाची जी तालीम देत असत त्यातून त्यांना संगीताचे बाळकडू मिळाले. १९३९ साली पती माधवदास यांचे निधन झाल्यावर मोगूबाईंवर स्वत: अर्थार्जन करून तीन मुलांच्या संगोपनाची जबाबदारी आली. मात्र मोगूबाईंनी आपल्या कन्येस जयपूर घराण्याची तालीम दिली. मोगूबाईं शिवाय बाळकृष्ण

पर्वतकर, आग्रा घराण्याचे अन्वर हुसेन खाँ, जयपूर घराण्याचे मोहनराव पालेकर, भेंडीबाजार घराण्याच्या अंजनीबाई मालपेकर व अल्पकाळासाठी मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर, शरदचंद्र आरोलकर यांचेही मार्गदर्शन त्यांना लाभले. निवृत्तीबुवा सरनाईक यांचेकडूनही काही बंदिशी त्या शिकल्या. लहानपणापासूनच त्यांना गायनाची आवड होती. उपजत कुशाग्र सांगीतिक सौंदर्यबुद्धी व अपेक्षित असणारी सांगितिक अभिव्यक्ती स्वत:च्या गळ्यातून साकारण्यासाठीचा अट्टाहास यामुळे किशोरीताईंनी अल्पवयातच रागगायनाबरोबरच विविध अशा गीतप्रकारात प्राविण्य मिळवले. 'गुरू तुम्हाला बळ देतो.. पण चालायचं, धावायचं तर तुम्हालाच असतं..' ही किशोरीताईंची गुरूबाबतची मनोधारणा होती.

**४) संगीत साधना :**

त्यांची स्वरांवर निस्सीम भक्ती होती. रियाझ करताना त्या अडीच-तीन तास झाले तरी गंधार-पंचमापर्यंतच असायच्या. त्यांचे स्वरांवरील प्रभुत्व अफाट होते. प्रत्येक स्वराचे प्रकटीकरण करण्याची ताईंची एक खास शैली होती आणि त्या प्रकटीकरणातून प्रत्येक वेळी वेगळे काही सांगितले जायचे, इतका त्यांचा स्वरांचा सूक्ष्म अभ्यास होता. कंठसंगीतावर वर्षानुवर्षे कठोर परिश्रम, सराव आणि अंगभूत प्रतिभेमुळे किशोरीताईंचे गाणे कसदार होते व रसिकांच्या हृदयाचा ठाव घेते. रियाज तर सर्वजणच करतात परंतु त्यांना एक सिद्धी लाभली होती.त्यामुळेच त्यांचा सूर हा लखलखत्या झुंबरसारखा तेजस्वी झाला होता.

**५) गायकी :**

किशोरीताईंसाठी गाणं, संगीत, स्वर म्हणजे द्वैत नव्हतंच. अद्वैत होतं. संगीताप्रती पराकोटीचे विनम्र भाव बाळगून हे अद्वैत साधायचा त्या प्रयत्न करायच्या. त्यांचे गाणे म्हणजे उच्च कोटीचा आध्यात्मिक अनुभव देणारा असा तो क्षण असायचा. त्यांना असुंदर, बेसूर असे त्यांना काहीच मान्य नव्हते. ख्यालाचे संपूर्ण अवकाश व्यापताना त्यांनी कुठेही पोकळी सोडली नाही. विलंबित लयीतून द्रुत लयीत थेट आल्यामुळे श्रोत्यांना मिळणाऱ्या रागाच्या अनुभूतीत व्यत्यय येऊ नये, श्रोते त्या रागात तरंगत असताना त्या तरंगण्याला कुठेही धक्का लागू नये, यासाठी त्यांनी मध्य लयीच्या अध्ध्या तालातील बंदिश बांधली. गाण्याच्या सौंदर्याला कुठेही बाधा येऊ नये,

यासाठी त्या जागरुक असायच्या! किशोरीताईंचे गाणे ऐकताना आपण दैवी अनुभव घेत आहोत असे वाटायचे. ते गाणे मनाला स्पर्श करून जायचे.

आरती अंकलीकर त्यांच्या गायकी बद्दल लिहितात, ''ताईंची बुद्धी अफाट. रागाचा स्वयंभू विचार ताईंचा. जयपूर घराण्याची गायकी कोळून प्यायलेल्या, ती आत्मसात केलेल्या ताई. त्यापलीकडे जाऊन रागाच्या अमूर्ततेचा विचार करणाऱ्या, मनात आलेला प्रत्येक विचार गळ्यातून हुकमतीनं काढणाऱ्या ताई. पाण्यासारखा गळा, अत्यंत विलक्षण, असरदार. गळ्यात प्रत्येक अलंकार. मींड, खटका, मुरकी, तान, कण, जलद-अतिजलद ताना, दाणेदार ताना.. तारसप्तकातल्या मध्यमावरून क्षणात खाली षड्जावर येऊन मुखडा म्हणत. विलक्षण प्रतिभा, अतिउत्कृष्ट आवाज, बुद्धी, मन. त्यांच्या संगीतातल्या अध्यात्मामुळे अनेकानेक रसिकांची जीवनं उजळून टाकणाऱ्या ताई.''

**६) आणि आवाज लुप्त झाला :**

वयाच्या पंचविशीत असताना एक दुर्दैवी घटना घडली. अचानक त्यांचा गाण्याचा आवाजच लुप्त झाला. सुमारे दोन वर्षे त्या गाऊच शकत नाहीत. आयुर्वेदिक उपचारानंतर त्यांना गाता येवू लागले. या दोन वर्षांच्या अवकाशानंतर नंतर त्यांच्या गाण्यानं महत्त्वाचं वळण घेतलं. हा कालावधी त्यांना संगीतावरील चिंतनासाठी खूप उपयुक्त ठरला. संगीताचा, रागांचा, श्रुतींचा, रससिद्धांताचा सखोल विचार त्यांनी या काळात केला. दोन वर्षांच्या स्वल्पविरामानंतर त्या जेव्हा पुन्हा गाऊ लागल्या तेव्हा तो सारा विचार त्या गाण्यातून प्रकट झाला. जटिल व काहीशा कर्मठ अशा रागनियमांतून त्यांचं गाणं अलवारपणे मुक्त झालं. नियमांना सोडून नाही तर त्यातील भाव अधिक मोलाचा मानून त्या गाऊ लागल्या. त्यातून त्यांचं गाणं अधिक विस्तारलं.. विकसित झालं. जे संगीतप्रेमींना खूप काही देत राहिलं.

**७) लोकप्रिय गाणी :**

कोणत्याही गाण्याला त्यांचा परिस्पर्श व्हायचा आणि त्या गाण्याचा सोनं होऊन जायचं अशीच अनेक गीत त्यांनी आजारांवर करून ठेवले आहेत. यात अवघा रंग एक झाला.. शामसुंदर राजसा.. म्हारो प्रणाम.. उड जा रे कागा.. पडले दूर देशी.. घट घट मे पंछी बोलता.. अवघा तो शकुन.. आणि अर्थातच सहेला रे...अशी त्यांची अनेक गाणी आजही रसिकांच्या

मनावर अधिराज्य गाजवीत आहेत. त्या शुद्ध शास्त्रीय रागदारी बरोबरच ठुमरी, मराठी अभंग, भावगीतं, हिंदी अभंग, निर्गुणी भजनं इत्यादी प्रकार प्रभावीपणे सादर करीत असत.

**८) सांगीतिक योगदान :**

किशोरीताईंनी इ.स. १९५० चे दरम्यान आपल्या व्यावसायिक कारकिर्दीस प्रारंभ केला. किशोरीताईंची शास्त्रीय संगीत कारकीर्द बहराला लागली ती सन १९६०च्या आसपास.इ.स. १९६४ मध्ये हिंदी चित्रपट 'गीत गाया पत्थरोंने' साठी त्यांनी पार्श्वगायन केले आहे. इ.स. १९९१ मध्ये प्रसारित झालेल्या 'दृष्टी' ह्या हिंदी चित्रपटाचे संगीत दिग्दर्शनही त्यांनी केले आहे. त्यांनी आजवर देशोदेशी आपले संगीत कार्यक्रम केले असून भारतातील प्रमुख संगीत महोत्सवांत त्यांना आपली कला सादर करण्यासाठी सन्मानपूर्वक बोलावले जायचे. त्यांनी 'स्वरार्थरमणी – रागरससिद्धान्त' हा संगीतशास्त्रावरील ग्रंथ लिहिला आहे. शास्त्रीय संगीतातील भावप्रधान गायकीचा प्रकार त्यांनी पुनरुज्जीवित केला असे मानले जाते.

**९) बंदीशी व रागांची निर्मिती :**

किशोरीताईंनी अनेक भावपूर्ण बंदिशींची रचना केली. उदा., भूप (प्रथम सूर साधे, सहेला रे, मै तेरी रे), बागेश्री (बिरहा ना जरा, आज सह्यो ना जाए बिरहा, एरी माई साजन नही आये),यमन (मो मन लगन लागी, तोसे नेहा लागा), नंद (आजा रे बालमवा), खंबावती (रे निर्मोही सजना), हंसध्वनी (गणपत विघनहरन, आज सजनसंग मिलन, तराना), ललितबिभास (चलो री सखी सौतन घर जैये), अहिरभैरव (नैनवा बरसे) इत्यादी. तसेच आनंदमल्हार (बरसत घन आयो), सावनमल्हार (रे मेघा ना बरसो) हे रागही त्यांनी निर्माण केले आहेत.

**१०) शिष्य संप्रदाय :**

किशोरीताई या उत्तम गायिका तर होत्या परंतु एक आदर्श करून सुद्धा होत्या.देवकी पंडित, माणिक भिडे, पद्मा तळवलकर, अरुण द्रविड, सुहासिनी मुळगांवकर, रघुनंदन पणशीकर, मीरा पणशीकर, मीना जोशी, नंदिनी बेडेकर, विद्या भागवत, माया उपाध्याय, किशोरीताईंची नात तेजश्री आमोणकर, व्हायोलिन वादक मिलिंद रायकर यांसह अनेक कलावंत किशोरीताईंच्या तालमीत घडले.

## ११) पुरस्कार:

त्यांनी केलेल्या आता परिश्रमाचे देतात म्हणून त्यांनी अनेक मान सन्माननीय सन्मानित करण्यात आले.

१) संगीत नाटक अकादमी पुरस्कार (इ.स. १९८५)

२) पद्मभूषण पुरस्कार (इ.स. १९८७)

३) संगीत सम्राज्ञी पुरस्कार (इ.स. १९९७)

४) पद्मविभूषण पुरस्कार (इ.स. २००२)

५) संगीत संशोधन अकादमी पुरस्कार (इ.स. २००२)


६) संगीत नाटक अकादमी फेलोशिप (इ.स. २००९)

किशोरीताईंच्या सांगीतिक कारकिर्दीवर अमोल पालेकर आणि संध्या गोखले यांनी भिन्न षड्ज हा माहितीपट दिग्दर्शित केला आहे.

दरवर्षी नाट्यसंपदा प्रतिष्ठानतर्फे किशोरी अमोणकर यांच्या नावाचे पुरस्कार दिले जातात.

## १२) समारोप :

त्या ज्या स्वराशी अद्वैत साधायचं त्या स्वराच्याही पल्याड असलेल्या शाश्वत स्वरात आपले अलौकिक स्वर मागे ठेवून त्या विलीन झाल्या. तो दिवस होता ३ एप्रिल २०१७. या दिवशी मुंबईतील राहत्या घरी वयाच्या ८५ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. व्यक्ती गेली तरी त्याने केलेले काम कधीही संपत नाही हे सत्य असल्याने किशोरीताईंचे सूर कायमच रसिकांसमवेत असतील. किशोरी अमोणकर यांच्या स्मरणार्थ दरवर्षी 'गानसरस्वती महोत्सव' नावाचा गायन-वादन-नृत्य असा तीन दिवसांचा संगीताचा कार्यक्रम घेवून त्यांना श्रध्दांजली अर्पण केली जाते.



# ३५.

# पंडित शिवकुमार शर्मा

**१) प्रस्तावना :**

संतूर हे कश्मीरमधील एका लोकवाद्य. परंतु या लोकवाद्याला सुवर्ण मुकुट चढून भारतातच नाही तर संपूर्ण जगभरामध्ये लोकप्रियतेच्या शिखरावर पोचविण्याची कार्य एका कलावंताने केले ते कलावंत म्हणजे पंडित शिवकुमार शर्मा होय. अशा या संतुर वादकाच्या जीवन कार्याचा आढावा खालील मुद्द्यांच्या आधारे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

शिवकुमार शर्मा यांचा जन्म इसवी सन १३ जानेवारी १९३८ मध्ये जम्मू येथे झाला असून त्यांची मातृभाषा डोग्री आहे. १९९९ साली त्यांनी रेडियोला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी सांगितले की त्यांच्या वडिलांनी त्यांना केवळ पाच वर्षांचे असल्यापासून शास्त्रीय गायन आणि तबल्याचे धडे द्यायला आरंभ केला. त्यांच्या आई उमा दत्त शर्मा (गायिका) यांनी सखोल अभ्यास करून ठरवले की शिवकुमार यांनी भारतीय शास्त्रीय संगीत संतूरवर वाजवणारे भारतातील पहिले वादक बनावे. म्हणून मग त्यांच्या इच्छेनुसार, शिव कुमार यांनी वयाच्या तेराव्या वर्षापासून संतूर शिकण्यास प्रारंभ केला आणि उमा दत्त शर्मा यांचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवले.

**३) गुरु व शिक्षण :**

संतूर या वाद्याला लोकप्रिय करण्याचे श्रेय त्यांनाच जाते.वयाच्या सातव्या वर्षापासून पंडीत शिवकुमार शर्मा यांनी त्यांच्या वडिलांकडून कंठ संगीताचे शिक्षण घेण्यास सुरुवात केली त्यानंतर मध्येच गाण्याचे शिक्षण बंद केले व तबलावादनाची धडे घेण्यास प्रारंभ केला. त्यानंतर त्यांच्या वडिलांनी संतूर या वाद्यात आमूलाग्र बदल केले. त्यावर झाला,जोड व गतकारी वाजविण्यायोग्य बनविले. वडिलांचे या प्रयोगामुळे पंडित शिवकुमार शर्मा

सुद्धा प्रभावी झाले. वडिलांकडून त्यांनी संतूर हे वाद्य शिकून घेतले. या उपेक्षित लोकवाद्याला लोकप्रियता मिळवून देण्याचे श्रेय पंडित शिवकुमार शर्मा यांनाच जाते.

**४) संशोधन :**

पंडित शिवकुमार यांनी या वाद्याला शास्त्रीय संगीताच्या मैफलीत आणून बसविण्यासाठी मोलाचे योगदान दिले. पंडित शिवकुमार सांगतात की, ''पूर्वी हे वाद्य शततंत्री वीणा या नावाने प्रचलित होते परंतु हे वाद्य जेव्हा काश्मीरहून फारस येथे गेले तेव्हा त्याचे नाव संतूर असे पडले. पूर्वी या वाद्याला १०० तारा होत्या परंतु शास्त्रीय संगीतातील राग वाजविता यावेत व हे वाद्य परिपूर्ण व्हावे यासाठी त्यात ११६ तारा बसविलेल्या आहेत. या तारा २५ ब्रिजवर बसविलेल्या असतात. याच्या तारा स्वरात जुळविणे अत्यंत कष्टाची काम असते.'' त्यांनी १९६० पासून संतूर या वाद्याच्या आवाजाची गुणवत्ता सुधारण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. सुरुवातीला त्यांनी संतूरचा आकार मोठा केला. आवाजात गोडवा आणि गुंजन यात सुधारणा केली. यासाठी त्यांनी २५ ऐवजी २९ ब्रिजेसचा वापर केला त्यामुळे चार अधिक स्वर मिळाले.

**५) सांगीतिक कार्य :**

त्यांनी आपल्या वादनकौशल्याचे पहिले सादरीकरण १९५५ मध्ये मुंबई येथे हरिदास संगीत संमेलनात केले.१९५६ साली शांताराम यांच्या ''झनक झनक पायल बाजे'' गाण्यास त्यांनी संगीत दिले. १९६० साली त्यांनी स्वतःचा एकल गीतसंच प्रसिद्ध केला. १९६७ साली त्यांनी प्रसिद्ध बासरीवादक हरिप्रसाद चौरसिया आणि ब्रिज भूषण काब्रा यांच्यासमवेत ''कॉल ऑफ द व्हॅली'' ही ध्वनिमुद्रिका प्रसिद्ध केली. ती कालांतराने खूपच प्रसिद्ध झाली. हरिप्रसाद चौरसिया यांच्या साथीने त्यांनी काही चित्रपटांना संगीतसुद्धा दिले आहे. त्याची सुरुवात १९८० साली ''सिलसिला'' चित्रपटापासून झाली. या काळात या जोडगोळीने ''शिव-हरी'' या नावाने संगीत दिले होते. त्यांनी फासले (१९८५), विजय, चाँदनी (१९८९), लम्हे (१९९१), साहिबान, डर (१९९३) या चित्रपटांना संगीत दिले.

सरोद वादक उस्ताद अमजद अली खाँ, बासरी वादक पंडित हरिप्रसाद चौरसिया, सनई वादक उस्ताद बिस्मिल्ला खाँ यांच्या समवेत अनेक

दिग्गज कलाकारांबरोबर त्यांनी संतूरची जुगलबंदी केली. या मैफिली श्रोत्यांच्या त्यांच्या चिरकाल स्मरणात राहिल्या.

**६) मान सन्मान :**

पंडित शिवकुमार शर्मा यांना अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय सन्मान आणि पुरस्कार मिळाले आहेत. त्यांना १९८५ मध्ये बाल्टीमोर शहराची मानद नागरिकतासुद्धा मिळाली आहे. पंडित शिवकुमार शर्मा यांना सन १९८६ मध्ये संगीत नाटक अकादमी पुरस्कार मिळाला.सन १९९१ साली पद्मश्री तसेच२००१ मध्ये पद्मविभूषण या सन्मानाने पंडितजी यांना सन्मानित करण्यात आले. २००४ मध्ये मध्य प्रदेश सरकारकडून तानसेन पुरस्कार, त्याचबरोबर २००५ साली दीनानाथ मंगेशकर पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

**७) वैयक्तिक आयुष्य :**

शिवकुमार शर्मा यांचे लग्न हे मनोरमा शर्मा यांच्याशी झाले. त्यांना रोहित आणि राहुल हे दोन मुलगे आहेत. त्यांचा मुलगा राहुल हासुद्धा संतूर वादक असून १९९६ पासून तो शिवकुमारांना साथ करतो आहे. १९९९ मध्ये शर्मा यांनी एका मुलाखतीत म्हटले होते की, राहुलला देवाकडूनच संगीताची भेट मिळाली असल्यानेच त्यांनी त्याचा शिष्य म्हणून स्वीकार केला आहे.शिवकुमार शर्मा यांनी ‘जर्नी विद अ हंड्रेड स्ट्रिंग्ज: माय लाईफ इन म्युझिक’ या नावाचे आत्मचरित्र लिहिले आहे. या पुस्तकाचे सहलेखन इना पुरी यांनी केले आहे.

**८) निधन :**

अशा या थोर कलावंताचे वयाच्या ८४ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने मुंबई येथे निधन झाले.



# ३६.

# वाजिद अली शहा

**१) प्रस्तावना :**

कलेसाठी कलावंत आयुष्यभर योगदान देत असतात. कठोर परिश्रम घेऊन कला आत्मसात करतात. मिळालेली कला श्रोत्यांपर्यंत पोचविण्यासाठी मेहनत घेतात परंतु त्या कलावंतांनी अर्थिकतेचे बळ दिले तर ते कलावंत अधिक कार्यक्षमपणे व जोमाने कलेचा प्रचार व प्रसार करतात. असाच राजाश्रय देणारा राजा म्हणजे वाजिद अली शाह होय त्यांच्या जीवनकार्याचा आढावा पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**२) जन्म व बालपण.:**

वाजिद अली शहा हे लखनौ आणि अवधचे नवाब होते.त्याचा जन्म ३० जुलाई १८२२रोजी लखनौ येथे झाला. ते अमजद अली शहा यांचे पुत्र होते. त्याचा मुलगा बिरजीस कादर हा अवधचा शेवटचा नवाब होता. नवाब वाजिद अली शहा यांचे नाव संगीतविश्वात अविस्मरणीय आहे.

**३) ठुमरीचे जनक :**

ते 'ठुमरी' या संगीत प्रकाराचे जनक म्हणून ओळखले जातात. त्यांच्या दरबारात रोज संगीताचा कार्यक्रम असायचा. त्यांच्या काळात कथ्थक नृत्यासोबत ठुमरीही गायली जात होती. त्यांनी अनेक उत्कृष्ट ठुमरी रचल्या. असे म्हटले जाते की जेव्हा ब्रिटिशांनी अवधवर कब्जा केला आणि नवाब वाजिद अली शाह यांना निर्वासित केले तेव्हा त्यांनी प्रसिद्ध ठुमरी 'बाबुल मोरा नैहर छुटो जाए' गाऊन आपल्या संस्थानाचा निरोप घेतला.

**४) एक आदर्श राजा :**

ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीने समृद्ध औधचे प्रतिष्ठित सिंहासन काबीज करण्याचा निर्धार केला होता. अशा वेळी औधच्या सिंहासनावर आरूढ होणे हे वाजिद अली शाह सर्वात दुर्दैवी होते. इतर परिस्थितीत ते शासक म्हणून यशस्वी झाले असते कारण त्याच्याकडे अनेक गुण होते ज्यामुळे तो एक चांगला प्रशासक बनले. त्यांनी भारतीय परंपरेतील ललित कलांचे

सर्वात उदार आणि उत्कट संरक्षक म्हणून मोलाचे योगदान दिले. ते आपल्या प्रजेबद्दल उदार आणि दयाळू होते.

**५) कलांशी संबंध :**


वाजिद अली शहा यांच्या दरबारात शास्त्रीय नृत्य कथ्थकला विशेष विकास मिळाला.

वाजिद अली शाह भव्य 'रहस्नृत्य'चे आयोजन करायचे आणि स्वतः कृष्णाची भूमिका करायचे. त्यांच्या दरबारातही होलिकोत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. वाजिद अली शहा यांच्या चरित्रावर आधारित गुलाबोन सिताबो नावाचा एक विशिष्ट कठपुतळी प्रकार, एक प्रमुख दृश्य कला प्रकारात विकसित झाला.

**६) साहित्यात योगदान :**

गायन, वादन व नृत्याबरोबरच वाजिद अली शाह यांनी त्यांच्या दरबारात साहित्य आणि अनेक कवी आणि लेखकांना राजाश्रय दिला. त्यापैकी उल्लेखनीय म्हणजे 'बराक', 'अहमद मिर्झा साबीर', 'मुफ्ती मुन्शी' आणि 'अमीर अहमद अमीर', ज्यांनी वाजिद अली शाह, इर्शाद-उस-सुलतान आणि हिदायत-उस-सुलतान यांच्या आदेशानुसार पुस्तके लिहिली.

असा हा थोर कलाप्रेमी राजाचे ०१ सप्टेंबर १८८७ रोजी कोलकाता तेथे निधन झाले.



# ३७.

## आचार्य बृहस्पती

**१) प्रस्तावना :**

अभिजीत भारतीय संगीताचा प्रचार आणि प्रसार करण्यामध्ये गायक, वादक व नर्तकांचे मोलाचे योगदान आहे.त्याचबरोबर जे ग्रंथकार आहेत त्यांनी सुद्धा अत्यंत मोलाचे योगदान भारतीय संगीत संवर्धनात दिले आहे.

अशाच ग्रंथकारांपैकी एक अग्रगण्य नाव म्हणजे आचार्य बृहस्पती त्यांच्या जीवन कार्याचा आढावा पुढील मुद्द्यांच्या आधारे पाहता येईल.

**२) जन्म व बालपण :**

आचार्य बृहस्पती यांचा जन्म इ.स. १९१८ रोजी उत्तर प्रदेशातील रामपूर येथे झाला. त्यांचे संपूर्ण नाव कैलास चंद्र देव बृहस्पती असे होते. त्यांचे वडील श्री गोविंद राम, आजोबा पं. अयोध्या प्रसाद आणि आजोबा पं. बुद्धसेनजी हे उच्च दर्जाचे विद्वान होते. अयोध्या प्रसाद यांना त्यांचे काका पं. दत्ताराम जी यांनी दत्तक घेतले होते. पं. दत्ताराम जी हे न्याय, व्याकरण, कर्मकांड, ज्योतिष, सिद्ध तांत्रिक आणि उत्तम संगीतकार होते. थोडक्यात असे म्हणता येईल कैलाशचंद्र देव यांना पितृत्वाच्या वारशाने संगीताची दीक्षा मिळाली. वयाच्या दहाव्या वर्षी कैलाशचंद्रांना वडिलांच्या स्नेहापासून वंचित राहावे लागले. आई नर्मदा देवी यांनी पितृप्रेमाच्या सावलीशिवाय या बालकाचे पालन पोषण करून संगीतक्षेत्रात वटवृक्षाच्या रूपात प्रस्थापित केले.

वयाच्या साडेतीनव्या वर्षी आचार्य बृहस्पतींचे उच्चार पूर्णपणे शुद्ध होते. वयाच्या पाचव्या वर्षी ''चाणक्य धोरण'' आणि दुर्गा सप्तशतीतील 'पांडव गीता', 'कवच' आर्मला आणि कौलक या श्लोक त्यांना मुखोद्गत होते. अकराव्या वर्षी त्यांनी 'सवैय्या चांद' संगीत करायला सुरुवात केली. वयाच्या चौदाव्या वर्षी अयोध्येच्या पंडित परिषदेने संस्कृतमधील श्लोकांच्या रचनेवर संतुष्ट होऊन त्यांना 'काव्य मनिषी' आणि 'साहित्य-सूरी' या उपाधींनी विभूषित केले.

**३) संगीत आणि शास्त्रांचे शिक्षण :**

बृहस्पतीजींचे यांनी रामपूर दरबारचे संगीतकार सय्यद मिर्झा नवाब हुसेन यांच्याकडून संगीताची तालीम घेण्यास सुरूवात केली. त्यानंतर याच दरबारातील अयोध्या प्रसाद यांच्याकडून पखवाज वादनाचे शास्त्रोक्त शिक्षण घेतले. त्यांनी महामहोपाध्याय पी परमेश्वरानंद यांच्याकडुन अलंकार शास्त्र शिकून घेतले. न्यायाचे शिक्षण हरिशंकर झा, व्याकरणाचे शिक्षण पं.छेदी झा आणि प्राथमिक शिक्षण कन्हैया लाल शुक्ल, राजपंडित रामचंद्र शास्त्री आणि त्यांच्या वडिलांकडून प्राप्त केले.

**४) संगीत क्षेत्रातील योगदान :**

आचार्य बृहस्पती यांनी महत्त्वाच्या ग्रंथांमधून संगीताशी संबंधित

अशा मूलभूत स्रोतांचा संग्रह केला, ज्याच्या आधारे त्यांनी भारतीय संगीत संपूर्ण जगासमोर स्पष्टपणे मांडले. नोव्हेंबर १९५५ मध्ये जेव्हा त्यांनी मुंबई मध्ये सूर सिंगार संसदने आयोजित केलेल्या परिसंवादात अध्यक्षीय भाषण केले, तेव्हा श्रोत्यांनी संगीत जगतातील या उगवत्या ताऱ्याचे मूल्य ओळखले. या चर्चासत्रात आचार्य यांनी भारतीय संगीताच्या काळानुसार बदललेल्या परिस्थितीचे सकारात्मक विवेचन केले. सप्टेंबर १९५६ मध्ये आचार्य बृहस्पती यांनी ऑल इंडिया रेडिओ दिल्लीने आयोजित केलेल्या परिसंवादात 'रस सिद्धांत' या विषयावरील त्यांचा शोध निबंध सादर केला. या चर्चासत्रात आचार्यजींनी महर्षी भारताच्या 'रिती दर्पण' या वाद्यावर श्रुती मंडळाच्या प्रतिबिंबावर चर्चा केली. यात ते म्हणाले, ''माझ्या संशोधनाचे निष्कर्ष ही चाचणी सदोष नसेल, तर महर्षी भारताची स्थापना तिची समानता आणि व्यावहारिकता सिद्ध करेल. या वैज्ञानिक परीक्षणावर लवकरात लवकर अंतिम निकाल देणे हे शासनाचे कर्तव्य आहे, जेणेकरून या संदर्भात पसरलेले अनेक गैरसमज दूर होऊन महर्षींसारख्या पुरुषांच्या वाक्यांवर सतत अविश्वास निर्माण करणाऱ्या त्या क्षेत्रांचा पर्दाफाश करता येईल. आचार्य ब्रहस्पती यांना गांधर्व महाविद्यालय दिल्ली येथे पत्रकार परिषदेचे निमंत्रण केले होते. जेथे त्यांनी भीष्मवेदींच्या 'श्रुती-दर्पण' वर श्रुती वर्तुळ बनवून 'यमन कल्याण' आणि दरबारीच्या ऋषम आणि तोडी आणि पीलूचे वेगवेगळे गांधार असे सूक्ष्म स्वर भरताच्या श्रुती मंडळात दाखवले. आचार्य बृहस्पतीजींनी प्रभात रंजनी या रागाची निर्मिती केली.

इंटरनॅशनल सेंटर कानपूर यांच्यावतीने बल्गेरियन शिष्टमंडळाच्या सन्मानार्थ एका स्नेहभजनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर आचार्य यांच्या निर्देशानुसार श्री भीष्मदेव वेदी यांनी 'बृहस्पती किन्नरी' यावर प्राचीन जाती व रागांचे प्रदर्शन केले. यावेळी शिष्टमंडळातील सर्व प्रतिनिधी, राजदूत व प्रमुख बल्गेरियन संगीत तज्ञ प्रभावित झाले. आणि बल्गेरिया ची राजधानी येथून प्रकाशित केलेल्या यात्रेचे विवरण आचार्यांनी विचारांनी महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले

ते भरत यांच्या चतुसारना आणि त्यातून प्राप्त २२ श्रुतींचे सप्रयोग प्रदर्शन करीत असायचे.त्यांनी बृहस्पती वीणा या वाद्याची निर्मिती केली.या वाद्यावर ते जातीचे प्रदर्शन करायचे. संगीत आणि रस यातील परस्पर

संबंधाच्या संदर्भात अत्यंत विस्ताराने त्यांनी स्पष्टीकरण केले आहे.

**५) विशेष निवडी :**

त्यांची अचाट बुद्धिमत्ता व विद्वत्ता पाहून तत्कालीन प्रसारण मंत्री श्री बी व्ही केसरकर यांनी त्यांना ऑल इंडिया रेडिओच्या केंद्रीय सल्लागार समितीचे मानद सदस्य म्हणून नामांकन केले होते. अकॅडमी ऑफ म्युझिक अँड फाईन आर्ट्स कानपूर येथे संचालक म्हणून त्यांनी कार्य केले. भातखंडे कॉलेजच्या पुन:संघटन समितीवर सदस्य म्हणून त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. पुढे चालून या समितीच्या अंतर्गत पुन: संघटन याची रूपरेषा निश्‍चित करण्यासाठी त्रीस्तरीय उप समितीचे सदस्य म्हणून सुद्धा त्यांची नियुक्ती करण्यात आली होती.

**६) संगीत ग्रंथ संपदा :**

ब्रहस्पतीजींनी संगीत लेखनाच्या क्षेत्रातही मोलाचे योगदान दिले आहे. 'भरत का संगीत सिद्धांत' या ग्रंथात मूर्च्छना या घटकावर संदर्भात महत्त्वपूर्ण विवेचन केले आहे. 'संगीत चिंतामणी' या ग्रंथात शारंगदेव यांच्या विवेचनावर भाष्य केले आहे. धृपद आणि त्याचा विकास, मुस्लिम आणि भारतीय संगीत, संगीत समयसार' यामध्ये त्यांनी आचार्य पार्श्वदेवांचे गूढ भाव हिंदी अनुवादाद्वारे अतिशय स्पष्टपणे मांडले आहेत. याशिवाय त्यांनी राग रहस्य, नाट्यशास्त्राचा अठ्ठावीसवा अध्याय, खुसरो, तानसेन आणि इतर कलाकार, ब्रज वल्लरी विलास, मेघ का कवी या सांगीतिक ग्रंथांचे लेखन केले आहे.

**७) लेख.:**

आचार्य बृहस्पती यांनी विविध लेख लिहून संगीताला दिशा देण्याचे काम केले. त्यांनी 'मुसलमान गझल, कव्वाली और ख्याल'आणि 'भारतीय संगीत के परमभक्त अमिर खुसरो' या दोन लेखात दोन्ही संस्कृतींचा सारखेपणावर भाष्य केले आहे. याबरोबरच 'संगीत चिंतामणी' या ग्रंथात 'संगीत और आलोचना' व 'संगीत, साहित्य और रस' हे लेख लिहिले आहेत.

**८) सन्मान आणि पुरस्कार :**

आचार्य ब्रहस्पती यांना संगीत रचनांसाठी संगीत नाटक अकादमीचे 'रत्न सदस्य' म्हणून राष्ट्रपतींच्या हस्ते गौरविण्यात आले. अखिल भारतीय गांधर्व मंडळाने त्यांचा 'संगीत महामहोपाध्याय' ही पदवी देऊन गौरव केला.

द्वारकापीठाच्या शंकराचार्यांनी आचार्यजींना त्यांच्या सर्वांगीण ज्ञानामुळे 'विद्या मार्तंड' ही पदवी दिली.

**९) समारोप :**

आचार्य बृहस्पती यांनी उत्तम लेखक, टीकाकार संगीत चिंतक, शिक्षक, संगीत तज्ञ व कवी असे महत्त्वपूर्ण भूमिका आपल्या आयुष्यात निभावल्या. त्यांनी संगीत विषयक ग्रंथातून कला व शास्त्र विषयी मौलिक माहिती दिली जी संगीत साधकांसाठी दीपस्तंभ प्रमाणे मार्गदर्शक ठरत आहे. अशा या महान संगीत तज्ञांचे ३० सप्टेंबर १९७९ रोजी देहावसन झाले.



# ३८.

## गंगूबाई हनगल

**१) प्रस्तावना :**

काही ठिकाणची मातीत अशी असते की जिथे कलाकार आपोआप घडत जातात. अशीच एक भूमी म्हणजे कर्नाटकातील हुबळी -धारवाड! अशा या पवित्र भूमीने देशाला अनेक संगीतातील हिरे दिले. ज्यामध्ये सवई गंधर्व, बसवराज राजगुरू,मल्लिकार्जुन मन्सूर, पंडित भीमसेन जोशी, पंडित कुमार गंधर्व व गंगुबाई हंगल. यापैकी गंगुबाई हनगल यांच्या जीवन कार्याचा आढावा आपण पुढील मुद्द्यांच्या आधारे पाहूयात.

**२) जन्म व बालपण :**

गंगुबाई हनगल यांचा जन्म तेव्हाच्या धारवाड (आताच्या हावेरी) जिल्ह्यात देवदासी परंपरेतील केटव कुटुंबात इ.स. १९१३ मध्ये झाला. त्यांनी कर्नाटक-संगीताचे प्राथमिक धडे वयाच्या दहाव्या वर्षांपासून आपल्या आईकडून घेतले. वयाच्या अकराव्या वर्षी, म्हणजे इ.स. १९२४ मध्ये त्यांनी बेळगांव येथे महात्मा गांधीच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या (इंडियन नॅशनल)काँग्रेसच्या अधिवेशनात पंडित जवाहरलाल नेहरू, मौलाना अबुल कलम आझाद

आणि सरोजिनी नायडू यांच्या उपस्थितीत स्वागतगीत गायले. हा त्यांचा पहिला जाहीर कलाविष्कार होता.

**३) गुरु व शिक्षण :**

गंगूबाईंच्या आई अंबाबाई या कर्नाटक शास्त्रीय संगीत गायिका होत्या. त्यामुळे त्यांच्या बालपणापासून आईने त्यांना संगीताचे प्राथमिक शिक्षण व संस्कार दिले. किराणा घराण्याच्या आद्य प्रवर्तक उस्ताद अब्दुल करीम खाँ हे सुद्धा आंबाबाई यांच्याकडे कर्नाटक संगीतातील बारकावे समजून साठी घरी यायचे.धारवाड येथे प्रतापलाल व श्यामलाल यांच्याकडे लहान असतानाच त्यांनी काही काळ कथ्थक नृत्याचे शिक्षण घेतले. हिंदुस्थानी गायकीचे शिक्षण त्यांनीदत्तोपंत देसाई व कृष्णाचार्य हुळगूर यांच्याकडे घेतले. नंतर १९३८ मध्ये सवाई गंधर्व (रामचंद्र गणेश कुंदगोळकर) या किराणा घराण्याच्या गायकांकडे गंगूबाई यांनी सुमारे पंधरा वर्षे त्यांनी सवाई गंधर्वांकडे संगीताचे शिक्षण घेतले व किराणा घराण्याची शैली पूर्णपणे आत्मसात केली. तेथे त्यांना गायक भीमसेन जोशी आणि फिरोज दस्तूर यांचा सहयोग मिळाला.

**४) विवाह :**

वयाच्या सोळाव्या वर्षी हुबळी येथील वकील व व्यावसायिक गुरुराज कौलगी यांच्याशी गंगुबाई यांचा विवाह झाला. ते मितभाषी आणि गाण्याची आवड असणारे होते. या विवाहामुळे त्या हुबळी येथे वास्तव्यास आल्या. गायिका कृष्णा हनगल, बाबुराव आणि नाना ही त्यांची अपत्ये होत.

**५) गंगुबाई यांच्या मैफली :**

इ.स. १९२५ मध्ये त्या किराणा घराण्याचे अध्वर्यू उस्ताद अब्दुल करीम खान यांच्यासमोर धारवाड येथे गायन झाले.

इ.स. १९३१ मध्ये त्यांचा मुंबईतील गोरेगांव येथे शास्त्रीयसंगीताचा पहिला जाहीर कार्यक्रम झाला. हिज मास्टर्स व्हॉइस (एच्?एम्?व्ही) या मुंबईतील कंपनीने गंगूबाईंच्या गाण्याची पहिली ग्रामोफोन तबकडी काढली. आकाशवाणी ऑल इंडिया रेडियो च्या मुंबई केंद्रावरून त्यांच्या प्रत्यक्ष गाण्याचा कार्यक्रम पहिल्यांदाच प्रसारित.

इ.स. १९५२ साली जयपूरच्या राजवाड्यात पंडित नेहरूंसमोर गायन झाले. याशिवाय त्यांनी विविध देशांतून किराणा घराण्याच्या मैफिली सादर केल्या. त्यांत इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, जर्मनी, फ्रान्स, पाकिस्तान व नेपाळ यांचा समावेश आहे.

**६) शिष्य संप्रदाय :**

गंगूबाईंचा शिष्यपरिवार बराच मोठा असून, त्यांतील नागनाथ वडियार, अशोक नाडगीर, साईनाथ मोहिते, कन्या कृष्णा हनगल, श्रीमती पट्टमल व शकुंतला भरणे यांनी गायन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे.

**७) मानसन्मान :**

गंगुबाई यांनी केलेले अथक परिश्रमाचे द्योतक म्हणून त्यांना एकूण पन्नासहून अधिक पुरस्कार मिळाले होते.

१९७१ –पद्मभूषण भारत सरकार

१९७३ – संगीत नाटक अकादमी पुरस्कार १९७३ –प्रसारण सेवा पुरस्कार

१९७७– मध्य प्रदेश सरकारचा तानसेन पुरस्कार

२००२– पद्मविभूषण आदी सन्मानाने त्यांना अलंकृत केले. याशिवाय

१९९२ ते १९९४ कर्नाटकाच्या विधान परिषदेच्या सदस्या,चार मानद डॉक्टरेट,किमान नऊवेळा पंतप्रधान व पाचवेळा राष्ट्रपतींकडून त्यांचा खास गौरव झाला होता. पाचवी इयत्ता शिकलेल्या गंगूबाईंनी संगीताच्या मानद प्राध्यापिका म्हणून काम केले. धारवाड येथील कर्नाटक विद्यापीठाच्या त्या सिनेट सदस्या होत्या. देशात व देशाबाहेर त्यांनी अनेक संगीत मैफली गाजवल्या.

**८) समारोप :**

५ मार्च २००९ रोजी वयाच्या ९६व्या वाढदिवशी त्या आपल्या धारवाडच्या जन्मघरी दहा मिनिटे गायल्या. हे त्यांचे शेवटचे जाहीर गाणे. अखेर २१ जुलै २००९ रोजी वयाच्या ९७ व्या वर्षी वृद्धापकाळाने गंगूबाईंचे निधन झाले. त्यांच्या स्मृती कायम राहाव्यात यासाठी हनगल कुटुंबीयांनी १९९२ मध्ये हनगल म्युझिक फऊंडेशनची स्थापना केली. गंगूबाई यांचे 'गंगालहरी' हे हुबळीतील घर नूतनीकरण करून तेथे संग्रहालय करण्यात आले आहे. भारतातील विविध प्रांतांतील १२० प्रकारची शास्त्रीय व लोकवाद्ये तेथे आहेत. तसेच गायकांचे फोटो, चरित्रे, वापरातल्या वस्तू, पारितोषिके, पुरस्कार, ग्रामोफोन रेकॉर्ड्स, कॅसेट्स इत्यादींचा संग्रह करण्यात आला आहे. जिथे गंगुबाई हंगल गुरुकुल कार्यरत असून तेथे होतकरू व गुणवान विद्यार्थ्यांना गुरुकुल पद्धतीने शास्त्रीय संगीताचे ज्ञान दिले जात आहे.



# ३९.

## डॉ. अशोक दामोदर रानडे

**१) प्रस्तावना :**

भारतीय संगीत क्षेत्रातील गाढे अभ्यासक, प्रयोगनिष्ठ कला आणि शास्त्र परंपरा यांचा समन्वय साधून भारतीय संगीताला योग्य दिशा देणारे, ग्रंथ लेखक, मार्मिक विश्लेषक, भारतीय संगीत-संस्कृतीच्या समृद्धतेचे दर्शन घडविणारे चिंतनशील भाष्यकार, समीक्षक, सर्जनशील संगीतकार अशा विविध नात्यांनी ज्यांनी ५० हून अधिक वर्षे संगीतासाठी काम केले. असे व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ.अशोक रानडे. त्यांच्या सांगीतिक कार्याचा आढावा पुढील मुद्द्यांच्या आधारे घेता येईल.

**२) गुरु व शिक्षण :**

डॉ.अशोक रानडे यांनी वयाच्या दहाव्या वर्षापासूनच संगीताचे शिक्षण घेण्यास प्रारंभ केला.त्यांनी पंडित गजाननराव जोशी, पंडित प्रल्हाद गानू,पंडित लक्ष्मणराव बोडस यांच्याकडुन अनेक वर्षे ग्वाल्हेर, जयपूर, आग्रा, पतियाळा या घराण्यांची तालीम घेतली. प्रो. बी.आर. देवधर यांच्याकडे आवाजाच्या आणि कंठसंगीताच्या तंत्रज्ञानाचा अभ्यास केला.

**३) लौकिक शिक्षण :**

वास्तविक पाहता त्यांना साहित्य विषयात आवड होती. मात्र त्यांना वडिलांच्या आग्रहामुळे बीएला अर्थशास्त्र विषय घ्यावा लागला. नंतर एल्.एल्.बी केले. साहित्याची ओढ असल्याने मराठी वाङ्मयात एमए केले. मग इंग्रजी साहित्य खोलात जाणून घ्यायचे म्हणून पुन्हा इंग्रजीत एमए केले. डॉक्टरेटचा अभ्यास डॉ. रा.भा. पाटणकरांकडे चालू असताना दोनतीनदा विषय बदलले. ध्वनिसिद्धान्तावर संशोधन करीत असतानाच 'शेक्सपिअरच्या नाटकांमधील संगीत' यावर पीएच. डी. करावी असाही आग्रह झाला.

**४) विविध पदांवर कार्य :**

अशोक रानडे यांनी १९६३ ते ६६ या काळात मुंबईच्या आकाशवाणी केंद्रात नोकरी केली. त्यानंतर १९६७ ते १९६८ या काळात 'सिद्धार्थ कॉलेज ऑफ कॉमर्स अॅन्ड एकॉनॉमिक्स'मध्ये त्यांनी अर्थशास्त्राचे अध्यापन केले. १९६८ मध्ये ते मुंबई विद्यापीठात युनिव्हर्सिटी म्युझिक सेन्टरचे संचालक झाले. तेथे ते १९८३ पर्यंत होते; त्यानंतर पुण्याच्या अमेरिकन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन स्टडीज या संस्थेत ते या शाखेचे एका वर्षासाठी सहसंचालक झाले. १९८४ पासून ते १९९३ पर्यंत अशोक रानडे हे मुंबईच्या 'एन्.सीपीए' (नॅशनल सेन्टर फॉर दि परफॉर्मिंग आर्ट्स) मध्ये उपसंचालक म्हणून काम करीत होते.

**५) सांगीतिक योगदान :**

जयपूर आणि ग्वाल्हेर घराण्याची तालीम घेतलेले डॉ.अशोक दामोदर रानडे यांनी शास्त्रीय संगीत आणि लोकसंगीताला आपल्या सौदर्यशास्त्रीय दृष्टीने मोठ्या उंचीवर नेऊन ठेवले होते. मुंबईत एन.सी.पी.ए.त (नॅशनल सेन्टर फॉर दि परफॉर्मिंग आर्ट्स), महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्यावतीने लावणी महोत्सव आयोजित होत असतो. त्यात लावणीवरची कार्यशाळा नेहमी आयोजित व्हायची. या कार्यशाळेत अशोक रानडे बैठकीच्या लावणीचे मर्म उलगडून सांगायचे. डॉ. अशोक रानडे यांनी लोकसंगीताला जी सैद्धांतिक बैठक प्राप्त करून दिली ती निश्चितच अजोड अशी आहे.

**६) संगीत व नाट्य सेवा :**

भारतीय संगीताचे आदिम संगीत, लोकसंगीत, धार्मिक संगीत, लोकप्रिय संगीत, शास्त्रीय संगीत असे वर्गीकरण करून त्यामागची शक्तिस्थाने शोधण्याचा प्रयत्न सातत्याने अशोक रानडे यांनी केला. त्यांनी मुंबई विद्यापीठात संगीत विभागाची स्थापना करून त्या विभागाची सतत प्रगती घडवून आणली. आकाशवाणी, एन.सी.पी.ए., चव्हाण केंद्र अशा संस्थांमधून महत्त्वाच्या पदांवर काम करीत असताना, अशोक रानडे यांनी आयुष्यभर संगीतसेवा आणि नाट्यसेवा केली.

**७) ग्रंथ संपदा :**

अशोक दा. रानडे यांनी १० मराठी व १३ इंग्रजी पुस्तके लिहिलेली आहेत. यात परंपरा आणि आविष्कार, भाषणरंग : व्यासपीठ आणि रंगपीठ,

भाषण व नाट्यविषयक विचार, मला भावलेले संगीतकार, लोकसंगीतशास्त्र, संगीत विचार आणि हिंदुस्तानी संगीत, संगीताचे सौदर्यशास्त्र, स्ट्राव्हिन्स्कीचे सांगीतिक सौदर्यशास्त्र, हिंदी चित्रपट गीते यांचा नामोल्लेख करता येईल.

यासोबतच अशोक दामोदर रानडे हे महाराष्ट्र टाइम्समध्ये 'किरणांची सावली' या नावाचे आणि लोकसत्तामध्ये 'संगीत संगती' नावाचे सदर लिहीत असत.

**८) संगीत दिग्दर्शन/संयोजन :**

एक झुंज वाऱ्याची (प्रायोगिक नाटक)

देवाजीने करुणा केली (नाटक)

अशोक रानडे यांनी 'रसिक रंगा' या नावाने हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतात काही बंदिशी रचल्या आहेत. शोनार बांगला (नाटक) आदी नाटके व बंदिशीचे संगीत दिग्दर्शक व संयोजन केले.

**९) पुरस्कार :**

डॉ. अशोक रानडे यांच्या भरीव सांगीतिक योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कारांनी अलंकृत करण्यात आले.

१) 'चतुरंग परिवारा'चा जीवनगौरव पुरस्कार

२) भारत सरकारचा संगीत नाटक अकादमी पुरस्कार

३) महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाचा कलादान पुरस्कार

**१०) समारोप :**

ज्यांनी संगीत क्षेत्रासाठी अहोरात्र परिश्रम घेतले, विवीध ग्रंथ संपदा निर्माण करून सांगीतिक साहित्यात भर टाकली, संगीतातील विविध संकल्पनांचा वेध घेतला असे थोर व्यक्तिमत्त्व ३०जुलै २०११ रोजी कालवश झाले.

# ४०.

## मासित खाँ व गुलाम रझा खाँ

**१) प्रस्तावना :**

भारतीय संगीताला समृद्ध करण्यासाठी अनेक गायक, वादक व नर्तक यांनी मोलाचे योगदान दिले. यापैकी मसीत खाँ हे एक सुप्रसिद्ध सतार वादक होते. त्यांच्या जीवनकार्याचा आढावा पुढीलप्रमाणे पाहता येईल.

**२) नवीन शैलीचा आविष्कार :**

अमीर खुसरो यांच्या वंशातील मसीत खाँ हे प्रसिद्ध सितार वादक होते. ते अतिशय हुशार व प्रतिभावान असल्यामुळे त्याकाळी लोकप्रिय सतार वादन शैलीत सुधारणा करून त्यांनी नवीन सितार शैलीचा शोध लावला. तेव्हापासून ही शैली 'मासितखानी बाज' म्हणून ओळखली जाते आणि त्यांनी बनवलेल्या गतीला मासितखानी गत म्हणून ओळखले जाते.

**३) गतीचे नियम :**

मसीतखानने मसितखानी गतीचे काही नियमही बनवले होते. ही गत विलंबित लयीतच असावी आणि त्याचा मुखडा चार-पाच मात्रांचा असावा. त्यांनी गतीचे शब्दही त्यांनी निश्चित केलेले होते आणि ते कधीही बदलू शकत नाहीत.

**४) मासीत खाँ यांचा कालखंड.:**

त्याचा वंश आणि कार्यकाळ याबद्दल विद्वानांमध्ये मतभेद आहेत. काही विद्वान त्याला अमीर खुसराचा दुसरा मुलगा मानतात तर काही फिरोज खाँ यांचा मुलगा समजला जातो. काही विद्वानांचा असा विश्वास आहे की त्याचा मृत्यू १५ व्या शतकात झाला. काही विद्वानांनी त्याचा कार्यकाळ १८ वे शतक मानला आहे.

**५) समारोप :**

मसिद खाँ यांनी निर्माण केलेल्या रचना आजही अजरामर झाल्या आहेत. त्यांचे कार्य सतारवादक कधीही विसरु शकणार नाहीत.

# गुलाम रझा खाँ

**१) प्रस्तावना :**

सतार वादनात किंबहुना वाद्यवादनात दोन महान कलावंत होऊन गेले. एक म्हणजे मसीत खाँ व रजा खाँ.यापैकी रजा खाँ यांच्या सांगीतिक कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**२) नूतन आविष्कार :**

गुलाम रझा खान हे १९ व्या शतकातील लखनौमधील प्रसिद्ध सितार वादक होते. त्यांची सतार वादनाची शैली ठुमरी आणि तराणा शैलीसारखीच चंचल व द्रुत लयीतील होती. त्याने या एक नवीन शैलीची निर्मिती केली, म्हणून ती आजही त्यांच्या नावाने प्रसिद्ध आहे.

**३) गतीचे वैशिष्ट्ये .:**

या गती केवळ मध्य आणि द्रुत लयीत वाजवल्या जातात. अवधचा नवाब,त्याच्या कुटुंबातील सदस्य आणि त्याच्या परिचयाचे लोक या गतीवर विशेषतः प्रभावित झाले होते.



# ४१.

# इनायत खाँ

**१) प्रस्तावना :**

भारतीय संगीत प्रचार व प्रसारामध्ये अनेक कलावंतांनी मोलाचे योगदान दिले आहे. यामध्ये उस्ताद इनायत खाँ यांनी भारतीय संगीतासाठी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांचे जीवन कार्याचा आढावा पुढील मुद्द्यांच्या आधारे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

उस्ताद इनायत खाँ यांचा जन्म २६जून १८९५ मध्ये इनायत खान यांचा जन्म उत्तर-पश्चिम प्रांतात संगीतकारांच्या कुटुंबात झाला. त्यांचे वडील महान सितारवादक इमदाद खान होते. ते इमदादखानी घराणा किंवा इटावा घराण्याचे कलावंत होते.जवळच्या एका लहान गावाच्या नावावरून आग्र्याला इटावा म्हणतात. घरात दोन पिढ्यांपासून संगीताचा वारसा घेऊन जन्माला आलेल्या उस्ताद इनायत खाँ यांच्यावर संगीताचे संस्कार व्हायला वेळ लागला नाही. त्यांचे वडील इमदाद खान हे उच्च कोटीचे सूरबहार व सतार वादक होते. तर आजोबा साहवदाद खाँ धृपद, ख्याल व गझल शैलीत परांगत होते. त्याचबरोबर ते सारंगी व जलतरंग इत्यादी वाद्ये वाजवीत असत.

**३) गुरु व शिक्षण :**

उस्ताद इनायत खाँ यांनी सतार वादनाचे शिक्षण त्यांच्या वडिलांकडून घेतले.त्यांनी वडिलांकडून धृपद, ख्याल व ठुमरीची तालीम घेतली.रागदारीचे ज्ञान झाल्यानंतर त्यांनी वडिलांकडून सूरबहार व सतार वादनाचे शिक्षण घेतले.त्यांनी ख्याल गायक बंदे हुसेन यांची मुलगी बसीरन बीबी हिच्याशी विवाह केला.

**४) वादन शैली :**

उस्ताद इनायत खाँ यांनी घराणेदार शिक्षण घेतले होत. परंतु वादनात रंजकत्व कसे यावे यासाठी त्यांनी अनेक प्रयोग केले. भूपाली रागामध्ये शुद्ध मध्यम,काफी रागात तीव्र मध्यम तर यमन मध्ये कोमल रिषभ चा प्रयोग करून ते वादन करायचे. या चमत्कृतीमुळे त्यांचे वादन ऐकून श्रोते मंत्रमुग्ध व्हायचे. याचबरोबर ते वादनाकरिता विवादी स्वरांचा इतक्या कल्पकतेने प्रयोग करायचे की श्रोते आश्चर्यमुग्ध झाले नाही तरच नवल.


**५) यशस्विता :**

संगीताचे अध्ययन पूर्ण झाल्यानंतर त्यांचे भाऊ वहीद खान यांच्यासोबत ते इंदूरच्या दरबारातून कलकत्त्याला गेले. तिथे त्यांचा मानसन्मान झाला.कलकत्त्यात असताना त्यांनी सतार व सुरबहार वादनाचा इतका प्रचार केला की तेथील लोक घराघरात सतार व सुरबहार वाजवायला लागले.तेथे त्यांचा गौरीपुरच्या विजेंद्र चौधरी यांचा परिचय झाला. इनायत खाँ यांचे वादन ऐकून त्यांनी गौरीपूर दरबारात नियुक्ती केले. त्यांनी विविध संगीत संमेलनात

भाग घेऊन अनेक सुवर्णपदके प्राप्त केली. मैनलसिंह जिल्ह्यात त्यांचा फार मोठा शिष्य संप्रदाय पसरलेला आहे. त्यांच्या प्रमुख शिष्यात त्यांचे सुपुत्र उस्ताद विलायत खाँ, ध्रुवतारा जोशी व रेणुका शाह इत्यादींचा नामोल्लेख करता येईल.

**६) समारोप :**

असे हे महान सुरबहार व सतार वादक अलाहाबाद येथे कार्यक्रमासाठी गेले. असतानाच अचानक त्यांची प्रकृती बिघडली. ते मैफलीत वादन करू शकले नाहीत. त्यांना तात्काळ घरी परतावे लागले. परतीच्या मार्गावर असताना त्यांना अधिक अस्वस्थ वाटू लागले. ते कसेबसे कोलकत्याला पोहोचले. दुसऱ्या दिवशी ११ नोव्हेंबर १९३८ मध्ये त्यांचे देहावसन झाले. त्यांचे पुत्र उस्ताद विलायत खाँ यांनी गौरीपूर घराण्याची परंपरा समर्थपणे चालविली. त्यांच्या सतार वादनातून इनायत खाँ यांच्या वादनाची अनुभूती येते. अशा थोर कलावंतास विनम्र अभिवादन.



# ४२.

## पंडित बिरजू महाराज

**१) प्रस्तावना :**

बिरजू महाराज हे एक असे व्यक्तिमत्व होते, जे घुंगरूंच्या तालावर प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करायचे. बिरजू महाराज जेव्हा नाचायचे, तेव्हा त्यांच्या पायातील घुंगरूही बोलायचे. ताल आणि घुंगरू यांचा ताळमेळ साधणे हे नर्तकासाठी सामान्य आहे, पण त्यांच्या घुंगरूच्या झंकाराने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करताना बिरजू महाराजांचे नाव अग्रक्रमाने येते. असे या महान नर्तकाच्या जीवन कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

पं. बिरजू महाराज यांचा जन्म ४ फेब्रुवारी, १९३८ साली लखनौ येथे झाला. त्यांचे मूळ नाव ब्रिजमोहन मिश्रा असे आहे. संगीताचा फार मोठा वारसा घेऊन पं. बिरजू महाराज जन्माला आलेले आहेत. 'मुलाचे पाय

पाळण्यात दिसतात' या उक्तीप्रमाणे पं. बिरजू महाराजांचे वडील पं. अच्छन महाराज जेव्हा इतर शिष्यांना नृत्याची तालीम देत असत त्यावेळी बाल बिरजू त्याचे तंतोतंत अनुकरण करायचे. इतर शिष्यांचे गंडाबंधन ते नेहमी पाहात असत. बिरजू महाराजांनी थोडे पैसे जमा केले आणि वडील अच्छन महाराजांकडे आपल्यालाही गंडाबंधन करावे असा आग्रह धरला आणि खऱ्या अर्थाने हा बाल हट्ट व नृत्यविषयीची आवड पाहून अच्छन महाराजांनी त्यांना अगदी बालवयातच नृत्याचे धडे देण्यास सुरुवात केली.

**३) गुरू व शिक्षण :**

खऱ्या अर्थाने वडील व गुरू पं. अच्छन महाराज यांच्याकडून कथ्थकं नृत्याची तालीम घ्यायला बिरजू महाराजांनी सुरुवात केली. अगदी बालवयातच नृत्य शैलीतल्या अनेक गोष्टी शिकून घेतल्या. बालवयामध्येच डेहराडून येथे त्यांनी आपल्या नृत्याचा कार्यक्रम करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. या दरम्यान दुर्दैवाने बिरजू महाराज यांच्यावर फार मोठा आघात झाला. अच्छन महाराजांचे देहावसान झाले. बालवयातील हा आघात बिरजू महाराजांनी मोठ्या धैर्याने सहन केला.

वडिलांच्या मृत्यूनंतर बिरजू महाराजांच्या जीवनाला मोठी कलाटणी मिळाली. यानंतर बिरजू महाराज आपल्या मातोश्री श्रीमती महादेवी यांच्याबरोबर आपल्या आजोळी लखनौ येथे स्थायिक झाले. त्यानंतर त्यांनी वयाच्या नवव्या वर्षापासून त्यांचे काका पं. शंभू महाराज आणि लच्छु महाराज यांच्याकडून कथ्थकमधील रितसर तालीम घेतली.

**४) सांगीतिक कार्य :**

सन १९५३ च्या दरम्यान दिल्ली येथे भारतीय कलाकेंद्राची स्थापना झाली. तेव्हापासून पं. बिरजू महाराज हे या केंद्राशी संबंधित आहेत. या ठिकाणी मात्र खऱ्या अर्थाने पंडितजींच्या अंगभूत आविष्काराला मोठा वाव मिळाला. 'मालती माधव', 'कुमार संभव', 'डालिया' अशा अनेक नृत्यनाटिकांच्या रचना त्यांनी केल्या. देशभरातल्या अनेक मैफिलींमधून या नृत्यनाटिकांना मोठा प्रतिसाद मिळाला. भारत सरकारच्या अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये प्रमुख कलाकार या नात्याने त्यांचा सहभाग राहिलेला आहे.

**५) चित्रपट क्षेत्रातील योगदान :**

पं. बिरजू महाराजांचे चित्रपट सृष्टीत मोठे योगदान आहे. अनेक चित्रपट गीतांचे नृत्यदिग्दर्शन पंडितजींनी केलेले आहे. १९७७ साली सत्यजीत राय यांच्या 'शतरंज के खिलाडी' या चित्रपटाचे नृत्यदिग्दर्शन करण्याबरोबरच

गीतगायनही त्यांनी केले आहे. २००२ साली फिल्म देवदासमधील अप्रतिम अशा 'काहे छेड छेड मोहे' या शास्त्रीय संगीतावर आधारित उत्कृष्ट नृत्य संयोजन त्यांनी केले. याचबरोबर डेढ इश्कीया, उमरावजान, बाजीराव मस्तानी अशा अनेक चित्रपटांसाठी त्यांनी केले आहे.

**६) पंडितजींची नृत्यशैली :**

पं. बिरजू महाराज एक उत्कृष्ट नृत्य दिग्दर्शक व नर्तक म्हणून सर्वांना परिचित आहेत. परंपरागत नृत्यशैलीचे शिक्षण त्यांनी घेतलेले असले तरी वर्तमानाला अनुकूल असे नवनवीन प्रयोग ते नेहमीच करतात. त्यांच्या नृत्यामध्ये प्रामुख्याने सौंदर्यपूर्णता, लयकारी व कलात्मकतेचा सुंदर समन्वय आपल्याला पाहायला मिळतो. त्यांनी भावप्रदर्शनाच्या माध्यमातून केलेला लय-लयकारीचा आविष्कार सर्वसामान्य रसिकांनाही मंत्रमुग्ध करतो. पं.बिरजू महाराज हे एक अष्टपैलू कलावंत आहेत. उत्तम नृत्य करण्याबरोबरच गायन, तबला, पखवाज, ढोलक ही वाद्येही ते अत्यंत सफाईदारपणे वाजवतात. नृत्यनाटिकांच्या संगीत रचनाही ते स्वतः करतात.

**७) मानसन्मान व पुरस्कार :**

एक उत्तम नर्तक, उत्कृष्ट नृत्य दिग्दर्शक, नृत्य गुरू, गायक, वादक अशा अनेक कार्यांमध्ये समर्पित झालेले व्यक्तिमत्व म्हणून पंडितजींचा नावलौकिक आहे. त्यांच्या या महत्त्वपूर्ण सांगीतिक योगदानाबद्दल त्यांना अनेक मानसन्मान मिळाले. प्रामुख्याने भारत सरकारने पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण या पुरस्काराने त्यांचा यथोचित गौरव केला. उत्तर प्रदेश सरकारने 'कालिदास' पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. याचबरोबर काशी हिंदू विश्व विद्यालय व खैरागढ विश्वविदयालय यांनी पंडितजींना मानद डॉक्टरेट ही उपाधी दिली. सोव्हिएत संघाने 'नेहरू फेलोशिप' दिली. याशिवाय संगीत नाटक अकादमी पुरस्कार, बाजीराव मस्तानी चित्रपटातील 'मोहे रंग दो लाल' या गीताच्या नृत्य दिग्दर्शनाबद्दल फिल्म फेअर अवार्ड व लता मंगेशकर पुरस्काराचेही ते मानकरी आहेत.

**८) समारोप :**

ज्यांनी भारतासह संपूर्ण जगात त्यांनी कथ्थकला एका वेगळ्या उंचीवर नेले होते.ज्यांनी भारतीय संगीताच्या परंपरेमध्ये कथ्थक नृत्याला जागतिक रंगमंच मिळवून देण्याचे कार्य केले असे महान नर्तक पं.बिरजू महाराज यांचे १७ जानेवारी २०२२ लखनऊ येथे देहवासन झाले.



# ४३.

## रुक्मिणीदेवी अरुंडेल

**१) प्रस्तावना :**

भारतीय नृत्य प्रणालीमध्ये भरतनाट्यम नृत्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.एकेकाळी भरतनाट्यम नृत्याला कसल्याही प्रकारची प्रतिष्ठा नव्हती.त्या काळी भरतनाट्यमला समाजात अत्यंत खालच्या दर्जाचे व अश्लील असे समजत असत.असे असूनही ह्या नृत्य प्रकारातील सौंदर्य व ह्याचे अध्यात्मिक दृष्टीने असलेले महत्व ज्यांनी जाणले आणि समाजाचा कट्टर विरोध असून सुद्धा ज्यांनी भरतनाट्यम मध्ये प्राविण्य मिळवले व सर्वांसमोर ते मंचावर सादर सुद्धा करून दाखवले.असा थोर कलावंत म्हणजे रुक्मिणीदेवी अरुंडेल.त्यांच्या जीवन कार्याचा आढावा खालील मुद्द्यांच्या आधारे घेता येईल.

**२) जन्म आणि बालपण :**

रुक्मिणीदेवी ह्यांचा जन्म २९ फेब्रुवारी १९०४ रोजी मदुराई येथील येथे झाला. त्यांचे वडील नीलकांत शास्त्री अभियंता म्हणून कार्यरत होते आणि त्यांच्या आई शेषाम्मल ह्यांना संगीतात रस होता. नीलकांत शास्त्री ह्यांची फिरतीची नोकरी असल्याने त्यांचा परिवाराला अनेक शहरांत राहण्याची संधी मिळाली.१९०१ साली त्यांची एका थियोसोफिकल सोसायटीशी ओळख आली. ते डॉ. ऍनी बेझंट ह्यांचे अनुयायी असल्यामुळे त्यांच्यावर थियोसोफिकल मुव्हमेंटचा प्रभाव झाला.सेवानिवृत्त झाल्यानंतर ते चेन्नईला गेले आणि त्यांनी थियोसोफिकल सोसायटी अड्यारच्या मुख्यालयाजवळ घर बांधले. ह्याच ठिकाणी रुक्मिणी देवी लहान असताना त्यांना थियोसोफिकल विचार तसेच संस्कृती, रंगभूमी, संगीत आणि नृत्य ह्याबद्दल शिकायला मिळाले.

**३) विवाह :**

काही काळानंतर ह्याच ठिकाणी त्यांची भेट ब्रिटीश थियोसोफिस्ट डॉ. जॉर्ज अरुंडेल ह्यांच्याशी झाली.ते डॉ. ऍनी बेझंट ह्यांचे अतिशय जवळचे

सहयोगी होते. त्यानंतर ते वाराणसी येथील सेन्ट्रल हिंदू कॉलेजचे मुख्याध्यापक झाले. ह्यांच्याशीच काही काळानंतर त्यांचा विवाह झाला.

**५) अँना पाव्हलॉव्ह यांची भेट :**

१९२८ साली प्रसिद्ध रशियन बॅले नृत्यांगना अँना पाव्हलॉव्ह ह्यांनी मुंबईला भेट दिली आणि अरुंडेल दाम्पत्य त्यांचे नृत्य बघण्यासाठी त्यांच्या कार्यक्रमाला गेले. त्यांनतर योगायोगाने ते आणि अँना पाव्हलॉव्ह प्रवासादरम्यान एकाच बोटीवर होते. ते ऑस्ट्रेलियाला जात होते जिकडे त्यांच्या नृत्याचा पुढचा कार्यक्रम होता.

प्रवासादरम्यान त्यांच्यात चांगली मैत्री झाली आणि नंतर काही दिवसात रुक्मिणीदेवींनी अँना पाव्हलॉव्ह सोलो नर्तकिंपैकी एक क्लेओ नोर्डी ह्यांच्याकडून नृत्याचे प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली. त्यानंतर अँना ह्यांच्या विनंतीवरून रुक्मिणीदेवी ह्यांनी त्यांचे लक्ष भारतीय शास्त्रीय नृत्याबद्दल माहिती शोधण्यात केंद्रित केले. ह्या काळात भारतीय शास्त्रीय नृत्याकडे कोणीही गांभीर्याने बघत नव्हते. किंबहुना नृत्य ही चांगल्या घरातल्या व्यक्तींनी करायची गोष्ट नव्हे असेच समाजाचे मत होते. पण रुक्मिणीदेवी ह्यांनी समाजाचा विरोध पत्करून भरतनाट्यम ह्या शास्त्रीय नृत्यप्रकाराला पुनरुज्जीवित केले.

**५) गुरू आणि शिक्षण :**

१९३३ साली मद्रास मुझिक अकादमीच्या वार्षिक परिषदेत त्यांनी पहिल्यांदा 'साधीर' ह्या नृत्याचे सादरीकरण बघितले. त्यानंतर त्यांनी हे नृत्य मयलापोरे गौरी अम्मा ह्यांच्याकडून शिकून घेतले. यात इ कृष्णा अय्यर यांनी त्यांना मदत केली. नंतर त्यांनी प्रख्यात भरतनाट्यम गुरु व नर्तिका पांडणाल्लूर मिनाक्षी सुंदरम पिलाई ह्यांच्या मार्गदर्शनाखाली भरतनाट्यम्?चे अध्ययन केले होते.

**६) योगदान :**

भरतनाट्यम्?च्या पुनरुज्जीवनात रुक्मिणीदेवींचा मोठाच हातभार होता. त्यांनी खेडोपाडी जाऊन अनेक नृत्यशिक्षकांकडून या नृत्यप्रकारासंबंधी माहिती गोळा केली. ज्या काळी समाजात नृत्यास प्रतिष्ठा नव्हती त्या काळी त्यांच्यासारख्या सुसंस्कृत उच्च कुटुंबातील स्त्रीने त्या क्षेत्रात पदार्पण करावे, ही घटनाच अपूर्व होती. शरीराची लवचिकता, लयीविषयीची जाण व

हालचालींतील आकर्षकता ह्यांमुळे त्यांच्या नृत्यांना वैशिष्ट्यपूर्णता लाभली. नृत्याकडे त्यांनी श्रद्धेने व बुद्धिवादी दृष्टीने पाहिले. शास्त्रोक्त संगीत, नृत्यनाट्ये ह्यांतही त्यांनी विशेष प्राविण्य मिळविले होते.

कुमारसंभव, शाकुंतल, तसेच कुट्राल कुरवंजि, कण्णपर कुरवंजि, श्यामा, आंडाळ, रामायण (६ भाग) इ. नाट्ये, नृत्यनाट्ये त्यांनी सादर केली व त्यांच्या संगीतरचनाही केल्या. त्यांनी अड्यार येथे 'कलाक्षेत्र' ह्या संस्थेची स्थापना १९३६ साली केली होती.

त्यांनी ह्या नृत्यामधील शृंगाररस कमी केला, वैषयिक भाग कमी केला जो देवदासींच्या नृत्याचा महत्वाचा भाग होता. त्यांनी ह्या नृत्यामध्ये व्हायोलीन सारख्या वाद्यांचा समावेश केला तसेच नाविन्यपूर्ण पोशाखांचा व आभूषणांचा समावेश केला. त्यांच्या नृत्य सादरीकरणासाठी त्यांनी अनेक विद्वानांची, शास्त्रीय संगीतकारांची, कलाकारांची मदत घेतली आणि त्यातून अप्रतिम नृत्याविष्कार तयार झाले!

**७) महत्वपूर्ण नियुक्त्या :**

शिक्षणाच्या क्षेत्रातही त्यांनी कार्य केले आहेत. 'ॲरंडेल ट्रेनिंग सेंटर फॉर टीचर्स', मद्रास, 'इंटरनॅशनल सोसायटी फॉर प्रोटेक्शन ऑफ ॲनिमल्स', लंडन ह्या संस्थांच्या संचालिका, 'अनिमल वेल्फेअर बोर्ड'च्या अध्यक्ष, 'इंटरनॅशनल व्हेजिटेरियन युनियन', लंडन इत्यादींच्या उपाध्यक्षा आदी पदेही त्यांनी भूषविली आहेत.

**८) मानसन्मान व पुरस्कार :**

१) राज्यसभेच्या सभासद म्हणून १९५२ व १९५६ साली त्यांची नेमणूक झाली होती.
२) १९५६ साली त्यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित केले.
३) १९५७ साली संगीत नाटक अकादमीचे नृत्यविषयक पारितोषिक
४) १९६० अमेरिकेच्या वेन स्टेट विद्यापीठाकडून मानव्यविद्यांतील 'डॉक्टरेट'
५) १९७० साली कलकत्त्याच्या रवींद्रभारती विद्यापीठाची डी. लिट.

याखेरीज 'प्राणिमित्र' पारितोषिक, भरतनाट्यम् ?साठी राष्ट्रपती पारितोषिक आदी मानसन्मानही त्यांना लाभले होते

**९) गुगल कडून कार्याची नोंद :**

ज्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात अतुलनीय कार्य करून जगात वेगळे

स्थान निर्माण केले होते.आशा निवडक महिलांचे महिला दिनानिमित्ताने गुगल मध्ये जगभरातल्या १३ अशा महिलांचे चित्रण केले होते आणि ह्या यादी मध्ये रुक्मिणीदेवी अरुंडेल ह्या एकमेव भारतीय महिला होत्या.

**१०) राष्ट्रपती पद नाकारले :**

१९७७ साली राष्ट्रपती फक्रुद्दीन अली अहमद ह्यांचे निधन झाले. त्यांचा कार्यकाल पूर्ण झालेला नव्हता. तेव्हा तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई ह्यांनी त्यांना राष्ट्रपती होण्याविषयी विचारले .तेव्हा रुक्मिणीदेवी यांनी मोरारजी देसाई ह्यांना नम्रपणे सांगितले कि, '' मी राष्ट्रपती होऊ इच्छित नाही कारण मला त्या कामात अडकून पडायचे नाही. मला कलाक्षेत्र व भारतीय शास्त्रीय नृत्य व संगीत ह्याचीच सेवा व साधना करत आयुष्य कंठायचे आहे.''

त्यांनी जर ही संधी स्वीकारून राष्ट्रपतीपद स्वीकारले असते तर भारताला पहिल्या महिला राष्ट्रपती म्हणून व पहिल्या महिला पंतप्रधानासोबत काम करताना दिसल्या असत्या. कारण मोरारजी देसाई यांच्यानंतर इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या होत्या.

**११) मृत्यू :**

आपल्या नृत्य साधना व कलेच्या सेवेमध्ये कधीही खंड न पडू देणाऱ्या रुक्मिणी देवी ह्यांचे २४ फेब्रुवारी १९८६ साली चेन्नई येथे वयाच्या ८२ व्या वर्षी देहावसान झाले व भारत देश एका ऋषितुल्य व्यक्तिमत्वाला कायमचा मुकला. त्यांनी भारतीय शास्त्रीय संगीत व नृत्याच्या क्षेत्रात जे अतुलनीय कार्य केले आहे ते अनेकांसाठी दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक आहे. त्यांच्यामुळेच आज अनेक स्त्रिया भरतनाट्यम व इतर शास्त्रीय नृत्याची साधना करू शकतात. त्यांचे कलाक्षेत्रातील योगदान महान आहे.



# ४४.

# पंडिता मृणालिनी साराभाई

**१) प्रस्तावना :**

भारतीय नृत्याला प्रसार आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी अनेक कलावंतांनी हातभार लावला. त्यात मृणालिनी साराभाई यांचा नामोल्लेख करावा लागेल.त्यांनी सामाजिक संदेश जनसामन्यापर्यंत पोहोचवण्याचे कार्य केले. पारंपरिक कलेला विज्ञानाची जोड दिली.आशा महान नर्तिका पं. मृणालिनी साराभाई यांच्या जीवनकार्याचा आढावा खालील मुद्द्यांच्या आधारे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

पंडिता मृणालिनी साराभाई यांचा जन्म ११ मे १९१८ रोजी चेन्नई येथे उच्चशिक्षित परिवारात झाला. जेव्हा त्या चार वर्षाच्या होत्या तेव्हा कुठलेही गाणे ऐकले की त्या गाण्यावर थिरकायला व नृत्याभिनय करायला लागत.

**३) शिक्षण :**


पंडिता मृणालिनी साराभाई यांचे प्रारंभिक शिक्षण स्वित्झर्लंडमध्ये झाले होते. तिथे त्यांनी काही पाश्चात्य नृत्यशैलींचेही अध्ययन केले होतो. भारतात आल्यानंतर शिक्षणासाठी शांतिनिकेतन येथे गेल्या. त्या ठिकाणी त्यांना रवींद्रनाथ टागोर आणि नंदलाल बोस हे महान गुरू लाभले. या दोन गुरूंच्या सान्निध्यात मृणालिनी यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व घडले. पंडिता मृणालिनी साराभाई यांनी भरतनाट्यम्, मोहिनीअट्टम्, कथकली आणि मणिपुरी नृत्याचे शिक्षण गुरू मिनाक्षी सुंदरम्? पिल्लई, मत्थुकुमार पिल्लई, चोक्कलिंगम पिल्लई आणि कुंजुकुरूप अशा महान गुरूंकडून मिळवले होते. त्याचप्रमाणे अमेरिकन ॲकॅडमी ऑफ ड्रामॅटिक आर्ट्समधूनही त्यांनी प्रशिक्षण घेतले होते. या सर्वांचा मिलाप यांच्या नृत्यामध्ये होता.

**४) कार्य :**

पंडिता मृणालिनी यांनी आपल्या नृत्याला सामाजिक घडामोडींशी जोडले आणि ज्वलंत सामाजिक मुद्दे आपल्या नृत्यरचना आणि नृत्यनाटिकांच्या माध्यमातून मांडले. १९६०-६१ च्या दशकात जेव्हा गरीब घरातील मुली हुंडाबळी पडायच्या तेव्हा मृणालिनींनी हुंड्याची समस्या केंद्रस्थानी ठेवून नृत्याची संरचना तयार केली. त्यांनी नारी सबलीकरण, अस्पृश्यता, मानवाधिकाराचे दहन, मानवी मूल्यांचे अवमूल्यन आणि पर्यावरण इत्यादी अनेक विषयांकडे लोकांना आकर्षित केले. या कार्यामध्ये त्यांना पं. राम गोपाल आणि सी. पण्णिकरांसारख्या विद्वान आणि प्रयोगशील नृत्यशिल्पींचाही महत्त्वपूर्ण सहयोग मिळाला. जगप्रसिद्ध वैज्ञानिक डॉ. साराभाई यांच्याशी विवाह झाला. १९४८ मध्ये त्यांनी 'दर्पण ॲकॅडमी ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स' याची स्थापना केली.

**५) पुरस्कार :**

मृणालिनी यांना पद्मश्री पुरस्कार, पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित केले आहे. त्यांना संगीत नाटक ॲकॅडमीने फेलोशिप प्रदान केली होती. फ्रेंच अर्काईव्हजकडून पदक आणि डिप्लोमा मिळवणारी ही प्रथम भारतीय महिला होती. मेक्सिकन सरकारने त्यांच्या प्रभावशाली नृत्यनाटिकांसाठी त्यांना सुवर्णपदक देऊन सन्मानित केले होते. तसेच त्यांना इतरही राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय सन्मान मिळाले होते.प्रख्यात नृत्यांगना, अभिनेत्री आणि समाजसेविका मल्लिका साराभाई या मृणालिनी यांच्या कन्या आहेत. मृणालिनी यांनी 'मृणालिनी साराभाई : द वॉईस ऑफ द हार्ट' या नावाचे स्वतःचे आत्मचरित्र लिहिले आहे. अशा या महान नृत्यांगना नृत्य जगतात 'अम्मा' म्हणून ओळखल्या जात होत्या. २१ जानेवारी २०१६ रोजी त्यांचे निधन झाले.



# ४५.

## उस्ताद बडे गुलाम अली खाँ

**१) प्रस्तावना :**

उस्ताद बडे गुलाम अली खाँ यांची गणना भारतातील महान गायक आणि संगीतकारांमध्ये केली जाते. ते अद्वितीय मधुर आवाजाचे धनी होते. त्यांचे गायन ऐकून श्रोते काही काळ भान हरपून जायचे. भारताच्या कानाकोपऱ्यातून संगीत जाणकार खाँ साहेबांना गाण्यासाठी आमंत्रणे पाठवत असत. राजेशाही असो वा सामान्य शालेय विद्यार्थी, खाँ साहेबांनी आपल्या मखमली आवाजाने सर्वांना मंत्रमुग्ध केले. अशा या महान कलावंताच्या जीवन कार्याचा परिचय खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**२) जन्म व बालपण :**

बडे गुलाम अली खाँ साहेब यांचा जन्म २ एप्रिल १९०२ रोजी पाकिस्तानी पंजाबमधील लाहोर या प्रसिद्ध शहराजवळील केसूर गावात झाला.बडे गुलाम अली खाँ यांना संगीतातून मानसिक, शारीरिक आणि आध्यात्मिक बळ मिळाले आणि त्यामुळेच हे स्पष्ट झाले की त्यांच्या भाषणातून आणि हावभावांवरून हे व्यक्तिमत्त्व संगीताच्या प्रचारासाठी पृथ्वीवर अवतरले होते. त्यांच्या घरात संगीताचे वातावरण होते. त्यांच्या वडिलांचे नाव अली बक्श खाँ होते.

**३) गुरु आणि शिक्षण :**

विशेष म्हणजे संगीताच्या दुनियेत त्यांची सुरुवात सारंगी वादक म्हणून झाली. वडील अली बक्श खाँ आणि काका काले खाँ यांच्याकडून त्यांनी संगीताचे बारकावे शिकले. त्यांचे वडील काश्मीरच्या महाराजांचे दरबारी गायक होते आणि त्या घराण्याला ''काश्मीरी घराणा'' असे म्हणतात. जेव्हा हे लोक पटियालामध्ये राहू लागले तेव्हा हे घराणे ''पटियाला घराणे'' म्हणून ओळखले जाऊ लागले. बडे गुलाम अली, ज्यांचा स्वभाव अतिशय कडक होता. शरीर यष्टी धडधाकट होती.

**४) गायकी :**

यांनी ‘सबरंग’ नावाने अनेक बंदिशी निर्माण केल्या. त्यांची सरगम शैली पूर्णपणे अनोखी होती. हृदयस्पर्शी आवाजाचे मास्टर उस्ताद बडे गुलाम अली खाँ यांनी नव्या शैलीतून ठुमरीला नवे परिमाण दिले. तज्ज्ञांच्या मते, उस्तादजींनी आपल्या प्रायोगिक संगीताने ठुमरीला परिचित शैलीच्या सीमेपलीकडे नेले.

**३) यशस्विता :**

बडे गुलाम अली खाँ यांना त्यांच्या सुरेल आवाजामुळे खूप प्रसिद्धी मिळाली. १९१९ मध्ये त्यांनी लाहोर येथील संगीत परिषदेत पहिला सार्वजनिक कार्यक्रम झाला. त्यानंतर कोलकाता आणि अलाहाबादच्या संगीत संमेलनात त्यांना देशव्यापी प्रसिद्धी मिळाली. १०३० च्या दशकात भारतीय संगीत जगतात तारेप्रमाणे चमकणाऱ्या या गायकाने १९३८ मध्ये तत्कालीन कलकत्ता येथील एका कार्यक्रमात पहिल्यांदा आपल्या आवाजाची जादू जगासमोर पसरवली. त्यानंतर ते संगीताला प्रगत आणि समृद्ध करण्यासाठी रममाण झाले. खाँ साहेब दिग्गज गायक होते. त्यांच्या गायनात संमोहन शक्ती होती.

**४) एका गाण्यासाठी २५ हजार मानधन :**

मुघल-ए-आझम चित्रपटात गाण्यासाठी त्यांनी २५ हजार रुपये मागितले होते. कारण त्यांना चित्रपटात गाण्याची इच्छा नव्हती. संगीतकार नौशाद यांनी त्यांना सांगितले की आपल्या अलोकिक कलेला ४५ करोड जनतेपासून वंचित ठेवू नका. दिग्दर्शक के. आसिफने २५ हजार रुपये देण्याचे मान्य केले, तर त्या काळात लता मंगेशकर आणि मुहम्मद रफी यांना एका गाण्यासाठी पाचशे रुपयांपेक्षा कमी पैसे मिळत होते. त्यांनी गायलेले 'राधे श्याम बोल’ हे भजन ऐकून महात्मा गांधीजी खूप प्रभावित झाले होते.

**५) पंडित नेहरु यांच्यावर नाराज :**

बडे गुलाम अली खाँ साहब हे भारतातील सर्वात करिश्माई आवाजांपैकी एक होते. त्यांच्या प्रत्येक मैफिलीला हजारो लोक आकर्षित करायचे. गोष्ट त्या दिवसांची आहे जेव्हा बडे गुलाम अली खाँ साहेब एका कार्यक्रमानिमित्त कोलकात्यात आले होते. त्यावेळी देशाचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू होते. स्वतः नेहरू देखील खाँ साहेबांच्या गायनाचे मोठे प्रशंसक होते. त्याचं असं झालं की, पंडित नेहरूही कोलकात्यात काही

अधिकृत बैठकीला हजर होते. खाँ साहेबही शहरात असल्याचे कळताच त्यांनी त्यांच्या गायनाचा आनंद घेण्यासाठी थोडा वेळ काढण्याचे ठरवले. खाँ साहेब ज्या हॉटेलमध्ये राहत होते त्या हॉटेलला त्यांनी फोन केला आणि त्यांच्याशी बोलले.

खाँ साहेबांबद्दल असे म्हटले जाते की ते थोडे कठोर स्वभावाचे होते, स्वतःच्या मर्जप्रमाणे गायचे. औपचारिक संभाषणानंतर पंडित नेहरू त्यांना म्हणाले, ''तर खान साहेब, आता हा एक योगायोग आहे की तुम्हीही शहरात आहात आणि माझ्याकडेही एक तासाचा वेळ आहे, मला वाटतं तुमच्यासोबत एक मैफल व्हायला हवी.'' खाँ साहेब हे पंडित नेहरूंचे मित्र होते, पण 'माझ्याकडे एक तास आहे' या त्यांच्या बोलण्याने त्यांना थोडासा राग आला असावा. काही क्षणांच्या शांततेनंतर ते म्हणाले, ''पंडितजी, ते ठीक आहेत, पण आज आपण राहू द्या.'' हे ऐकून पंडित नेहरूंनी विचारले, ''आज काही अडचण का आहे?'' त्यावर ते आपल्या शैलीत हसत म्हणाले, ''त्याचे काय आहे ते पंडितजी, फक्त एका तासात माझा घसा गरम होतो.''

**६) खाँ साहेबांचे राष्ट्रप्रेम :**


१९४७ साली भारताच्या फाळणीनंतर बडे गुलाम अली खाँ पाकिस्तानात गेले होते, पण संगीताच्या या उपासकाला पाकिस्तानचे वातावरण अजिबात आवडले नाही. परिणामी ते लवकरच भारतात परतले. यावरून त्यांची राष्ट्रभक्ति दिसून येते.

**७) मानसन्मान :**

खाँ साहेब यांना भारत सरकारने पद्मभूषण आणि संगीत नाटक अकादमी पुरस्कारानेही सन्मानित केले आहे. यासोबतच विविध संस्था व सांस्कृतिक मंडळाच्या वतीने अनेक मानसन्मान देऊन त्यांना सन्मानित केले.

**८) मृत्यू :**

हैदराबादमधील नवाब झहिरयारजंग यांच्या बशीरबाग राजवाड्यात उस्ताद बडे गुलाम अली खाँ यांचा चांदण्याची शीतलता देणारा आणि देदीप्यमान मखमली आवाज २५ एप्रिल १९६८ रोजी कायमचा लोपला.आणि जुन्या काळातील पटियाला घराण्याचा एक मधुर अध्याय संपला.



# ४६.

## पंडित किशन महाराज

**१) प्रस्तावना :**

भारतीय संगीतात तबला या वाद्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. तबला या वाद्याला लोकप्रिय करण्यात अनेक कलावंतांनी मोलाचे योगदान दिले आहे.यात बनारस घराण्याचे थोर कलावंत पंडित किशन महाराज यांचा नामोल्लेख प्रामुख्याने करावा लागेल. त्यांचे जीवन कार्य पुढीलप्रमाणे आहे.

**२) जन्म व बालपण :**

पं. किशन महाराज यांचा जन्म बनारस येथील कबीर चौरा मोहल्ला येथे दि. ३ सप्टेंबर, १९२३ रोजी झाला. कृष्णाष्टमीच्या मध्यरात्री त्यांचा जन्म झाल्यामुळे त्यांचे नाव किशन असे ठेवण्यात आले. घरात सांगीतिक वातावरण होते. त्यांच्या वडिलांचे नाव हरि महाराज तर आईचे नाव अंजीरादेवी असे होते.

**३) गुरू व शिक्षण :**

पं. किशन महाराज यांनी तबला वादनाचे प्राथमिक शिक्षण वडील पं. हरि महाराज यांच्याकडून घेतले. वडिलांच्या निधनानंतर त्यांचे काका पंडित कंठे महाराज यांच्याकडून त्यांनी तबला वादनाची विधीवत तालीम घेतली.

**३) वादन शैली :**

बनारस घराण्याची जी वादन शैली आहे त्याची सर्वच वैशिष्ट्ये त्यांच्या वादनात दिसून येतात. उंचीपुरी देहयष्टी, गौरवर्णीय रुबाबदार चेहरा, कपाळावर शोभून दिसणारा कुंकुम तिलक, मानेवर रूळणारे केस त्यांचे व्यक्तिमत्व खुलवत होते. वीरासनात बसून ते वादन करायचे. त्यांचे दायाँ बायाँचे संतुलन अतुलनीय होते. बनारसी बोलबाट, चलन चाला, नृत्याचे बोल इत्यादी बोल प्रकार ते उत्तम प्रकारे सादर करायचे.

**४) साथसंगत :**

स्वतंत्र वादनाबरोबरच ते उत्तम साथ करायचे. त्यांनी उस्ताद फैय्याज खां, पं. ओंकारनाथ ठाकूर, उस्ताद गुलाम अली खां, पं. भीमसेन जोशी, पंडित रविशंकर, उस्ताद अली अकबर खां यांसारख्या दिग्गज कलावंतांसोबत साथसंगत केलेली आहे. याच बरोबर शंभूमहाराज, पं.गोपीकृष्ण आणि पंडित बिरजू महाराज यांच्या नृत्याला त्यांनी साथसंगत केली. त्यांनी १९६५ मध्ये ब्रिटनमध्ये कॉमनवेल्थ कला समारोहातही साथसंगत केली आहे. निचा नगर, आंधिया, बडी माँ या चित्रपटांतील गीतांना त्यांनी तबल्याची साथसंगत केली आहे.

**५) पुरस्कार :**

पंडित किशन महाराजांना संगीतासाठी केलेल्या अथक परिश्रमांबद्दल व सांगीतिक कार्याबद्दल अनेक मानसन्मान व पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. त्यांना लय भास्कर, संगीत सम्राट पुरस्कार, काशी स्वर गंगा सन्मान, संगीत नाटक अकादमी पुरस्कार, ताल चिंतामणी, लय चक्रवर्ती, उस्ताद हाफिज अलीखां या पुरस्कारांसह भारत सरकारच्या पद्मश्री व पद्मविभूषण पुरस्कारांनी सुद्धा गौरवण्यात आले आहे.

**६) शिष्यसंप्रदाय :**

पंडित किशन महाराज हे उत्तम तबला वादक तर होतेच परंतु ते एक आदर्श गुरूही होते. त्यांनी अनेक शिष्य बोस, पंडित बाळकृष्ण निर्माण केले. यात पंडित कुमार बोस, अय्यर, सुखविंदर सिंह नामधारी अशा शिष्यांचा नामोल्लेख करता येईल. ज्यांनी तबला वादनाचा देशविदेशांत प्रचार व प्रसार केला, ज्यांनी अनेक चित्रपट गीते आपल्या तबला साथीने अजरामर केली; ज्यांनी अनेक शिष्य घडवून अभिजात संगीतात मौलिक योगदान दिले.

**७) समारोप :**

अशा थोर तबला वादक पंडित किशन महाराज यांचा ४ मे, २००८ रोजी बनारसजवळील खजूरी येथे मृत्यू झाला. देशातील सर्वच संगीतकारांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. पं. किशन महाराजांच्या निधनामुळे संगीत जगतात जी पोकळी निर्माण झाली ती कधीही भरून न निघण्यासारखी आहे.



# ४७.

## प्रो. बी. आर. देवधर

**१) प्रस्तावना :**

भारतीय अभिजात संगीतात वेगवेगळ्या व्यक्तिमत्त्वाची थोर माणसं आपल्याला भेटतात. त्यापैकी एक विलक्षण व्यक्तिमत्व म्हणजे प्रो. बाळकृष्ण रघुनाथ देवधर! ज्यांना संगीत शिक्षक, प्रसिद्ध शास्त्रीय गायक,भारतीय संगीतज्ञ आणि कंठ साधनेचे अभ्यासक अशा विविध भूमिका बजावून भारतीय संगीताचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. अशा प्रो देवधरांच्या जीवन कार्याचा आढावा पुढील मुद्द्यांच्या आधारे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

प्रो. देवधरांचा जन्म ११ सप्टेंबर १९०१ रोजी मिरज येथे झाला. घरात संगीताचे वातावरण होते. आजोबा वेद पारंगत होते. आई, वडील आणि दोन काका असे एकत्र कुटुंब होते. देवधर मास्तर ३ वर्षांचे असतानाच प्लेगच्या साथीनं घरातील सर्वजण दगावले. मास्तरांनाही प्लेग झाला परंतु भविष्यात खूप काही सांगीतिक कार्य त्यांच्या हातून घडायचे होते म्हणूनच की काय ते वाचले.

**३) गुरु आणि शिक्षण :**

त्यांचं संगीत शिक्षण लहानपणी मिरजेला अण्णाजी सुखदेव यांच्याकडेच झाले. त्यानंतर त्यांनी पं. वामन बुवा चाफेकर, पं. विनायकबुवा पटवर्धन पं. नीळकंठ बुवा जंगम यांच्याकडून तालीम घेतली. पं. बाळकृष्ण बुवा इचलकरंजीकर यांच्याकडूनही काही दिवस त्यांना ग्वाल्हेर घराण्याची आली. पुढे ते मुंबईला गेले. तेथे पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर यांच्यासारख्या थोर गुरूंकडून संगीताचे शिक्षण घेत आले. मास्तरांची समर्पित भावना कष्ट करण्याची तयारी व त्यांची तळमळ पाहून पंडित पलुस्कर यांनी त्यांना व्यवस्थापक व संगीत शिक्षक म्हणून काम करण्याची संधी दिली पुढे बी ए चे शिक्षण

घेण्याची सुद्धा अनुमती दिली. एवढेच नाही तर विष्णु दिगंबरांनी त्यांना जी. स्क्रिझी यांच्याकडे पाश्चात्त्य संगीताच्या शिक्षणासाठी पाठविले.

**४) इंडियन स्कूल ऑफ म्युझिक ची स्थापना :**

गुरूंच्या कृपाशीर्वादाने त्यांनी १९२५ मध्ये गिरगाव येथे ‘देवधर स्कूल ऑफ इंडियन म्युझिक’ ची स्थापना केली. ते उच्चशिक्षित असल्यामुळे परंपरागत व नाविन्य याचा विलोभनीय संगम आपल्या शिक्षण पद्धतीतून त्यांनी साधला.विद्यालयातून अभिजीत संगीताचे शास्त्रोक्त पद्धतीने अध्यापन तर सुरू झालेच. परंतु याचबरोबर प्रचार प्रसार करण्यासाठी त्यांनी विविध संगीत परिषदा,चर्चासत्रे, नवोदित कलावंतांसाठी मुक्त व्यासपीठ निर्माण करून दिले. पुढे या संस्थेला देवधर्स स्कूल ऑफ इंडियन म्युझिक असे नाव पडले.

**५) आदर्श गुरु :**

डॉ.देवधर यांना पंडित भातखंडे यांचा चार वर्षे सहवास लाभला. त्यांच्या हिंदुस्थानी संगीत पद्धती या ग्रंथाचा प्रभाव त्यांच्यावर होता. कंठ साधना या त्यांचा आवडीचा विषय असल्यामुळे विद्यार्थ्यांना याविषयी विशेष मार्गदर्शन ते करायचे. घराणेशाहीचे जोखड त्यांना कधीच मान्य नव्हते त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार विविध घराण्याचे शिक्षण घेण्याची अनुमती त्यांनी दिली होती.

विविध घराण्यांच्या दुर्मिळ बंदिशी त्यांनी जीवा पाडततन करून ठेवल्या होत्या त्या खुल्या दिल्याने सर्व शिष्यांना वाटून टाकल्या.मैफलीत गावयाचे राग व बंदिशी यांची टिपणे आधी काढून ठेवण्याची शिस्त त्यांनी शिष्यांना लावली.

**६) शिष्य संप्रदाय :**

पंडित कुमार गंधर्वांसारखा एक महान कलाकार त्यांनी घडवला हे भारतीय संगीत विश्वातील देवधर मास्तरांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. यांच्याबरोबर चंद्रशेखर रेळे, शीला पंडित,शाम गुप्ते, पंढरीनाथ कोल्हापुरे,वसुंधरा श्रीखंडे,मनोरमा वागळे,बाळ फडणीस असे अनेक कलावंत त्यांनी घडवले.

**७) गायकी :**

संगीत शास्त्र हा त्यांचा मुख्य विषय होता. असे असले तरी मैफिलीच्या तंत्राची त्यांना उत्तम जाण होती.देवधर स्वत: मैफलीचे गायक नव्हते.असे असले तरी सावकाश चलन, थोडीशी गमक, कणस्वर, मींड,

हरकत आदी सौंदर्य स्थळांनी ते राग भरायचे. सर्व घराण्यांचा त्यांनी अभ्यास केला होता त्यामुळे विविध घराण्यातील सौंदर्य स्थळे टिकून आपल्या मैत्रीत सादर करायचे. ते गाणे चालू असतानाच त्याचे जलद गतीने स्वर लेखन करायचे.

**८) संगीतकार :**

डॉ. देवधर १९३१ते ३६ याकाळात चित्रपट व्यवसायाकडे वळले.सुरुवातीच्या काळात अभिनेत्यालाच गायन करावे लागायचे. परंतु काही वेळा अभिनेत्याचा आवाज साधारण असेल तर त्याला हलक्या फुलक्या चाली देऊन त्यांच्याकडून गावून घेत. त्यामुळे अल्पावधीतच त्यांची प्रतिथयश संगीतकार म्हणून सर्वदूर ख्याती झाली. जाऊन मुखपटांना संगीत देण्यासाठी वाद्य वृंदाचा समर्पपणे उपयुक्त त्यांनी केला व आपल्या शिक्षण कडून तसे वाद्य वंदनाच्या रचनाही तयार करून घेतल्या त्यांनी अंगुठी, पतित-पावन, सस्सी पुन्नू अशा ११ चित्रपटांचे संगीत दिग्दर्शन केलं तर ९० गाण्यांचे संगीत दिग्दर्शन केले. 'नीला' या मराठी व हिन्दी चित्रपटाची त्यांनी निर्मिती केली.

**९) लेखन कार्य :**

देवधर मास्तराने संगीत कला विहार या मासिकासाठी तब्बल २४ वर्षे संपादक म्हणून कार्य यातूनच पुढे 'थोर संगीतकार' या ग्रंथाची निर्मिती झाली.याशिवाय त्यांनी आपल्या गुरुंचे चरित्र गायनाचार्य पं. विष्णु दिगंबर लिहिले.शिवाय त्यांचे 'व्हाईस कल्चर', पिलर्स ऑफ हिंदुस्थानी म्युझिक अशा ग्रंथांची निर्मिती केली.

**१०) विवीध पदांवर निवड :**

१९५१ साली संगीत नाटक अकादमीची स्थापना झाली. त्यावेळी डॉ. देवधर मास्तर अकादमीवर निवडून गेले. याशिवाय बनारस हिंदू विद्यापीठ, संगीत विभागाचे अधिष्ठाता (डीन) म्हणून तर वनस्थली विद्यापीठ,राजस्थान आणि नागपूर विद्यापीठात संगीत विभाग प्रमुख म्हणून त्यांनी समर्थपणे जबाबदारी पूर्ण केली.आकाशवाणीच्या श्रवण कसोटी मंडळाचे ते सदस्य होते. त्यांची अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाचे सन्मान्य कार्याध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली. त्यांनी अखिल भारतीय गांधर्व विद्यालयाचे अभ्यासक्रम, परीक्षा पद्धती, दर तीन वर्षांनी शिक्षकांची संमेलने, जलसे यासाठी त्यांनी

मोलाचे योगदान दिले. देवधर मास्तरांच्या प्रयत्नांमुळे देशाच्या कानाकोपऱ्यातून हजारो विद्यार्थी संगीत परीक्षांना बसू लागले.

**११) विदेशात संगीत प्रचार :**

भारतीय संगीत साता समुद्र पलीकडे पोहोचवावे या दृष्टिकोनातून त्यांनी विदेशी दौरे केले.फ्लॉरेन्स (इटली) येथील जागतिक संगीत परिषदेसाठी भारताचे प्रतिनिधित्व केले. त्यावेळी त्यांनी जर्मनी, फ्रान्स,ऑस्ट्रिया, इंग्लंड, चेकोस्लोव्हाकिया आदी देशांना भेटी दिल्या. शिवाय फ्रान्समधील संगीत परिषदेतही ते सहभागी झाले. त्यानंतर ते युनोस्कोतर्फे आयोजित केलेल्या आग्नेय आशियाई संगीत परिषदेसाठी भारताच्या सांस्कृतिक प्रतिनिधिमंडळातून मनिला (फिलिपीन्स) येथे उपस्थित होते. १९५८ मध्ये ते पूर्व यूरोपात भारतीय सांस्कृतिक मंडळांबरोबर गेले. या सुमारास त्यांनी रशिया, पोलंड, युगोस्लाव्हाकिया आदी देशांना सदिच्छा भेट दिली.

**१२) आवाज जोपासना शास्त्र :**

आवाज शास्त्राकडे दुर्लक्ष होऊ नये यासाठी देवधरांनी आवाज जोपासनाशास्त्र (व्हाईस कल्चर) विषयीचे संशोधन करून भारतीय संगीतासाठी महत्वपूर्ण योगदान दिले. याकरिता त्यांनी न्यूयॉर्क येथे १९५८ नंतर काही वर्षे 'सायन्स ऑफ व्हाईस कल्चर' च्या संशोधनात प्रा. एंगल्स यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन–अध्यापन केले आणि ही पद्धती वा शोध भारतीय संगीताला कशी लागू करता येईल यासाठी प्रयत्न केले. त्यांनी प्रोफेसर जी. स्क्रीनझी या इटालियन संगीतज्ञाकडून प्रेरणा घेऊन आणि अमेरिकेत प्रो. इंगम या पाश्चात्त्य संगीतज्ज्ञाकडून शिक्षण घेतले व निष्कर्ष पुस्तकरूपाने 'आवाज जोपासना शास्त्र' या ग्रंथात मांडले. त्याकाळी हा विचार नवा होता. या धाडसी प्रयोगांची लोकांनी कुचेष्टाही केली. तरीही डॉ. अशोक रानडे आणि गायिका निर्मला गोगटे या शिष्यांच्या तालमीत देवधर्स इंडियन स्कूल ऑफ म्युझिकमध्ये आपल्या विद्यार्थ्यांवर प्रयोग केला.

**१३) मानसन्मान :**

संगीताचा प्रचार प्रसार करण्यासाठी प्रो. बी आर देवधर यांनी अत्यंत मोलाचे योगदान दिले. त्यामुळे त्यांना अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

१) अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाने महामहोपाध्याय या

पदवीने गौरविले.


२) भारत सरकारतर्फे त्यांना ७५व्या वर्षी पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले.

३) संगीत नाटक अकादमीची अधिछात्रवृत्ती मिळाली.

४) थोर संगीतकार या ग्रंथाला महाराष्ट्र राज्य पुरस्कार प्राप्त झाला.

**१४) समारोप :**

अखेरच्या काळात मिरज येथील 'स्वर विलास' या वास्तूत ते पत्नी चंपावती देवधर यांच्यासह रहात होते. तिथेच १० मार्च, १९९० रोजी त्यांची प्राणज्योत मावळली. ज्यांनी अभिजात संगीताला नवी देण्याचे काम केले घराण्याच्या चौकटीत न राहता संगीताचा व्यापक व विस्तृत विचार करायला ज्यांनी लावला, आवाज जोपासना शास्त्राची जननी भारतात मुहूर्तमेढ रोवली अशा थोर कलावंताचे कार्य निश्चितच स्मरणात राहिला असेच आहे.



# ४८.

## पंडित हरिप्रसाद चौरसिया

**१) प्रस्तावना :**

भगवान श्रीकृष्णाने आपल्या बासरीने सर्वांना मंत्रमुग्ध केले. त्याचप्रमाणे आधुनिक काळामध्ये आपल्या मधुर बासरी वादनाने केवळ भारतीयच नव्हे तर साऱ्या विश्वाला वेड लावले असे महान कलावंत पंडित हरिप्रसाद चौरसिया यांच्या सांगीतिक कार्याचा आढावा पुढील मुद्द्यांच्या आधारे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

पंडित हरिप्रसादजी यांचा जन्म भारताच्या उत्तर प्रदेश राज्यातील अलाहाबाद येथे १ जुलै १९३८ रोजी झाला. ते सहा वर्षांचा असताना त्याची आईचे निधन झाले. वडिलांच्या नकळत त्याला संगीत शिकावे

लागले, कारण त्याच्या वडिलांची इच्छा होती की त्याने कुस्तीपटू व्हावे. चौरसिया यांनी आखाड्यात जाऊन काही काळ वडिलांसोबत प्रशिक्षण घेतले, तरी त्यांनी त्यांच्या मित्राच्या घरी संगीत शिकण्यास आणि सराव करण्यास सुरुवात केली. ते म्हणतात,''मी कुस्तीत चांगला नव्हतो. मी तिथे फक्त माझ्या वडिलांना खूश करण्यासाठी गेलो होतो. पण कदाचित त्याच्या ताकदीमुळे आणि तग धरण्यामुळे मी अजूनही बासरी वाजवू शकतो.''

**२) गुरु व शिक्षण :**

चौरसिया यांनी वयाच्या १५ व्या वर्षी शेजारी असलेल्या राजाराम यांच्याकडून गायन शिकण्यास सुरुवात केली. पुढे आठ वर्षे वाराणसीच्या भोलानाथ प्रसन्न यांच्याकडे त्यांनी बासरी वाजवायला सुरुवात केली. १९५७ मध्ये त्यांनी ऑल इंडिया रेडिओ, कटक, ओडिशा येथे संगीतकार आणि कलाकार म्हणून काम केले. त्यानंतर ऑल इंडिया रेडिओसाठी काम करत असताना त्यांना बाबा अल्लाउद्दीन खाँ यांची कन्या अन्नपूर्णा देवी यांचे मार्गदर्शन मिळाले.

**३) वादन शैली :**

पंडित चौरसिया यांच्या बासरीवादनात सर्वात मोठी जमेची बाजू आहे ती म्हणजे प्रभावी फुंक व अमीट स्वर माधुर्य. याशिवाय त्यांची नवनिर्मितीची क्षमता अनेक वेळा चाहत्यांना आश्चर्यचकित करते. पंडित चौरसिया हे एकीकडे परंपरावादी आहेत तर दुसरीकडे नवप्रवर्तक आहेत. शास्त्रीय संगीताव्यतिरिक्त, त्यांनी भारतीय लोकसंगीत, पॉप संगीत आणि पाश्चिमात्य संगीतात त्यांचा विस्तार केला आहे.

**४) चित्रपटांचे संगीत दिग्दर्शन :**

शास्त्रीय संगीताव्यतिरिक्त पं.हरिप्रसाद यांनी शिवकुमार शर्मा यांच्यासोबत 'शिव-हरी' या नावाने सिलसिला, चांदनी, लम्हें, डर, परंपरा, फासले आणि साहिबानसह अनेक लोकप्रिय चित्रपटांसाठी संगीत दिले आणि काही अतिशय लोकप्रिय गाण्यांची निर्मिती केली.

**५) विदेशात संगीताचा प्रचार :**

त्यांनी नेदरलँड्समधील रॉटरडॅम संगीत कंझर्व्हेटरी येथे जागतिक संगीत विभागाचे कलात्मक संचालक म्हणून काम करतात. त्यांनी मुंबई येथे २००६ मध्ये वृंदावन गुरुकुल आणि २०१० मध्ये भुवनेश्वर येथे वृंदावन

गुरुकुल सुरु केले. या दोन्ही संस्थांमधून बासरी वादनाचे शास्त्रोक्त शिक्षण दिले जाते.

त्यांनी जॉन मॅक्लॉफ्लिन, जॅन गार्बरेक आणि केन लॉबर यांच्यासह अनेक पाश्चात्य संगीतकारांसोबत कार्य केले आहे. चौरसिया यांनी १९६८ मध्ये ''द इनर लाइट बी-साइड'' यात जॉर्ज हॅरिसन यांच्या समवेत जुगलबंदी केली.

**६) मानसन्मान :**

१) संगीत नाटक अकादमी - १९८४

२) कोणार्क सन्मान - १९९२

३) पद्मभूषण - १९९२

४) यश भारती पुरस्कार - १९९४

५) पद्मविभूषण - २०००

६) मानद डॉक्टरेट, उत्तर ओरिसा विद्यापीठ - २००८

७) गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार - २०२१-२२

८) २०१३ मध्ये माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार द्वारे 'बासरी गुरु' हा चौरसिया यांचे जीवन आणि वारसा दर्शविणारा माहितीपट प्रदर्शित केला. जो त्याचा मुलगा संगीतकार राजीव चौरसिया यांनी दिग्दर्शित केला आहे.

**७) समारोप :**

पंडित हरिप्रसाद चौरसिया यांनी भारतीय संगीताचे सप्तसूर स्वतः समुद्रापलीकडे पोहोचवले. विविध मैफलीतून साऱ्या जगाला बासरीचे मधुर स्वर पाजले, भारतीय अभिजात संगीत व पाश्चात्त्य संगीताचा विलोभनीय समन्वय घडवून आणला. संगीतातील मौलिक योगदानाबद्दल विविध कलावंतांना 'हरिप्रसाद चौरसिया लाइफटाइम अचीवमेंट अवॉर्ड' देऊन सन्मानित करण्यात येते. त्यांचा पुतण्या राकेश चौरसिया हा देखील बासरीवादक असून घराण्याचा वारसा पुढे चालवत आहे.



# ४९.

## उ. झाकीर हुसेन

**१) प्रस्तावना :**

जेव्हा ते आपल्या जादुई बोटांनी तबला वादन करतात तेव्हा ते जगाला मंत्रमुग्ध करतात. त्यांचा तबल्याचा आवाज ऐकून लोक मंत्रमुग्ध होतात आणि नकळतच 'वाह उस्ताद' असे शब्द बाहेर पडतात. ज्यांनी आपल्या कौशल्यपूर्ण वादनाने आणि बुद्धिमत्तेमुळे कलेचा झेंडा देशातच नव्हे तर जगभर फडकवला आहे. आयुष्यात एवढी प्रसिद्धी मिळूनही, साधी राहणी उच्च विचारसरणी या उक्तीप्रमाणे जे जमिनीवर राहतात ते थोर कलावंत म्हणजेच उस्ताद झाकीर हुसेन होय. त्यांच्या सांगीतिक कार्याचा परिचय खालील मुद्द्यांच्या आधारे घेता येईल.

**२) जन्म व बालपण :**

उ. झाकीर हुसेन यांचा जन्म ९ मार्च १९५१ रोजी मुंबई येथे झाला. त्यांच्या वडीलांचे नाव अल्लार खाँ व आईचे नाव बावी बेगम आहे. ग्यानी बाबा नावाच्या सत्पुरूषाने बाबी बेगम यांना मुलाचे नाव झाकीर हुसेन ठेव असे सांगितले. झाकीर याचा एक अर्थ असा की जो जिक्र करतो तो, म्हणजे जिक्र करणे हा सूफी परंपरेचा भाग आहे.

**३) गुरू व शिक्षण :**

पंजाब घराण्याचा मोठा वारसा घेऊन जन्माला आलेल्या उ. झाकीर हुसेन यांची लहानपणापासूनच तबल्यावर बोटे फिरू लागली. त्यांचे तबला वादनाचे शिक्षण उ. अल्लारखाँ यांच्याकडे झाले. त्यांचे शालेय शिक्षण सेंट मॉयकेल हायस्कूल, माहीम येथे तर महाविदयालयीन शिक्षण सेंट झेविअर्स कॉलेज, मुंबई येथे झाले. झाकीर हुसेन आपल्या तबला वादनाचे श्रेय तबलावादनातील त्रिमूर्तींला देतात. ही त्रिमूर्ती म्हणजे पं. सामताप्रसाद, पं किशन महाराज आणि त्यांचे वडील उस्ताद अल्लार खाँ.

**४) परिश्रम :**

घरात परंपरागत तबलावादनाचे वातावरण होते. पहाटे तीन वाजता उठवून अल्लारखाँ (अब्बा) बोल शिकवायचे. तालबद्ध रचना व बोलांचा स्पष्ट निकास, दायाँ- बायाँचे संतुलन आदी बाबी वडीलांच्या मार्गदर्शनाखाली शिकून घेतल्या. झाकीर हुसेन यांनी अथक परिश्रम घेतले. वर्षानुवर्षे केलेला अखंड रियाज, अल्लारखाँ यांचे योग्य मार्गदर्शन यामुळे उ. झाकीर हुसेन एक महान तबलावादक म्हणून उदयास आले. उस्तादांकडे ट्रेनमध्ये बसण्यासाठी राखीव जागा नसल्यामुळे ते वर्तमानपत्र पसरवून बसायचे. तबल्याला कोणाचा पाय किंवा जोडा लागू नये म्हणून तो आपल्या मांडीत ठेवायचे. जोपर्यंत त्यांचा प्रवास सुरू होता तोपर्यंत ते लहान मुलाप्रमाणे तबला आपल्या मांडीवर घेऊन जात असत. संगीत यात्रेदरम्यान पैशांअभावी ते कुटुंबीयांची भेटही घेऊ शकले नाहीत. सततच्या संघर्षानंतर जेव्हा त्यांची आर्थिक स्थिती सुधारली तेव्हा त्यांनी संगीत दौऱ्यातून वेळ काढून कुटुंबाला भेट दिली. सर्व अडचणी पार करून त्यांनी जगभरातील लोकांच्या हृदयात स्थान निर्माण केले. जेव्हा ते तबला वाजवतात तेव्हा लोकांचे भान हरपून जाते आणि नव्या जगाच्या प्रवासाचा आनंद लुटतात. भारतीय शास्त्रीय संगीताच्या विकासात उस्तादांचे मोठे योगदान आहे.

**५) वादनशैली :**

उ. झाकीर हुसेन यांची वादनशैली पंजाब घराण्याची आहे. ते इतर सर्व घराण्यांचादेखील तबला तयारीने वाजवतात. वादनातील तयारी, वादन स्पष्टता, गोडवा, दायाँ-बायाँवरील अप्रतिम संतुलन, गणिती सौंदर्य, क्लिष्ट लयकारीवरील प्रभुत्व या साऱ्याच गोष्टी कल्पनातीत आहेत. स्वतंत्र वादनाबरोबरच गायन, वादन, नृत्याची साथसंगत म्हणजे रसिक प्रेक्षकांना मोठी पर्वणी असते. भारतीय संगीताबरोबरच पाश्चात्य संगीताचा त्यांचा मोठा अभ्यास आहे.

**६) यशस्वीता :**

ईश्वर प्राप्त देणगी लाभलेल्या उ. झाकीर हुसेन यांनी वयाच्या सातव्या वर्षी पाहिला जाहीर कार्यक्रम केला. वयाच्या बाराव्या वर्षी तबलावादनासाठी जगभ्रमण सुरू केले. १९७० मध्ये त्यांनी अमेरिकेत एकाच वर्षात १५० यशस्वी मैफिली केल्या. भारतीय व पाश्चात्य कलावंतासोबत

फ्युजन या प्रकारातून भारतीय संगीताचे महत्त्व सर्व जगामध्ये पोहोचवले. देशविदेशातील विद्यापीठांमध्ये तबलावादनाचे अध्यापनाचे कार्य ते करीत आहेत. सॅनफ्रॅन्सिस्को आणि मुंबई येथील आपल्या अकादमीच्या माध्यामातून विदयार्थ्यांना तबलावादनाचे अनमोल असे मार्गदर्शन करीत आहेत.

**७) मानसन्मान :**

उ. झाकीर हुसेन यांना पद्मश्री, पद्मभूषण, संगीत नाटक अकादमी पुरस्कार, ग्रॅमी अॅवार्ड असे पुरस्कार मिळालेले आहेत. अमेरिकेची प्रतिष्ठित नॅशनल हेरीटेज फेलोशिप. 'आणि १९९८' या दोन डॉक्युमेंट्री फिल्म त्यांच्या जीवनावर तयार करण्यात आल्या आहेत. १९८३ साली प्रदर्शित 'हार्ट अँड डस्ट' चित्रपटापासून त्यांनी चित्रपटाला संगीत देण्यास प्रारंभ केला. 'साज' या चित्रपटात त्यांनी भुमिका केली आहे., या चित्रपटांना उस्तादजींनी संगीत दिलेले आहे. २०१८ साली 'माझं तालमय जीवन' हे प्रणव सखदेव यांनी अनुवाद केलेले पुस्तक प्रकाशित झाले आहे. २२ मार्च २०२३ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते त्यांना पद्मविभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात करण्यात आले.



# ५०.

## पुण्यभूषण डॉ. प्रभा अत्रे

**१) प्रस्तावना :**

भारतीय संगीतातील गायक, वादक, नर्तक व संगीतकारांनी संगीताप्रति आपली अस्था दाखवत आपली प्रतिभा, कठोर परिश्रम व रियाजातून भारतीय संगीताची सेवा केली. अशाच एक महान कलावंत म्हणजे डॉ. प्रभा अत्रे. त्यांच्या सांगीतिक कारकीर्द पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**२) जन्म व बालपण :**

डॉ. प्रभा अत्रे यांचा जन्म १३ सप्टेंबर १९३२ पुण्यात आबासाहेब

आणि इंदिराबाई अत्रे यांच्या पोटी झाला. लहानपणी अत्रे आणि त्यांची बहीण उषा यांना संगीताची आवड होती, पण दोघींनीही संगीता करिअर करण्याचा विचार केला नाही. अत्रे आठव्या वर्षांच्या असताना इंदिराबाईंची तब्येत बरी नव्हती आणि शास्त्रीय संगीताचे धडे घेतल्याने त्यांना बरे वाटेल असे मित्राच्या सांगण्यावरून त्यांनी काही धडे घेतले. ते धडे ऐकून अत्रे यांना शास्त्रीय संगीत शिकण्याची प्रेरणा मिळाली. डॉ. प्रभाताईंच्या घरात सांगीतिक वातावरण नव्हते. असे असले तरी शालेय शिक्षण घेत असतानाच गायन, नाट्य व चित्रकला या स्पर्धांत त्या उत्स्फूर्तपणे सहभागी व्हायच्या. विज्ञान व विधीची पदवी घेत असतानाच त्या 'शारदा', 'विद्याहरण' स्वयंवर व 'संशयकल्लोळ' इ. संगीत नाटकांतून आवडीने भूमिका साकारायच्या.

**३) गुरू आणि शिक्षण :**

डॉ. प्रभा अत्रे यांनी हिराबाई बडोदेकर व पं. सुरेशबाबू माने यांच्याकडून किराणा घराण्याची विधिवत तालीम घेतली. उ.अमीर खाँ यांच्या गायकीचा प्रभाव त्यांच्यावर होता. पारंपरिकता व नाविन्य यांचा विलोभनीय संगम साधत त्यांनी स्वतःची गायकी निर्माण केली. कथ्थक नृत्य प्रकाराचे त्यांनी औपचारिक प्रशिक्षणही घेतले आहे. संगीत शिकत असतानाच अत्रे यांनी पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयातून विज्ञान शाखेची पदवी मिळवली. पुढे त्यांनी पुणे विद्यापीठाच्या लॉ कॉलेजमधून एल.एल.बी. ही पदवी प्राप्त केली. त्यांनी गांधर्व महाविद्यालय मंडळातून संगीत अलंकार व संगीताचार्य या पदव्या संपादन केल्या. ट्रिनिटी क्लब कंझर्व्हेटरी ऑफ म्युझिक अँड डान्स, लंडन येथेही शिक्षण घेतले आहे. पुढे त्यांनी संगीतात पीएच.डी ही केली.

**४) सांगीतिक कार्य :**

१९६५ साली ऑल इंडिया रेडिओवर 'असिस्टंट प्रोड्यूसर फॉर क्लासिकल अँड लाइट म्युझिक'च्या जागेवर त्यांची निवड झाली. रांची, नागपूर व मुंबई आकाशवाणी केंद्रावर त्यांनी १० वर्षे कार्य केले. या कालावधीत त्यांनी अभिजात संगीताला प्रोत्साहन दिले व संगीताचा प्रचार केला. पुढे मुंबई येथील एसएनडीटी विद्यापीठात संगीत विभागप्रमुख म्हणून दायित्व स्वीकारले. या काळात त्यांनी संगीताच्या पाठ्यक्रमात आमूलाग्र बदल घडवून आणले. नेदरलँड्समधील रॉटरडॅम कंझर्व्हेटरीसह पश्चिमेकडील काही संस्थांमध्ये ती व्हिजिटिंग प्रोफेसर आहेत. म्युझिक कंझर्व्हेटरी येथे व्हिजिटिंग प्रोफेसर म्हणून कार्य केले. भारतातील प्रमुख संगीत संमेलनांतून त्यांनी मैफली

सादर केल्या आहेत. याचबरोबर युरोप-अमेरिका व इतर देशांत जाऊन त्या अभिजात संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत.

**५) गायकी :**

अत्रे या सध्या किराणा घराण्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या देशातील ज्येष्ठ गायकांपैकी एक आहेत. सुरेल व घुमारेदार स्वरांची त्यांना देणगी लाभलेली आहे. त्यांचा स्वर अत्यंत कसदार व सुरेल असल्यामुळे अत्यंत आकर्षक वाटतो. गायनातील सुरेलपणा, आलापचारीचे अनेक प्रकार, मींड व कणयुक्त प्रयोग इ. विशेषतः त्यांच्या गायनात दिसून येतात. भावपूर्ण स्वरलगाव, अचूक स्वरस्थाने इ. मुळे श्रोते स्वरांचा आस्वाद आनंदाने घेतात. स्पष्ट शब्दोच्चार, आलाप, ताणांची तयारी व सरगमावरील प्रभुत्वामुळे श्रोते एका वेगळ्या भावविश्वात रमून जातात. त्यांच्या गायकीत रागदर्शनापेक्षा स्वरदर्शन अधिक जाणवते. त्या उत्तम 'वाग्गेयकार' आहेत. गायन करताना त्या स्वतः बांधलेल्या बंदिशी प्रस्तुत करतात. मारुबिहाग रागातील 'जागू मैं सारी रैना' कलावती रागातील 'तन, मन, धन' या त्यांच्या बंदिशी अजरामर झाल्या आहेत. ख्याल, ठुमरी, दादरा, गझल, गीत, नाट्यसंगीत आणि भजन अशा विविध संगीत शैलींमध्ये त्या पारंगत आहेत. भारतीय शास्त्रीय गायन संगीताला जागतिक स्तरावर लोकप्रिय करण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे.

**६) संगीतकार :**

डॉ. प्रभाजी यांनी संगीतकार म्हणून स्वरंगिनी आणि स्वरंजनी या रचनांचे पुस्तक प्रकाशित केले. त्यांनी अपूर्व कल्याण, दरबारी कौंस, पटदीप-मल्हार, शिव काली, तिलंग-भैरव, रविभैरव आणि मधुरकैंस यांसारख्या नवीन रागांचाही आविष्कार केला. भरतनाट्यम नृत्यांगना सुचेता भिडे चापेकर यांनी कोरिओग्राफ केलेल्या 'नृत्य प्रभा' या नृत्य कार्यक्रमासाठी रचनांना त्यांनी संगीत दिले. नेदरलँड्सच्या सुझैन अबुहल यांनी जॅझसाठी संगीत रचना केली.

**७) ग्रंथ लेखन :**

अत्रे यांनी भारतीय शास्त्रीय संगीत या विषयावर अनेक व्याख्याने दिली आणि लेखन केले. अत्रे यांच्या नावावर ११ पुस्तके (एका व्यासपीठावरून) प्रकाशित करण्याचा जागतिक विक्रम आहे. १८ एप्रिल २०१६ रोजी इंडिया हॅबिटॅट सेंटर, नवी दिल्ली येथे हिंदी आणि इंग्रजीमध्ये संगीतावरील ११ पुस्तकांचे प्रकाशन केले. तसेच इंग्रजी भाषेतूनही पुस्तके लिहून सांगीतिक साहित्यात मोलाची भर टाकली आहे.

**८) शिष्य संप्रदाय :**

इ.स. १९६९ पासून त्या संगीत अध्यापन करत आहेत. पुण्यातील 'स्वरमयी गुरुकुलातून' त्या भावी पिढीस संगीताचे ज्ञानामृत पाजीत आहेत. तसेच गानवर्धन संस्थेच्या माध्यमातून त्या नवोदित अभिजात कलावंतांना मुक्त व्यासपीठ मिळवून देत आहेत. प्रभाताईंच्या शिष्यवर्गात अनेक आकाशवाणी कलाकार, दूरदर्शन कलाकार, पार्श्वगायक, संशोधक, हिंदुस्तानी संगीत गायक इत्यादींचा समावेश होतो. त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये भारतीय व परदेशी कलावंतांचा समावेश असून त्यांच्या १० विद्यार्थ्यांना आज पर्यंत डॉक्टरेट शिष्यवृत्ती मिळाली आहे. त्यांच्या शिष्यवर्गात सरला देसाई, डॉ. आशा पारसनीस - जोशी, रागिणी चक्रवर्ती, पद्मिनी राव, आरती ठाकुर, चेतना बाणावत, अश्विनी मोडक, वीणा कुलकर्णी व अतींद्र सरवडीकर यांचा समावेश आहे.

**९) मानसन्मान :**

डॉ. प्रभाताईंच्या या मौलिक कार्याबद्दल श्री शंकराचार्यांनी 'गान - प्रभा' हा किताब देऊन सन्मानित केले. १९९० साली भारत सरकारने पद्मश्री हा पुरस्काराने प्रदान केला. १९९१ साली केंद्र सरकारने 'संगीत नाटक अकादमी पुरस्कार' दिला. २००२ साली भारत सरकारने पद्मभूषण पुरस्काराने गौरवान्वित केले. त्यांच्या वयाच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त रसिकांनी त्यांना 'स्वरयोगिनी' हा किताब बहाल केला. भारत सरकारच्या वतीने २०२२ चा पद्मविभूषण पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

**१०) समारोप :**

२०११ पासून तात्यासाहेब नातू ट्रस्ट आणि गानवर्धन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ''स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे राष्ट्रीय शास्त्रीय संगीत पुरस्कार'' दिला जातो. त्या अनेक सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक संस्थांसाठी समिती सदस्य म्हणून काम करत अशा या थोर कलावंतास वयाच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त पुण्यात 'पुण्यभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अशा थोर यांना २०२३ मध्ये वयाची ९० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल 'हरिप्रसाद चौरसिया लाईफ टाईम अचीवमेंट अवार्ड' या पुरस्कार सन्मानित करण्यात आले. अशा या पुण्यभूषण डॉ. प्रभा अत्रे यांच्या हातून नादब्रह्माची अशीच सेवा घडो, अशी ईश्वरचरणी नम्र प्रार्थना.



# ५१.

## पंडित अजय चक्रवर्ती

**१) प्रस्तावना :**

अभिजात शास्त्रीय संगीत..! आपल्याला देशाने जगाला दिलेली महत्त्वपूर्ण देणगी. मनाला शांत करून एका वेगळ्या भावविश्वात घेऊन जाणारी, मनाचे रंजन करणारी ही कला अनेक कलावंतांनी अत्यंत प्राणपणाने जोपासली. तोच वारसा पुढे घेऊन ही कला जोपासण्याचे कार्य वर्तमान काळातील अनेक कलावंत करीत आहेत. त्यापैकी पंडित अजय चक्रवर्ती यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. त्यांच्या जीवनकार्याचा आढावा पुढील मुद्द्यांच्या आधारे पाहता येईल.

**२) जन्म व बालपण :**

पंडित अजयजी यांचा जन्म २५ डिसेंबर १९५२ रोजी कोलकाता येथे झाला. हिंदुस्थानच्या फाळणीच्या परिस्थितीत त्यांचे वडील बांग्लादेशातील आपल्या मूळ गावातून भारतात येऊन पश्चिम बंगालमधील श्यामनगर येथे स्थायिक झाले.

**३) गुरु व शिक्षण :**

त्यांनी संगीत या विषयात पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण कोलकाता येथील प्रसिद्ध रवींद्र भारती विद्यापीठातून पूर्ण केले. दोन्ही अभ्यासक्रमात त्यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. पं.अजय चक्रवर्ती यांचे पहिले गुरू म्हणजे त्यांचे वडील अजितकुमार चक्रवर्ती. त्यानंतर पन्नालाल सामंत, कनाईदास बैगारी, ज्ञानप्रकाश घोष यांच्याकडे त्यांचे सांगीतिक शिक्षण झाले. अजय चक्रवर्तींनी याशिवाय हिराबाई बडोदेकर, निवृत्तीबुवा सरनाईक, लताफत हुसेन खाँ यांच्याकडेही तालीम घेतली. त्यांनी कर्नाटकी संगीताची तालीम एम्.बालमुरलीकृष्णन्? यांच्याकडून घेतली.

### ४) गायकी :

पंडित अजय चक्रवर्ती हे आजच्या सर्व महान भारतीय शास्त्रीय गायकांमध्ये एक मोठे व्यक्तिमत्व म्हणून उभे आहेत. पं.चक्रवर्ती हे पतियाला घराण्याचे कलावंत आहेत.जरी त्यांना पतियाळा घराण्याचे उत्तराधिकारी मानले गेले तरी ते प्रामुख्याने उस्ताद बडे गुलाम अली खान साहिब यांच्या गायनाचे प्रतिनिधित्व करतात. ते इंदूर, दिल्ली, जयपूर सारख्या भारतातील इतर प्रमुख शास्त्रीय घराण्यांशी देखील संबंधित आहेत. ते ख्यालगायकीसाठी प्रसिद्ध आहेत. त्याव्यतिरिक्त टप्पा, ठुमरी, भजन, कीर्तन, लोकसंगीत असे गायनप्रकारही ते सादर करतात. त्यांनी विविध भारतीय भाषांमधून चित्रपट संगीत, उपशास्त्रीय गायन असे सांगीतिक प्रकार गायलेले आहेत. अशा प्रकारची विविधता भारत मोर्चा कलावंतांमध्ये दिसून येते.

### ५) सांगीतिक योगदान :

बीबीसी या मान्यताप्राप्त व्यासपीठाने भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त पंडित अजय चक्रवर्ती यांना गायनासाठी विशेष आमंत्रित केले होते. पाकिस्तान आणि चीन या देशांनी गायनासाठी आमंत्रित केलेले ते पहिले हिंदुस्थानी शास्त्रीय गायक असल्याचे मानले जाते. जगभरातील प्रसिद्ध अशा सांगीतिक व्यासपीठावरून पंडित चक्रवर्ती यांनी आपली कला सादर केली आहे.

### ६) गुरुकुल :

पंडित चक्रवर्ती यांनी आपल्या वडिलांपासून प्रेरणा घेऊन हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचे प्रशिक्षण देणारी 'श्रुतिनंदन' नावाची शिक्षण संस्था १९९७ साली कोलकाता येथे स्थापन केली. यातून ते पुढील पिढीसाठी मोलाचे मार्गदर्शन करीत आहेत. त्यांच्या शिष्यामध्ये त्यांच्या कन्या कौशिकी चक्रवर्ती या अपल्या वडिलांचा वारसा खांद्यावर घेवून अत्यंत योग्य प्रकारे अभिजात शास्त्रीय संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत. याबरोबरच कविता कृष्णमूर्ती, श्रीकातो आचार्य, मोनोमय भट्टाचार्य, पूरबायन चटर्जी, स्नेहाशीष मजुमदार, देबाशीष भट्टाचार्य, ब्रजेश्वर मुखर्जी, अनोल चॅटर्जी, देबोर्शी भट्टाचार्य आदी नवोदित तरुण प्रतिभाही त्यांच्याकडून ज्ञानार्जन करीत आहेत.

### ७) मानसन्मान :

पं. चक्रवर्ती यांना राष्ट्रीय पुरस्कार (१९८९), कुमार गंधर्व सन्मान

(१९९३), संगीत नाटक अकादमी पुरस्कार (२०००), बंग विभूषण अवॉर्ड (२०१२) आदी पुरस्कार मिळाले आहेत. २०११ मध्ये त्यांचा पद्मश्री पुरस्कार देऊन गौरव झाला आहे. त्यांना २०१५ साली मध्यप्रदेश सरकार कडून दिला जाणारा तानसेन संगीत पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**८) समारोप :**

अगदी कोवळ्या वयात, पंडित अजय चक्रवर्ती यांनी संगीत क्षेत्रातील त्यांची उत्कृष्टता सिद्ध केली आणि तेव्हापासून ते ज्येष्ठ-तरुणांनी त्यांचे कौतुक केले. त्यांच्या संपूर्ण संगीत प्रवासात त्यांना या स्तुतीने प्रेरणा मिळाली आणि त्यांनी त्यांचे संपूर्ण आयुष्य संगीत शिकण्यासाठी, समजून घेण्यासाठी आणि साजरे करण्यासाठी पूर्ण समर्पण आणि अत्यंत कठोर परिश्रमाने समर्पित केले आहे. त्यांचे संपूर्ण आयुष्य स्वतःचे गुरू पंडित ज्ञानप्रकाश घोष, दिग्गज सतार वादक पंडित रविशंकर, गुणी सरोद वादक उस्ताद अली अकबर खान यांच्यापासून ते उस्ताद झाकीर हुसेन, पंडित शंकर घोष यांसारख्या आधुनिक काळातील उस्तादांपर्यंत भारतीय तसेच जागतिक संगीत क्षेत्रातील अक्षरशः सर्वांनी कौतुक केले आहे. यावरुन त्याची निर्विवाद प्रतिभा आणि जबरदस्त कामगिरी दिसुन येते.

१) संगीत कला विहार, किशोरी आमोणकर विशेषांक, मिरज, १९८८.

२) मारुलकर, दत्ता, गानसरस्वती, श्रीपाद प्रकाशन, पुणे, २००३

३) दैनिक लोकसत्ता

पुस्तक - स्वरगंगा गंगुबाई हनगल (लेखिका - संध्या देशपांडे) अनुबंध प्रकाशन (पुणे सन २०२०)

गानयोगी शिवपुत्र, पंढरीनाथ कोल्हापुरे, संपा. श्रीरंग संगोराम, पुणे, १९९९.

Deshpande, Waman Hari, Between Two Tanpuras, Mumbai, 2013 (Reprint)

समीक्षक : सु. र. देशपांडे

मराठी विश्वकोश

महाराष्ट्र टाईम्स, ६ जानेवारी २२, डॉ कीर्ती आगाशे